03-04-2007 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

GRB/ 11:00

03-04-2007 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही) A-1

GRB/ KGS/ KTG/ 11:00

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

<u>सभागृहातील कोरमबाबत.</u>

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सभागृहामध्ये कोरम नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय शिक्षण मंत्री प्रा.वसंत पुरके यांच्या उपस्थितीमध्ये आज सभागृहाची बैठक सुरु होणार म्हणून मी सभागृह सुरु होण्यापूर्वी त्यांचे अभिनंदन केले. सभागृहामध्ये कोरम नाही. या सभागृहाकडे जर असे दुर्लक्ष केले जाणार असेल तर हे सभागृह बरखास्त करावे. सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण दिले पाहिजे. सभापती म्हणून या सभागृहाची प्रतिष्ठा राखण्याची जबाबदारी आपली आहे. आपण सत्ताधारी पक्षाला किती वेळा समज देणार आहात ? मला असे वाटते की, एक दिवस तुमच्यावर राजीनामा देण्याची वेळ येईल. तुमची भावनात्मक होण्याची पद्धत मला माहिती असल्यामुळे, मी असे म्हणालो. आपण सत्ताधारी पक्षाला समज द्यावी, अशी माझी विनंती आहे.

उपसभापती : मी सभागृहाची बैठक 11.15 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11वाजून 03 मिनिटांनी सकाळी 11 वाजून 15 मिनिटांपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.गागरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहात आता देखील गणपूर्ती नाही. सत्ताधारी पक्षाचे पुरेसे सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत. सभागृहात गणपूर्ती ठेवण्याची जबाबदारी सत्ताधारी पक्षाची आहे. गणपूर्ती नसल्यामुळे सभागृहाचा वेळ वाया जात आहे. आज मराठी भाषेची गळचेपी होत असल्याबाबतच्या प्रस्तावावर चर्चा होणार आहे. गणपूर्ती नसल्यामुळे सभागृह स्थगित करावे लागले त्यामुळे या चर्चेसाठी दिलेला वेळ वाया गेला आहे, त्यामुळे प्रस्तावावरील चर्चेचा वेळ वाढवून देण्यात यावा, ही आमची मागणी आहे.

तालिका सभापती : माझी विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांनी चर्चा सुरु करावी. थोडया वेळाने सदस्य येतील व गणपूर्ती होईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, नाही, या बाबत आम्ही सहमत नाही. गणपूर्ती झाल्याशिवाय चर्चा सुरु करता येणार नाही. गणपूर्ती ठेवण्याची जबाबदारी सत्ताधारी पक्षाची आहे, गणपूर्ती झाली नाही तर त्याची जबाबदारी विरोधी पक्षाची आहे का ? नेहमी बोलले जाते की, विरोधी पक्ष ढेपाळला आहे, कूचकामी आहे. मग गणपूर्ती ठेवण्याची जबाबदारी सत्ताधारी पक्षाची नाही का ? हे आम्ही विचारु इच्छितो.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, विरोधी पक्षाचे सदस्य सभागृहात उपस्थित होते, गणपूर्ती झाली होती, परंतु 2-3 सदस्य सभागृहाच्या बाहेर गेले आहेत. गणपूर्ती ठेवण्याची जबाबदारी सत्ताधारी पक्षाची आहे, याच्याशी मी सहमत आहे परंतु गणपूर्ती न होऊ देण्याची प्रवृत्ती विरोधी पक्षाची आहे का ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, गणपूर्ती करण्याची जबाबदारी विरोधी पक्षाकडे द्या, आम्ही ती पार पाडू. सभागृहात गणपूर्ती नाही, त्यामुळे आपण सभागृहाची बैठक स्थगित करावी, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

तालिका सभापती : गणपूर्तीअभावी मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.18 ते 11.30 वाजेपर्यंत स्थगित झाली)

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर ....)

सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री. रामनाथ मोते

तालिका सभापती : सभागृहामध्ये गणपूर्ती झालेली आहे. तरी आता आपण रितसर सभागृहाच्या कामकाजास सुरूवात करू या. आता सभागृहापुढे नियम 260 अन्वयेचा दिनांक 30 मार्च 2007 रोजीचा प्रस्ताव आहे. तो चर्चेला घेतला जाईल. या प्रस्तावावरील चर्चा थांबविण्यात आली होती तेव्हा माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांचे भाषण सुरू होते. तरी आता सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण पुढे सुरू करावे.

पृ.शी. : राज्यात सर्वच ठिकाणी मराठीची गळचेपी होत असल्यामुळे मराठी भाषेचा वापर अनिवार्य करणे.

मु.शी. : राज्यात सर्वच ठिकाणी मराठीची गळचेपी होत असल्यामुळे मराठी भाषेचा वापर अनिवार्य करणे याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत, श्री.मधुकर चव्हाण, श्री.अरविंद सावंत, श्री.संजय केळकर, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री. रामनाथ मोते, श्री. श्रीकांत जोशी वि.प.स. यांचा नियम 260 अन्वये प्रस्ताव. (चर्चा पुढे सुरू ....)

--

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, परवाच्या दिवशी आम्ही जो मराठी भाषा विषयक प्रस्ताव येथे मांडला होता त्यावर बोलत असताना आपण ही चर्चा थांबविली होती. ती चर्चा मी आता पुढे सुरू करीत आहे. ....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, एका गोष्टीची नोंद सभागृहाच्या रेकॉर्डवर होणे आवश्यक असल्याने मी आपल्या परवानगीने आपला एक मिनिटाचा वेळ घेऊन बोलू इच्छितो. सभापती महोदय, परवाच्या दिवशी ही चर्चा आपण अर्धवट थांबविली आणि आज सकाळी 11.00 वाजता सभागृहाची खास बैठक घेऊन ही चर्चा घेण्याचे आपण सर्वानुमते ठरविले होते. या चर्चेसाठी आम्ही वेळेवर आलो होतो. परंतु सभागृहामध्ये सत्तारूढ पक्षाकडून पुरेशी गणसंख्या नसल्याने सभागृहाचे कामकाज आपल्याला दोन वेळा तहकूब करावे लागले. त्यात सभागृहाचा अर्धा तास केला. आता मराठी भाषेच्या बाबतीत आपण आम्हाला संरक्षण दिले, आपण त्याची प्रतिष्ठा राखण्याचा प्रयत्न केला. पीठासीन अधिकाऱ्यांनी पहिल्यांदाच एक वेगळी भूमिका घेतली, पण असे

..... सी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

असतानाही सत्तारूढ पक्षाने जाणून बुजून आतापर्यंत मराठीची गळचेपी केली आहे आणि आताही करीत आहे हे दाखविण्यासाठीच आम्ही हा प्रस्ताव येथे आणला. यावर चर्चेसाठी देखील सत्तारूढ पक्षाकडून सभागृहामध्ये पुरेशी गणसंख्या ठेवणे होत नाही आणि त्यामध्ये नाहक सभागृहाचा या चर्चेसाठीचा अर्धा तास वेळ फुकट घालविला. तेव्हा या चर्चेचा वाया गेलेला हा कालावधी या चर्चेसाठी आम्हाला मिळाला पाहिजे हे मी येथे मुद्दाम नमूद करतो. तसेच सत्र समाप्तीच्या वेळी जो कामकाजाचा आढावा सभागृहाला दिला जातो त्यात कोरम अभावी सभागृहाचा किती वेळ वाया गेला याचीही माहिती देणे आवश्यक आहे याचीही आपण दखल घ्यावी.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर 47 वर्षांनंतर आम्हाला आज मराठी भाषा विषयक प्रस्ताव सदनामध्ये मांडावा लागतो हेच दुर्दैव आहे आणि या दुर्दैवाचा पुढील भाग असा आहे की, या मराठी भाषा विषयक प्रस्तावावरील चर्चा आज येथे सुरू करताना सत्तारूढ पक्षाने स्वत: सभागृहात गणसंख्या राखण्याची जबाबदारी पार पाडली नाही आणि त्यामुळे सभागृहाची बैठक दोन वेळा तहकूब करावी लागते, हे दुसरे दुर्दैव. सत्तारूढ पक्षाची जबाबदारी सत्तारूढ पक्षाला समजत नसेल तर आपण ती त्यांना समजावून देऊन पुढील वेळेस अशी चूक होऊ नये याची काळजी घेतली गेली पाहिजे. यानंतर मी आता मुख्य विषयाकडे वळतो.

सभापती महोदय, मराठी विषयक प्रस्तावावर चर्चा करताना आज मी प्रथमत: आजच्या 'महाराष्ट्र टाईम्स' या दैनिक वर्तमानपत्रातील एक बातमीकडे आपले लक्ष वेधणार आहे. ही बातमी वाचल्यानंतर मला आश्चर्य वाटले. मराठी भाषा विषयक चर्चा येथे चालली असताना, मुंबई महाराष्ट्राला कशी मिळाली याची चर्चा चालली असताना या मुंबई शहरामध्ये काही शहाणे लोक असे आहेत की, 'मुंबईसाठी महापालिका नकोच' अशा शीर्षकाखाली मागणी केल्याची बातमी आली आहे. माननीय मंत्री महोदयांनी याची दखल घ्यावी आणि या लोकांची देखील दखल घ्यावी. सभापती महोदय, ही बातमी मी आपल्याला येथे वाचून दाखवितो. या बातमीमध्ये म्हटले आहे की, "मुंबईला टोकियो किंवा फ्रँकफर्टच्या दर्जाचे आंतरराष्ट्रीय आर्थिक केंद्र बनवायचे असेल तर परप्रांतियांचे स्वागत करा. मुंबईचा कारभार महापालिकेकडून काढून घेऊन स्वतंत्र विभागाकडे सोपवा. अशा धक्कादायक सूचना बड्या अधिकाऱ्यांच्या समितीने केल्या आहेत. .." हे बडे

..... सी 3 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार .....

अधिकारी लोक कोण आहेत ? तर आयआयसीआय बँकेचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक के.व्ही.कामत, म्हणजे कर्नाटकीय माणूस., स्टेट बँकेचे माजी मुख्य व्यवस्थापकीय संचालक श्री.ओ.पी.भट्ट, हेही कर्नाटकवाले. यांच्या समितीने भारतातील एसईझेड आणि फायनान्शिअल हबच्या भरभराटीसाठी कठोर उपायांची गरज असल्याचे या अहवालात स्पष्ट केले आहे. ...

(यानंतर श्री. सरफरे ..... डी 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

मुंबईला कॉस्मोपोलिटन चेहरा द्यायला हवा. केवळ काही क्षेत्र आर्थिक विकासासाठी राखीव ठेवून मुंबईला जागतिक शहर बनवता येणार नाही. त्यासाठी भूमीपूत्रासारखे मुद्दे बाजूला सारायला हवेत. प्रांतिकतेच्या भिंती पाडून परप्रांतियांचे स्वागत करायला हवे. त्या बरोबरच सर्व देशांतून आलेल्या नागरिकांचेही स्वागत करायला हवे. परदेशातून येणाऱ्यांपैकी 25 ते 30 टक्के भारतीय वंशाचे असावे, असेही समितीने म्हटले आहे.

मुंबई महापालिकेच्या कारभारावर टीका करीत या महानगराचा संपूर्ण कारभार एका स्वतंत्र व्यवस्थापकीय विभागाकडे देण्याची गरज आहे. या विभागाला महसूल उभारणीचे अधिकार आणि आर्थिक स्वायत्तता हवी. त्यावरील सभासद निवडून आलेले किंवा नियुक्ती केलेले असावेत, असा पर्यायही त्यांनी सुचविला."

सभापती महोदय, आजच्या महाराष्ट्र टाईम्स या वर्तमानपत्रामध्ये ही बातमी छापून आली आहे. त्यामुळे ती असत्य असण्याची शक्यता नाही ही गोष्ट निर्विवाद आहे. मला या निमित्ताने शासनाला प्रश्न विचारावयाचा आहे की, महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतर या राज्यामध्ये महाराष्ट्राचे मंत्रीमंडळ काम करीत आहे. तेव्हा या राज्यामध्ये मंत्रीमंडळ कार्यरत असतांना अशाप्रकारच्या बातम्या, अशाप्रकारचे विचार कोण प्रकट करु शकतो? त्याची हिंमत कशी होते? हा भट कोण आहे? याकरिता महाराष्ट्र शासनाने काळजी घ्यावी. आजच्या चर्चेला ज्यावेळी मंत्रीमहोदय उत्तर देतील त्यावेळी त्यांनी मी उपस्थित केलेल्या या मुद्दयांबाबतही खुलासा करावा असे मला याठिकाणी नमूद करावेसे वाटते.

सभापती महोदय, या प्रस्तावावर त्या दिवशी बोलत असतांना मी काही सूचना केल्या होत्या. आज पुन्हा काही सूचना करुन मी माझे भाषण थांबविणार आहे. दिनांक 12.1.2007 च्या महाराष्ट्र टाईम्समध्ये छापून आलेले वृत्त आपणास वाचून दाखवितो. "महाराष्ट्रात सर्व कार्यालयातील कारभार आणि पत्रव्यवहार मराठीतूनच चालेल आणि केवळ अन्य राज्यांशी पत्रव्यवहार करताना वेगळया भाषेची मदत घ्यावी असे सत्ताधाऱ्यांनी या नोकरशहांना सांगायला हवे. पण कोणत्याच सत्ताधाऱ्यांनी आग्रह धरला नाही. आपले नामफलक इंग्रजीतच ठेवणारे अधिकारी हे मराठीचे मारेकरी आहेत, हे ओळखायला हवे.".

सभापती महोदय, वर्तमानपत्रे ही लोकांमध्ये एकप्रकारे वैचारिक प्रबोधन करणाऱ्या संस्था आहेत. तेव्हा त्यांनी दिलेल्या सल्ल्यांकडे महाराष्ट्र सरकारने लक्ष द्यावे. दिनांक 26 जानेवारी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

2007 च्या दै. सामना या वर्तमानपत्रामध्ये छापून आलेल्या बातमीतील ठराविक मुद्दे आपणास वाचून दाखवितो. "शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी तमाम मराठी जनतेला मराठीतच बोलण्याची शपथ घेण्याचे आवाहन केले आहे. इतर परप्रांतीय परस्परांशी त्यांच्याच मातृभाषेत बोलतात व आपल्या मराठी माणसांना मात्र मराठीतच बोलण्याचे आवाहन शिवसेनाप्रमुखांना करावे लागते ही खेदाची गोष्ट आहे.

शिवसेना निर्मितीनंतर शिवसेनाप्रमुखांनी शिवसैनिकांना दोन दंडक घातले होते. एक असा की, परस्परांना भेटल्यावर प्रत्येकाने "जय महाराष्ट्र" असा महाराष्ट्राचा जयजयकार करुन अभिवादन केलेच पाहिजे. दुसरा दंडक असा की, कोणत्याही सभास्थानी भाषण करणाऱ्या वक्त्याने भाषणाचा समारोप करताना आपल्या राष्ट्राला प्रथम मान देऊन "जय हिंद" व महाराष्ट्राला दुसरा मान देऊन "जय महाराष्ट्र" असे म्हटलेच पाहिजे." अशाप्रकारचा दंडक त्यांनी घालून दिला. "मराठी भाषा व संस्कृती टिकविणे मराठी महिलांच्या हाती मोठया प्रमाणात आहे. त्यासाठी सर्व महिला मंडळांनी तसेच महिला संस्थांनी व मराठी भाषेत प्रसारित होणाऱ्या दूरदर्शन व आकाशवाणीच्या महिलांच्या कार्यक्रमातून प्रसार करणे अत्यंत जरुरीचे आहे. असंख्य घरातून आई बाबा जाऊन त्यांची जागा पप्पा-मम्मी किंवा डॅड-मॉमने घेतली आहे. तेथे पुन्हा आई-बाबा आणण्याचे मराठी महिलांनी आवाहन केले पाहिजे.

मराठी भाषा वाढविण्यासाठी प्रत्येक मराठी माणसाने दक्ष राहिले पाहिजे. मुद्दाम जर कोणी इंग्रजी व हिंदी भाषेत तुमच्याशी बोलल्यास त्याला आपण दोघेही मराठी आहोत अशी समज द्यावी व इंग्रजी येणे म्हणजे विद्वत्ता आणि प्रतिभेचे लक्षण नाही असे समजवावे."

सभापती महोदय, दै. लोकमत हे कॉंग्रेस पक्षाचे मुखपत्र मानले जाते. त्या वर्तमानपत्रामध्ये छापून आलेली बातमी आपणास वाचून दाखवितो. "आज महाराष्ट्रात काय दिसते? 1 मे, 1960 ला मराठी राज्याची स्थापना झाली. मराठीला राजभाषेचा दर्जा मिळाला, मात्र तिला राजवैभव मिळाले नाही. मराठीच्या नावाची व्दाही खऱ्या अर्थाने राज्यात फिरलीच नाही. गेल्या 47 वर्षात न्यायालयीन कामकाज आम्ही मराठीत करु शकलो नाही. मराठी बोलायला मराठी माणसाला लाज वाटते. खुद्द राजधानीत मराठी अस्तित्वहीन झाली आहे. मराठी शाळा शेवटचे आचके देत आहेत. इंग्रजी पाटया शहरा-शहरातच नव्हे तर विधानभवनातही मराठीच्या छातीवर पाय देऊन दिमाखात मिरवीत आहेत.

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

03-04-2007 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही)D 3

DGS/ KGS/

श्री. मधुकर सरपोतदार...

मराठी राज्याच्या खाणाखुणा राज्यात दिसतच नाहीत. डोक्यावर राजमुकुट आणि अंगावर फाटकी वस्त्रे अशा अवस्थेत मराठी मंत्रालयाच्या दारात उभी आहे. अशी खंत कुसुमाग्रजांनी व्यक्त केली होती".

(यानतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरू...

सभापती महोदय, "सामना" या दैनिकामध्ये दिनांक 27-2-2007 रोजी दुसरी एक बातमी आलेली आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "बृहन्मुंबईसाठी तर मराठी भाषा ऐच्छिक भाषा मांडणारी तरतूद आहे. म्हणजेच बृहन्मुंबईसाठी वेगळी आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी वेगळी तरतूद असा सगळा खेळ चालतोय. या सर्व विसंगत तरतुदी असताना न्यायालयीन कामकाजाची भाषा मराठी व्हावी अशी खरीच शासनाची इच्छा आहे काय, याबद्दल शंका येते" या सगळ्या मुद्यांची उत्तरे शासनाकडून मिळावीत अशी अपेक्षा आहे. "अर्थशास्त्र, विज्ञान, तंत्रज्ञान व करिअर याकरिता ज्ञानभाषा म्हणून मराठीला विकसित करण्यात आपण अपयशी ठरलो. याला आपल्या राजकीय नेत्यांकडे इच्छाशक्तीचा असलेला अभावही कारणीभूत आहे. त्यामुळे भाषावार प्रांतरचना करून आपण नेमके काय साध्य केले, याचा विचार करण्याची गरज आहे. महाराष्ट्रात मराठीची जेवढी उपेक्षा झाली त्यापेक्षा अन्य राज्यामधील प्रादेशिक भाषांची कमी उपेक्षा झाली असली तरी त्या भाषाही ज्ञानभाषा झालेल्या नाहीत..... अरूण साधू." साहित्य संमेलनामध्ये बोलताना श्री.अरूण साधू यांनी आपली व्यथा व्यक्त केलेली आहे.

सभापती महोदय, "लवचिकता आणि प्रवाहीपणा जपत मराठी भाषेचा आत्मा टिकवायचा असेल तर मराठी माणसाने आळस, न्यूनगंड आणि शरम सोडून सार्वजनिक ठिकाणी मराठीतून बोलायला हवे" असे, केंद्रीय ऊर्जा मंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी सोलापूर येथील साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषणात नमूद केले आहे. आता ते केंद्रीय ऊर्जा मंत्री आहेत, त्यांच्याकडे ऊर्जा निर्मितीचे साधन आहे, परंतु महाराष्ट्र अंधारात आहे, याबाबत खेद व्यक्त करावासा वाटतो.

(बेल वाजविण्यात येते.)

सभापती महोदय, मी माझे फक्त मुद्दे मांडतो. त्यावर सविस्तर विश्लेषण करत नाही. दोन कवितांचा उल्लेख करून माझे भाषण संपवितो.

"सह्याद्रीच्या सहस्त्र शिखरी उन्नत झालेला
गोदा,कृष्णा, भीमा यांनी पुनीत केलेला,
पश्चिम सिंधू, बंधू पाठिशी, पूर्वोदधि जामात,
विध्याद्रीची उंची सप्ती सातपुडा प्रांत,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ...

अलंकार जायाचे पैठण पंढरपुर,
आळंदी, चाफळ, देहू तुळजापूर,
की पुणे, रायगड, शिवनेरी सुंदर
रज:कणाला लाऊन भाळी महाराष्ट्र देशा,
तुला प्रभाती प्रसन्न हृदये प्रणाम परमेशा."

त्यानंतर "प्रिय आमुचा एक महाराष्ट्र देश हा" या कवितेमध्ये म्हटलेले आहे की,

"गीत मराठ्यांचे श्रवणी मुखी असो
स्फूर्ति दीप्ति धृतिही देत अंतरी ठसो
वचनी लेखनीही मराठी गिरा दिसो
सतत महाराष्ट्र-धर्ममर्म मनी ठसो
देह पडो तत्कारणी ही असे स्पृहा."

या सगळ्या कवींनी काव्य निर्माण केले. हे काव्य केवळ वाचनासाठी नाही तर वाचून त्याचा अर्थ लक्षात घेऊन प्रत्यक्षात जीवनामध्ये उपयोग करता आला तर तो करावा,म्हणूनच श्री.कृ. कोल्हटकरांनी काव्य लिहिले. या संदर्भाने सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनीही याबाबतची उदाहरणे दिलेली आहेत. झोपी गेलेल्या शासनाला मराठी भाषेची आपुलकी नाही. महाराष्ट्रामध्ये मराठी भाषा असावी, मराठी भाषेचा सन्मान व्हावा असे वाटत नाही.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

मुंबई हायकोर्ट असेल किंवा मुंबई वा महाराष्ट्रातील जिल्हा न्यायालये किंवा तालुका न्यायालये असतील त्या सगळ्या न्यायालयांमध्ये मराठी भाषेचा वापर करुन मराठी भाषेचा सन्मान करण्याची आवश्यकता आहे. मघाशी मी बातमी वाचली त्याप्रमणे ज्यांना मराठी नको आहे असे काही आय.ए.एस. अधिकारी मुंबई आणि महाराष्ट्रामध्ये आहेत. असे जे मराठी व्देष्टे आय.ए.एस. अधिकारी असतील त्यांना महाराष्ट्राच्या बाहेर काढावे. जर मराठीशी इमान राखावयाचे असेल, मराठी भाषेचा आदर करावयाचा असेल, मराठी भाषा प्रत्यक्षात अनुशासनामध्ये आणावयाची असेल तरच तुम्हाला महाराष्ट्रात काम करता येईल. अन्यथा तुम्हाला महाराष्ट्रामध्ये जागा नाही असे सांगण्याची वेळ आलेली आहे. मला या दृष्टीकोनातून आणखी एक खेदाची गोष्ट नमूद करावीशी वाटते. मराठी भाषेसंबंधीची चर्चा घडवून आणत असताना मराठी भाषेचा सन्मान व्हावा, सर्व स्तरावर मराठी भाषेचा वापर व्हावा, मराठी माणसाने फक्त मराठी भाषेत बोलावे. आपल्याला इंग्रजी भाषा येऊ नये, हिंदी भाषा येऊ नये असे माझे बिलकुल मत नाही. कोणतीही भाषा माणसने शिकली पाहिजे. भाषेवर प्रभुत्व असणे हे माणसाच्या फार मोठ्या विव्दत्तेचे लक्षण मानले जाते.. या महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी 105 हुतात्म्यांनी बलिदान केले. अनेक माणसे अपंग झाली. अनेक लोक अपंग होऊन नंतर स्वर्गवासी झाले. अनेक प्रकारच्या हालअपेष्टा सहन करुन, लढे लढून आपल्याला महाराष्ट्र राज्य मिळाले. महाराष्ट्र राज्य आपल्याला सहजासहजी मिळालेले नाही. त्यासाठी अनेक लोकांचे योगदान मिळालेले आहे. अशा पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने या गोष्टीची त्वरित दखल घेऊन ताबडतोब मराठी भाषेची अंमलबजावणी कशी करावी याचा विचार करावा. आपण सगळे मराठी आहात. दोन तीन माननीय मंत्रिमहोदय आहेत त्यांचे मी नाव घेंऊ इच्छित नाही. कारण मी त्यांना नोटीस दिलेली नाही. मी त्यांना नोटीस दिली असती तर मराठीव्देष्ट्या मंत्र्यांची नावे मी घेतली असती. मी त्याची नावे घेत नाही कारण त्यांना नोटीस देण्याचे माझे काम होते परंतु तशी नोटीस मी त्यांना देऊ शकलो नाही. या प्रस्तावावरील चर्चा तुकड्यातुकड्याने होत आहे. जर सलग चर्चा झाली असती तर मी नोटीस देऊन संबंधित मंत्रिमहोदयांना बोलवले असते आणि त्यांच्याबद्दलची माझी मते मी मांडली असती. परंतु दुर्दैवाने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

त्या पध्दतीने शासनावर प्रहार करण्याची संधी मला मिळाली नाही. आमचे खरे काम प्रहार करण्याचे आहे. ते प्रहार झेलून त्याचे परिणाम दाखविण्याचे काम शासनाचे आहे. ते काम शासनाने करावयास पाहिजे अशी आग्रही भूमिका घेऊन या प्रस्तावाला पूर्णपणे समर्थन व्यक्त करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

--- ...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP

श्री. कपिल पाटील (मुंबई शिक्षक) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये हा प्रस्ताव देऊन मराठी भाषेबद्दलची महत्वाची चर्चा या सभागृहात घडवून आणली त्याबद्दल सुरुवातीला मी आदरणीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे अभिनंदन करतो. मराठी भाषेची चर्चा करीत असताना ही जागा उखाळ्या-पाखाळ्या काढण्याची किंवा व्यक्तिगत उणेदुणे काढण्याची नाही असे मी मानतो. मराठीच्या एकूण प्रश्नावर ज्या पध्दतीने या सभागृहात चर्चा होत आहे त्यापेक्षा थोड्या वेगळ्या मुद्यांकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. त्यासाठी मला थोडा अधिक वेळ लागेल तो आपण द्यावा अशी मी आपल्याला सुरुवातीलाच विनंती करतो.

सभापती महोदय, मराठीचे मारेकरी कोण ? असा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी विचारला. मराठीचे मारेकरी मराठी माणसेच आहेत, इतर कोणी नाही. हे त्याचे खरे उत्तर आहे. परंतु या चर्चेचा जो रोख आहे तो प्रामुख्याने शासकीय कामकाजात मराठीचा वापर करण्याच्या संदर्भात आहे. येथील मराठी शाळांच्या संदर्भात, इंग्रजी शाळांच्या संदर्भात, न्यायालयीन कामकाजाच्या भाषेच्या संदर्भात आणि एकूणच मुंबई परिसरामध्ये मराठीची जी गळचेपी होत आहे त्यासंदर्भात प्रस्तावाचा मूळ रोख आहे. तो रोख बाजूला न जाऊ देता मला काही प्रश्नांकडे आपले लक्ष वेधावयाचे आहे. गेली 800 वर्षे मराठीचे अरण्यरुदन सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार तसेच इतर सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, महाराष्ट्र राज्यामध्ये मराठी कोठे आहे ? नागदेवाचार्यांनी संस्कृत भाषेच्या संदर्भात असे म्हटले होते की, तुमचे अस्मात तस्मात मला काही माहीत नाही, मी माझ्या मराठीत बोलू इच्छितो आणि मराठीत सांगू इच्छितो. त्याचप्रमाणे संत ज्ञानेश्वरांनी असे सांगितले की, तुमच्या संस्कृतमध्ये काही भांडार लपलेले आहे अशातील भाग नाही तर मला माझ्या भाषेत ज्ञानाचे भांडार फोडावयाचे आहे. ती हिंमत आज मराठी राज्य स्थापन झाल्यानंतर आपण सगळ्यांनी मिळून राखली आहे असे माझे मत नाही. जे कोणी मराठी भाषेचे कैवारी आहेत त्यांची मुले कोठे शिकतात हा भाग महत्वाचा नाही. जी भाषा ती बोलणाऱ्याला जगविण्यासाठी समर्थ आहे की नाही यावरुन ती भाषा जगणार की नाही हे ठरते. मराठी भाषा जगणार की मरणार ? याचे उत्तर असे आहे की, मराठी भाषा येथील मराठी माणसाला जगवण्यासाठी समर्थ असल तर मराठी भाषा जगेल. ती जगवण्यासाठी समर्थ नसेल तर मरेल.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ KGS/ पूर्वी श्री. बरवड

(श्री. कपिल पाटील पुढे सुर...

ही स्थिती आपण कोणीही रोखू शकत नाही हा खरा त्यातील महत्वाचा मुद्दा आहे. आता ही मराठी भाषा, बोलणा-या मराठी माणसाला जगविण्यासाठी, समर्थ बनविण्याची जी जबाबदारी आहे ती प्रामुख्याने शासनाची आहे. म्हणून शासनाच्या संदर्भात हा खरा प्रश्न उपस्थित होतो. कारणे खूप आहेत. परंतु महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर आपण जी मराठी भाषा स्वीकारली ती भाषा आणि जो पदनाम कोष आपण निर्माण केला, राजव्यवहाराची भाषा निर्माण केली ती सर्व भाषा पाहिली की ती मराठी आहे की नाही असा प्रश्न पडतो. आपले शासकीय आदेश असोत, शासकीय कागद असोत, किंवा आपल्या व्यवहारामध्ये जे कागद आपल्या समोर मांडले जातात या कागदावरची भाषा सुध्दा मराठी आहे की नाही, हा खरा प्रश्न आहे. ही भाषा आपल्या सभागृहातील सदस्यांना सुध्दा समजायला कठीण जाते. ही भाषा समजत नाही म्हणून उद्या अधिका-यांनी इंग्रजी भाषेचा आग्रह धरला तर अधिका-यांना मी दोष देणार नाही. जे मराठी आपण राजव्यवहारामध्ये वापरतो ते मराठी सामान्य माणसाला कळण्यापलिकडचे मराठी आहे. मी साधे उदाहरण देतो. आपण फाईलला नस्ती म्हणतो. "नस्ती" या शब्दाचा अर्थ कोणत्याही माणसाला समजणार नाही. अधिका-यांना ती नस्ती कटकट वाटते आणि सामान्य माणसाला जी नेहमीच नकारघंटा वाजवत असते ती नस्ती असते. परंतु त्या नस्तीच्या बाबतीत आपण माननीय मंत्रीमहोदयांकडे काही आदेश मागायला गेलो तर माननीय मंत्री महोदयांचा आदेश निर्गमित होतो. निर्गमित होतो म्हणजे काय? आदेश निर्वाण होतो की स्वार्गात पोहोचतो की आणखी कोठे जातो ? आदेश दिले, असे साधे मराठी वापरायचे सोडून आदेश निर्गमित केले अशी वाक्य रचना केली जाते. ही राजभाषा संस्कृतप्रचूर आहे आणि तेथून मराठी भाषेला मारण्यास सुरुवात होते, तिच्या मृत्युपंथाला सुरुवात होते. ज्यानी राजभाषा तयार केली आणि ज्या शासनाने ती आपणा सर्वांवर लादली, हे खरे त्या भाषेचे मारेकरी आहेत. राजभाषा बदलणार की नाही हा खरा मुद्दा आहे. तलाठ्याने पत्र लिहिले तर ते त्यालाही आपण काय लिहीत आहोत हे कळत नाही. म्हणून माझे मराठी मला कळत का असा प्रश्न निर्माण होतो. ते कळत नसेल तर, ते मराठी नाही. आपण ज्या शुध्दतेचा आग्रह मराठी भाषेसाठी धरला तोच मुळात भाषाद्रोह आहे. कारण जगातली कोणतीही भाषा कधीच शुध्द असू शकत नाही. जी मी बोलतो ती भाषा शुध्द आहे. आपण जी मराठी प्रमाण भाषा म्हणून स्वीकारली ती सदाशिव पेठी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

किंवा पुणेरी भाषा म्हणून आपण स्वीकारलेली आहे. म्हणजे सदाशिव पेठेच्या बाहेर मराठी बोलली जात नाही असा आपला ग्रह आहे. यामधील सगळयात वाईट भाग हा आहे की, भाषा ही कोणत्या जातीची नसते, कोणत्या धर्माची नसते. ती बहुवांशिक असते, बहुधार्मिक असते, बहु जातींची असते. या महाराष्ट्रामध्ये व-हाडात बोलली जाणारी बोली मराठी नाही काय ? खानदेशात बोलली जाणारी मराठी, मराठी नाही काय ? झाडीपट्टीत बोलली जाणारी मराठी, मराठी नाही काय ? माणदेशात किंवा घाटावर बोलली जाणारी मराठी, मराठी नाही काय ? कोकणातील मालवणी बोली ही मराठी नाही काय ? गोव्यातील कोकणी बोली ही मराठी नाही काय ? आपण गोव्यातील कोकणी नाकारली म्हणून तिला वेगळे स्थान स्वीकारावे लागले आणि तिने स्वतंत्र भाषेचा दर्जा घेतला. महाराष्ट्रामध्ये मराठी विरुध्द कोकणी असा मोठा वाद झाला. आजही हा वाद सुरु आहे. पण आपणच मराठीच्या ह्या सगळया बोली नाकारल्या. या राज्यातील आदिवासींच्या खूप संपन्न अशा बोली आहेत. परंतु आपण त्या स्वीकारल्या नाहीत. आपण भाषा अधिकाधिक आकुंचित करीत गेल्यामुळे ती मरणपंथाला लागली. या जगामध्ये कोणताही वंश शुध्द राहिलेला नाही. वर्णसंकर झाल्याशिवाय माणूस जगू शकत नाही. मग भाषा ती काय ? भाषा जितकी संकरित होईल तितकी ती ताकदवान बनते. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी ज्ञानभाषेचा, वैभव भाषेचा उल्लेख केला. ही मराठी भाषा ज्ञानभाषा बनविणे, वैभवसंपन्न बनविणे ही जबाबदारी प्रामुख्याने राज्य शासनाची होती. तसेच मराठी भाषेचे जे कोण कैवारी होते जे कोणी सारस्वत होते, त्या सारस्वतांची ती जबाबदारी होती. मी केवळ शासनाला दोष देत नाही. एकूणच सर्व मराठी सारस्वतालाच दोष देतो. साध्या मराठी साहित्य संमेलनाला गेल्यानंतर पालखीमध्ये मराठीचे पहिले गद्य वाड.मय दिसत नाही. महदंबेचे ढवळे त्या पालखीत नसतात. महदंबासुध्दा माहीत नसते. नागदेवाचार्य माहीत नसतात, ज्यांनी मराठी भाषेचा स्वाभिमान सांगितला त्या चक्रधरस्वामीनी, अन्य देशात जाऊ नये, असे सांगितले. मी मुद्दाम एक शब्द गाळून बोललो आहे. हा अभिमान आम्हीच स्वत:हून नाकारलेला आहे. मराठी खरी विदर्भामध्ये जन्माला आली. आज त्या

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. कपिल पाटील...)

विदर्भावरती पूर्णपणे हिंदीचे साम्राज्य आहे. त्याठिकाणी माणसे मराठी बोलतच नाहीत.ते अर्धे हिंदी बोलतात. खरे म्हणजे मराठीचा जन्म विदर्भातला आहे. परंतु आापणच ही मराठी जगविली नाही, आपणच ती नाकारत गेलो. याचे कारण असे की, ज्यांना राज्य करायचे असते, आपले साम्राज्य उभे करायचे असते असा वर्ग आपली भाषा प्रजेवर लादत असतो.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

मराठीच्या बाबतीत असेही घडले. प्राचीन काळी संस्कृत ही ज्ञानभाषा होती, ताकदीची भाषा होती. मुठभरांची ती मक्तेदारी होती. मराठी भाषा बनली. तिची मक्तेदारी निर्माण करण्यासाठी, अधिकाधिक कठीण ज्ञानभाषा बनविण्यासाठी सर्व दरवाजे बंद करण्यात आले. म्हणून मराठी मरणपंथाला लागली. ज्या वर्गाने ही भाषा बनविली तो वर्ग आज अमेरिकेला निघून गेला आहे. त्याला इकडचे काही सोयरसूतक राहिलेले नाही. म्हणून मराठी मरणपंथाला लागली आहे.

सभापती महोदय, याठिकाणी शिक्षणमंत्री बसलेले आहेत. मला शासनाचे दुसऱ्या एका गोष्टीकडे लक्ष वेधावयाचे आहे. शेवटी भाषा शिकविली जाते ती शाळांमधून, मराठी माध्यमातून शिक्षण आपण देत आहोत. शेवटी कोणतीही भाषा एका जातीची, एका धर्माची, एका वंशाची नसते. आज शाळांमधून आपण जे शिक्षण देतो ते सेक्युलर आहे की नाही? ते सेक्युलर असले पाहिजे. परंतु ते शिक्षण सेक्युलर न झाल्यामुळे एकधार्मिक, एकवर्गीय, एकजातीय केल्यामुळे मराठी भाषेला मरणकळा निर्माण झाली. मराठी माध्यम ज्याला म्हणतो, एकेकाळी महाराष्ट्रात जे कोणी मराठी बोलतात ते सगळे मराठी मानत होतो. शिक्षण सेक्युलर न झाल्यामुळे, माझी धार्मिक आयडेन्टिटी, स्वतंत्र आयडेन्टिटी, ज्या शाळेत माझा पाल्य जातो, त्याला शाळेत पाठविल्यानंतर संपेल या भीतीने सर्व वर्ग बाजूला व्हायला लागले. एकेकाळी महाराष्ट्रात सर्व मुस्लिम मराठीत शिकत होते. त्यांची मातृभाषा मराठी नव्हती. ख्रिश्चन समाज मराठीत शिकत होता. त्यांची मातृभाषा मराठी आहे. आज आदिवासी पट्टयामध्ये, अमरावती व विदर्भात मराठी भाषा आमची नाही म्हणून इंग्रजीचा आश्रय घेण्याची प्रवृत्ती सुरु झाली. कारण शिक्षण हे सेक्युलर झालेले नाही. माझी आयडेन्टिटी संपेल असे वाटते तेव्हा माणूस बाजूला जातो. मी मराठी आणि तो मुस्लिम आहे असे आपण म्हणतो. मी मराठी आणि तो ख्रिश्चन असे आपण म्हणतो. मराठी भाषा जगवली ती वसईतील ख्रिश्चन समाजाने. शाळेत, व्यवहारात, धर्मात त्यांनी मराठी भाषा स्वीकारली. परंतु आपण ते स्वीकारले नाही. आपण त्यांचा उल्लेख ख्रिश्चन असा करीत आलो. मराठी भाषेला ताकद देण्यासाठी शिक्षण सेक्युलर असण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आज साहित्य सम्मेलनासाठी शासन 25 लाख रुपयांची मदत देते. छोटे छोटे समाज साहित्य सम्मेलन भरवितात. मराठी भाषा समृध्द करु म्हणतात त्यांना मात्र 5-25 रुपये सुध्दा शासनाकडून दिले जात नाहीत. आदिवासी समाजाकडून मराठी साहित्य सम्मेलन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भरविले जाते त्यांना शासन किती मदत करते? ख्रिश्चन साहित्य सम्मेलन मराठीत भरते, त्यांना शासनाकडून किती निधी दिला जातो? अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलनाकरिता 25 लाख रुपये दिले जातात. परंतु इतर सम्मेलने आमची नाहीत अशी भूमिका घेतली जाते. दलित साहित्य सम्मेलनासाठी किती निधी दिला जातो? गुराखी मराठी साहित्य सम्मेलन भरविले जाते, आदिवासी मराठी साहित्य सम्मेलन भरविले जाते, त्यासाठी शासनाकडून किती निधी दिला जातो? त्यांना शासन काहीही मदत करीत नाही. जे मराठी टिकविण्यासाठी प्रयत्न करतात त्यांना शासन काही देत नाही. माननीय शिक्षणमंत्री याठिकाणी बसले आहेत म्हणून शासनाची या संदर्भात भूमिका काय आहे याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

सभापती महोदय, मी कोणाविरुध्द वैयक्तिक टीकाटिप्पणी करण्यासाठी उभा राहिलेलो नाही. मला आपण बोलण्यासाठी अधिक वेळ द्यावा अशी माझी विनंती आहे. सभापती महोदय, याठिकाणी इंग्रजीचा उल्लेख झाला. इंग्रजी आज जगाची ज्ञानभाषा आणि संपर्कभाषा बनलेली आहे. ती शिकल्याशिवाय माणूस प्रगती करु शकत नाही. मला याठिकाणी अभिनंदन करावेसे वाटते. तत्कालीन शिक्षणमंत्री कै.रामकृष्ण मोरे आणि सन्माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी धाडसाने पहिलीपासून इंग्रजी भाषेचे ज्ञान देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाला तथाकथित लोकांनी विरोध केला. जो बहुजन वर्ग शिकू मागतो, त्याच्या हातात ज्ञानाची कोणतीही भाषा येऊ नये असा प्रयत्न एक वर्ग करतो.

श्री.दिवाकर रावते : सदनामध्ये इंग्रजी भाषेला कुठे विरोध झाला नाही.

श्री.कपिल पाटील : मी सन्माननीय सदस्यांबद्दल काही बोललेलो नाही. सभागृहाच्या बाहेर ज्या लोकांनी विरोध केला त्यांच्याबद्दल बोलत आहे.

श्री.दिवाकर रावते : मी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना विनंती करु इच्छितो की, अगोदर जात, पंथ, भेदभाव निर्माण करण्याचा प्रयत्न करायचा आणि सेक्युलरिझमची भाषा करायची हे योग्य नाही. मी काही बोललो नाही असे म्हणत असताना भाषणामध्ये मात्र म्हणतात की, ख्रिश्चन समाज मराठी भाषा बोलतो, तुम्ही त्यांना ख्रिश्चन का म्हणता? मुस्लिम समाज मराठी बोलतो, तुम्ही त्यांना मुस्लिम का म्हणता? सभापती महोदय, आम्ही कधी असे म्हणालो नाही. परंतु सन्माननीय सदस्यांना पुढे असेही विचारु इच्छितो की, ख्रिश्चन मराठी साहित्य सम्मेलन त्यांनी का भरवावे?

(नंतर श्री.जुन्नरे....

अशुद्धलिखित प्रत / शीघ्रलिपीची नोंद

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आदिवासी मराठी साहित्य संमेलन, खिश्चन मराठी साहित्य संमेलन भरवतात परंतु त्यांना शासन निधी देत नाही असे सांगितले. या ठिकाणी सन्माननीय सदस्य "सेक्युलर" नावाचा घोष करीत आहेत. सर्व धर्म समभाव हा लांबलचक शब्द असल्यामुळे ते "सेक्युलर" शब्द वापरत आहेत. सेक्युलरचा टेंभा मिरवित आहेत. त्यामुळे माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी मराठी भाषेच्या संदर्भात आक्षेप घेऊ नये. कोकणातील मुसलमान लोक मराठी बोलतात त्यासाठी आम्ही कधी भेदभाव केला नाही. सभापती महोदय इतर राज्यात गेलो तर त्या ठिकाणची भाषाच बोलली जाते, सगळे व्यवहार त्याच भाषेतून केले जातात, तेथील जनता त्यांची भाषा शिरावर घेत असते, परंतु जे लोक महाराष्ट्रात येऊन मराठी भाषेला पायदळीत तुडवतात त्यांच्यासाठीच आम्ही विचार मांडलेले आहेत. महाराष्ट्रातील मराठीला राज भाषेचा दर्जा दिला गेला पाहिजे हेच आम्ही सांगितलेले आहे. आम्ही इंग्रजी भाषेचा विरोध केला नाही. पहिलीच्या वर्गापासून कै. रामकृष्ण मोरे यांनी इंग्रजी भाषा शिकविण्याची योजना आखली त्याचे सुध्दा आम्ही अभिनंदन केले होते हे आपण विसरु नये.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी मी सन्माननीय सदस्य रावते साहेबांचे आभार मानतो. सेक्युलर शिक्षण किंवा सेक्युलर भाषा याचा अर्थ सर्वसधर्मसमभाव असा मी केलेला नाही. सेक्युलर म्हणजे सर्वधर्म समभाव. भाषेला धर्म नसतो एवढेच मला म्हणावयाचे आहे. मी शासनाला सांगू इच्छितो की, आदिवासी मराठी साहित्य संमेलन भरवले जाते त्यांना सुध्दा निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक माणूस हा जन्मत:च सेक्युलरच असतो.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी हरकतीच्या मुद्यावर बोलण्यासाठी उभा आहे. सन्माननीय सदस्य सेक्युलर, सेक्युलर म्हणून मराठी भाषेची टिंगल करीत आहेत. सन्माननीय सदस्य हे शिक्षक मतदार संघातून आलेले आहेत, असे असतांना त्यांनी अशा प्रकारची भाषा वापरावी याचा मला खेद होतो आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य सेक्युलरचा उद्घोष करीत आहेत, परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, लोकसभेत एकूण 544 खासदार असतात. मी लोकसभेत प्रश्न विचारला होता की, माणूस जन्मत:च सेक्युलर म्हणून जन्माला येतो का? त्या दिवसाच्या चर्चेच्या वेळेस माननीय शरदचंद्र पवार, चॅटर्जी, इंद्रजित गुप्ता असे किती तरी सन्माननीय सदस्य उपस्थित होते परंतु यासंदर्भात एकाही खासदाराने काहीही माणूस जन्मत: सेक्युलर असतो असे सांगितले नाही. सभापती महोदय, त्यांनी सांगितले की, आम्ही सेक्युलर..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

म्हणून जन्मास आलो नाही. जन्म घेतल्यानंतर आम्ही सेक्युलरवाद स्वीकारला. माणूस जन्मत: सेक्युलर नसतो. जन्मानंतर माणूस सेक्युलर होत असतो. सेक्युलर हा शब्दच मुळी ढोंग आहे. सेक्युलर या शब्दानेच या देशाची वाट लावली आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी मराठी भाषेच्या संदर्भात सेक्युलर वाद न आणता मराठी भाषा कशी वाढेल, समृध्द कशी होईल यासंदर्भात विचार व्यक्त केले तर बरे होईल. कोकणी, आदिवासी, ख्रिश्चन मंडळी मराठी संमेलन भरवत असतात. मराठी भाषेची वाढ कशी होईल, मराठी भाषा कशी जगेल एवढया पुरते सन्माननीय सदस्यांनी विचार मांडले तर अधिक चांगले होईल एवढाच माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांचे नाव शाळेत नोंदविले होते तेव्हा त्यांचा धर्म हिंदूच लावलेला होता.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, जोपर्यंत माणूस हृदयाची कवाडे उघडत नाही तोपर्यंत त्याचा विकास होत नाही. मराठी भाषेच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विचार मांडलेले आहेत त्याचे मी कौतुक केलेले आहे. मराठी भाषेच्या संदर्भात चर्चा केल्याशिवाय मराठी भाषेला चांगले दिवस येणार नाही ही वस्तुस्थिती आहे. राज व्यवहारासाठी जी मराठी भाषा वापरली जाते ती तुम्हा आम्हाला का वाचता येत नाही याची कारणमिमांसा होण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी मी उखाळया पाखाळया काढीत नाही. उखाळया पाखाळया काढल्या तर मराठी भाषा मरेल. जी भाषा माणसाला जगवते तीच भाषा जगत असते. गरीब माणूस सुध्दा आज आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत पाठवित असतो. कारण त्याला वाटत असते, मी जसे दारिद्रयात दिवस काढले तसे दिवस माझ्या मुलांने काढू नयेत त्यासाठीच तो आपल्या मुलाला इंग्रजी शाळेत टाकत असतो. मराठी भाषा माझ्या मुलाला जगवण्यासाठी पुरेशी नाही म्हणून लोक आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत टाकत असतात परंतु याचा अर्थ ते मराठी भाषेचा अवमान करतात असा होत नाही. आपल्या मुलाची दिवसेंदिवस अधिक प्रगती होत जावी यासाठी पालक आपल्या पाल्यांना इंग्रजी शाळेत पाठवित असतो. सरदेसाई हे इंग्रजीत शिकले, वाढले परंतु तरी ते चांगल्या प्रकारे मराठी बोलतात, मी मराठी आहे म्हणून सांगत असतात, त्यांनी मराठी चॅनल काढण्याचा देखील प्रयत्न चालवला आहे. त्यामुळे मराठी भाषा आपल्याला जर संपन्न

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील.....

करावयाची असेल, जगवायची असेल तर तिच्या मुख्य कारणाकडे गेले पाहिजे. मराठी भाषेच्या आजाराकडे मी लक्ष दिले नाही तर तिच्यावर उपाययोजना होऊ शकणार नाहीत. मी मराठी भाषेला विरोध करीत नाही. माणूस जेव्हा भाषा शुध्द करावयास जातो

यानंतर श्री. अजित.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.....

तेव्हा ती शुध्द होऊ शकत नाही. कोणताही वंश शुध्द असू शकत नाही. जर असा प्रयत्न झाला तर ती भाषा नष्ट होते. काही आदिवासी भाषा सुध्दा अशाप्रकारे नष्ट झालेल्या आहेत. कारण त्या भाषा शुध्द होत्या. त्या भाषा संकरीत झालेल्या नाहीत. इंग्रजी भाषा का पुढे गेली ? कारण इंग्रजी भाषा जेथे जेथे गेली तेथे तेथे त्या भाषेने स्थानिक शब्दांचा सुध्दा आधार घेतलेला आहे. उदारहण सांगावयाचे झाले तर इंग्रजीमध्ये भाकर, पक्का असे शब्द घेण्यात आलेले आहेत. आपण शुध्द मराठी भाषेचा आग्रह करतो, परंतु मराठी भाषेत 30 टक्के शब्द हे फारशी भाषेतील आहेत. आपल्याकडील अनेक थोरांनी सुध्दा मराठी भाषा शुध्द करण्याचा प्रयत्न केला...

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य सभागृहाला चुकीची माहिती देत आहेत. इंग्रजी भाषा फक्त इंग्लंड आणि अमेरिका या देशात बोलली जाते. युरोपमध्ये इंग्रजी भाषा बोलली जात नाही. सन 1984 मध्ये मुंबई महानगरपालिकेचे महापौर श्री.बेदी होते. त्यावेळी त्यांना भेटण्यासाठी मास्कोचे महापौर आले होते. तेव्हा श्री.दत्ता प्रधान यांची कन्या या दुभाषी म्हणून काम करीत होत्या. मास्कोच्या महापौरांनी त्यांना विचारले की, तुम्हाला इंग्रजी येत नाही काय ? तेव्हा त्यांनी सांगितले होते की, मला इंग्रजी भाषा येते परंतु माझी मातृभाषा मराठी आहे. इंग्रजी भाषा फक्त काही देशातच बोलली जाते. जर्मनीमध्ये जर्मन, स्पेनमध्ये स्पॅनिश भाषा बोलली जाते. मी या निमित्ताने सभागृहाला सांगू इच्छितो की, आम्ही युरोपला गेलो होतो त्यावेळी आम्हाला असे आढळून आले की, तेथे प्रथम राष्ट्रीय भाषेत सूचना लिहिली जाते. त्यामुळे सन्माननीय सदस्य सांगत आहे त्याप्रमाणे इंग्रजी ही समृध्द भाषा नाही. तत्कालीन मंत्रिमहोदय श्री.हुसेन दलवाई मराठी भाषेत शिकलेले आहेत. श्री.यु.म.पठाण, श्री.जब्बार पटेल तथाकथित सेक्युलर हे मराठीत शिकले आहेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी बरोबर सांगितले. मी जे मुद्दे मांडत आहे तेच त्यांनी सांगितले. फक्त त्यांनी ते वेगळया परिभाषेत सांगितले. मी कोणाचाही व्यक्तीगत उल्लेख करीत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.....

सभापती महोदय, आपण मराठी भाषा समृध्द झाली पाहिजे अशी ओरड करतो. मराठी भाषा समृध्द करण्याची जबाबदारी शासनाची आहे आणि शासनाने या जबाबदारीपासून अनेकवेळा पळ काढलेला आहे. मराठी भाषेच्या संदर्भात जनतेने मोठ्या प्रमाणावर आंदालने केलेली आहेत. या सभागृहात सुध्दा अनेकवेळा चर्चा झालेली आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांनी केलेल्या भाषणाचा उतारा येथे वाचून दाखविला. यापूर्वी सुध्दा मराठी साहित्य संमेलनात मराठी भाषेच्या अनास्थेबद्दल प्रश्न मांडण्यात आलेले आहेत. मराठी साहित्य संमेलनासाठी फक्त 25 लाख रुपये दिले म्हणजे शासनाची जबाबदारी संपली असे नाही. तर या व्यासपीठावरुन मराठी भाषेच्या संदर्भात ज्या व्यथा मांडल्या जातात त्या सोडविण्याचा शासनाने प्रयत्न केला पाहिजे. आपण जी मराठी राजभाषा स्वीकारलेली आहे ती खरीखुरी लोकभाषा होईल असे ठोस आश्वासन आज मिळणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, शासकीय शब्दकोषाची चिकित्सा करणे आवश्यक आहे. या शब्दकोषातील भाषा बदलण्याची आवश्यकता आहे. जे प्रचलित इंग्रजी शब्द आहेत ते तसेच ठेवले पाहिजे. उदाहरणार्थ टेबल. सामान्य लोकांनादेखील समजेल अशी भाषा शब्दकोषात आली पाहिजे. आपण संस्कृत भाषेची मोडतोड करुन मराठीत शब्द घेतले आणि त्या भाषेची देखील मोडतोड केली. तेव्हा नवीन शब्द घालण्याऐवजी जे रोजच्या व्यवहारातील शब्द आहेत त्याचा वापर झाला पाहिजे.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.....

मी मघाशी सांगितले की, जगातील कोणताही वंशज शुध्द असू शकत नाही. जो वंशज शुध्द राहतो तो संपून जातो किंवा नष्ट होतो. वर्ण संकर अपरिहार्य असतो. आदिवासींच्या जमाती ज्या बेटांवर आहेत त्या संपत चालल्याचे आपण वाचतो. कारण त्या शुध्द वंशाच्या आहेत. त्यांचा संकर झाला तर त्या जगतील अन्यथा त्या जगणार नाहीत आणि तोच नियम शुध्द भाषेला सुध्दा आहे. इंग्रजी भाषा पुढे का गेली ? इंग्रजी भाषा ज्ञानभाषा का बनली किंवा जगाची संपर्क भाषा किंवा साम्राज्य भाषा का बनली ? जेथे जेथे इंग्रजी भाषा गेली तिथे तिथे इंग्रजी भाषेने तेथील भाषा आणि शब्द स्वीकारले. आज भाकर हा शब्द इंग्रजीतसुध्दा आहे. आपण शुध्दतेचा आग्रह धरायला लागलो तर मराठी भाषा सुध्दा 50 टक्केवर येईल. कारण आज मराठी भाषेत 33 टक्के शब्द फारसी आहेत. आपल्याकडील थोरांनी सुध्दा मराठी भाषा शुध्द करण्याचा प्रयत्न केला...फारसी शब्द काढून घेतल्यावर काय होईल.....

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य शिक्षक आहेत. परंतु ते सभागृहाला चुकीची माहिती देत आहेत. इंग्रजी भाषा फक्त इंग्लंड आणि अमेरिका या देशात बोलली जाते. युरोपमध्ये इंग्रजी भाषा बोलली जात नाही. सन 1984 मध्ये मुंबई महानगरपालिकेचे महापौर श्री.बेदी होते. त्यावेळी त्यांना भेटण्यासाठी मास्कोचे महापौर आले होते. तेव्हा श्री.दत्ता प्रधान यांची कन्या या दुभाषी म्हणून काम करीत होत्या. श्री.बेदी यांनी त्यांना विचारले की, तुम्हाला इंग्रजी येत नाही काय ? तेव्हा तिने सांगितले होते की, मला इंग्रजी भाषा येते परंतु माझी मातृभाषा मराठी आहे. इंग्रजी भाषा फक्त काही देशातच बोलली जाते. जर्मनीमध्ये जर्मन, स्पेनमध्ये स्पॅनिश भाषा बोलली जाते. मी या निमित्ताने सभागृहाला सांगू इच्छितो की, आम्ही युरोपला गेलो होतो त्यावेळी आम्हाला असे आढळून आले की, तेथे प्रथम राष्ट्रीय भाषेत सूचना लिहिली जाते. त्यामुळे सन्माननीय सदस्य सांगत आहे त्याप्रमाणे इंग्रजी ही समृध्द भाषा नाही. काही इतर धर्मियांना वाटते की, आम्ही मराठीत शिकलो तर आमचा वंशज संपेल. पण मी याठिकाणी नमूद करु इच्छितो की, तत्कालीन मंत्रिमहोदय श्री.हुसेन दलवाई मराठी भाषेत शिकले आहेत. त्यांनी मराठीतून शिक्षण घेतले म्हणून त्यांना धर्म बुडला नाही. श्री.यु.म.पठाण, श्री.जब्बार पटेल तथाकथित सेक्युलरवादी आहेत. त्यांनी देखील मराठीतून शिक्षण घेतले आहे. त्यामुळे इंग्रजी ही जगाची भाषा नाही. ही भाषा फक्त इंग्लंड देशाची आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी बरोबर सांगितले. मी जे मुद्दे मांडत आहे तेच त्यांनी सांगितले. फक्त त्यांनी ते वेगळया परिभाषेत सांगितले. मी कोणाचाही व्यक्तीगत उल्लेख करीत नाही.

सभापती महोदय, आपण मराठी भाषा समृध्द झाली पाहिजे अशी ओरड करतो. मराठी भाषा समृध्द करण्याची जबाबदारी शासनाची आहे आणि शासन या जबाबदारीपासून अनेकवेळा दूर पळालेले आहे. मराठी भाषेच्या संदर्भात जनतेने मोठ्या प्रमाणावर आंदालने केलेली आहेत. या सभागृहात सुध्दा अनेकवेळा चर्चा झालेली आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांनी केलेल्या भाषणाचा उतारा येथे वाचून दाखविला. यापूर्वी सुध्दा मराठी साहित्य संमेलनात मराठी भाषेच्या अनास्थेबद्दल प्रश्न मांडण्यात आलेले आहेत. मराठी साहित्य संमेलनासाठी फक्त 25 लाख रुपये दिले म्हणजे शासनाची जबाबदारी संपली असे नाही. तर या व्यासपीठावरुन मराठी भाषेच्या संदर्भात ज्या व्यथा मांडल्या जातात त्या सोडविण्याचा शासनाने प्रयत्न केला पाहिजे. मी याठिकाणी मागणी करतो की, आपण जी मराठी राजभाषा स्वीकारलेली आहे तिची जागा खऱ्याखुऱ्या मराठीने घेतली पाहिजे म्हणजे लोकभाषा असलेल्या मराठीने घेतली पाहिजे. त्याप्रमाणे याठिकाणी आश्वासन मिळणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, शासकीय शब्दकोषाची चिकित्सा करणे आवश्यक आहे. या शब्दकोषातील भाषा बदलण्याची आवश्यकता आहे. जे प्रचलित इंग्रजी शब्द आहेत ते तसेच ठेवले पाहिजे. उदाहरणार्थ टेबला आपण टेबल म्हटले पाहिजे. त्यास पर्यायी शब्द नको. सामान्य लोकांनादेखील समजेल अशी भाषा शब्दकोषात आली पाहिजे. आपण संस्कृत भाषेची मोडतोड करुन मराठीत शब्द घेतले आणि त्या भाषेची देखील मोडतोड केली. तेव्हा नवीन शब्द घालण्याऐवजी जे रोजच्या व्यवहारातील शब्द आहेत त्याचा वापर झाला पाहिजे.

यानंतर श्री.पुरी.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.कपिल पाटील...

इतर काही केले नाहीतरी चालेल. साहित्य मंडळ चालवले नाहीतरी चालेल. परंतु साहित्य मंडळाने जी राजाभाषा आयोग स्थापन करण्याची मागणी केलेली आहे, ती पूर्ण करावी. आपण नवा भाषा आयोग स्थापन करावा व त्या आयोगाकडे उद्दिष्ट द्यावे. तसेच, राजभाषेचे रुपांतर लोकभाषेत करावे. त्याचबरोबर मराठीचे रुपांतर ज्ञानभाषेत करण्याची जबाबदारी भाषा आयोगाकडे द्यावी, असे मला वाटते. तसेच, उत्तम इंग्रजीची सोयही केली पाहिजे. ती आज नसल्यामुळे सगळयांचीच अडचण निर्माण झालेली आहे. त्यासाठी आपल्याला सेमी इंग्रजी स्वीकारावी लागेल, तरच मराठी जगेल व त्यामुळेच मराठी भाषेला अधिक मोठी विकासाची दारे उघडी होऊ शकतील.

सभापती महोदय, याठिकाणी माननीय रावते साहेबांनी मराठी शाळेचा उल्लेख केला. मराठी शाळा टिकवायच्या असतील तर त्याठिकाणी सेमी इंग्रजी सर्व शाळांमध्ये सक्तीची केली पाहिजे. सीबीएसई आणि आयसीएसईच्या परीक्षा घेणाऱ्या ज्या शाळा आहेत, त्या सर्व शाळांमध्ये आपण पहिलीपासून मराठी सक्तीची करावी. कारण, त्याठिकाणी मराठी रुजली पाहिजे व मुलांना मराठी आवडली पाहिजे. परंतु त्याठिकाणी जर आपण खोसला कांदबरीचा किंवा नेमाडयांच्या भाषेतील उतारा दिला तर त्या शाळांतील मुले मराठी कशी शिकतील ? त्यामुळे आपण त्याठिकाणी सोप्या भाषेत मराठी शिकणे सक्तीचे करावे. त्याठिकाणच्या शाळांतील मुलांना मराठी शिकायची नाही अशातला भाग नाही, ती फक्त आपण सोप्या भाषेत त्यांना शिकवली पाहिजे व मुलांना ती आवडली पाहिजे, याची आपण काळजी घेतली पाहिजे. तसेच, आज मराठी अभ्यासक्रमांतील सगळी पाठयपुस्तके बदलण्याची आवश्यकता आहे. आपल्याला मराठी शाळांमध्ये मराठी टिकवायची असेल तर इंग्रजी शाळांच्या दर्जाची आणि मराठी शाळांच्या दर्जाची तुलना करता, आपल्याला मराठी शाळांचा दर्जा अनेक पातळीने वर वाढवावा लागेल. कारण, मराठी शाळांमध्ये आज पटसंख्या बरीच कमी असते. माननीय सभापती महोदय, आपणही शिक्षक आमदार आहात, याबाबतची कल्पना आपल्यालाही असणारच. त्यामुळेच आज मी याठिकाणी पटसंख्येची मागणी करीत आहे. मराठी शाळांमध्ये आज 80-80 मुले एकाच वर्गात असतात. त्यांना धड मराठीही येत नाही, अशी आजची परिस्थिती आहे. मराठी शाळांतील सगळयात जास्त मुले मराठी

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

विषयातच नापास होतात. परंतु, इंग्रजी शाळांतील मुले मराठी विषयात मोठया संख्येने पास होतात, अशी परिस्थिती आहे. याचे कारण म्हणजे, शाळांमध्ये मुले पोहचतच नाहीत. त्यामुळे याठिकाणी आपण पटसंख्येच्या संदर्भात दुरुस्ती करावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, आज आपल्याला उद्योग व व्यापारामध्ये मराठी सक्तीची करावी लागणार आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये जे उद्योग व व्यापार येतील, त्या व्यावसायिकांनी मराठी भाषेतच व्यवहार करावा, अशी सक्ती शासनाने त्यांच्यावर केली पाहिजे. मुंबई व राज्याच्या इतर भागामध्ये येणाऱ्या कोणत्याही उद्योगधंद्याच्या बाबतीत येणाऱ्या व्यावसायिकांनी मराठी भाषेतच बोलले पाहिजे व मराठी भाषेतच व्यवहार केला पाहिजे असे बंधन आपण त्यांच्यावर टाकणे आवश्यक आहे, असे मला वाटते. आपण अशी सक्ती केली तरच स्थानिक लोकाधिकाराचा प्रश्न मिटेल, असे मला वाटते. मराठी भाषा सक्तीची केली तर त्याठिकाणी ते उद्योगधंद्यामध्ये मराठी कर्मचाऱ्यांना नोकरीवर घेतील व मराठीचा टक्का सुधारेल. सभापती महोदय, आज बिग बाजारमध्ये हाच प्रश्न निर्माण झाला होता. त्यासाठी लढाई करावी लागली. त्यामुळे मुंबईमध्ये व राज्यामध्ये उद्योग व व्यापार करण्याकरिता येणाऱ्यांवर आपण मराठी सक्तीची करावी, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, न्यायालयीन भाषा किमान जिल्हा पातळीवर तरी मराठीत केली पाहिजे. संगणकाच्या बाबतीत बोलावयाचे झाल्यास, आपण अजूनही संगणकांवर मराठीतून आज्ञावली करु शकलो नाही. हा प्रश्न अजूनही प्रलंबितच आहे. संगणकावर मराठी टाईप करावयाचे असेल तर त्यावर मराठीचा फॉंट वा त्यासंबंधीचे सॉफ्टवेअर उपलब्ध नसते. त्यामुळे आम्हाला मराठीतून व्यवहार करता येत नाही. त्यामुळे हे सर्व मराठीतून करुन घ्यावे, अशी माझी विनंती आहे.

नंतर कु.गायकवाड...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.कपिल पाटील सुरु ...

ज्ञानभाषेचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. सरपोतदार यांनी केला. विज्ञान तंत्रज्ञान, संशोधन या सर्व क्षेत्रातील इंग्रजी मधील ज्ञानाचे मराठीकरण करण्याची आवश्यकता आहे आणि ती जबाबदारी विद्यापीठाची आहे. लोणेरे विद्यापीठापासून मुंबई,पुणे पर्यंत सर्व विद्यापीठांनी ही जबाबदारी स्वीकारली पाहिजे. विधानसभेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र विज्ञान विद्यापीठ निर्माण करावे अशी मागणी करण्यात आली होती. तत्कालिन शिक्षण मंत्री श्री. कलल किशोर कदम यांनी या संदर्भात निर्णय घेतला होता. त्या वेळी माजी माननीय सदस्य श्री. शांताराम भिलसे यांनी या विद्यापीठातील डिप्लोमा कोर्सेस मराठीत सुरु करण्याची मागणी केली होती. परंतु ही मागणी नंतर फेटाळण्यात आली याचे कारण म्हणजे आपण अधिकाऱ्यांचे ऐकतो. या सदनामध्ये निर्णय घेण्याऐवजी आपण अधिकाऱ्यांना त्यांचे मत विचारतो आणि त्यानंतर निर्णय घेतो. हे बरोबर नाही. याबाबत शासनाने जर निर्णय घेतला तर साध्या कोर्सेसना असलेल्या प्रचंड मागणीमुळे तरुणांना नोकरीची संधी उपलब्ध होईल. हे कोर्सेस मराठीमध्ये सुरु केले जात नाहीत त्यामुळे अन्य भाषिक मुले हे कोर्सेस करतात. महाराष्ट्रातील विद्यालयामध्ये मराठी विषय घेणारी मुले फार कमी आहेत. महाराष्ट्र राज्याने त्रिभाषा सुत्राऐवजी द्विभाषा सूत्र कठोरपणे स्वीकारण्याची आवश्यकता आहे. हिंदी भाषा सक्तीची करु नका. हिंदी ऐवजी मराठी व इंग्रजी भाषा आपल्याला ठेवता येईल. इतर राज्यामधील लोक त्यांच्या प्रदेशात आपापली भाषा बोलतात व आपले सर्व व्यवहार त्याच भाषेत करतात. तसेच या लोकांचे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असते व ते इंग्रजीत देखील उत्तम प्रकारे व्यवहार करतात. ही राज्ये विकासामध्ये मुंबईपेक्षाही अग्रेसर आहे. या राज्यांमध्ये द्वीभाषा सूत्र आहे. मी मुद्दयांच्या पलिकडे बोलत नाही...

तालिका सभापती (श्री. रामनाथ मोते) : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील आपण अर्धा तासापासून बोलत आहात.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मी मुद्दयांच्या पलिकडे बोलणार नाही. मला या ठिकाणी मुद्यांची पुनरावृत्ती करावयाची नाही, त्यामुळे मी माझे भाषण थोडक्यात संपवितो.

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा राज्य मराठी भाषा विकास संस्थेविषयी आहे. या संस्थेचे मुख्य काम मराठी भाषेच्या विकासाचेच असले पाहिजे अशी सभागृहाची देखील इच्छा आहे.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील.....

परंतु या कामाकडे अतिशय दुर्लक्ष होत आहे. मराठी भाषेचा विकास करण्याच्या कामाची जी जवाबदारी या संस्थेची आहे ती जवाबदारी आपण वाढविणे आवश्यक आहे. या कामासाठी आपण आवश्यक 5 कोटी रुपयांचा निधी शासनाने उपलब्ध करुन दिला पाहिजे.तरच या समस्येवर मार्ग निघू शकेल असे मला वाटते. एवढे बोलून मी आपली रजा घेतो.

.....

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार (महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, एक अत्यंत जिव्हाळयाच्या आणि महत्वाच्या विषयावर या सदनाचे ज्येष्ठ सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी नियम 260 अन्वये मराठी भाषेविषयीचा प्रस्ताव या ठिकाणी चर्चेला आणला. त्याबद्यल मी त्यांचे आभार मानतो. गेल्या 2-3 दिवसांमधील सुट्टीचे दिवस वगळून सर्व सदस्यांच्या भावना आपण लक्षात घेऊन या विषयाला भरपूर वेळ देण्याची सोय येथे केली त्याबद्दल मी आपणास धन्यवाद देतो. मला असे वाटते की, या सदनामध्ये इतका प्रदीर्घ वेळ व मराठी भाषेवर चर्चा पहिल्यांदाच होत आहे. या चर्चेत अनेक सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेऊन अनेक मते मांडली. त्यामुळे एक -दोन मुद्दयांची पुनरावृत्ती झाल्यास मी आपली माफी मागतो.

सभापती महोदय, महाराष्ट्राची भाषावार प्रांत रचना सन 1960 मध्ये झाली असा उल्लेख या ठिकाणी करण्यात आला होता. सन 1946 साली बेळगावला अखिल भारतीय साहित्य संमेलन घेण्यात आले होते. या साहित्य संमेलनामध्ये प्रथमत: मराठी भाषिक राज्याची मागणी करण्यात आली. श्री. ग. त्र्यं.माडखोलकर हे त्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. ते एक ज्येष्ठ पत्रकार, ज्येष्ठ साहित्यिक व ज्येष्ठ कादंबरीकारही होते. श्री. ग. त्र्यं. माडखोलकर हे नागपूरमधील होते. लीला चरित्र तसेच मराठी वांङमयाची निर्मिती प्रथम अमरावतीजवळ झाली हा उल्लेख बरोबर आहे. स्वातंत्र्य प्राप्ती नंतर भाषावार प्रांत रचना करण्यास सुरुवात झाली आणि ती अंमलात येण्यास 1960 साल उजाडावे लागले. त्या वेळी स्व. यशवंतराव चव्हाण यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या शुभारंभाच्या भाषणात असे मार्मिकपणे सांगितले होते की, या महाराष्ट्रात सर्वत्र मराठीकरण होईल. आंध्र प्रदेशची तेलुगु, तामिळनाडूची तामिळ, महाराष्ट्राची मराठी, पश्चिम बंगालची बंगाली या प्रकारे सर्व राज्यांनी आपापली भाषा स्वीकारलेली आहे.

यानंतर श्री. रोझेकर.

अशुद्धीत पत्र / शुद्धीपत्र नाही

श्री.उल्हास पवार.....

भाषेच्या आधारावर राज्य निर्मिती झाल्यानंतर अनेकवेळा शासनाच्या वतीने मराठी ही प्रशासनाची भाषा, राजभाषा, सर्व पत्रव्यवहारांची भाषा झाली पाहिजे, असा प्रयत्न झाला. अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की, अद्याप शासनाला यामध्ये यश आलेले नाही. ठीक आहे. अद्याप मराठी भाषा पूर्णपणे वापरली जात नाही, ही खेदाची आणि दुर्देवाची बाब आहे, असे मलाही वाटते. अर्थातच, याला आपण सर्व जबाबदार आहोत. राज्यावर जे जे शासक म्हणून आले, पक्ष कोणताही असो, परंतु सर्वच थोडयाबहुत फरकाने यास कारणीभूत आहेत. सन्माननीय सदस्य, श्री.कपिल पाटील यांनी प्रमाण भाषा आणि बोली भाषा यासंदर्भातील उल्लेख त्यांच्या भाषणात केला आहे. मी योगायोगाने मराठी भाषा विकास परिषदेवर आमंत्रित सदस्य म्हणून कार्यरत आहे आणि मला सांगण्यास अत्यंत आनंद होत आहे की, ब-याच कालावधीनंतर सन्माननीय मुख्यमंत्री, श्री.विलासराव देशमुख यांनी मराठी भाषा विकास परिषदेला भाषा विकासासाठी निधी उपलब्ध करुन दिला आहे. या परिषदेला मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध करुन दिला जावा, या मागणीशी मी सहमत आहे. या परिषदेला निधी देण्यास उशीर झाला, ही खेदाची गोष्ट आहे. परंतु, बरेच वर्ष न दिलेला निधी काही अंशी का होईना, देण्याचा कृतिशील प्रयत्न माननीय मुख्यमंत्र्यांनी केला आहे.

सभापती महोदय, मराठी भाषेचा विकास म्हणजे नेमके काय ? दुर्देवाने म्हणा किंवा सुर्देवाने म्हणा, राज्यात खूप बोलीभाषा आहेत. पण या सर्व बोलीभाषा अत्यंत गोड आहेत. अहिराणी बोलीभाषेतील बहिणाबाईंच्या कविता आपल्याला गोड वाटतात. या भाषेत इतर भाषेचे देखील शब्द आहेत. गुजराथी भाषा अहिराणीमध्ये बेमालूमपणे मिसळली आहे. त्याचप्रमाणे कोकणी, व-हाडी या भागातील बोलीभाषा आहेत. व-हाडी भाषेतील 'माय' हा शब्द लहानांपासून मोठयांपर्यन्त व शिक्षितांपासून अशिक्षितांपर्यन्त सर्व लोक वापरतात, या शब्दामुळे एकप्रकारचा जिव्हाळा निर्माण होतो. असे अनेक शब्द आहेत. त्यामुळे प्रमाण भाषा, बोली भाषा, चर्चेतील भाषा यासंदर्भात चर्चा करीत असतांना साधकबाधक विचार करुन अंतिम निर्णय घेणे आवश्यक आहे. जी भाषा सर्वदूर, सर्वांना अतिशय सहजपणे स्वीकारता येईल, शिकता येईल आणि शिकवता येईल, अशा भाषेचा स्वीकार आपण केला पाहिजे. प्रमाण भाषा आपल्या शिक्षणामध्ये असल्यामुळे दूरच्या भागामध्ये ज्या शाळा आहेत तेथील विद्यार्थ्यांना व शिक्षकांना अडचणी निर्माण होतात. ज्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार.....

भागात शिक्षक जाऊ इच्छित नाहीत, बदली करुन घेण्याचा प्रयत्न करतात, त्यांच्यासाठी शासनाला काही सोयी कराव्या लागल्या, अडचणी लक्षात घेऊन व्यवस्था करावी लागली, सवलती द्याव्या लागल्या. पण योग्य प्रकारे शब्द शिकवता आला नाही म्हणून आपणच शिक्षकांची टिंगल करतो. टिंगल करणे हा भाग जरी बाजूला ठेवला तरी विद्यार्थ्यांना शहाणे करणे, योग्य पद्धतीने शिकविणे ही काळाची गरज आहे. परंतु, प्रमाण भाषा लोकांवर लादली गेल्यामुळे सर्वदूर, सर्व समाजातील लोकांना ती शिकण्यास अवघड जाते, याचाही गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. पदनाम कोषाबाबत आचार्य अत्र्यांनी आतिशय मार्मिक कोटी केली आहे. त्यांनी 'बदनाम कोष' अशी जी कोटी केली त्यामुळे त्यांच्यावर टीका झाली, अनेक वृत्तपत्रांनी अग्रलेख लिहिले. माझे म्हणणे आहे की, काही गोष्टी, काही शब्द हे स्वीकारले पाहिजेत. भारतातील हिंदी भाषेतील काही शब्द इंग्लडमध्ये त्यांच्या इंग्रजी भाषेमध्ये वापरले जातात. इंग्लडमध्ये 'लफडा' हा हिंदी शब्द वापरात असल्याचे मी वर्तमानापत्रात वाचले आहे. 'लफडा' या शब्दाऐवजी एखादा चांगला शब्द तिकडे गेला असता तर बरे झाले असते, हा भाग वेगळा. पण काही शब्द हे स्वीकारले जातात. मला हे सांगायचे आहे की, वेगवेगळया भाषेतील काही शब्द आपल्या भाषेत चपखलपणे बसतात. 'अभियंता' हा शब्द सुरुवातीला आपल्याला उच्चारण्यास अवघड वाटला असेल, 'कार्यकारी अभियंता' हा शब्दही तसाच आहे, पण हे शब्द आपण स्वीकारले, असे अनेक शब्द आहेत. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी मूळ शब्दांना असलेले प्रतिशब्द उत्तम प्रकारे सांगितले होते. रोजच्या व्यवहारात ते शब्द मुखामध्ये, कानामध्ये, ऐकण्यामध्ये नसल्यामुळे नवखे वाटतात पण एकदा ते रुळले की, आपलेसे वाटतात. म्हणून काही शब्द स्वीकारले पाहिजेत.

सभापती महोदय, दुसरी गोष्ट म्हणजे, महाराष्ट्राची राजधानी, मुंबई आहे, हे शहर आता वैश्विक शहर झाले आहे, हे शहर भारताची आर्थिक राजधानी आहे. पश्चिम बंगालमधील कलकत्ता, तामिळनाडूतील मद्रास ही शहरे देखील तशाच प्रकारची आहेत. परंतु, या शहरांपेक्षा मुंबईमध्ये भाषेच्या बाबतीत काही दुष्परिणामही जास्त झाले आहेत. वैश्विक शहर होतांना किंवा आर्थिक राजधानी होतांना जसे काही चांगले परिणाम झाले तसेच काही दुष्परिणामही झाले आणि ते आपल्या भाषेवर जास्त झाले. पश्चिम बंगालमध्ये कोणताही उद्योजक गेला, कोणताही परप्रांतीय गेला तर त्याला बंगालीमध्ये लिहावे लागते.

यानंतर कुमारी जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार.....

आपण तामिळनाडूमध्ये गेलात तर तेथे आपल्याला तामिळमध्ये लिहावेच लागेल,आंध्रमध्ये गेलात तर तेलगूमध्ये लिहावच लागेल परंतु आपल्या महाराष्ट्रामध्ये आलात तर आपल्याला मराठीमध्ये लिहावच लागेल याचे बंधन आपल्याकडून आगंतूकांवर घातले जात नाही, उक्त राज्यांसारखी परिस्थिती आपल्या राज्यामध्ये नाही आणि असलीतरी त्यासंदर्भात केलेल्या कायद्याची अंमलबजावणी अत्यंत सक्तीने करणे ही काळाची गरज आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी या ठिकाणी एक मुद्दा मांडला आणि त्या मुद्दयाला समर्थन देणारी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते यांनी मान हलविली. मुद्दा असा होता की, कैलासवासी शिक्षणमंत्री रामकृष्ण मोरे,माजी मुख्यमंत्री यांनी मराठी शाळांमध्ये पहिल्या इयत्तेपासून इंग्रजी विषय सुरु केला. याबद्दल माझे काहीही म्हणणे नाही कारण ही काळाची गरजच आहे. आजकाल केवळ श्रीमंत नव्हे तर मध्यमवर्गीय,कनिष्ठ मध्यमवर्गीय माणसांना सुध्दा असे वाटते की, आपली मुले ही इंग्रजी माध्यमातूनच शिकली पाहिजे. हल्ली एखादा गरीब माणूससुध्दा ओळीमध्ये बसून अत्यंत आग्रहाने असे सांगतो की, माझ्या मुलाला याच इंग्रजी शाळेमध्ये प्रवेश मिळाला पाहिजे. आमच्या येथील श्री.प्रकाश पाठारे नावाच्या एका तरुण व नवोदित कवीने यावर एक विडंबनपर कविता लिहिली आहे. प्रथम चार पाच इयत्ता इंग्रजी माध्यमातून शिकल्यानंतर आपल्या पाल्याला इंग्रजी शाळेतून काढून नंतर मराठी माध्यमामध्ये टाकणा-या पालकांची उदाहरणेही मी बरीच बघितली आहेत, या पालकांची आर्थिक, कौटुंबिक,सांस्कृतिक अवस्था आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमामध्ये शिकविण्याची नसतांना देखील ते आपल्या पाल्यांना अत्यंत आग्रहाने इंग्रजी माध्यमातील शाळांमध्ये शिकण्याकरिता प्रवेश घ्यावयाला लावतात,ही मानसिकता दुर्देवाने फार वाईट आहे. उदाहरणच द्यावयाचे झाले तर बृहन्महाराष्ट्र मंडळाची स्थापना केव्हा झालेली आहे ? स्वर्गीय काकासाहेब गाडगीळ, मालणकर वगैरे ही खूप जुनी माणसे आहेत., त्या काळामध्ये एक लाख मराठी माणसे दिल्लीमध्ये राहत होती. दिल्लीतील नुतन मराठी विद्यालयामध्ये सगळे विषय मराठीतून शिकविले जात होते, परंतु आता काळ बदलला आहे आता तेथे मराठी शिक्षक किती आहेत ? आज त्या ठिकाणी मराठी भाषेची व शाळांची काय अवस्था आहे, तेथील शाळांमध्ये मराठी शिकविण्याकरिता एकही शिक्षक तयार नाही. महाराष्ट्र सदनासमोर केरळची एक शिक्षण संस्था आहे, त्याचा विस्तार मात्र दिल्लीमध्ये मोठया प्रमाणावर होत आहे. अमेरीकेत किंवा इंग्लंडमध्ये गुजराथी,तामिळ,तेलगू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ SBT/ MHM/ KTG/

12:25

श्री.उल्हास पवार.....

शाळा आहेत परंतु मराठी शाळा नाहीत. इंग्लंड व अमेरीकेमध्ये मराठी माणसांच्या मुलांकरिता मराठी शिक्षणाची सोय नाही. माझे एक नातेवाईक इंग्लंडमध्ये राहतात त्यांनी असे सांगितले की, इंग्लंडमध्ये दर आठवडयाला रविवार मराठी भाषा शिकविण्याकरिता एक वर्ग चालविला जातो , अशा प्रकारे मराठी शिकविण्याकरिता सोय केलेली आहे. परंतु त्या आठवडी वर्गाला किती आत्मीयतेने मराठी माणसे जातात ? आपल्या महाराष्ट्रामध्ये मुंबई पुण्यामध्ये किती मराठी भाषिक आपापल्या घरी बोलतांना मराठी भाषेचा वापर करतात. मला सांगतांना अतिशय खेद होत आहे की, मुंबई महापालिकेच्या कक्षेमधील मराठी शाळा दरवर्षी 150,200,250 अशा प्रकारे बंद पडत आहेत, यात मी दोष कुणालाही देऊ इच्छित नाही, उगाच कोणाच्याही उखाळयापाखाळया काढणे व प्रतिकात्मक टोले मारणे मला बरोबर देखील वाटत नाही. मराठी शाळा आता ओस पडलेल्या आहेत, परंतु मराठी शाळा आज बंद का होत आहेत ? याचा आपण अभ्यास केला पाहिजे. या ठिकाणी आज सन्माननीय सदस्य श्री.एन.पी.हिराणी, डॉ.अजीज बसले आहेत ते उत्तम मराठी बोलतात त्यांनी एकेकाळी मराठी नाटकांमध्येदेखील कामे केलेली आहेत. यवतमाळ जिल्हयातील अली हसन ममदानी मला आठवतात की, सदाशिव पेठेतील मराठी माणसाला सुध्दा इतके उत्तम मराठी बोलता येणार नाही इतके उत्तम मराठी अली हसन ममदानी बोलतात. त्यांचे मराठी भाषेचे ज्ञान अगाध आहे. तसेच, काँगेस सेवा दलातील श्री.यु.ओ.पठाण, हे उत्तम मराठी बोलावयाचे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी एक मुद्दा मांडला होता, त्यांची मानसिकता उर्दूकडे का झुकली, उर्दू ही भाषा आपल्याला आलीच पाहिजे, परंतु त्याचबरोबर मराठी ही भाषा देखील आली पाहिजे या मानसिकतेमधून ते का गेले नाही ? आता ही संशोधनाची गोष्ट आहे याचा अभ्यास तुम्ही आम्ही सर्वांनी करावयाची आवश्यकता आहे.. मराठी भाषेला मरण आहे, असे मला वाटत नाही कारण मी भागवत संप्रदायातील एक आशावादी माणूस आहे. मराठी भाषेला जोपर्यंत आदिवासी व दलित साहित्य जिवंत आहे तोपर्यंत मरण नाही. मुंबई, पुण्यातील घरांमधून मराठी जाण्याची एकवेळ शक्यता आहे. तुम्ही आम्ही कितीही मराठी संपविली तरीसुध्दा मला पूर्ण विश्वास आहे की, दलित साहित्याच्या रुपाने मराठी कायम जिवंत राहील, असे मला वाटते. स्वर्गीय आचार्य अत्रे संयुक्त महाराष्ट्राच्या प्रचाराच्या वेळी संपूर्ण महाराष्ट्रात फिरत होते त्यावेळी डांग उंबरगाव या आदिवासी विभागातील गावामध्ये ते गेले असता, त्यांना असा अनुभव आला की,

N -3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार.....

सभेत ते मराठी विनोद करीत असतांना त्यांच्या विनोदांवर कुणीही हसत नव्हते, मग त्यांच्या असे लक्षात आले की, या माझ्या आदिवासी बांधवांना की जे गावित आहेत त्यांना मराठी समजत नाही. आपल्या महाराष्ट्रातील आदिवासी विभागांमध्ये गावित हे आडनाव प्रचंड प्रमाणावर आढळून येते, परंतु आता हा गावित समाज गुजराथमध्ये स्थलांतरित झालेला आहे.

यानंतर श्री.बोरले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार .....

ते कोळी बांधव आहेत, समुद्र किना-यावर राहणारे आहेत, मच्छिमारी करणारे आहेत. परंतु त्यांना आचार्य अत्रे यांचा मराठी भाषेतील विनोद समजत नव्हता. हे स्वत: आचार्य अत्रे यांनी लिहून ठेवलेले आहे. मघाशी मी दिल्लीतील नूतन मराठी विद्यालयाची अवस्था सांगितली. बृहन महाराष्ट्र मंडळाची स्थापना होऊन आज जवळ जवळ 75 वर्षे पूर्ण झालेली आहेत. चेन्नई येथे बृहन महाराष्ट्र मंडळाच्या समारंभाला माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख, माननीय केंद्रीय ऊर्जा मंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे आणि मी गेलो होतो. त्या समारंभाला जाण्याची संधी आम्हाला मिळाली होती. सागर जो आता मध्यप्रदेशातील भाग आहे, तेथे मराठी माध्यमाची शाळा होती. श्रीमती पिंपळगावकर यांचे वय आज 90 वर्षे आहे. त्यांचे पती त्या शाळेमध्ये शिक्षक होते. त्यांनी मला सांगितले की, राजमाता विजयाराजे शिंदे सागरमधील मराठी माध्यमाच्या शाळेत शिकलेल्या आहेत. मला जेव्हा त्यांनी ही माहिती सांगितली तेव्हा मला आश्चर्य वाटले. सांगावयाचा मुद्दा असा की, भाषावार प्रांत रचना झाल्यानंतर मराठी ही महाराष्ट्रापुरती झाली आणि एक काळ जेव्हा विभागवार प्रांत होते तेव्हा मराठी चेन्नईच्या "सागर" भागातही बोलली जात होती. सन 1948 पर्यंत ग्वाल्हेरमध्ये 70 टक्के शाळा मराठी होत्या. होळकरांचे राज्य असतांना इंदौरच्या न्यायालयाची भाषा मराठी होती. आज भाषिक प्रांत रचना होऊन सुद्धा महाराष्ट्रात जेव्हा न्यायालयाची भाषा मराठी होत नाही, तेव्हा आम्हाला फार दु:ख होते. न्यायालयामध्ये वकील नेमकी काय बाजू मांडतो, हे त्या अशीलालाही कळत नाही. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री.बाबासाहेब भोसले यांनी मला एक गंमत सांगितली होती. मी ही गोष्ट सांगत असतांना सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी माझ्याकडे पाहून हसत आहेत. न्यायालयाचे न्यायाधीश असे म्हणत होते की, तुमचा मुद्दा मला कळलेला आहे. तुम्ही पुन्हा तेच तेच का सांगत आहात ? तेव्हा बाबासाहेब भोसले त्या न्यायाधीशांना इंग्रजीमध्ये म्हणाले की, माझ्या अशीलाला इंग्रजी कळत नाही. पण त्याला असे वाटावे की, मी त्याच्यासाठी खूप भांडत आहे. म्हणजे मला फी मिळेल, असा विनोद त्यांनी सांगितला. म्हणून न्यायालयाची भाषा मराठी झाली तर वकील न्यायालयामध्ये कशी बाजू मांडतो, हे त्या अशीलाला कळेल. विजेचे बील असेल, न्यायालयातील चर्चेची जी भाषा असेल ती जर सामान्य मराठी माणसाला समजली तरच त्यांना फायदा होईल. न्यायालयातील खटला, आता खटल्याचे खूप

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार .....

अर्थ आहेत, तो भाग सोडून द्या. परंतु "केस" म्हटल की समजते. ग.दि.माडगूळकर यांनी त्यांच्या संवादामध्ये असे म्हटले होते की, तुम्ही छायाचित्र काय म्हणता ? फोटो असे मराठीमध्ये बोला. सांगावयाचा मुद्दा असा की, काही गोष्टी स्वीकारुन मराठी भाषा समृद्ध कशी करता येईल, हे पाहिले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी अत्यंत चांगले मुद्दे मांडले. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते असे म्हणाले की, मराठी भाषेकरिता एकदा आम्हाला रडू द्या आणि सगळीकडे तशाच स्वरुपाचे शीर्षक आले. आम्ही देखील सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या भावनांशी पूर्णपणे एकरुप झालो. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी माधव जुलीयन यांची कविता वाचून दाखविली. त्या कवितेमध्ये असे म्हटलेले आहे की, इंग्रजांचे राज्य आहे. ज्या ठिकाणी ज्यांचे राज्य असते, तेथे ते साम्राज्याच्या सर्व गोष्टींबरोबर आपली भाषा लादतात, हे बरोबर आहे. जगातील संपर्काची, व्यवहाराची भाषा इंग्रजी झाली, ही गोष्ट खरी आहे. पण याचा अर्थ त्याचा पगडा सर्व युरोपभर नाही. 64 किलोमीटरची खाडी, फ्रान्समध्ये इंग्रजी बोलत नाहीत. जर्मनीमध्ये, जपानमध्ये, रशियामध्ये इंग्रजी भाषा बोलत नाहीत. ती माणसं आपआपल्या भाषेमध्ये आधुनिक विज्ञान आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. आपल्याही भाषेमध्ये हे होणे काळाची गरज आहे.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

उपसभापती : आता 12 वाजून 34 मिनिटे झालेली आहेत. आपल्याला 12.55 वाजेपर्यंत माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह ही चर्चा पूर्ण करावयाची आहे.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, मी दोन मिनिटांमध्ये माझे मुद्दे मांडतो. मला एवढेच म्हणावयाचे आहे की, मी मघाशी बृहन महाराष्ट्र मंडळाचा उल्लेख केला. मला आठवते की, माननीय मुख्यमंत्र्यांनी चेन्नई येथे बृहन महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षांना आश्वासन दिले होते. देशामध्ये या ठिकाणी मराठी माणसे आहेत त्या ठिकाणी मराठी भाषा, मराठी संस्कृती, मराठी सण हे सर्व जपण्याचा ती मंडळी मनापासून प्रयत्न करीत आहेत.

यानंतर श्री.गागरे .....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.उल्हास पवार .....

आपण त्यांना 5-10 लाख रुपयांचे अनुदान देत आहात. माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख असे म्हणाले की, दरवर्षी मराठी साहित्य संमेलनाला आपण 25 लाख रुपये देतो त्याचप्रमाणे अर्थसंकल्पात तरतूद करुन बृहन्महाराष्ट्र मंडळासाठी आर्थिक तरतूद करण्यात येईल. सभागृहात उपस्थित असलेले शालेय शिक्षण मंत्री प्रा.वसंत पुरके यांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना आग्रहाने सांगावे की, बृहन्महाराष्ट्र मंडळ देशभर काम करीत आहे. या मंडळावर कोण काम करीत आहे हे सर्व विसरुन दरवर्षी अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली तर मराठी भाषा सर्वदूर पोहोचण्यासाठी, संवर्धित व वृंध्दीगत होण्यासाठी अत्यंत चांगली मदत होईल असे मला नम्रपणे सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी त्यांच्या भाषणात कवी माधन ज्युलीयन यांचा उल्लेख केला आहे. "मराठी असे आमची मायबोली, जरी आज ती राजभाषा नसे, हिचे पुत्र आम्ही, हिचे पांग फेडू, हिला बैसवू वैभवाच्या शिरी" असे कवी माधव ज्युलीयन म्हणून बरीच वर्षे झालेली आहेत. मराठीला आपण वैभवाच्या शिरी बसविले आहे की नाही हे मला माहिती नाही. मराठी टिकवायची की नाही याची चर्चा चालू आहे, मराठी टिकविण्यामध्ये शासनाची अत्यंत महत्वाची जबाबदारी आहे, त्याच बरोबर प्रत्येक मराठी माणसाची जबाबदारी आहे, असे मला सांगावयाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी मुद्दा मांडला आहे तो खरा आहे, कदाचित भविष्य काळामध्ये लोक ज्ञानदेव तुकाराम म्हणण्याऐवजी टुकाराम म्हणतील, असे घडण्याची शक्यता आहे. मराठी भाषेबाबत जुन्या काळात घडलेली एक आठवण सांगतो. कै.वसंतदादा पाटील हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना पुण्यातील गणेशोत्सवासाठी ते आले होते. मी त्यांच्या बरोबर गेलो होतो, पुण्यातील गणेशोत्सवाच्या कार्यक्रमात तुकारामाच्या सदेह वैकुंठ गमनाचे एक दृश्य होते. संजीवन समाधी याला काही पर्यायी शब्द नाही. सदेह वैकुंठ गमन याला उत्तम शब्द दुसऱ्या वाड्मयात सापडेल की नाही हे मला सांगता येणार नाही. गणेशोत्सवात सदेह वैकुंठ गमनाचे दृश्य चालू होते, सदाशिव पेठेतील एक कुटुंब 12 वर्षाच्या मुलासह ते दृश्य पाहात होते. तो मुलगा सारखा त्याच्या आई-वडीलांना विचारत होता की, हे काय चालले आहे ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार.....

जवळजवळ 10 मिनिटे आई-वडील त्या मुलाला सांगत होते की, संत ज्ञानेश्वर यांच्या नंतर संताची जी परंपरा आहे, त्यातील जगतगुरु संत तुकाराम हे फार मोठे संत आहेत. संत तुकाराम सदेह वैकुंठ गमनाला गेले, असे त्याचे आई-वडील हातवारे करुन सांगत होते. परंतु त्या मुलाला काही समजत नव्हते. कारण तो सुरुवातीपासून इंग्रजी माध्यमाचा होता. 10-12 मिनिटानंतर तो मुलगा मोठयाने ओरडला. Why this Tukaram (टुकाराम) is going up and down. Why this Tukaram(टुकाराम) is going up and down कै.वसंतदादा पाटील व मी ते दृश्य पाहात होतो. आता आपण जसे हसत आहात, तसे मला क्षणभर हसू आले होते. पण मी जेव्हा कै.वसंतदादा पाटील यांच्याबरोबर परत निघालो, तेव्हा मला या बाबीचा अत्यंत खेद झाला. कारण पुणे शहरापासून 28 कि.मी. वर आळंदी आहे. 30 कि.मी. वर तुकाराम महाराजांची देहू आहे. "आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने, शब्द जे वाटू लोकांमध्ये" असे म्हणणारे जगतगुरु संत तुकाराम महाराज हे पुण्यापासून 30-32 कि.मी. वर आहेत. ज्ञानेश्वर महाराजांची संजीवन समाधी जवळच आहे. तरी पुणे शहरातील मुलगा Why this Tukaram(टुकाराम) is going up and down असे म्हणतोय. पुढच्या पिढीतील मुलांना मराठी येईल किंवा नाही अशा शंका, भिती व खेद तुम्ही व्यक्त करत आहात. मी नम्रपणे सांगतो की, मराठी भाषा टिकवायची, वाढवायची असेल तर शासनाबरोबर पालकांची व लोकांची जबाबदारी आहे. मला असे आढळून आले आहे की, मराठी माणसे डेक्कन क्वीन रेल्वेत असोत किंवा विमानात असोत, त्यांच्या मुलांबरोबरही मराठी बोलत नाहीत आणि बोलताना चेहऱ्यावर अभिनय करुन अभिमानाने सांगतात की, माझ्या मुलाला मराठी येत नाही. अशा वेळी मला फार वाईट वाटते. अशा वेळी मला किती राग आला तरी तो व्यक्त करण्यासाठी मला सभागृहात असंसदीय शब्द वापरता येत नाही, कारण माझे व्यक्तिमत्व तसे नाही. परंतु असे वाटते की, त्या माणसाचे थोबाड फोडावे. मी ही सत्य घटना सांगत आहे. उच्च शिक्षित माणसाच्या मुलाला मराठी येत नसेल तर त्याचा त्या माणसाला अभिमान वाटतो हे बरोबर नाही.

उपसभापती : श्री.दिवाकर रावते व तुम्ही दोघे एकत्र येऊन जो कोणी मराठीत बोलणार नाही त्यांच्या कानफाटात माराल, तुम्ही तसा श्री.दिवाकर रावते यांना ग्रीन सिग्नलच देऊन टाकला आहे. 3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, मी अत्यंत नम्रपणाने सांगतो की, जगातील मानव वंशाच्या शास्त्रज्ञांनीच नव्हे तर शरीरशास्त्राचा, बुध्दीमत्तेचा, बुध्द्यांकाचा अभ्यास करणा-यांनी हे अभ्यासाअंती जाहीर केलेले आहे की, मातृभाषेत शिकल्याशिवाय कोणत्याही मुलाचा बुध्दयांक, स्मरणशक्ती, प्रगल्भता व आकलनशक्ती वाढत नाही. जगातील शास्त्रज्ञांनी सिध्द करुन हे मत व्यक्त केलेले आहे. हे सगळे माहिती असतानासुध्दा आपला अट्टाहास इंग्रजी शाळेकडे जाणारा आहे. मी अनेक उदाहरणे दिली आहेत. श्री.जयंत नारळीकरांचे व श्री.वसंत गोवारीकरांचे उदाहरण दिले आहे. त्याच्याही पेक्षा मी तुम्हाला गंमत सांगतो की, श्री.विजय भटकर हे विदर्भातील अकोला जिल्हयातील मुर्तिजापूर तालुक्यातील रहिवासी असून एका शेतकरी कुटुंबातील आहेत, त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार मिळाला आहे.

नंतर श्री.सुंबरे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार ....

त्यांचे सख्खे बंधू आले होते, ते त्यांच्या गावचे उपसरपंच होते. मूर्तिजापूर जवळ त्यांचे गाव आहे.` श्री.विजय भटकर, कोठल्याही नू.म.वि., मॉडर्न वा राजा शिवाजी विद्यालय यासारख्या मोठ्या शाळेमध्ये गेलेले नव्हते, अगदी गावातील छोट्या शाळेत त्यांचे शिक्षण झालेले होते. तसेच डॉ.रघुनाथराव माशेलकर हेही कोकणातील आपल्या खेड्यातील शाळेत शिकले आणि नंतर मुंबईमध्ये येऊन रात्रशाळेमध्ये शिकले आणि आज जगद्विख्यात झाले. म्हणजे डॉ. माशेलकरांचे मोठ्या शाळेवाचून काही अडले नाही, ते डायरेक्ट इंग्रजी शाळेमध्येही गेले नाहीत. तीच गोष्ट डॉ. नारळीकराची, डॉ. गोवारीकरांची, श्री.विजय भटकर यांचीदेखील आहे. म्हणून मला विनम्रपणे सांगावयाचे आहे की, या शासनाच्या माध्यमातून, आपल्या सर्वांच्या, सदनाच्या माध्यमातून मी सांगू इच्छितो की, जसे याबाबतीत शासनाचे कर्तव्य आहे तसेच लोकांपर्यंत आपली ही जी भावना आहे ती पोहोचविणे ही काळाची गरज आहे. आपल्याला मराठी भाषा उत्तमपणे टिकवावयाची असेल, शक्तीशाली करायची असेल, मजबूत करावयाची असेल तर हे आपण केले पाहिजे. मी या बाबतीत एकच उदाहरण देतो. मी भाषावार प्रांतरचनेपूर्वीचे सांगतो आहे. जेव्हा मध्य प्रदेश प्रांत निर्माण करण्याचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा त्या राज्याची भाषा हिंदी असावी असे पंडित रविशंकर शुक्ला, श्री.डी.बी.मिश्रा, स्व. पंडित जवाहरलाल नेहरू या सर्वांनी ठरविले. पण त्यावेळचे थोर स्वातंत्र्य सैनिक श्री.आर.के.पाटील, ज्यांची नुकतीच वयाची 100 वर्षे पूर्ण झाली आहेत आणि आजही ते हयात आहेत. त्यांच्या 100 व्या वाढदिवसाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख आणि मी असे दोघेही गेलो होतो. त्यांनी आपल्या हाताने लिहून दिले. मला खूप आनंद वाटला. त्यावेळी पं.जवाहरलाल नेहरूंच्या पुढे, त्यावेळी लोकप्रियतेच्या कळसावर असलेल्या त्या माणसाच्या पुढे बोलण्याची कोणाचीही हिम्मत नव्हती आणि त्यावेळी पं.नेहरूंनी सांगितले की, मध्य प्रदेशची राजभाषा ही हिंदी होईल तेव्हा श्री.आर.के.पाटील म्हणाले की, नाही, या राज्याची भाषा मराठी देखील असली पाहिजे. हिंदी आणि मराठी अशा दोन्ही भाषा त्या मध्य भारत म्हणजे मध्य प्रदेश राज्याच्या असल्या पाहिजेत. त्यावर पं. नेहरू म्हणाले की, नाही, मध्य प्रदेशची भाषा हिंदीच राहील. त्यावर श्री.आर.के.पाटील यांनी पं. नेहरूंना सांगितले की, मग मध्य प्रदेश होणार नाही. सभापती महोदय, आज देखील श्री.आर.के.पाटील हे हयात आहेत. त्यांच्या वयाला 100 वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यांची ही आग्रही भूमिका पाहिल्यानंतर, एका थोर स्वातंत्र्य सैनिकाने ही भावना

.... क्यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

व्यक्त केल्यानंतर स्व. पं. नेहरूंनी दोन्ही भाषा स्वीकारल्या. मग त्यावेळच्या मध्य भारताची म्हणजेच मध्य प्रदेशची भाषा मराठी व हिंदी अशी दोन्हीही झाली. माझा सांगण्याचा मुद्दा असा की, असा हा प्रखरपणा असला पाहिजे. शेवटी अतिरेकी आत्मियता ही जशी धोक्याची आहे तसाच अतिरेकी उदारमतवाद हा देखील धोक्याचा आहे. तेव्हा या निमित्ताने मी शासनाला आणि सर्वच पक्षाच्या नेते मंडळींना सांगू इच्छितो की, जसा अतिरेकी अस्मिता आणि अति संकुचितपणा हा जसा धोक्याचा आहे तसाच किंबहुना त्यापेक्षाही अधिक अतिरेकी उदारमतवादीपणा कधी कधी धोक्याचा आहे. जसे मी मघाशी सांगितले की, मराठी आणि हिंदीची लिपी एकच असल्याने आपण 'स्व' स्वीकारतो. ...

उपसभापती : अतिरेकी उदारपणाचे फटके मी खाल्ले असल्याने मला त्याची जाणीव आहे.

श्री. उल्हास पवार : दुसरी गोष्ट म्हणजे आपला पोषाख. आता मी असे म्हणत नाही की, प्रत्येकाने फेटा बांधला पाहिजे. पण या पोषाखाच्या बाबतीत मी तामिळनाडूचे उदाहरण आपणास देतो. या संदर्भात स्व. बाळासाहेब भारदे असे म्हणाले होते की, तामिळनाडूतील माणसाने उच्च शिक्षण घेतले, तो अमेरिकेमध्ये गेला, जगभर फिरून आला पण आपली लुंगी आणि कपाळावरचे भस्म लावण्याचे विसरला नाही. त्यामुळेच ते लोक तामिळी उत्तम बोलतात आणि इंग्रजीही उत्तम बोलतात. आपल्या लोकांनी काय केले ? तर पोषाख देखील सांभाळलेला नाही आणि संस्कृतीही सांभाळली नाही, काहीच सांभाळलेले नाही. ही केवळ शासनाची जबाबदारी आहे असे म्हणून आपण मोकळे होऊन चालणार नाही. जसे मी खेद येथे व्यक्त केला की, आपल्या घरातील माणसे एकमेकाशी मराठी बोलत नाहीत. पण तामिळनाडूमध्ये ते चालणार नाही. अमेरिकेमध्ये असलेला तामिळी माणूस देखील घरामध्ये बोलताना तामिळीमध्येच बोलतो. तेव्हा आपली ही जी अस्मिता आहे ती आपण कोठे तरी दडवून ठेवलेली आहे आणि ती म्हणजे काही तरी आपली न्यूनता आहे, मला इंग्रजी भाषा येते, पण मला माझी मराठी भाषा येत नाही याचा अभिमान वाटणे याच्या इतकी खेदाची आणि दुर्दैवी गोष्ट नाही असे मला वाटते. म्हणून या सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करून, मराठी भाषेच्या विकासासाठी प्रशासकीय भाषेमध्ये मराठीमध्ये, ज्याप्रमाणे कार्यकारी अभियंता हा एक प्रतिकात्मक शब्द सांगितला, त्याची टिंगल टवाळी न करता स्वीकारला गेला पाहिजे आणि ज्या शब्दाला पर्यायी मराठी शब्द नसतीलच तर मग ते, दुसऱ्या भाषेतील शब्द

..... क्यू 3 ...

KBS/ KTG/ SBT/ श्री. गागरे नंतर --- 12:40

श्री. पवार ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्वीकारले पाहिजेत. जसे 'टेबल' हा शब्द. याला दुसरा पर्यायी शब्द मराठीत नाही. 'मेज' हा शब्द आहे पण तो हिंदी भाषेतील शब्द आहे. म्हणून असे काही शब्द आपण दुसऱ्या भाषेतील असले तरी ते स्वीकारले पाहिजेत. मग ते शब्द आणि आपली भाषा असे करून आपण आपली भाषा अधिक वृद्धिंगत, अधिक सबल, अधिक शक्तिशाली करून प्रत्येकाच्या मनात रूजविण्याचा प्रयत्न केला तर मला वाटते की हा प्रस्ताव या ठिकाणी ज्या भावनेने सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी मांडलेला आहे आणि ज्या भावनेने सर्वांनी या चर्चेत सहभागी होऊन शासनाला विनंती करण्याचा प्रयत्न केला आहे त्याची दखल आपण गांभीर्याने घ्यावी एवढीच विनंती करतो आणि थांबतो. धन्यवाद.

****

(यानंतर श्री. सरफरे ..... आर 1 ..

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : या प्रस्तावावरील चर्चेमध्ये अजून तीन ते चार माननीय सदस्यांना भाग घ्यावयाचा आहे. ही चर्चा मला आजच संपवावयाची होती. परंतु मंत्रिमहोदयांच्या उत्तराच्या भाषणासह ही चर्चा आज संपविणे अशक्य असल्यामुळे उद्या सकाळी 10 वाजता या प्रस्तावावरील चर्चेकरिता विशेष बैठक घेण्यात येईल. त्यामुळे ज्या सदस्यांना चर्चेमध्ये भाग घ्यावयाचा आहे त्यांनी उद्या सकाळी 10 वाजता सभागृहामध्ये उपस्थित रहावे. ज्या माननीय सदस्यांचे भाषण पूर्ण झाले आहे, ते उद्या सकाळी लवकर नाही आले तरी चालू शकेल. उदा. माननीय सदस्य श्री. सरपोतदार साहेबांचे भाषण पूर्ण झाले आहे. ते सभागृहामध्ये ज्येष्ठ आणि वडीलधारी सदस्य आहेत. त्यामुळे त्यांचा आदर राखून त्यांच्याप्रमाणे ज्या माननीय सदस्यांची भाषणे पूर्ण झाली आहेत व ज्यांना लवकर सभागृहामध्ये उपस्थित रहाणे अशक्यप्राय आहे त्यांच्याकरिता मी हे सांगत आहे. परंतु सर्वच माननीय सदस्यांना अशक्यप्राय होऊ नये. मराठी भाषेच्या प्रस्तावावर चर्चा करतांना, मराठी भाषेला न्याय देतांना सभागृहामध्ये आवश्यक गणपूर्ती राखली गेली पाहिजे. तरच आपण मराठी भाषेवरील आपले प्रेम सिध्द करु शकू. आज गणपूर्तीअभावी दोन वेळा सभागृहाचे कामकाज तहकूब करावे लागले. आजची वेळ उद्या पुन्हा येऊ न देता सर्व माननीय सदस्यांनी मोठया संख्येने सभागृहामध्ये उपस्थित रहावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी आपणास एकच विनंती आहे की, मी माननीय श्री. पुरके साहेबांना म्हणालो. तेव्हा ते मला "नोटींग" घ्यावयाचे आहे असे म्हणाले. त्यांनी शासनाच्या वतीने "नोटींग" हा शब्द वापरला. माझ्याकडे शब्दकोष आहे त्यामध्ये पर्यायी शब्द "टिप्पणी" आहे. तेव्हा हा चर्चेचा महत्वाचा मुद्दा नाही. या प्रस्तावावर उद्या मंत्रीमहोदय उत्तर देणार आहेत. या चर्चेला माननीय मुख्यमंत्र्यांनीच उत्तर दिले पाहिजे हे सांगण्याची पाळी 50 वर्षानंतरही आमच्यावर येते. तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांनीच उत्तर दिले पाहिजे हा आमचा आग्रह आहे. या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी निर्णयात्मक भूमिका घेणे आवश्यक आहे. यामधून संपूर्ण शासकीय यंत्रणेला संदेश गेला पाहिजे. तामिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, आजपासून आमची राजभाषा ही तामिळच असेल. जो कुणी ही भाषा मानणार नाही त्याची गय केली जाणार नाही. तेव्हा अशाप्रकारचा संदेश आपल्या माननीय मुख्यमंत्र्यांमार्फत गेला पाहिजे. नाही तर माननीय मंत्री किंवा राज्यमंत्र्यांनी चर्चेला दिलेले उत्तर हे त्या विभागाचे उत्तर असेल. अशी आमची आग्रहाची मागणी आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, उद्या सकाळी साडे दहा वाजता बैठक घ्यावी अशी माझी सूचना आहे.

उपसभापती : उद्या सभागृहाची नियमित बैठक 12.00 वाजता आहे. त्यामुळे ही चर्चा आपण आणखी पुढे नेली तर मराठी भाषेचे महत्व कमी करीत आहोत असे होईल...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, भाषेचे महत्व कमी होणार नाही. उलट महत्व वाढेल. ज्या माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे त्यांना आपण बोलू द्यावे. आम्ही या प्रस्तावाकरिता आग्रह धरीत आहोत, इतर अडीच तासांच्या प्रस्तावांच्या बाबतीत आम्ही आग्रह धरीत नाही. तेव्हा या प्रस्तावावर ज्या माननीय सदस्यांना बोलावयाचे असेल त्यांना तेवढा वेळ आपण बोलू द्यावे अशी माझी मागणी आहे.

उपसभापती : ठीक आहे. आता माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी भाषण सुरु करावे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यामध्ये मराठी भाषेच्या अस्तित्वाकरिता एवढी रडण्याची पाळी आपल्यावर यावी ही शोकांतिका आहे असे मला वाटते. माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मराठी भाषेच्या विषयासंबंधी अतिशय चांगला प्रस्ताव पोटतिडिकीने मांडला आहे. त्यावर माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. मधुकर दादा सरपोतदार यांनी चांगले भाष्य केले आहे. सभापती महोदय, आपण सातत्याने पहातो की, मराठी भाषेच्या वापरासंबंधी जी माणसे अतिशय आग्रहाने बोलत असतात त्यांची मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये शिकत असतात. म्हणून आपण जे बोलतो त्याचे आचरण आपल्यापासूनच केले पाहिजे असे मला वाटते. या चर्चेमध्ये जे मुद्दे मांडण्यात आले आहेत त्यांची मी पुनरुक्ती करणार नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे (पुढे सुरु....

परंतु उद्या या संबंधाने शासनाकडून जे उत्तर दिले जाणार आहे, त्या संदर्भाने आम्हा सर्व सन्माननीय सदस्यांची अशी अपेक्षा आहे की, शासनाच्या माध्यमातून ज्या काही जाहिराती निघतात, या ठिकाणी जी काही निवेदने होतात, त्यामध्ये कोणत्याही पध्दतीने इंग्रजीचा वापर या पुढच्या काळामध्ये होणार नाही, जे काही शासनाच्या अखत्यारित आहे ते देखील निश्चित करू या विषयीचे ठोस अभिवचन देणारे निवेदन करावे,अशी अपेक्षा व्यक्त करून आणि आपण मला दोन मिनिटे बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल आपले आभार मानून माझे दोन शब्द संपवितो.

उपसभापती : मराठी भाषेसंबंधीच्या प्रस्तावावर उद्या सकाळी 9-30 ते 11-30 वाजता विशेष बैठक घेण्यात येईल. त्यामध्ये सर्वश्री श्रीकांत जोशी, रामनाथ मोते, संजय केळकर, अरविंद सावंत आणि डॉ.एम.अे.अझिज असे पाच सन्माननीय सदस्य बोलणार आहेत, त्यांना दहा-दहा मिनिटांचा वेळ देण्यात येईल, त्यानंतर मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण होईल.

आता सभागृहाची बैठक स्थगित होऊन सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1-00 वाजता सुरु होईल.

(यानंतर सभागृहाची बैठक 12-52 ते दुपारी 1-00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

यानतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: पुण्यतिथी निमित्त छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,...

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कामकाज मंत्री) : सभापती महोदय, या सदनाचे कामकाज सुरु होण्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने त्यांना अभिवादन करण्याच्या दृष्टीकोनातून मी प्रस्ताव मांडू इच्छितो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी त्यासाठीच उभा राहिलो होतो. तिथीप्रमाणे काल छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम साजरा झाला. आपल्या विधिमंडळ परिसरामध्येही तो कार्यक्रम आपण साजरा केला. परंतु काल सभागृहाचे कामकाज चालू नव्हते. त्यामुळे आज आपण छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करावे अशी मी विनंती करतो. मी दुसरा एक महत्वाचा मुद्दा मांडू इच्छितो. माझी अशी माहिती आहे की, शिवनेरी गडावर जो शिलालेख लिहिलेला आहे त्या शिलालेखावर 3 एप्रिल, 1680 हा पुण्यतिथीचा दिवस लिहिलेला आहे. हे अभिवादन करीत असताना याबाबत तपासणी करुन नक्की तारीख कोणती आहे हे महाराष्ट्राला कळले पाहिजे. म्हणून त्यासंबंधी शासनाने निवेदन करावे अशी विनंती करतो.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, विधानसभा सभागृहामध्ये यासंदर्भात प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. माननीय मुख्यमंत्र्यांच्या स्तरावर यासंदर्भात बैठक घेऊन त्या शिलालेखावर माननीय विरोधी पक्ष नेते म्हणतात त्याप्रमाणे जी तारीख दिलेली आहे ती तपासून घेतली जाईल. सभापती महोदय, आज आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने त्यांना अभिवादन करावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय संसदीय कार्य मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांनी या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने शिवछत्रपतींना अभिवादन करण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडलेला आहे. काल छत्रपती शिवाजी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/

सभापती .....

महाराजांची पुण्यतिथी होती परंतु काल सभागृहाला सुट्टी होती. आज सदनाच्या सर्व सन्माननीय सदस्यांच्या माध्यमातून आपण छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करु या आणि नंतर सभागृहाच्या कामकाजाला सुरुवात करु. मी सन्माननीय संसदीय कार्य मंत्र्यांना एवढेच सांगेन की, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी असा एक मुद्दा या ठिकाणी मांडलेला आहे की, शिवछत्रपतींच्या पुण्यतिथीच्या अनुषंगाने शासकीय शिलालेखामध्ये 3 एप्रिल या तारखेचा उल्लेख आहे. त्याबाबतीत योग्य तपासणी करुन शासनाने त्याबाबत योग्य वेळी सभागृहाच्या पटलावर निवेदन ठेवावे. शिवछत्रपतींना अभिवादन करण्यासाठी सन्माननीय सदस्यांनी एक मिनिट स्तब्ध उभे राहावे अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सन्माननीय सदस्य उभे राहतात)

सदस्यांनी खाली बसावे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: लेखी उत्तरे

हिऱ्यांचे दागिने व हिरे यांचेवरील विक्रीकराबाबत

(१) * २४४१८ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. जगदीश गुप्ता , श्री.सागर मेघे : तारांकित प्रश्न क्रमांक २०५४२ ला दिनांक ४ डिसेंबर, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :

सन्माननीय **वित्तमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १ एप्रिल, २००५ पासून नव्याने मूल्यवर्धित कर कायद्याची अंमलबजावणी राज्यात सुरु झाली आहे व त्यामुळे करदाते या नव्या करप्रणालीशी समरस होण्यास त्यांना अवधी देण्याच्या हेतूने माहे एप्रिल, २००५ पासून पुढील सहा महिने हिरे व्यापाऱ्यांना भेटी न देण्याचा शासनाने निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ एप्रिल, २००५ पूर्वी सन २००३ ते एप्रिल, २००५ पर्यंत विक्रीकर खात्यामार्फत हिरे व्यापाऱ्यांना प्रत्यक्ष एकदाच भेट देण्यात आली होती याची कारणे काय आहेत,

(३) माहे एप्रिल, २००५ पूर्वी हिरे व हिऱ्यांपासून केलेले दागिने यावरील कराचा दर ४ टक्के असल्यामुळे त्या कालावधीत या कराच्या रुपाने मिळणारा महसूल बुडला असल्याची दाट शक्यता असतांनाही त्यावेळी व्यापाऱ्यांना भेटी न देण्याची कारणे काय आहेत,

(४) अशा प्रकारे एप्रिल, २००५ पूर्वीच्या काळात जो महसूल बुडालेला आहे त्यास कोणकोणते अधिकारी जबाबदार आहेत व त्यांच्याविरुध्द कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली आहे ?

श्री.जयंत पाटील : (१) हे अंशत: खरे आहे. सदर निर्णय फक्त हिरे व्यापाऱ्यांच्या संदर्भात घेतला नसून संपूर्ण व्यापारी वर्गासाठी घेण्यात आला होता.

(२) व्यापाऱ्याला भेट देण्यासाठी व्यापारी कर चुकवत असल्याबाबतचा निश्चित पुरावा अथवा निश्चित स्वरुपाची माहिती उपलब्ध असणे महत्त्वाचे असते. अशाप्रकारचा पुरावा अथवा माहिती उपलब्ध नसल्यामुळे सन २००३ ते एप्रिल, २००५ पर्यंत एकाही हिरे व्यापाऱ्याला भेट देण्यात आली नाही.

(३) उपप्रश्न २ च्या उत्तरामध्ये इतर हिऱ्यांचे व्यापाऱ्यांना भेटी न देण्याबाबतची कारणे आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी असा प्रश्न विचारला आहे की, दिनांक 1 एप्रिल, 2005 पासून नव्याने मूल्यवर्धित कर कायद्याची अंमलबजावणी राज्यात सुरु झाली आहे व त्यामुळे करदाते या नव्या करप्रणालीशी समरस होण्यास त्यांना अवधी देण्याच्या हेतूने माहे एप्रिल, 2005 पासून पुढील सहा महिने हिरे व्यापाऱ्यांना भेटी न देण्याचा शासनाने निर्णय घेतला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र.24418 ..... श्री. पांडुरंग फुंडकर .....

होता, हे खरे आहे काय ? या प्रश्नाला "हे अंशत: खरे आहे" असे उत्तर दिलेले आहे. सभापती महोदय, या महाराष्ट्रामध्ये आणि विशेषत: मुंबईमध्ये हिऱ्यांचा व्यापार मोठ्या प्रमाणावर चालतो. हजारो कोटी रुपयांच्या हिऱ्यांची निर्यात राज्यातून आणि विशेषत: मुंबईतून होते. माझ्याजवळ जेम्स अँड ज्वेलरी कौन्सिलचा अहवाल आहे. त्याप्रमाणे सन 2004-05 मध्ये जवळपास 57,959 कोटी रुपयांच्या हिऱ्यांची निर्यात या ठिकाणाहून झाली.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यामधून असा निष्कर्ष निघतो की, जेवढी निर्यात होते त्याच्या 15 ते 20 टक्के हि-यांचा स्थानिकस्तरावर व्यापार होतो. म्हणजे 8693 कोटी रुपयाच्या हि-यांचा व्यापार आपल्या स्थानिक ठिकाणी झाला. व्हॅटच्या अंमलबजावणीचा जवळपास 5.4 टक्के कर, 4 टक्के विक्री कर आणि 1 टक्का ओव्हर टॅक्स आणि 10 टक्के सरचार्ज असा जवळपास 470 ते 625 कोटी रुपये इतका कर या हि-यांच्या विक्रीकरातून राज्य शासनाला मिळणे अपेक्षित होते. उत्तरामध्ये 184 कोटी इतका कर हिरे व्यापा-यांकडून वसूल केलेला आहे, असे नमूद केलेले आहे. म्हणजे जवळपास 300 कोटी रुपये इतक्या कराची चारी झालेली आहे. या व्यापा-यांना भेटी दिल्या जात नाहीत. 6 महिने या हिरे व्यापा-यांना भेटी देऊ नयेत असे आदेश दिलेले आहेत. या हिरे व्यापा-यांना भेटी न देण्याची कारणे काय आहेत ? 300 कोटी रु.चा कर बुडविलेला आहे, यास कोण जबाबदार आहे ? जबाबदार असलेल्या विक्रीकर अधिका-यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.जयंत पाटील : राज्य सरकारने व्हॅटची अंमलबजावणी सुरु केली त्यावेळी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये व्यापा-यांवर करण्यात येणा-या कारवाईबाबतचे जे क्लॉजेस होते त्यावर बरीच चर्चा झाली. तसेच सेल्स टॅक्स ॲक्ट मधील क्लॉजेस यासंदर्भात देखील चर्चा झाली होती. त्यावेळी मी सभागृहामध्ये जाहीर केले होते की, व्हॅटची अंमलबजावणी आपण सुरु करीत आहोत. ही व्हॅटची अंमलबजावणी सुरु करण्याच्या सुरुवातीचा काही काळ आम्ही व्यापा-यांना ॲश्युरन्स दिलेले होते की आम्ही व्हिजिट करणार नाही. तुमची व्यवस्था स्ट्रीमलाईन होईपर्यन्त सुरुवातीचे 6 महिने आपल्या राज्यातील कोणत्याही व्यापा-याकडे व्हिजिट करावयाची नाही अशा सूचना दिलेल्या होत्या. सभागृहालाही याबाबतीत सूचना दिलेली होती. त्यामुळे आपण कोणत्याही व्यापा-याकडे जवळपास 6 महिने व्हिजिट केलेल्या नाहीत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सन 2004-05मध्ये जवळपास 8693.55 कोटी रु. इतक्या किंमतीचा हि-यांचा व्यापार स्थानिक स्तरावर झाला. त्या व्यवहारातून शासनाला 600 कोटीचा कर मिळावयास पाहिजे होता. फक्त 184 कोटी रु. इतका कर मिळालेला आहे. म्हणजे 300कोटी रु. कराची चोरी झालेली आहे. ही चोरी होण्याला कोण जबाबदार आहे ? शासन संबंधित जबाबदार अधिका-यांवर कोणती कारवाई करणार आहे ?

===2==

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(ता.प्र.क्र.24418...)

श्री. जयंत पाटील : चोरी झाली असा अर्थ काढणे बरोबर होणार नाही. इन्फोर्समेण्ट डिपार्टमेण्टकडून व्हॅलिड इन्फॉर्मेशन आल्या शिवाय व्हिजिट केली जात नाही. एखाद्या व्यापा-याची माहिती प्राप्त झाली आणि ती खरी आहे अशी खात्री पटल्यानंतर व्हिजिट ॲरेन्ज केल्या जातात. इन्फोर्समेण्ट विभागाचा सरसकट व्हिजिट करण्यासाठी आपण वापर करु शकत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सहा महिन्यामध्ये सडन व्हिजीट किती केल्या ?

श्री. जयंत पाटील : सडन व्हिजीट करण्याचे अधिकार आयुक्तांना आहेत. आयुक्तांकडे जी माहिती येते त्या माहितीमध्ये तथ्य असेल तर आयुक्त इन्फोर्समेंट विभागाला व्हिजिट देण्यास परवानगी देतात. सन्माननीय सदस्यांनी टक्केवारी दिली. स्थानिक धंदा झाला असेल तर 4 टक्के आणि अधिक 1 टक्का उलाढाल कर या प्रमाणे आपल्याला टॅक्स मिळावयास पाहिजे.या बाबतीत सर्वसाधारणपणे ज्या रेटने टॅक्स भरला जातो तो एकदम कमी झाला तर व्यापा-यांनी कमी टॅक्स भरला असेल ..

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तर मग संशयाला जागा असू शकते आणि म्हणून व्यापाऱ्यांवर या कालावधीत शासनाने फारशा व्हिजिट केलेल्या नाहीत. सन 2004-05 मध्ये शासनाने एकूण 1237 व्हिजिट केल्या आणि त्यामध्ये 1012 केसेसमध्ये इव्हेजन दिसून आले. त्यामधून 85 कोटी रुपयांचा टॅक्स वसूल झाला. त्या वर्षात हिरे व्यापाऱ्यांवर कोणतीही व्हिजिट केलेली नाही. सन 2005-06 मध्ये शासनाने 383 व्यापाऱ्यांवर व्हिजिट केल्या. 383 पैकी 282 केसेसमध्ये इव्हेजन आढळले. त्यामधून 69.61 कोटी रुपयांचा टॅक्स वसूल झाला. सन 2006-07 मध्ये 541 व्हिजिट झाल्या. एकूण 425 कोटी रुपयांचे इव्हेजन आढळून आले. त्यामधून 243 कोटी रुपयांदरम्यान टॅक्स वसूल झाला अशी आकडेवारी आहे. मात्र सन 2005-06 या वर्षात एकाच हिरे व्यापाऱ्यावर व्हिजिट केली होती.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हि-यांचे मूल्यांकन करणारी तज्ज्ञ माणसे किंवा अभ्यासक शासनाकडे उपलब्ध आहेत का? हिरा किती किंमतीचा आहे याचे मूल्यमापन विक्रीकर विभागाकडून किंवा अर्थ खात्याकडून कसे केले जाते?

श्री.जयंत पाटील : शासनाकडे असे तज्ज्ञ उपलब्ध नाहीत. प्रत्येक हिरे व्यापाऱ्यांवर व्हिजिट केल्यावर समोर असलेल्या हिऱ्यांचे मूल्यमापन करणे शक्य नाही. सरकारकडे किंवा विक्रीकर विभागाकडे मूल्यमापन करणारी यंत्रणा उपलब्ध नाही. व्हिजिट केली जाते त्यावेळी विक्रीकर रिटर्न भरण्याचा जो प्रकार आहे तो, व्यापाऱ्याने किती मालमत्ता खरेदी केली व किती किंमतीला विक्री केली, त्या खरेदी-विक्रीमध्ये किती फरक आहे यावर अवलंबून आहे. प्रत्येक विषयाचे एक्स्पर्ट विक्रीकर विभागाकडे उपलब्ध असणे स्वाभाविकपणे अपेक्षित नाही.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

नाशिक जिल्ह्यातील मर्चंट सहकारी बँक, शरणपूर रोड शाखेत तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या दस्तऐवजात फेरफार केल्याबाबत

(२) * २७२४८ श्री. प्रतापराव सोनवणे , श्री. नितीन गडकरी , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २०७६० ला दिनांक ०४ डिसेंबर, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील मर्चंट सहकारी बँक शरणपूर रोड शाखेत तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या दस्तऐवजात फेरफार करुन सुमारे ५० लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी बँकेच्या व्यवस्थापकांनी दिनांक २७ ऑगस्ट, २००६ रोजी संबंधित पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केल्याप्रकरणी गुन्हयाची चौकशी करुन दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ४ आरोपी अद्यापही फरारी असून, त्यांचा शोध घेण्यात आला आहे, काय,

(३) असल्यास, सदरहू तपास पूर्ण झाला आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री. आर.आर. पाटील यांच्याकरिता : (१) होय. प्रस्तूत प्रकरणी सहा आरोपी विरुध्द गु.र.नं. २१२/२००६ भा.दं.वि.क. ४०६, ४२०,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येऊन दोन आरोपीना अटक करण्यात आली आहे.

(२) ४ आरोपी फरार असून त्यांचा शोध घेऊन त्यांना अटक करण्याचा कसोशीने प्रयत्न चालू आहे.

(३) गुन्ह्याचा तपास अद्याप चालू आहे.

श्री.प्रतापराव सोनवणे : सभापती महोदय, सदर गुन्हयातील आरोपीने नाशिक मर्चंट बँकेकडून कर्ज घेताना जी मालमत्ता गहाण ठेवली होती, ती मालमत्ता पुन्हा बँक ऑफ बरोडा, नाशिक शाखेकडे गहाण ठेवून कर्ज उचलले हे खरे आहे काय? खरे असल्यास बँक ऑफ बरोडा, नाशिक शाखेने सदर प्रकरणी कोणती कारवाई केली? असे गुन्हे पुन्हा घडू नयेत यासाठी बँकांनी कोणती काळजी घेतली पाहिजे यादृष्टीने गृहखात्याकडून बँकांना कोणते मार्गदर्शन करण्यात आले आहे?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, तक्रार प्राप्त झाली होती. आरोपीने जी मालमत्ता तारण ठेवली होती ती मालमत्ता कर्ज दिलेल्या बँकेच्याच ताब्यात ठेवावी असे कोर्टाचे आदेश होते. असे असताना ती मालमत्ता दुसऱ्या बँकेकडे तारण ठेवता येत नाही. तरी देखील आरोपीने ती मालमत्ता दुसऱ्या बँकेकडे तारण ठेवली अशी तक्रार प्राप्त झाल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला व दोन आरोपींना अटक करण्यात आली.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.२७२४८.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मालमत्ता दुस-या बँकेकडे तारण ठेवताना त्या बँकेकडून सर्च रिपोर्ट घेतला गेला होता का? असल्यास त्या बँकेचे वकील अधिकृत पॅनेलवर होते का?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सुरुवातीला बँकेने कागदपत्र पाहून कर्ज दिले होते.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी देखील एका बँकेचा चेअरमन आहे. बँक जेव्हा कर्ज मंजूर करते त्यावेळेला सर्च रिपोर्ट घ्यावा लागतो, तो सर्च रिपोर्ट घेण्यासाठी बँकेच्या वकिलांचे अधिकृत पॅनेल असते. असे पॅनेल त्या बँकेचे होते का? असेल तर ज्या वकिलांनी सर्च रिपोर्ट घेतला त्यांच्यावर कारवाई केली आहे का?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. माझ्याकडे सध्या माहिती उपलब्ध नाही. तक्रार आली होती की, त्यांनी जागा बँकेकडे तारण ठेवली असताना व कोर्टाचे आदेश असतानाही ती जागा दुसऱ्याला विकली. या प्रकरणाची चौकशी करण्यात आल्यानंतर आरोपींना अटक करण्यात आली.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 27248 .....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, टू दी पॉईंट माहिती नाही असे माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले याचा मला खेद होतो आहे. सदर गुन्हा 27 ऑगस्ट, 2006 मध्ये घडलेला असून आता एप्रिल, 2007 साल सुरु आहे. सदर गुन्हा घडून आठ महिने उलटून गेलेले आहेत. सदर गुन्ह्यातील 4 आरोपी फरार असून त्यांचा शोध घेतला जात आहे अशी माहिती उत्तरात देण्यात आलेली आहे. दरोड्यातील आरोपी आपल्याला विभागाला मिळत नाहीत हे आम्ही समजू शकतो परंतु सदर घटनेतील आरोपी सुध्दा आपल्या विभागाला मिळत नाहीत याचा अर्थ तुमचा पोलीस विभाग नेमका काय काम करतो?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे :सभापती महोदय, सदर गुन्ह्यातील आरोपी सापडलेले असून उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची राहून गेलेली आहे. या प्रकरणात सहा आरोपींना पकडण्यात आलेले असून, अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे पुढील प्रमाणे आहेत. 1) श्री. सुशील सोनवणे 2) प्रशांत सोनवणे 3) सुनील सोनवणे, 4) सुभाष कुलकर्णी, 5) श्रीमती शैलजा सोनवणे 6) राजेंद्र वामनराव सोनवणे. या प्रकरणातील दोन आरोपींना 25.7.2006 रोजी 2.15 वाजता अटक करण्यात आलेली असून चार व्यक्तींना नंतर अटक करण्यात आलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण आम्हाला नेहमीच संरक्षण देत आलेला आहात. प्रश्नाच्या संदर्भात अधिका-यांनी बेपर्वाईने उत्तर देणे योग्य नाही. या प्रकरणाच्या संदर्भात सर्व आरोपींना अटक करण्यात आलेली आहे असे उत्तर देण्यात यावयास पाहिजे होते परंतु कशीही माहिती द्या, द्या ठोकून ही वृत्ती अधिका-यांमध्ये वाढत आहे हे योग्य नाही त्यामुळे संबंधित अधिका-यांवर कारवाई होणे आवश्यक आहे.

सभापती : एखाद्या उत्तरात किंचितही दुरुस्ती असेल तर प्रश्न पुकारल्या बरोबर प्रश्नाच्या संदर्भात जी काही दुरुस्ती असते ती दुरुस्ती मंत्रीमहोदयांनी त्वरित केली पाहिजे. ज्या अधिका-यांनी या प्रश्नाच्या संदर्भात माहिती दिली असेल त्यांच्यावर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. सदनासमोर सातत्याने अपूर्ण किंवा चुकीची माहिती येणे हे बरोबर नाही.

....2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 27248 .....

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, तारांकित प्रश्न क्रमांक 20760 हा 4 डिसेंबर , 2006 रोजी उपस्थित करण्यात आला होता. त्यावेळेस या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देण्यात न आल्यामुळे आज नव्याने हा प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. अधिकारी वर्ग प्रश्नाकडे गांभीर्याने पहात नसेल, सर्वोच्च सदनाकडे गांभीर्याने पहात नसेल तर आम्ही उप प्रश्न तरी का विचारावयाचे? मागे काय झाले, आता काय झाले याची माहिती सदनाला मिळत नसेल तर कशाच्या आधारावर आम्ही उप प्रश्न विचारावयाचे? या प्रश्नाच्या संदर्भात जे कोणी संबंधित अधिकारी असतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्याच्या संदर्भात आपण निदेश द्यावेत अशी माझी मागणी आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, "4 आरोपी अद्यापही फरार असून त्यांचा शोध घेऊन त्यांना अटक करण्याचा कसोशीने प्रयत्न चालू आहे" असे उत्तरात म्हटले आहे. त्यामुळे चार लोकांना केव्हा अटक करण्यात आलेली आहे?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या गुन्हयातील दोन आरोपींना 25.7.2006 रोजी अटक करण्यात आलेली असून उर्वरित 4 आरोपींना 2.4.2007 रोजी म्हणजे कालच अटक करण्यात आलेली आहे.

सभापती : सदनासमोर येणारी माहिती बिनचूक व अचूक असली पाहिजे. उत्तरामध्ये जर काही दुरुस्ती करावयाची असेल तर प्रश्न पुकारल्याबरोबर सन्माननीय राज्यमंत्री महोदयांनी त्यात सुधारणा करण्याची काळजी घ्यावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात आपण दखल घेतली त्याबद्दल धन्यवाद. या प्रश्नाच्या संदर्भातील चार आरोपींना काल अटक झालेली आहे त्यामुळे आपले अधिकारी इतके दिवस काय करीत होते यासंदर्भात आपण निर्देश द्यावेत अशी विनंती आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र. 27248.....

सभापती : दोन आरोपींना काल अटक करण्यात आलेली आहे. खरे म्हणजे त्यांना लवकर अटक करावयास पाहिजे होती. या प्रकरणाची जे पोलीस अधिकारी चौकशी करीत होते त्यांचीच चौकशी करण्याची गरज आहे असे वाटते. जर त्या अधिकाऱ्यांनी तपासामध्ये हलगर्जीपणा केला असेल तर त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बॉम्बे सायन्स ॲण्ड रिसर्च एज्यूकेशन इन्स्टिटयुट या संस्थेने केलेली फसवणूक

(३) * २४५६७ डॉ. दिपक सावंत , श्री. दिवाकर रावते , श्री. अरविंद सावंत , श्री. अनिल परब , श्री.परशुराम उपरकर , श्री. सुरेश जेथलिया , श्री. गोपीकिसन बाजोरिया , डॉ. निलम गोन्हे , श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे , श्री.कपिल पाटील , प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील , श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री.सय्यद जामा , श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील बॉम्बे सायन्स एन्ड रिसर्च एज्युकेशन इन्स्टिटयुट या संस्थने डायरेक्टर जनरल ऑप शिपिंगची मान्यता न घेता मरीन इंजिनिअरिंग संबंधीचे बोगस कोर्सेस चालवून शेकडो विद्यार्थ्यांना फसविले असल्याची घटना माहे १५ जानेवारी, २००७ वा त्या सुमारास उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संस्थेच्या संचालकांनी आजवर ४० कोटीहून अधिक रक्कम विद्यार्थ्यांकडून गोळा केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन संबंधित संस्थेच्या व्यवस्थापनावर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे , श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) होय,

(२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणी उरण पोलीस ठाणे गु.र.नं. नं. ३/२००७ भा.दं.वि. सं. कलम ४०६,४२०,४१८,३४ प्रमाणे गुन्हा नोंद करुन संस्थेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याच्या तपासात आतापर्यंत २० विद्यार्थ्यांची सुमारे १,४९,०३,२००/- रुपयांची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे. विद्यार्थ्यांचे पैसे परत मिळवून देण्यासाठी आरोपी यांची १९ बॅक व पोष्टाची खाती गोठवण्यात आली आहेत.

या गुन्ह्यात अद्यापपर्यंत किती विद्यार्थ्यांची फसवणूक झाले. याबाबत अधिक तपास चालू आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, ही अतिशय गंभीर घटना आहे. या संस्थेस कोणत्याही प्रकारची परवानगी नसताना त्यांनी विद्यार्थ्यांना आमिष दाखवून त्यांच्याकडून लाखो रुपयांची लूट केलेली आहे. उत्तरात म्हटलेले आहे की, " संस्थेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना अटक करण्यात आली असून गुन्ह्याच्या तपासात आतापर्यंत 20 विद्यार्थ्यांची सुमारे 1 कोटी 49 लाख रुपयांची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे." या प्रकरणात फक्त अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना अटक करुन चालणार नाही तर या संस्थेवर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. तेव्हा माझे मंत्रिमहोदयांना दोन प्रश्न आहेत की, त्या संस्थेची मान्यता रद्द करणार काय ? फसवणूक झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची रक्कम मिळाली काय, मुलांचे भवितव्य काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, त्या संस्थेस मान्यता नसल्यामुळे मान्यता रद्द करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तेथे फक्त एकच कोर्स शिकविला जात होता. संस्थेने त्यांची संस्था मान्यता प्राप्त आहे असे भासवून विद्यार्थ्यांची फसवणूक केली. 20 विद्यार्थ्यांनी तक्रार केल्यानंतर ही बाब उजेडात आली. या गुन्ह्याच्या तपासात आतापर्यंत 1 कोटी 49 लाख रुपंयाची फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले आहे. या संस्थेत एकूण 319 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. त्यातील फक्त 20 विद्यार्थ्यांनी तक्रार नोंदविली. आम्ही उर्वरित विद्यार्थ्यांना पत्र पाठवून त्यांचीसुध्दा फसवणूक झाली किंवा कसे याबाबत तक्रार नोंदविण्यास सांगितलेले आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, या बोगस संस्थेच्या विरुध्द विद्यार्थ्यांनी तक्रार करण्या अगोदर महसूल विभागाने दिनांक 7.2.2006 रोजी तक्रार केली होती. कारण शेतकऱ्यांच्या जमिनी हडप करुन त्याठिकाणी हे कॉलेज उभे करण्यात आले होते. परंतु महसूल विभागाने केलेल्या तक्रारीकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्याचप्रमाणे हे कॉलेज उभे करण्यात आले ती जागा सी.आर.झेड.मध्ये येत होती किंवा कसे याची विचारणा सिडकोकडे करण्यात आली होती का ? तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, ती जागा सी.आर.झेड.मध्ये येत होती काय ? या संस्थेच्या अध्यक्ष व उपाध्यक्षांची नावे सांगणार काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या संस्थेचे अध्यक्ष श्री.विकास चौरसिया व उपाध्यक्ष श्री.संतोष पाल असून श्री.जवाहर चौरसिया हे डायरेक्टर आहेत. तसेच आणखी दोन-तीन डायरेक्टर आहेत. त्यांनी बनावट संस्था उभी केली. जागेच्या संदर्भात सांगू इच्छितो की, संस्थेने सिडकोकडून परवानगी घेतली किंवा कसे याची चौकशी करण्यात येईल. सध्या हे प्रकरण कोर्टामध्ये आहे.

श्री.धनाजी साठे : सभापती महोदय, उत्तरात म्हटले आहे की, ".....आरोपिंची 19 बँक व पोस्टाची खाती गोठविण्यात आलेली आहेत. त्यांची मालमत्ता जप्त करण्यासाठी आणखी कोणती कारवाई करण्यात आली ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आरोपिंची एकूण 19 खाती गोठविण्यात आली असून ती रक्कम जवळपास 1 कोटी 35 लाख 598 इतकी आहे.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24567.....

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, याठिकाणी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "गुन्हयाच्या तपासात आतापर्यंत 20 विद्यार्थ्यांची सुमारे 1,49,03,200/- रुपयांची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे. विद्यार्थ्यांचे पैसे परत मिळवून देण्यासाठी आरोपी यांची 19 बँक व पोष्टाची खाती गोठविण्यात आली आहेत." माझा प्रश्न असा आहे की, या गोठवलेल्या खात्यांमध्ये एकूण किती रुपयांची रक्कम ठेवली होती ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, 1,37,90,578/- रुपये खात्यात होते. या व्यतिरिक्त शेअरमध्ये, बॉण्डमध्ये किंवा इतर ठिकाणी जी मालमत्ता होती, ती जप्त करण्याच्या दृष्टीने कार्यवाही चालू असून याबाबतीत कोर्टाला विनंती करण्यात आलेली आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "या गुन्हयात अद्यापपर्यंत किती विद्यार्थ्यांची फसवणूक झाली, याबाबत अधिक तपास चालू आहे." परंतु गुन्हा नोंद होऊन तीन महिने झालेले आहेत. त्यामुळे याबाबतीत 90 दिवसांत आरोपपत्र दाखल केले जाणे आवश्यक असून अजूनही या केसचा तपास पूर्ण झालेला नाही, तो पूर्ण केव्हा होणार ? व या प्रकरणी ज्यांना अटक झालेली आहे, त्यांना जामिनावर सोडण्यात आले आहे काय ? असा माझा माननीय मंत्री महोदयांना प्रश्न आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या प्रकरणी आरोपीला पकडल्यानंतर माननीय कोर्टाने त्यांस जामिनावर सोडलेले आहे. त्यामुळे याबाबतीत 90 दिवसांच्या आत आरोपपत्र दाखल करण्यात आलेले नाही. या प्रकरणाची व्याप्ती फार मोठी आहे. परंतु याठिकाणी सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन, या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे अन्वेशन विभागामार्फत पूर्ण करण्यात येईल. डीसीपी लेवलचा अधिकारी....

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, हा प्रश्न आर्थिक गुन्हे अन्वेषन विभागाचा होऊ शकत नाही. हा प्रश्न पोलीस ठाण्याशी संबंधित आहे. त्यामुळे या प्रश्नी 90 दिवसांच्या आत तपास पूर्ण होऊन आरोपपत्र दाखल होणे आवश्यक आहे.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24567.....

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, कोर्टाने आरोपींना जामिनावर सोडलेले आहे. त्यामुळे याठिकाणी 90 दिवसांच्या आत आरोपपत्र दाखल करण्याचा प्रश्नच येत नाही. या प्रकरणाची संपूर्ण व्याप्ती पाहता, या प्रकरणामध्ये 319 विद्यार्थी असून त्या प्रत्येकांचे जबाब घेणे आवश्यक असून त्यास बराच उशीर लागणार आहे. ज्याप्रमाणे पोलीस खाते काम करीत आहे, त्यापलिकडचा हा विषय असल्यामुळे या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे अन्वेशन विभागाकडून पूर्ण करुन घेण्यात येईल व यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

सभापती : माननीय मंत्री महोदयांना मी विचारु इच्छितो की, या प्रश्नाच्या बाबतीत दोन्ही बाजूने गांभीर्याने चर्चा होत आहे. या प्रकरणी आरोपींना कोर्टाने जरी जामिनावर सोडलेले असले तरी, जामीन रद्द करण्याच्या दृष्टीने माननीय मंत्री महोदय उच्च न्यायालयात अपील करणार काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, होय. आपण निदेश दिल्याप्रमाणे उच्च न्यायालयात जामीन रद्द करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

सभापती : ठीक आहे. आता आपण पुढील प्रश्नांवर चर्चा करुया.

(सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे जागेवर उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. मी आता पुढील प्रश्न पुकारलेला आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी बऱ्याच वेळ हात वर करुन प्रश्न विचारण्यास परवानगी मागत आहे. परंतु आपण मला संधी दिलेली नाही.

सभापती : माननीय फुंडकर साहेब, आपण सन्माननीय तावडे साहेबांना सांगावे की, सभापतींशी अशा पध्दतीने बोलण्याची ही पध्दत नाही.

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मु.पो. तग्गेमळा (ता. जत, जि. सांगली) येथील जतनिगडी रस्त्यावरील तग्गेमळा येथे पांडूरंग आप्पासो सूर्यवंशी ह्यांचे घरावर ७ ते ८ दरोडेखोरांनी दरोडा टाकून घरातील व्यक्तींना केलेल्या मारहाणीमध्ये आप्पोसो सूर्यवंशी ह्यांचा मृत्यू झाल्याबाबत

(४) * २८७२० श्री. प्रकाश शेंडगे , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २५ जानेवारी, २००७ रोजी वा त्या सुमारास मु.पो. तग्गेमळा (ता. जत, जि. सांगली) येथील जतनिगडी रस्त्यावरील तग्गेमळा येथे पांडुरंग आप्पासो सूर्यवंशी ह्यांचे घरावर ७ ते ८ दरोडेखोरांनी दरोडा टाकून घरातील व्यक्तींना केलेल्या मारहाणीमध्ये आप्पोसो सूर्यवंशी ह्यांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) सदर प्रकरणाचा तपास करण्यात आला आहे काय, तपासाचे निष्कर्ष काय व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) हे खरे नाही.

(२) व (३) तथापि, सदरचा खून हा मयताची पत्नी व जावई यांनी संगनमताने केल्याचे निष्पन्न होत असल्याने या दोन आरोपींना अटक करुन त्यांचेविरुद्ध जत पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.९/०७ भा.दं.वि.सं. कलम ३०२,२०१,३४ नोंद करण्यात आला. याबाबत गुन्ह्याचा अधिक तपास चालू आहे.

नंतर कु.गायकवाड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे : सांगली जिल्हयातील वाडी या वस्तीवर राहणाऱ्या नागरिकांचे जीवन अतिशय धोक्यात आलेले आहे. या ठिकाणी रात्रीअपरात्री दरोडा घालण्याचे प्रकार सुरु आहेत. 10 जणांची दरोडेखोरांची टोळी येथे सक्रीय आहे. ही टोळी दरोडा घातल्यानंतर त्या माणसांचा खून देखील करते. जतनिगडी रस्त्यावरील तग्गेमळा येथील पांडुरंग सूर्यवंशी आपल्या घरात रात्री सुमारे एक ते दीडच्या सुमारास एकटेच असताना त्यांच्या घरावर सात ते आठ दरोडेखोरांनी दरोडा टाकून केलेल्या मारहाणीत त्यांचा मृत्यू झाला . या ठिकाणी खरोखरच त्यांच्या घरावर दरोडा पडला होता की त्यांचा खून करण्यात आला याचा पोलिसांनी तपास केला होता का ? आणि तपास झाला असेल तर या पोलीस तपासात काय निष्पन्न झाले ?

श्री सिद्धराम म्हेत्रे : सभापती महोदय, या ठिकाणी दरोडा पडलेला नाही तर खून झालेला आहे. श्री. पांडूरंग सूर्यवंशी यांची पत्नी आणि त्यांचा जावई या दोघांनी मिळून त्यांचा खून केलेला आहे. पोलिसांकडे केलेल्या तक्रारीत असे सांगण्यात आले होते की, श्री. पांडूरंग सूर्यवंशी यांच्या पायाला मारहाण केली होती. मात्र तशा प्रकारच्या कोठल्याही जखमा त्यांच्या पायावर आढळून आलेल्या नाहीत. सोन्याच्या बांगड्या ,मंगळसूत्र इतर ऐवज व 14000 रुपये त्याच घरात आढळून आले त्यामुळे दरोडयाचा उद्देश नव्हता तर त्यांची पत्नी व जावई यांनी संगनमताने सूर्यवंशींचा खून केला आहे.

श्री. प्रकाश शेंडगे : श्री. पांडुरंग सूर्यवंशी यांच्या पायाला जखम झाली असे चौकशीत सांगण्यात आले, ते खरे आहे का ?

श्री सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, चौकशीत असे सांगण्यात आले होते की, श्री. पांडूरंग सूर्यवंशी यांचे पाय बांधून त्यांना मारहाण करण्यात आली. परंतु त्यांच्या पायाला कोठलीही जखम आढळून आलेली नाही. ज्या कुऱ्हाडींने त्यांच्यावर हल्ला करण्यात आला ती कुऱ्हाड देखील त्यांच्याच घरात उशीखाली सापडली आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, हा दरोडा नसून मृत व्यक्तीच्या जावयाने व त्यांच्या पत्नीने संगनमताने केलेला खून आहे. परंतु जावयाने अशा प्रकारे खून करण्याचे कारण काय आहे ? . ..2..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.24958.....

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, पोलीस चौकशीत असे आढळून आलेले आहे की, त्यांचा जावई आणि पत्नीचे अनैतिक संबंध होते आणि त्या सासऱ्याचा त्यांना अडसर होता. म्हणून त्या दोघांनी मिळून सासऱ्याचा खून केला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उल्हासनगर (जि.ठाणे) येथे उल्हासनगर पालिका आयुक्त हे कॅम्प नं.१ मधील शहाड उड्डाणपूलाखालून जात असताना त्यांचेवर प्राणघातक हल्ला केल्याबाबत

(५) * २४९५८ श्री. धनाजी साठे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. रमेश निकोसे : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथे उल्हासनगर पालिका आयुक्त हे कॅम्प नं.१ मधील शहाड उड्डाणपुलाखालून जात असताना दिनांक ८ जानेवारी, २००७ रोजी वा त्या दरम्यान त्यांचेवर प्राणघातक हल्ला करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार हल्ल्यातील गुन्हेगारांवर कडक कारवाई करण्याबाबत तसेच आयुक्त यांना संरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे , श्री. आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) व (२) होय,

(३) व (४) याप्रकरणी दिलेल्या फिर्यादीवरुन दिनांक ०८/०१/२००७ रोजी उल्हासनगर पोलीस ठाणे येथे गु.नों.क्र. ७/०७, भा.दं.वि.सं. कलम ३३६.४२७ अन्वये दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यातील निष्पन्न एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. तथापि गुन्हयाचे कारण अद्यापी स्पष्ट झालेले नाही. आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. सदर आरोपी जामिनावर सूटून आल्यानंतर त्याला महाराष्ट्र प्रतिबंधात्मक स्थानबध्दता कायद्यान्वये १ वर्षाकरिता स्थानबध्द करण्यात आले आहे. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांना दिवसा एक व रात्री एक असे नि:शुल्क सशस्त्र पोलीस संरक्षण पुरविण्यात येत आहे.

श्री. धनाजी साठे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी येथे दिलेल्या उत्तरात असे म्हटले आहे की, गुन्हयाचे कारण अद्यापि स्पष्ट झालेले नाही. या गोष्टीस आता सुमारे अडीच महिने होत आलेले आहेत. तेव्हा याबाबत आपण चौकशी केव्हा करणार आहात ?

श्री.सिद्धराम म्हेत्रे : सभापती महोदय, या आरोपीने रामगोपाल यादव उर्फ सुरेश अशी वेगवेगळे नाव धारण केली होती. कामगार विभागातील काही कामगार नेत्यांना निलंबित करण्यात आले होत. त्यांना पुन्हा कामावर घेण्यात यावे तसेच उल्हासनगर पालिकेचे जे अनधिकृत बांधकाम आहे ते पाडण्यात येऊ नये यासाठी पालिका आयुक्तांवर हल्ला करण्यात आला होता. संबंधितांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, या प्रकरणात आयुक्तांचा जबाब आपण नोंदविला आहे का ? हा जबाब केव्हा नोंदविण्यात आला ? उल्हासनगर पालिकेचे आयुक्त श्री.

..3..

श्री.संजय दत्त.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

कांबळे हे कँप नं.1 मधील शहाड उड्डाणपुलाखालून जात असताना त्यांच्या गाडीचा वेग कमी झाला होता. त्यामुळे आरोपीचा जबाब घेतल्याशिवाय गुन्हा कसा नोंदविणार ?

यानंतर श्री. रोझेकर ....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24958 पुढे सुरु.....

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, उल्हासनगर येथील पालिका आयुक्तांवर हल्ला झाला व त्यातील आरोपींना पकडण्यात आले. या हल्लाचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसल्याचे, लेखी उत्तरात नमूद केले आहे. माझा प्रश्न असा आहे की, हल्ला कशासाठी झाला ? तो प्राणघातक हल्ला नव्हता तर जीव घेण्याचाच प्रकार होता. हेतुपुरस्सर जीव घेण्याचा प्रयत्न झाला आहे. असे असतांना या गुन्हयातील आरोपींवर भा.दं.वि.कलम 336 व 427 लावण्यात आलेले आहे. आरोपींवर भा.दं.वि.कलम 307 का लावण्यात आले नाही ? कारण, मारलेला दगड जर डोक्याला लागला असता तर संबंधित व्यक्ति मृत पावला असता व हा एक प्रकारे खून आहे. त्यामुळे गुन्हयाचा उद्देश लक्षात न घेता पोलिसांकडून कलमे लावली जातात, याचे नेमके कारण काय ? हा सर्व जुळवून घेण्याचा प्रकार आहे. गुन्हा करण्याचा उद्देश महत्वाचा असतो व त्यामुळे कोणत्या उद्देशाने हल्ला करण्यात आला याचा उल्लेख करणे आवश्यक असते. गुन्हयातील उद्देशाचाच शोध अद्याप पोलिसांना लागलेला नाही, याबद्दल शासनाला काय म्हणायचे आहे ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, जखमी व्यक्तिच्या शरीरावरील जखमेचे स्वरुप लक्षात घेऊन भा.दं.वि.कलम 307 लावले जाते. गुन्हयासाठी कलमे ठरवितांना शरीरावरील जखमा, डॉक्टरांचे प्रमाणपत्र या बाबी लक्षात घेतल्या जातात. संबंधितांनी गाडीवर दगड मारला परंतु पालिका आयुक्तांना दगड लागलेला नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, उल्हासनगर येथे उल्हासनगर पालिका आयुक्त हे कॅम्प नं.1 मधील शहाड उड्डाणपुलाखालून जात असताना दिनांक 8 जानेवारी 2007 रोजी वा त्या दरम्यान त्यांचेवर प्राणघातक हल्ला करण्यात आला, हे खरे आहे काय ? असा तारांकित प्रश्नाचा पहिला भाग आहे. लेखी उत्तरात या प्रश्नाला 'होय' असे उत्तर देण्यात आले आहे. जर प्राणघातक हल्ला करण्यात आला, हे खरे असेल तर मग गुन्हयाला भा.दं.वि.कलम 307 का लावण्यात आले नाही ? एकतर लेखी उत्तर चुकीचे असेल किंवा मग योग्य कलम लावले नसेल. नेमकी वस्तुस्थिती काय आहे ?

..2.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

<u>ता.प्र.क्र.24958 पुढे सुरु.....</u>

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, हल्ला झाला, दगड मारला, हे खरे आहे म्हणून उत्तर 'होय' असे दिले आहे. मी अगोदरच सांगितले आहे की, जखमांचे स्वरुप, डॉक्टरांचे प्रमाणपत्र लक्षात घेऊन कलमे निश्चित करण्यात येतात. संबंधित आरोपींना अटक करण्यात आली होती व त्यांना नंतर न्यायालयाने जामीनावर सोडले आहे. त्यानंतर पोलिसांनी संबंधित आरोपींच्या मागील गुन्हयांची नोंद काढून त्यांच्यावर एम.पी.डी.ए.खाली गुन्हा नोंद केला व त्यामुळे ते आरोपी एक वर्षासाठी स्थानबद्ध आहेत.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, उल्हासनगर शहरातील अनधिकृत बांधकामांच्या संदर्भात न्यायालयाने यापूर्वी काही निर्णय दिले आहेत व त्यानुसार कारवाई करण्यासाठी काही अधिका-यांनी पुढाकार घेतला होता, अशी या प्रकरणाला पार्श्वभूमी आहे. शंका अशी निर्माण होते की, अधिका-यांमध्ये दहशत निर्माण व्हावी, त्यांच्यावर दबाव यावा, यासाठी अशा प्रकारचे हल्ले केले जातात. हे खरे आहे काय ? सध्या पालिका आयुक्तांना जे पोलीस संरक्षण देण्यात आले आहे ते पुरेसे आहे काय ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, पालिका आयुक्तांना जे पोलीस संरक्षण देण्यात आलेले आहे, ते पुरेसे आहे. त्यांची मागणी आली तर आणखी संरक्षण दिले जाईल. अनधिकृत बांधकामे पाडल्यामुळे त्रास होतो, बांधकामे पाडू नये, या दृष्टीकोनातून हा प्रकार घडला आहे.

..3.....

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

परभणी जिल्ह्यात पाथरी ते बाभळगांव, गंगाखेड ते कोदरी, सोनपेठ ते धामोनी या रस्त्याचे डांबरीकरण कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याबाबत

(६) * २८७४३ श्री. सुरेश जेथलिया : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून)मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात पाथरी ते बाभळगांव, गंगाखेड ते कोदरी, सोनपेठ ते धामोनी या रस्त्याचे डांबरीकरण कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी २००७ मध्ये उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

श्री.रविशेठ पाटील, श्री. छगन भुजबळ यांच्याकरिता : (१), (२) व (३) नाही. तथापि, याबाबत दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद मार्फत चौकशी करण्यात येत आहे.

श्री.सुरेश जेथलिया : सभापती महोदय, विचारण्यात आलेल्या सविस्तर तारांकित प्रश्नाला 'नाही' असे लेखी उत्तर देण्यात आले आहे. माझा प्रश्न असा आहे की, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांच्यामार्फत करण्यात येणा-या चौकशीचा अहवाल किती दिवसात प्राप्त होईल व रस्त्यासंदर्भात ज्या तक्रारी आहेत त्याबाबत संबंधितांनी रस्त्याची पाहणी केली आहे काय ?

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, पाथरी ते बाभळगाव हा रस्ता 6.20 किलोमीटरचा असून त्यासाठी 53 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली होती व आतापर्यन्त 32 लक्ष रुपये खर्च करण्यात आले आहेत. दुसरा रस्ता सोनपेठ ते धामोनी हा 9.30 किलोमीटरचा असून त्यासाठी 73 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली होती व 35 लक्ष 52 हजार रुपये आतापर्यन्त खर्च करण्यात आले आहेत. तिसरा राज्य महामार्ग क्रमांक 170 वरील गंगाखेड ते कोदरी हा रस्ता 4.10 किलोमीटरचा असून यासाठी 38 लक्ष 38 हजार रुपये तरतूद करण्यात आली असून 32 लक्ष रुपये आतापर्यन्त खर्च करण्यात आले आहेत. अशा प्रकारे एकूण 13.30 किलोमीटर रस्त्याच्या कामासाठी 91 लक्ष 80 हजार रुपये तरतूद करण्यात आली होती व 68 लक्ष 36 हजार रुपये आतापर्यन्त खर्च करण्यात आले आहेत. या तिन्ही कामांची तपासणी कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंता यांच्यामार्फत करण्यात आली आहे व तपासणीअंती कामाचा दर्जा खालावलेला नाही, असे त्यांनी नमूद केले आहे.

यानंतर कुमारी जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.28743.....

श्री.रविशेठ पाटील.....

सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगतो की, हा तारांकित प्रश्न आल्यानंतर शासनाकडून सदर कामाची चौकशी व्हिजिलन्सकडे सोपविण्यात आली आहे, आता अहवाल आल्यानंतर संबंधितांवर ताबडतोब कारवाई केली जाईल.

श्री.श्रीकांत जोशी :सभापती महोदय, आम्ही या भागातील लोकप्रतिनिधी असल्यामुळे असे सांगू इच्छितो की, गंगाखेड ते कोदरी,पाथरी ते बाभळगांव,सोनपेठ ते धामोनी या रस्त्यांवर मोठया प्रमाणावर खड्डे आहेत. या रस्त्यांवर करण्यात आलेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे आहे. सभागृहाचे सदस्य म्हणून मी जी माहिती दिली ती डोळयासमोर ठेवून आपण अधीक्षक अभियंता,कार्यकारी अभियंता,यांच्या स्तरावर कामाची पुनर्तपासणी करुन संबंधितांवर कडक कारवाई करणार का ?

श्री.रविशेठ पाटील : व्हिजिलंसचा अहवाल आल्यानंतर संबंधितांवर योग्य ती कडक कारवाई करण्यात येईल.

श्री.जयंत प्र. पाटील : या कामाची चौकशी तारांकित प्रश्न आल्यानंतर सुरु झाली की कोणी या निकृष्ट कामाबाबत तक्रार केल्यानंतर सुरु झाली ? या कामासाठी क्वालिटी कंट्रोलच्या अधिका-यांची नेमणूक केव्हा करण्यात आली ?

श्री.रविशेठ पाटील : सदर कामाची चौकशी तारांकित प्रश्न आल्यानंतर सुरु झाली.

श्री.अरविंद सावंत : वाह ! शासन अतिशय इमानदारीने काम करत आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या ठिकाणी गंगाखेड ते कोदरी,पाथरी ते बाभळगांव,सोनपेठ ते धामोनी या तीन रस्त्यांच्या कामाच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी सांगितल्याप्रमाणे या तिन्ही रस्त्यांवर मोठया प्रमाणावर खड्डे पडलेले आहेत. माझा प्रश्न असा आहे की, हे जे काम या ठिकाणी चालू आहे, त्या प्रत्येक रस्त्यांच्या कामावर शासनाकडून किती पैसे खर्च करण्यात आलेले आहेत ?

श्री.रविशेठ पाटील : यासंदर्भात सर्व आकडेवारी व माहिती माझ्याकडे उपलबध आहे, मी ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

BB - 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भिवंडी (जि.ठाणे) येथील शांती नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत २० लाख लुटणाऱ्या तिघांना अटक केल्याबाबत

(७) * २५०५२ श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. संजय दत्त , श्रीमती सुधा जोशी , श्री. रमेश निकोसे , श्री.सय्यद जामा , श्री. गोविंदराव आदिक , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. धनाजी साठे : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील शांती नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत २० लाख लुटणाऱ्या तिघांना अटक करण्यात आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचा तपशील काय आहे व त्यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) अद्यापपर्यंत कार्यवाही झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सिध्दराम म्हेत्रे श्री. आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) होय,

(२) होय,

(३) व (४) फिर्यादी यांनी दिनांक १९.१२.२००६ रोजी शांतीनगर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली की, विहंग पार्क पोलीस ठाणे येथील एअरटेल कंपनी कार्यालयातील जमा झालेली रोख रक्कम रुपये २०,८०,०००/- टाटा इंडिको मधून सेंट्रल बँक कल्याण येथे घेऊन जात असताना वाटेत मारुती कारमधून आलेल्या ३-४ अज्ञात इसमांनी गाडी अडवून शस्त्राचा धाक दाखवून वरील रक्कम असलेली बॅग व मोबाईल फोन, गाडीची चावी चोरुन नेली. या वरुन शांती नगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २८३/२००६ भा.द.स.क. ३९५, १२०(ब), भा.ह.का. २५ (१)(अ) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्यामध्ये ६ आरोपी निष्पन्न झाले. त्यापैकी ४ आरोपींना अटक करण्यात येऊन त्यांच्याकडून रुपये १०,७७,५००/- रक्कम, गाडी, हत्यार जप्त करण्यात आले असून २ आरोपींचा तपास चालू आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, सदर गुन्हयातील सहा आरोपींपैकी चार आरोपींना अटक करण्यात आलेली आहे परंतु दोन आरोपी फरार आहेत. सदर गुन्हा घडून साडे तीन महिने उलटून गेलेले असतांनाही सहा आरोपींपैकी फरार असलेल्या दोन आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश का आलेले नाही ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, भिवंडी आणि आजुबाजूच्या परिसरामध्ये असे बरेचसे गुन्हे सतत घडत असतात. अशा प्रकारचे गुन्हे करणा-या गुन्हेगारांवर नियंत्रण आणण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करीत आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सदर गुन्हयामध्ये एकुण सहा आरोपी आहेत, त्यापैकी दोन आरोपी फरार आहेत, चार आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश आलेले आहे. फरार

दोन BB - 3

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे.....

ता.प्र.क्र.२५०५२.....

आरोपींपैकी एका आरोपीचे नाव मदनभाई असे आहे व दुसरा त्याचाच साथीदार आहे, अशी माहिती फरार दोन आरोपींबाबत पोलिसांना आहे. या आरोपींना पकडण्यासाठी तेथील परिसरामध्ये एक विशेष पोलीस पथक नेमण्यात आलेले आहे. अशा प्रकारच्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी त्या परिसरातील गस्त कडक करण्यात आलेली आहे.

ॲड.अनिल परब : मंत्रिमहोदयांनी दिलेल्या उत्तराप्रमाणे एका आरोपीचे नाव मदनभाई पूर्ण नाव पोलिसांना माहित नाही काय ? गुन्हा घडून साडे तीन महिने झाल्यानंतरही गुन्हेगाराचे पूर्ण नाव पोलिसांना माहित नसणे, हे पोलिसांचे अपयश नाही का ? गुन्हेगाराचे नाव व पत्ता पोलिसांना माहित नसणे हे शासनाचे आपण अपयश मानणार काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : या घटनेमध्ये शासनाच्या अपयशाचा प्रश्नच येत नाही. एकुण सहा आरोपींपैकी चार आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश आलेले आहे तसेच,१० लाख ७७ हजार रुपये एवढे पैसे पोलिसांनी या गैरव्यवहारामध्ये वसूल केले आहेत. सदर फरार आरोपी सापडल्यानंतर त्यांची कसून चौकशी केली जाईल.

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.25052.....

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, शस्त्राचा धाक दाखवून लोकांना लुबाडण्याच्या घटना दिसेंदिवस वाढत आहेत. माननीय मंत्री महोदयांनी मघाशी असे सांगितले की, 6 आरोपींपैकी 4 आरोपींना अटक करण्यात आली. त्या आरोपींचे दोन साथीदार मिळत नाहीत हे खरोखर पोलिसांचे अपयश आहे असे म्हणावयास काही हरकत नाही. माझा प्रश्न असा आहे की, या प्रकरणाचा तपास अतिशय धिम्या गतीने सुरु आहे काय ? 20,80,000/- रुपयांपैकी 10,77,500/- रुपये वसूल झालेले आहेत. परंतु अद्याप 10 लाखापेक्षा जास्त रक्कमेची वसुली होणे बाकी आहे. ही रक्कम का वसूल होऊ शकली नाही याची कारणमिमांसा माननीय मंत्री महोदय सांगतील काय, उर्वरित 10 लाख रुपये आरोपींनी इतर ठिकाणी उडविलेले तर नाहीत ना ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, हे चोरीचे प्रकरण आहे. अज्ञात इसमांनी गाडी अडवून शस्त्राचा धाक दाखवून चोरी केलेली आहे. यातील एक आरोपी एअरटेल कंपनीतील आहे. त्याने या आरोपींना असे सांगितले की, आमच्या कंपनीमध्ये जमा झालेली रक्कम गाडीतून नेली जाते. तुम्ही गाडी अडवून चोरी करा. या आरोपीला अटक करण्यात आलेली आहे. तोंड ओळख असलेल्या लोकांना त्याने आपल्या बरोबर घेऊन ही चोरी केली होती. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, पोलिसांनी चांगली कामगिरी केलेली आहे. पोलिसांनी 4 दिवसामध्ये 10,77,500/- रुपये वसूल केलेले आहेत.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, या प्रकरणाचा 50 टक्के तपास पूर्ण झालेला आहे. माननीय मंत्री महोदय याला पोलिसांचे यश मानतात काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आम्ही याला पोलिसांचे यश मानतो किंवा नाही, असा प्रश्न नाही. पोलिसांनी 4 दिवसामध्ये 10,77,500/- रुपये वसुली केलेली आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांचे असे म्हणणे आहे की, शंभर टक्के यश प्राप्त करा.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणात समाविष्ट नसलेल्या ठाणे जिल्ह्यातील आठ तालुक्यांच्या सुनियोजित विकासासाठी एक स्वतंत्र प्रादेशिक विकास मंडळ स्थापन करण्याच्या ठरावाबाबत

(8) * 26068 **श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. लक्ष्मण जगताप , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. वसंतराव चव्हाण , श्रीमती मंदा म्हात्रे , प्रा. फौजीया खान , श्री.भास्कर जाधव , श्री. राजेंद्र जैन , श्री. जगन्नाथ शेवाळे , डॉ. वसंत पवार** : सन्माननीय **नियोजनमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणात समाविष्ट नसलेल्या ठाणे जिल्ह्यातील आठ तालुक्यांच्या सुनियोजित विकासासाठी एक स्वतंत्र प्रादेशिक विकास मंडळ स्थापन करण्याचा ठराव दिनांक 14 सप्टेंबर, 2006 रोजीच्या नियोजन मंडळाच्या बैठकीमध्ये मंजुर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रश्नी आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री.जयंत पाटील : (1) होय.

(2) व (3) जिल्हा नियोजन समिती, ठाणे कार्यालयाच्या दिनांक 30 सप्टेंबर, 2006 रोजीच्या पत्रान्वये ठाणे जिल्ह्यातील आठ तालुक्यांसाठी प्रादेशिक योजना तयार करणे कामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 मधील तरतुदीनुसार प्रथमत: प्रादेशिक योजनेकरीता प्रदेशाची स्थापना करण्यासाठी प्रादेशिक निवड मंडळाची स्थापना करण्यास व प्रादेशिक मंडळाचे कार्यालय स्थापन करण्याकरीता प्रस्ताव नगर विकास विभागाकडे पाठविला आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, प्रश्नाला दिलेल्या उत्तरामध्ये "प्रादेशिक निवड मंडळ" असे नमूद केलेले आहे त्या ऐवजी "प्रादेशिक नियोजन मंडळ" आणि "प्रस्ताव नगर विकास विभागाकडे पाठविला आहे" असे नमूद केलेले आहे त्या ऐवजी "प्रस्ताव विभागाकडे पाठविलेला आहे" अशी दुरुस्ती आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, एम.एम.आर.डी.ए. म्हणजे मुंबई असे जणू काही समीकरणच झालेले आहे. एम.एम.आर.डी.ए. चा प्रश्न सर्व सन्माननीय सदस्यांनी लावून धरला पाहिजे. माझा प्रश्न असा आहे की, प्रस्ताव कोठे पाठविण्यात आला आहे आणि प्रस्तावाला अंतिम मान्यता केव्हा मिळेल ? एम.एम.आर.डी.ए.कडून ठाणे परिसराला न्याय मिळत नाही. सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, एम.एम.आर.डी.ए. ही एजन्सी मुंबईसह सर्व

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26068.....

श्री.जितेंद्र आव्हाड .....

जिल्हयांना लागू आहे. एम.एम.आर.डी.ए.चे अधिकारी फक्त मुबईत लाईम लाईटमध्ये कसे राहता येईल, यासाठीच प्रयत्न करतात. ठाणे जिल्हयाला भूकंपासाठी, पुरासाठी निधी प्राप्त झालेला आहे. परंतु ठाणे जिल्हयाला एम.एम.आर.डी.ए.चा कोणत्याही प्रकारचा उपयोग होत नाही. माझा प्रश्न असा आहे की, कायद्यानुसार बंधनकारक असलेला निधी मुंबईसह इतर सर्व जिल्हयांना समान प्रमाणात दिला जाईल काय आणि ठाणे जिल्हयाला व इतर जिल्हयांना जी दुजाभावाची वागणूक दिली जाते ती थांबेल काय ?

यानंतर श्री.गागरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26068

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, ठाणे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडून प्रादेशिक मंडळाच्या स्थापनेबाबत प्रस्ताव दिनांक 30.9.2006 रोजी शासनाकडे प्राप्त झालेला आहे. दिनांक 6.11.2006 रोजी नगर रचना संचालकांचा अभिप्राय घेण्यासाठी हा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. एक महिन्याच्या कालावधीत हया प्रस्तावावर त्यांचा अभिप्राय शासनाला प्राप्त होईल. त्यानंतर शासनाच्या अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करुन ठाणे जिल्हयातील उर्वरित आठ तालुक्यांचा समावेश एम.एम.आर.डी.ए. मध्ये करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, शासन किती दिवसात ही कार्यवाही करणार आहे, याबाबत मंत्री महोदयांनी स्पष्ट केलेले नाही.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, एक महिन्याच्या कालावधीत नगर रचना विभागाकडून त्यांच्या अभिप्रायासह प्रस्ताव शासनाला प्राप्त होईल. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे खरे आहे की, भविष्याच्या दृष्टीकोनातून या आठ तालुक्यामध्ये योग्य नियोजन होण्याची आवश्यकता आहे. सुनियोजित विकासासाठी स्वतंत्र प्रादेशिक विकास मंडळ स्थापन करण्याच्या बाबतीत प्रस्तावावर नगर रचना खात्याकडून अभिप्राय आल्यानंतर लवकरात लवकर कार्यवाही करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांचा प्रश्न आहे की, किती दिवसात कार्यवाही करणार आहे ? यावर मी त्यांना सांगू इच्छितो की, पुढील 3-4 महिन्याच्या कालावधीत शासन अंतिम निर्णय घेईल. तसा हा प्रश्न नगर विकास खात्याशी संबंधित आहे.

सभापती महोदय, ठाणे व मुंबई शहर सोडून उर्वरित भागावर एम.एम.आर.डी.ए. चा समान निधी खर्च व्हावा ही सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना योग्य आहे. मुंबई जवळील क्षेत्राचा सुनियोजित विकास आताच केला नाही तर सध्या मुंबईत जे प्रश्न दिसत आहेत, तेच तेथे दिसतील. हे प्रश्न दिसणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे. रायगड व ठाणे जिल्हयातील शहर वगळता उर्वरित भागावर एम.एम.आर.डी.ए. चा जो निधी खर्च होत आहे तो समप्रमाणात करण्याचा प्रयत्न राज्य सरकार निश्चित करील.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26068.....

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, सापत्न भावनेने हा प्रकार मागील पाच वर्षापासून चालू आहे. एम.एम.आर.डी.ए. च्या माध्यमातून महानगरपालिकेत भेदभाव केला जात आहे. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्राचा विकास होत नाही, अशा प्रकारची भावना निर्माण झालेली आहे. आपण ठाणे व रायगडसाठी किती निधी दिलेला आहे, एम.एम.आर.डी.ए. मध्ये स्थानिकांना प्रतिनिधीत्व मिळाले आहे का ? हे कृपया मंत्री महोदयांना स्पष्ट करावे. एम.एम.आर.डी.ए. चे अधिकारी ठाणे जिल्हयातील लोकप्रतिनिधींना अजिबात जुमानीत नाहीत, अशा प्रकारची भावना निर्माण झालेली आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे एम.एम.आर.डी.ए. मध्ये सर्व विभागाचे प्रतिनिधी आहेत, एम.एम.आर.डी.ए. च्या कार्यपध्दतीबाबत मी प्रत्यक्ष जबाबदार नाही, त्यामुळे माझ्याकडे याबाबतची अधिक माहिती नाही. हा प्रश्न नगर विकास खात्यास विचारला तर त्याबाबत अधिक माहिती प्राप्त होईल.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, ठाणे व रायगड जिल्हयावर अन्याय होत असल्याचे या प्रश्नाद्वारे निदर्शनास आणून देण्यात येत आहे. या प्रश्नावर नीट माहिती मिळत नसल्याने प्रश्न राखून ठेवण्यात यावा, अशी मी विनंती करतो. तसेच मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, एम.एम.आर.डी.ए. मधील श्री.टी.चंद्रशेखर नावाचे अधिकारी हे नेहमी लाईम लाईटमध्ये राहण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, नगर विकास खात्याच्या माननीय मंत्री महोदयांनी या प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजे. शासन ठाणे व रायगड जिल्हयांवर आणखी किती अन्याय करणार आहे ?

नंतर श्री.सुंबरे.....

अशुद्धीत प्रत / मुद्रणेपूर्वी नाही

सुंबरे. श्री. गागरे नंतर --- 13.55

ता. प्र. क्र. 26068 ....

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी आताच सभागृहामध्ये उपस्थित झालो आहे आणि माननीय वित्त मंत्र्यांनी मला या प्रश्नाबाबत सांगितले आहे. सभापती महोदय, एमएमआरडीएच्या रिजनमध्ये असलेल्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्था मग त्या महापालिका असतील वा नगरपालिका असतील, त्या सगळ्यांसाठी एमएमआरडीएच्या निधीतील निधी खर्च करण्याची योजना करण्याची सूचना एमएमआरडीएला शासनाकडून देण्यात येतील.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, एमएमआरडीए म्हणून जी संस्था तेथे काम करीत आहे ती मुंबई आणि तत्सम परिसरामध्ये जेथे आपले नाव मोठे होईल, 'चंद्रशेखर' हे नाव मोठे होईल या दृष्टीनेच केवळ काम करीत आहे. तेव्हा आजपर्यंत गेल्या पाच वर्षामध्ये एमएमआरडीएच्या अंतर्गत येणाऱ्या मुंबई, ठाणे, नवी मुंबई तथा रायगड या विभागांना निधीचे वाटप कसे करण्यात आले आहे हे मंत्री महोदयांनी सांगावे. तसेच ठाणे-रायगड या भागांना कमी प्रमाणात निधी मिळाला असेल तर तो अनुशेष भरून दिला जाणार आहे काय अन्यथा विदर्भ-मराठवाडा विभाग ज्याप्रमाणे अनुशेष भरून काढण्याची मागणी करीत आहेत तशीच वेळ या विभागांवर देखील येणार आहे. तेव्हा एमएमआरडीए कडून दिल्या जाणाऱ्या निधीचे वाटप समानतेने करणार असाल तर याबाबतीतील बैठक किती तासांमध्ये, दिवसांमध्ये नव्हे, आपण घेणार आहात ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांचे म्हणणे निश्चितपणे योग्य असेच आहे की, एमएमआरडीए रिजनमधील सर्व भागांचा विकास समतोल होणे आवश्यक आहे. त्या रिजनमधील स्थानिक स्वराज्य संस्थांचे महापौर, नगराध्यक्ष यांनी अशाच आपल्या भावना मांडल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील त्या मान्य केल्या आणि या संदर्भात जी समिती आहे, जी याबाबत निर्णय घेते, त्या ठिकाणी नगराध्यक्षांना वगैरे आतापर्यंत बोलाविले जात नव्हते पण आता त्यांना देखील तेथे बोलाविले जाते. ज्या स्थानिक स्वराज्य संस्था आहे, त्यांच्या प्रमुखांनाच बोलाविण्याचा निर्णय या संदर्भात एमएमआरडीएने घेतलेला आहे. त्यामुळे त्यांचे प्रश्न त्या बैठकीमध्ये ते लोक मांडू शकतात. मागील 4-5 वर्षांमध्ये या गोष्टी घडलेल्या नव्हत्या हे मान्य आहे आणि त्यामुळेच हा प्रश्न निर्माण झाला म्हणूनच माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या सगळ्यांना निधी तसेच प्रतिनिधीत्व देण्याचे मान्य केले आहे. सभापती महोदय, या निमित्ताने मी आपणा सगळ्यांना खात्री

..... इइ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देऊ इच्छितो की, आपण सांगत असाल तर मी स्वत: तेथील आमदारांची बैठक या संदर्भात घेईन तसेच श्री.चंद्रशेखर यांना देखील बोलावून घेऊन या सर्व भागांना निधीचे वाटप समानतेने कसे होईल या दृष्टीने विचार करण्यासाठी या अधिवेशन काळामध्येच बैठक घेतली जाईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, पण आतापर्यंत निधीचे वाटप कसे झाले आहे ? ही माहिती सभागृहापुढे आलेली नाही. सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण दिले पाहिजे. ज्याप्रमाणे विदर्भ-मराठवाड्यामध्ये अनुशेषाचा प्रश्न निर्माण झाला आहे त्याप्रमाणे येथेही आता तो निर्माण होतो आहे ...

सभापती : मी माननीय नगरविकास राज्यमंत्री तसेच माननीय वित्त मंत्र्यांना सांगू इच्छितो की, सदनातील दोन्ही बाजूंच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना अशा आहेत की, एमएमआरडीए हे प्राधिकरण आपण तयार केले ते केवळ मुंबईसाठीच आहे असा एक समज झालेला आहे. त्या ऐवजी ठाणे, रायगड या विभागातील भागांच्या विकासासाठी हे प्राधिकरण आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी जसे आपण बोलावितो, म्हणजे महापालिकांचे महापौर, नगरपालिकांचे नगराध्यक्ष आदी लोकांना आपण बोलाविता, तसे त्या परिसरातील स्थानिक लोकप्रतिनिधी आहेत, सन्माननीय सदस्य श्री.आव्हाड, श्री. केळकर इत्यादी सदस्यांची इच्छा आहे की, माननीय राज्यमंत्र्यांनी, त्यांच्या दालनामध्ये जी बैठक ते घेणार आहेत त्या बैठकीला लोकनियुक्त प्रतिनिधी म्हणून आमदारांना देखील बोलवावे. तरी माननीय राज्यमंत्र्यांनी सन्माननीय सदस्यांची ती अपेक्षा पूर्ण करावी.

श्री. राजेश टोपे : ठीक आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा या संदर्भात एक प्रश्न आहे. एमएमआरडीए म्हणजे मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण, हे नावच तसे आहे की, ज्यामुळे हे प्राधिकरण केवळ मुंबईसाठी आहे असा समज होतो. पण केवळ मुंबईचाच नव्हे तर त्या सभोवतालच्या परिसराला देखील त्याचा फायदा मिळावा या सन्माननीय सदस्यांच्या मताशी मीही सहमत आहे. परंतु तेथे आपण ज्यांना आयुक्त म्हणून आणून बसविले आहेत ते कोठल्याही पत्र व्यवहाराला दाद देत नाहीत, उत्तर देत नाहीत. एअरपोर्ट ॲथॉरिटीपुढे त्यांच्या जमिनींवरील इ ोपडपट्ट्यांचा प्रश्न उपस्थित झाला होता तेव्हा संबंधित केंद्रीय राज्यमंत्र्यांनी जी बैठक बोलाविली होती तिला मुंबईच्या आमदारांनाही बोलाविले होते पण एमएमआरडीएने जी बैठक

..... 2इ 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

घेतली होती त्यांनी मात्र आम्हाला बोलाविले नव्हते. म्हणजे एमएमआरडीएचे आयुक्त श्री.चंद्रशेखर ज्या पद्धतीने तेथे काम करतात .....

(यानंतर श्री. सरफरे ..... 2एफ 1 ..

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS

तर.प्र.क्र.26068...

श्री. मधुकर सरपोतदार...

ती त्या विभागाची पध्दत आहे, त्या खात्याची जबाबदारी आहे असे धरुन ते चालतात. ते लोकप्रतिनिधींना जबाबदार नाहीत. याचा परिणाम म्हणून मुंबईला महापूरामध्ये जावे लागले. त्याला कारण एम.एम.आर.डी.ए. आहे. आम्ही त्यांना केलेल्या पत्र व्यवहाराचे उत्तर येत नाही. ते आपल्या मर्जीप्रमाणे वागतात. त्यामुळें एम.एम.आर.डी.ए. ही मुंबई महानगरपालिकेला एक समांतर संघटना उभी केली आहे अशाप्रकारचे चित्र उभे केले जात आहे ते आपण बदलणार आहात काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावना निश्चितपणे एम.एम.आर.डी.ए. च्या आयुक्तांना कळविण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

धारावी (मुंबई) येथील राजीव गांधी नगरमधील बालाजी लाईम डेपोमध्ये बांधकाम साहित्यात होत असलेली भेसळ

(९) * २५१४० श्री. विनोद तावडे , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री. मधुकर चव्हाण : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डिसेंबर, २००६ मध्ये शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास धारावी (मुंबई) येथील राजीव गांधी नगरमधील बालाजी लाईम डेपो येथे बांधकाम साहित्य विक्रीच्या दुकानात सर्व कंपन्यांच्या सिमेंटमध्ये भेसळ होते, अशी लेखी तक्रार स्थानिक रहिवाशी राजेश वर्मा ह्याने मुंबई पोलीस आयुक्तांकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीमध्ये त्यांनी भेसळ कशी केली जाते, कोठे केली जाते ह्याची संपूर्ण माहिती दिली तरी स्थानिक पोलिसांनी वा आयुक्तांनी त्याकडे दुर्लक्ष करण्याची कारणे काय,

(३) स्थानिक पोलिसांनी वा आयुक्तांनी हे प्रकरण शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठवून काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) सदर प्रकरणी कारवाई करण्यास विलंब लागण्याची सर्वसाधारण कारणे काय, स्थानिक पोलिसांनी ह्या तक्रारी त्यांचेकडे वारंवार करुनही त्याची दखल न घेतल्याबाबत त्यांचेविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) होय.

(२) अर्जदाराचा सदर तक्रार अर्ज प्राप्त होताच त्वरीत चौकशी करुन बालाजी लाईमडेपोमध्ये गुप्तरित्या पाळत ठेवून व खास बातमीदारामार्फत माहिती मिळविली असता तेथे बांधकाम साहित्यात भेसळ होत नसल्याचे आढळून आले.

(३) सदर प्रकरणी अर्जदाराव्यतिरिक्त अन्य कोणीही पोलीस ठाण्यात तक्रार केलेली नसल्याने तसेच अर्जदाराच्या वरीलप्रमाणे तक्रारीत काही तथ्य नसल्याचे आढळून आल्याने सदर प्रकरण शासनाच्या संबंधित विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेले नाही.

(४) प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराचा तक्रार अर्ज प्राप्त होताच त्वरीत चौकशी करण्यात आलेली आहे.

(उपप्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

सभापती : प्रश्नोत्तरांचा तास संपलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

पृ.शी. व मु. शी : □□दपत्रे सभा□ृहासमोर ठेव□

श्री. राणा जगजितसिंह पाटील (कृषी राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अ□ुमती□ महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम, 1983 च्या कलम 55 च्या पोट-कलम (3) अन्वये, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या सन 1999-2000 चा लेखा परिक्षण अहवाल व वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचा सन 1999-2000 चा लेखा परिक्षण अहवाल व वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले. उक्त अहवालांच्या प्रती खर्चाच्या बचतीच्या दृष्टीने सर्व सदस्यांकरिता छापून उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत. संबंधित कृषी विद्यापीठांना तशी परवानगी देण्यात आली आहे.

मा. सदस्यांसाठी ग्रंथालयास काही प्रती उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याच्या मुद्दयासंबंधी

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मी अत्यंत खेदाने व गांभीर्याने याठिकाणी औचित्याचा मुद्दा मांडीत आहे. कालपर्यंत मुंबई शहराला वीज भार नियमनाची चिंता वाटत नव्हती. परंतु गेल्या दोन दिवसापासून वर्तमानपत्रामध्ये ज्या बातम्या वाचावयास मिळत आहेत. त्यामध्ये टाटा पॉवर कंपनी व रिलायन्स एनर्जी या कंपनीशी वीज खरेदी करार होत नाही. मुंबई शहराला 3000 मेगावॅट इतक्या वीजेची गरज आहे, प्रत्यक्षात 2600 मेगावॅट इतकी वीज उपलब्ध आहे. मुंबई शहराला टाटा कंपनी बेस्टच्या माध्यमातून वीजेचा पुरवठा करते. त्याचप्रमाणे रिलायन्स एनर्जी कंपनी देखील वीजपुरवठा करते. या दोन्ही कंपन्यांकडे पुरेशी वीज उपलब्ध नसल्यामुळे मुंबई शहरावर भारनियमनाचे संकट उभे राहिले आहे.

सभापती महोदय, खास करुन यामध्ये भीती अशी वाटते की, मुंबई शहर ही महाराष्ट्राची राजधानी आहे तसेच देशाची आर्थिक राजधानी आहे. जागतिक स्तरावरील व्यापार, व्यवहार या शहरामध्ये होतात. त्याचप्रमाणे मुंबईमध्ये हॉस्पिटल्स व आयुक्त कार्यालय आहे या सर्वांचा विचार केला तर भार नियमनाबाबत सर्व सामान्य माणसामध्ये भय निर्माण झाले आहे. साऱ्या देशातून, महाराष्ट्रातून आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी याकरिता लोक मुंबईमध्ये येतात. यानिमित्ताने केंद्रीय ऊर्जा मंत्र्यांनी देखील मुंबईमध्ये भारनियमन होणार नाही असे सांगितले असले तरी प्रत्यक्षात टाटा पॉवर कंपनीने आम्ही मुंबईला वीज पुरवठा देऊ शकत नाही असे सांगितले आहे. त्यामुळे 400 मेगावॅट वीजेचा तुटवडा निर्माण झाला असल्यामुळे शासनाने त्याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. आणि मुंबई शहराला दिलासा देण्याची गरज आहे असे या निमित्ताने मला सुचवावयाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्दयाप्रमाणेच माझाही औचित्याचा मुद्दा आहे. संपूर्ण महाराष्ट्राला भेडसावणारी भारनियमनाची समस्या आता कोणत्याही क्षणी मुंबईमध्ये येऊन पोहोचेल अशी शक्यता निर्माण झाली आहे. महाराष्ट्र पॉवर ग्रीडमधून टाटा इलेक्ट्रिक कंपनीने वीज घेतल्यामुळे महाराष्ट्रामध्ये भारनियमन वाढू लागले आहे. राज्यामध्ये भारनियमनाने जनता त्रस्त झाली असतांना त्यामध्ये आणखी भर पडत आहे. तसेच, मुंबईमध्ये 400 मेगावॅट वीजेचा निर्माण झालेला तुटवडा कायम स्वरुपामध्ये भरुन काढण्यामध्ये यश न आल्यामुळे मुंबईतील जनता चिंतित झाली आहे. यासंबंधी मार्च 2007 अखेर दाभोळ पॉवर प्रोजेक्ट सुरु होईल आणि त्यामुळे भार नियमनाचे प्रमाण कमी होईल असे आश्वासन दिले असतांना एप्रिल महिना सुरु झाला तरी हा प्रकल्प कां कार्यान्वित झाला नाही? त्याला विलंब कां होत आहे? या सार्वजनिकदृष्टया महत्वाच्या विषयावर मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात)

सभापती : यापूर्वी देखील अत्यंत महत्वाच्या विषयावर अनेक सन्माननीय सदस्यांनी मुद्दे मांडलेले आहेत तो विषय आज अतिमहत्वाचा असेल आणि अन्य सदस्यांनी त्यावर बोलण्याची इच्छा व्यक्त केली तर आपण त्यांना परवानगी दिलेली आहे. परवा अन्नधान्याच्या संबंधातही पाच-सहा सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी परवानगी दिलेली होती.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मी खुलासा करू इच्छितो की, मी काल दुपारी या विषयावरील औचित्याचा मुद्दा माननीय सचिव साहेबांकडे सादर केलेला आहे. हा विषय अनेक सन्माननीय सदस्यांनी मांडला असला तरी तो त्यांचा अधिकार आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी माझ्याबाबतीत आक्षेप घेऊ नये, अशी विनंती आहे.

सभापती : या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनाही औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्याची मी परवानगी दिली आणि सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनाही परवानगी दिलेली आहे.

सन्माननीय अर्थमंत्री श्री.जयंत पाटील साहेबांना सांगू इच्छितो की, हा मुंबई शहराच्यादृष्टीने गंभीर विषय आहे. राज्यामध्ये अन्य ठिकाणी विजेचे भार नियमन सुरू आहे. आता मुंबईमध्ये कोणत्याही प्रसंगी भार नियमन सुरू होण्याची शक्यता आहे. तेव्हा या विषयाच्या संदर्भात शासनाकडून निवेदन करण्यात यावे.

श्री.जयंत पाटील : निवेदन करण्यात येईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मला निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, टाटा कंपनीने मुबईला वीज पुरवठा आम्ही करू शकणार नाही अशी धमकी दिलेली आहे. ही बातमी वर्तमानपत्रांमधून आलेली आहे. सन्माननीय अर्थमंत्री हे मुंबईचे पालकमंत्री आहेत. त्यांनी या संदर्भाने गंभीर दखल घ्यावी.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SKK

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, दिनांक 13-12-2006 रोजी नागपूरच्या अधिवेशनामध्ये औचित्याचा मुद्दा उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधले होते की, हावड मुंबई रेल्वेचे नाव "संत ज्ञानेश्वरी एक्स्प्रेस" असे असताना, रेल्वे मंत्रालयाने "जनेश्वरी एक्स्प्रेस" असे केलेले आहे. त्या संदर्भाने परिवहन राज्यमंत्री श्री धर्मरावबाबा आत्राम यांनी दिनांक 29 मार्च 2007 रोजी मला पत्र पाठवून कळविलेले आहे की, "आपण विधान परिषदेत दिनांक 13-12-2007 रोजी "औचित्याचा मुद्दा" या रूपाने उपस्थित केलेल्या वरील विषया संदर्भात प्रत्येक रविवारी मुंबई हावडा येथे जाणाऱ्या रेल्वेच्या नावात "जनेश्वरी एक्स्प्रेस" ऐवजी "संत ज्ञानेश्वरी एक्स्प्रेस" अशी सुधारणा करण्याबाबत भारत सरकारच्या रेल्वे मंत्रालयास पत्रान्वये कळविण्यात आले आहे. " मंत्री महोदयांनी उत्तर पाठविल्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे. सभापती महोदय, या उत्तरावरून असा अर्थबोध होतो की, "जनेश्वरी एक्स्प्रेस" हे नाव होते, ते बदलून त्या ऐवजी आता "संत ज्ञानेश्वरी एक्स्प्रेस" अशी सुधारणा करावी. पण मुळामध्ये "संत ज्ञानेश्वरी एक्स्प्रेस" असेच त्या गाडीचे नाव होते, त्याऐवजी "जनेश्वरी एक्स्प्रेस" असे झालेले आहे, त्यामध्ये सुधारणा करावी, हा मी मुद्दा मांडलेला होता. तसे केंद्र सरकारच्या रेल्वे मंत्रालयाला कळविले पाहिजे.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : ठीक आहे.

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, मला ओ.बी.सी.च्या संदर्भात औचित्याचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. नुकताच ओ.बी.सी.च्या संदर्भात हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे तो गंभीर आहे. राज्य सरकारने देखील याबाबतची आपली भूमिका स्पष्ट करावी किंवा त्यासंबंधीचे निवेदन करावे.

सभापती : या विषयाच्या संदर्भात नियम 93 ची सूचना आलेली आहे. मला वाटते सर्वोच्च न्यायालनयाने दिलेल्या निर्णयाच्या संदर्भाने सर्वसामान्य जनतेच्या हिताच्यादृष्टीने देखील आपण विचार करणे जरूरीचे आहे. माझ्याकडे सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी 93 ची सूचना दिलेली होती, त्या अनुषंगाने मी माझा निर्णय दिलेला नाही. परंतु या संदर्भाने मी एवढेच सांगेन की, या संदर्भाने शासन कोणत्या पध्दतीने विचार करणार आहे,

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

सभापती .....

या अनुषंगाने केंद्र सरकारकडे आपला कोणता अभिप्राय देणार तसेच याबाबतीत सर्वोच्च न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे त्याअनुषंगाने केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या माध्यमातून ओ.बी.सी आणि अन्य दुर्बल घटकातील सामान्य माणसांना न्याय कसा मिळेल या अनुषंगाने जी कार्यवाही करावयाची आहे त्याबाबत शासनाने निवेदन करावे अशी मी शासनाला सूचना करतो.

श्री. सदाशिवराव पोळ : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. म्हसवड नगरपालिकेमधील नगराध्यक्षा सर्वसाधारण वॉर्डातून निवडून आल्या होत्या. त्यांनी त्यांचे जातीचे प्रमाणपत्र तीन महिन्याच्या आत पडताळणी करुन दिले नाही म्हणून त्यांना अपात्र करावे यासाठी तेथील विरोधी पक्षाचे सदस्य जिल्हाधिकारी कार्यालयासमोर प्राणांतिक उपोषणाला बसलेले आहेत. शासनाने याबाबत निवेदन करावे अशी मी विनंती करतो.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राष्ट्रीय स्नेही शिक्षण संस्था नागपूर या संस्थेच्या गैरकारभाराच्या संदर्भात या सभागृहामध्ये वेगवेगळ्या माध्यमातून दोन तीन वेळा चर्चा झालेली आहे. मला या सभागृहामध्ये लेखी आणि तोंडी आश्वासन देण्यात आले होते की, या संस्थेच्या संदर्भात तातडीने कारवाई करणार आहोत परंतु दोन तीन वेळा आश्वासन देऊनही आज दोन वर्षानंतरही त्यासंदर्भात कोणतीही कारवाई झालेली नाही. शिक्षण अधिकारी आणि शिक्षण संचालक यांच्या स्तरावर पूर्णपणे चौकशी झालेली आहे. शासनाने चौकशी मान्य केलेली आहे. शासनाने या संस्थेला पाठीशी घालण्याचे कारण काय ? हे मला समजत नाही. आश्वासन दिल्याप्रमाणे शासन तातडीने याबाबतीत कारवाई करील काय ?

सभापती : माननीय शिक्षण राज्यमंत्र्यांनी याबाबतीत कारवाई करावी.

श्री. हसन मुश्रीफ : याबाबतीत कारवाई करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण मला औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो. मराठवाड्यामध्ये 298 स्वातंत्र्य सैनिक बोगस असल्याचे जाहीर झालेले आहे. त्यासंदर्भात अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे. सर्व स्वातंत्र्य सैनिक उपोषणाला बसलेले आहे. उपोषणाला बसलेल्या स्वातंत्र्य सैनिकांपैकी 2 स्वातंत्र्य सैनिक मृत झालेले आहेत. 25 स्वातंत्र्य सैनिक रुग्णालयामध्ये आहेत. स्वातंत्र्य सैनिक म्हणून जाहीर झाल्यानंतर त्यांना मिळालेला लाभ, त्यांना मिळालेले पैसे तसेच त्यांच्या मुलांना मिळालेल्या नोकऱ्या याबाबतीत प्रश्न निर्माण झालेला आहे. कोर्टाने निर्णय दिल्यानंतर त्यांच्या मुलांना लागलेल्या नोकऱ्या जाणार काय ? पैसे वसूल करण्याच्या बाबतीत अशी परिस्थिती आहे की, 5-50 रुपये सुध्दा परत देण्यासारखी त्यांची परिस्थिती नाही. याबाबतीत शासनाला निश्चित स्वरुपाचा निर्णय घ्यावा लागेल. स्वातंत्र्य सैनिकांचे उपोषण चालू आहे.. सर्व स्वातंत्र्यसैनिक वयोवृध्द आहेत. 2 महिला मृत झालेल्या आहेत. आणखी काही घडू नये यादृष्टीने शासनाने याची तातडीने दखल घेऊन योग्य भूमिका घेणे आवश्यक आहे. नाही तर उपोषणाला बसले म्हणून 30-40 स्वातंत्र्य सैनिक मृत्यूमुखी पडले अशी परिस्थिती निर्माण होईल. सभापती महोदय, आपण याबाबतीत शासनाला ठोस निदेश द्यावेत अशी मी आपल्याला विनंती करतो.

सभापती : माननीय अर्थमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, आपण या अनुषंगाने लक्ष घालावे. त्याचप्रमाणे सामान्य प्रशासन विभागाने सन्माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करावी.

श्री. जयंत पाटील : ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आज सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यातील शिरोडा या गावी लोकांनी रास्ता रोको केलेला आहे. त्या ठिकाणी रास्ता रोको चालू आहे. एस.टी.च्या ड्रायव्हरने खाली उतरुन एका रिक्षा चालकाला मारहाण केली. रिक्षा चालकाला मारहाण केल्यानंतर तो रिक्षा चालक पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी गेला असता त्याची तक्रार घेतली गेली नाही. त्यामुळे ग्रामस्थांनी त्या ठिकाणी रास्ता रोको चालू केलेला आहे. यासंबंधी गृह राज्यमंत्र्यांनी लक्ष घालून निवेदन करावे अशी मी विनंती करतो.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : याबाबतीत लक्ष घालण्यात येईल.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. नांदेडला गेल्या 48 तासात 15 पेक्षा जास्त भूकंपाचे धक्के बसलेले आहेत. एका भूकंपाची नोंद 2.8 रिश्टर स्केलपर्यंत झालेली आहे. जवळपास साडेतीन लाख लोक गेल्या 48 तासापासून जागे आहेत. दिग्रस रस्त्यावर मोठा खड्डा पडलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये संपूर्ण नांदेड जिल्हा आणि आसपासच्या परिसरातील लोक भयभीत झालेले आहेत.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(श्री. श्रीकांत जोशी....

अशा परिस्थितीमध्ये राज्यकर्त्यांनी तेथे प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थिती पाहिली पाहिजे. आपला जो डिझ ास्टर मॅनेजमेंट प्रोग्रॅम आहे तो कागदावरच न राहाता त्याची अंमलबजावणी करण्याची गरज आहे. या निमित्ताने मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, त्यांनी तेथे स्वत: जावे. अचानक भूकंप झ ाला तर मोठयाप्रमाणावर जीवित हानी होईल. म्हणून सरकारने ठोस पावले उचलून उपाययोजना करण्याची गरज आहे. त्याठिकाणी घर पडल्यामुळे एक महिला जखमी झालेली आहे.

सभापती : नांदेड या ठिकाणी भूकंपसदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे शासनाने याबाबतीत तातडीने लक्ष घालावे. वरिष्ठ अधिकारी किंवा सन्माननीय राज्यमंत्र्यांनी किंवा मंत्री महोदयांनी तेथे जाऊन परिस्थिती पहावी. माननीय पालकमंत्र्यांनीही त्या ठिकाणी तातडीने भेट द्यावी आणि सदनाला वस्तुस्थिती विशद करावी. याबाबतीत शासनाने निवेदन करावे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 93 अन्वये सूचना</u>

सभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री पाशा पटेल, नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, संजय केळकर, व रामनाथ मोते, वि.प.स. यांनी "दिनांक 20.3.2007 रोजी मु.पो.ता.परळी वैजनाथ (जि. बीड) येथे रात्री श्री. बाबाजी नरहरी जाधव यांचेवर जाजुवाडी येथे काही इसमांसमवेत प्राणघातक हल्ला करणा-या विठ्ठल लक्ष्मण तांदळे या आरोपीला दिनांक 21.3.2007 पासून दीपक कन्या शाळा, परळी येथे 10 व्या परीक्षा केंद्रावर अधिकृत पर्यवेक्षक म्हणून दाखविल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व विनोद तावडे,वि.प.स. यांनी "राज्यात गुटखा विक्रीवरील बंधने शिथिल केल्यामुळे ग्रामीण व शहरी भागात प्रत्येक पानबिडीच्या दुकानातून विविध प्रकारच्या गुटख्यांची सर्रास विक्री सुरु असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सर्वश्री श्रीकांत जोशी व पाशा पटेल, वि.प.स. यांनी " संपूर्ण राज्यात 0 ते अडीच वर्षे वयोगटातील बालकांना दर महिन्याच्या आठवड्याला दिली जाणारी पोलिओची लस बीड जिल्ह्यातील केज येथील आरोग्य केंद्राला दिनांक 23.3.2007 रोजी मिळाल्याचे तसेच ही लस 100 ते 125 बालकांना पाजल्याबाबतचा अहवाल आरोग्य केंद्राने शासनाला पाठविल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण व संजय केळकर, वि.प.स. यांनी " एन.एस.सी.आय. या संस्थेने वरळी येथे वल्लभभाई पटेल इनडोअर स्टेडियम बांधण्यासाठी मूळ अंदाजपत्रक 40 कोटी रुपयांचे तयार केले असतानाही प्रत्यक्षात सदर बांधकामाचे अंदाजपत्रक 190 कोटीपर्यन्त वाढविल्याबाबत" या विषयावर नियम 93

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(माननीय सभापती...

अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. वसंतराव खोटरे, प्रा. बी.टी.देशमुख, सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, जी.एल. अैनापुरे व दिलीपराव सोनवणे, वि.प.स. यांनी "शासनाने राज्यात 2000-2001 पासून कायम विनाअनुदान तत्वावर माध्यमिक, उच्च माध्यमिक, शाळा व तुकड्या देण्याचे ठरविले असूनही कायम विनाअनुदानित शाळेतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी वेतन व इतर शैक्षणिक सवलतींपासून वंचित राहिल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र. पाटील व सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील,वि.प.स. यांनी "जेएनपीटी बंदराने बांधा, वापरा आणि हस्तांतर करा या तत्वावर बंदराचा एक भाग बहुराष्ट्रीय कंपनी एनएसआयसीटी ला 30 वर्षाच्या भाडेतत्वावर दिल्यामुळे उरण, गव्हाण, बेलपाडा, हनुमान कोळीवाडा आदी गावातील 700 मच्छिमार कुटुंबियांवर उपासमारीचे आलेले संकट" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, नितीन गडकरी व पाशा पटेल, वि.प.स. यांनी "श्रध्दा कैलास बागुल या 14 वर्षाच्या मुलीचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद येथे मार्च, 2007 च्या शेवटच्या आठवड्यात पोट दुखू लागल्यामुळे उपचार करणा-या डॉक्टराने चुकीचे इंजेक्शन दिल्याने सदर मुलीचा मृत्यू झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..4..

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाण, प्रा. बी.टी.देशमुख व श्री. वसंतराव खोटरे, वि.प.स. यांनी " आर्वी नाका चौक परिसरात दिनांक 30, 31 मार्च व 1 एप्रिल 2007 रोजी वडार झोपडपट्टी व परिसरातील गुंड प्रवृत्तीच्या दोन गटात खंडणी, अतिक्रमण व अन्य कारणाने झ ालेल्या टोळी संघर्षात अनेक जण जखमी झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील व श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी "राज्यातील ऊस पिकातील ठिबक व तुषार सिंचन संचासाठी अनुदान देण्याची केंद्र शासनाच्या योजनेसाठीचे सन 2005-2006 वर्षाचे मंजूर असलेले सुमारे पस्तीस लाख रुपयांचे अनुदान केवळ राज्य स्तरावरील वरिष्ठ अधिका-यांच्या हलगर्जीपणामुळे पडून असल्याबाबत "या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे व संजय केळकर, वि.प.स. यांनी "मुंबई गोरेगाव येथील आरे वसाहतीतील एस.आर.ए. प्रकल्प एम.एम.आर.डी.च्या कंत्राटदाराला सामान ठेवण्यासाठी देण्यात आलेली बेकायदेशीर जागा, परिणामी मुंबइतील एकमेव हरितपट्टा उद्ध्वस्त होण्याची निर्माण झालेली भीती " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शुद्धीपत्रक नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे, आपण नियम 93 च्या सूचनांसंबंधी निर्देश दिलेले होते. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी जवळजवळ 100 ते 150 निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवली जातात. काही वेळेला निवेदन सादर करण्यामध्ये शासनाकडून टाळाटाळ केली जाते. दिनांक 16 मार्च, 2007 रोजी म्हाडामधील भ्रष्टाचारासंबंधी दिलेल्या नियम 93 च्या सूचनेसंबंधी आपण शासनाला निवेदन करण्याचे निर्देश दिले होते. आज तीन आठवडे उलटूनही अद्याप शासनाने निवेदन केलेले नाही. ठराविक कालावधीत निवेदन सादर होणे अत्यंत आवश्यक आहे एवढीच माझी विनंती आहे.

सभापती : आज 10 निवेदने चर्चेकरिता घेत आहोत. शुक्रवार, दिनांक 30 मार्च, 2007 रोजी देखील 10 निवेदने चर्चेकरिता घेतली जाणार होती. परंतु सभागृहाचे कामकाज वाढल्यामुळे निवेदने वितरित केली गेली नाहीत वा त्यावर चर्चा झालेली नाही. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी मांडलेला मुद्दा योग्य आहे. नियम 93 च्या सूचनेसंबंधी शासनाने निवेदन करावे असे मी निर्देश देतो त्या संदर्भात तातडीने निवेदन केले गेले तर त्याला महत्व आहे आणि आपण देखील महत्व देतो. या अनुषंगाने मी यापूर्वी सुध्दा शासनाला सूचना दिलेल्या आहेत. आज 10 निवेदनांवर चर्चा होईल. उद्या देखील 10 निवेदने चर्चेसाठी घेण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, दिनांक 12 मार्च, 2007 पासून नियम 93 च्या सूचनांसंबंधी आपण निर्देश दिलेले आहेत. मी स्वत: उपस्थित केलेल्या सहा ते सात नियम 93 च्या सूचनांवर आपण शासनाला निवेदन करण्याचे निर्देश दिलेले आहेत. असे असताना 15 दिवसांचा कालावधी उलटून देखील एकाही सूचनेवरील निवेदन सभागृहास सादर झालेले नाही. असे घडत असेल तर आपण जे निर्देश देता त्याला काही अर्थ उरणार नाही. ठराविक कालावधीत सभागृहापुढे निवेदन सादर केले पाहिजे. निर्देश दिल्यानंतर किमान पाच दिवस किंवा लगतच्या पुढील आठवड्यात शासनाने निवेदन केले पाहिजे.

सभापती : या बाबतीत सन्माननीय मंत्रीमहोदयांनी नोंद घेणे जरुरीचे आहे. नियम 93 च्या सूचनांसंबंधी ज्यावेळी शासनास निवेदन करण्याच्या सूचना दिल्या जातात, त्यानंतर किमान पाच ते सहा दिवसात ते निवेदन मंत्रीमहोदयांमार्फत सभागृहात केले जाणे आवश्यक आहे, ते बंधनकारक

..2..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

सभापती.....

आहे. या माझ्या अत्यंत सक्त सूचना आहेत असे मंत्रीमहोदयांनी समजावे. काही निवेदने उद्या सादर करावीत, तातडीने निवेदने कशी सादर होतील हे सुध्दा पहावे. आज मी 10 निवेदने स्वीकारली आहेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आपण मघाशी म्हणाला होतात की, मी निर्णय दिलेला आहे. मी नियम 93 ची सूचना दिली होती.

सभापती : नियम 93 च्या सूचनेसंबंधी मी निर्णय दिल्यानंतर पुन्हा चर्चा झाली. त्यानंतर मी या निर्णयाप्रत पोहोचलो की, सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय अत्यंत महत्वाचा आहे. आपण सदनामध्ये भूमिका मांडली. मी मघाशी सांगितले की, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी नियम 93 ची सूचना दिली आहे. त्या संदर्भात मी शासनाला सूचना दिलेल्या आहेत की, हा देशातील आणि राज्यातील अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. सर्व समाजाच्या अनुषंगाने अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे आणि म्हणून सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्य शासनाची जी भूमिका आहे ती भूमिका शासनाने निवेदनाच्या माध्यमातून सभागृहापुढे विशद करावी.

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, विधानसभेमध्ये शासनाने या संदर्भात निवेदन केले आहे. विधानपरिषदेत देखील ते निवेदन सादर केले पाहिजे. या सभागृहाला या संदर्भात काहीच माहिती नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाबद्दल मी काही टिप्पणी केलेली नाही. निकालानंतर जी परिस्थिती उद्भवली आहे त्या परिस्थितीच्या संदर्भात नियम 93 ची जी सूचना दिली, तो मुद्दा गंभीर असल्याने चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे.

(नंतर श्री.जुन्नरे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. काही सूचना या ठिकाणी मांडण्यास आपण संमती देत असतो तसेच काही सूचना दालनात नाकारल्या जातात. सन्माननीय सदस्यांनी जी सूचना दिली होती त्यासंदर्भात विचार करीत असतांना, तसेच या सूचनेच्या संदर्भात माझ्या विभागातील अधिका-यांशी मी चर्चा केली होती. ही सूचना अत्यंत महत्वाची आहे. या सूचनेच्या संदर्भात वस्तुस्थिती असली, मला ती वस्तुस्थिती पटली असली तरी त्या अनुषंगाने 93 च्या सूचनेला मान्यता न देता यासंदर्भात शसनाने...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणे यांनी ओबीसीच्या संदर्भात उच्च न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे त्यासंदर्भात शासनाने विधानसभेत या बाबात शासनाचे धोरण काय आहे याची माहिती दिलेली आहे परंतु आपल्या सभागृहात यासंदर्भात शासनाने कोणत्याही प्रकारचे निवेदन केलेले नाही त्यामुळे ओबीसीच्या संदर्भात शासनाचे काय धोरण आहे याबाबत आपण आजच्या आज शासनास निवेदन करावयास सांगावे.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांना मी सांगू इच्छितो की, या विषयाच्या संदर्भात शासनाचे धोरण काय आहे, भुमिका काय आहे याबाबत तातडीने निवेदन करावयास सांगितलेले आहे. आजच्या दिवसाचे कामकाज संपण्यापूर्वी शासनाने याबाबतचे निवेदन करावे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : केंद्रशासकीय कर्मचा-यांना 1 जानेवारी, 2007 पासून मंजूर करण्यात आलेल्या महागाई भत्ता वाढीचा आदेश राज्यशासकीय कर्मचा-यांना लागू करणे.

मु. शी. : केंद्रशासकीय कर्मचा-यांना 1 जानेवारी, 2007 पासून मंजूर करण्यात आलेल्या महागाई भत्ता वाढीचा आदेश राज्यशासकीय कर्मचा-यांना लागू करणे याबाबत सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री. वसंतराव खोटरे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. जयंत पाटील (अर्थमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री व्ही.यु.डायगव्हाणे, प्रा. बी.टी.देशमुख, श्री. वसंतराव खोटरे यांनी केंद्रशासकीय कर्मचा-यांना 1 जानेवारी, 2007 पासून मंजूर करण्यात आलेल्या महागाई भत्ता वाढीचा आदेश राज्यशासकीय कर्मचा-यांना लागू करणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

3... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, 20 लाख शासकीय कर्मचा-यांचा हा प्रश्न आहे. नुकत्याच अर्थसंकल्पाच्या वेळी माननीय अर्थमंत्री श्री. जयंत पाटील यांनी सांगितले होते की, "राज्याची आर्थिक स्थिती मजबूत आहे. कर्ज वाढले म्हणून घाबरण्याचे कारण नाही. राज्यापुढे आता आर्थिक अडचण राहिलेली नाही." सभापती महोदय, या पूर्वी राज्य शासनाने 24 महिन्यांचा महागाईभत्ता गोठवलेला आहे. म्हणून केंद्रशासनाने 1 जानेवारी, 2007 पासून 6 टक्के दराने वाढीव महागाई भत्ता देण्याचे मान्य केलेले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासन, हे अधिवेशन संपण्यापूर्वी केंद्रशासनाप्रमाणे 1 जानेवारी, 2007 पासून देय ठरणारी 6 टक्के दराने महागाई भत्त्यात वाढ देण्याचा निर्णय हे काढणार आहे काय? तसेच तो निर्णय जसाच्या तसा सर्व शिक्षक कर्मचा-यांना लागू होईल असा निर्णय घेतला जाईल काय ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, केंद्रशासनाने 1 जानेवारी, 2007 पासून 6 टक्के दराने महागाई भत्ता देण्याच्या संदर्भात आदेश काढलेले आहेत त्यासंदर्भातील आदेश राज्य शासनास आताच प्राप्त झालेला आहे. त्या आदेशावर प्रोसेस करुन लवकरच कार्यवाही करण्यात येईल.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, 6 टक्के दराने महागाई भत्ता देण्याच्या संदर्भात आदेश केव्हा काढला जाईल यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी स्पेसिफिक उत्तर द्यावे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय वित्त मंत्र्यांनी राज्य शासकीय कर्मचा-यांच्या दोन्ही संघटनेसमवेत 21 डिसेंबर रोजी आपल्या दालनात बैठक घेतली होती. या बैठकीच्या संदर्भात श्री. र. ग. कर्णिक, निमंत्रक, समन्वय समिती, सरकारी-निमसरकारी कर्मचारी-शिक्षक संघटना तसेच श्री. ग.दि. कुलथे, सरचिटणीस, महाराष्ट्र राजपत्रित अधिकारी महासंघ यांना 21 डिसेंबर, 2007 रोजी पत्राने कळविले आहे की, वरील विषयाच्या संदर्भात मा. वित्त मंत्री (वित्त व नियोजन) यांच्या दालनात आज, दिनांक 21 डिसेंबर, 2001 रोजी आपण व आपल्या समितीच्या पदाधिका-यांबरोबर झालेल्या बैठकीत घेतलेले निर्णय पुढील प्रमाणे आपणास कळविण्यात येत आहेत.

1) वित्त विभागाच्या सूत्रानुसार अनुज्ञेय महागाई भत्ता वाढीची 50 टक्के एवढी रक्कम यापेही दिनांक 31 मार्च 2002 पर्यंत संबंधितांना रोखीने देय राहील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख.....

2) दिनांक 1 एप्रिल, 2002 ते 31 मार्च, 2003 या कालावधी करिता संबंधित पात्र कर्मचा-यांना केंद्र शासनाच्या सूत्रानुसार अनुज्ञेय ठरणा-या महागाई भत्त्याच्या अतिरिक्त वाढीच्या 75 टक्के अनुज्ञेय होईल. त्यापैकी 50 टक्के रोखीने दिले जाईल व उर्वरित 25 टक्के संबंधित कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या खात्यात जमा होईल.

3) दिनांक 1 एप्रिल, 2003 पासून संबंधित पात्र कर्मचा-यांना केंद्र शासनाच्या सूत्रानुसार अनुज्ञेय महागाईच्या भत्त्याच्या वाढी रोखीने देय राहतील.

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी जे शब्द उच्चरलेले आहेत ते मी जसेच्या तसे आपल्याला वाचून दाखवितो. त्यांनी असे म्हटले होते की, "त्यांच्या बरोबर चर्चा करुन पुन्हा आपण केंद्राप्रमाणे महागाई भत्ता देण्याचे धोरण स्वीकारलेले आहे." सभापती महोदय, आता सुध्दा सरकारी-निमसरकारी कर्मचा-यांना महागाई भत्ता देण्याच्या संदर्भात केंद्रशासनाचा जी.आर. आताच मिळालेला आहे असे माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितलेले आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख.....

माननीय मंत्रिमहोदयांना येथे ठामपणे सांगण्यास कोणतीही अडचण नाही कारण या संदर्भात धोरणात्मक निर्णय झालेला आहे. रेकॉर्डवर देखील आलेले आहे. तसेच दोन्ही संघटनांना देखील लिहून दिलेले आहे. तेव्हा वाढीव डी.ए.च्या संदर्भात येत्या दोन दिवसांत आदेश निर्गमित होतील काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, आम्हाला केंद्र शासनाकडून जी.आर.प्राप्त झाला नव्हता म्हणून आम्ही थांबलो होतो. आता आम्हाला जी.आर.प्राप्त झालेला असल्यामुळे पुढील कार्यवाही करण्यास हरकत राहिलेली नाही. (अडथळा) सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येईल. (अडथळा) डी.ए.मध्ये वाढ झालेली आहे ती द्यावीच लागणार आहे. या संदर्भात लवकरात लवकर कार्यवाही करण्यात येईल.

सभापती :मी मंत्रिमहोदयांना विचारु इच्छितो की, त्यांनी उत्तर देताना सांगितले की, सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. याचा अर्थ हे अधिवेशन संपण्यापूर्वी आदेश निर्गमित करण्यात येईल असा समजायचा का ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यांनी प्रश्न विचारला की, अधिवेशन संपण्यापूर्वी आदेश निर्गमित करण्यात येतील काय ? मी त्याचे उत्तर "आपण म्हणता त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल" असे दिलेले आहे. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी प्रश्न विचारला की, डी.ए.देण्याबाबत केव्हा कार्यवाही करणार आहात ? त्याचे उत्तर मी "लवकरात लवकर कार्यवाही करण्यात येईल" असे दिलेले आहे. दोन्ही सन्माननीय सदस्यांचे प्रश्न वेगळे असल्यामुळे त्याची वेगळी उत्तरे देण्यात आलेली आहेत.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या संदर्भात यापूर्वी देखील माननीय मंत्रिमहोदयांनी आश्वासने दिलेली आहेत आणि त्याप्रमाणे आदेश काढलेले आहेत. सुरुवातीस वित्त विभागामार्फत आदेश काढले जातात, मग जिल्हापरिषद आणि नगरपालिकामार्फत आदेश काढले जातात. प्रत्येक आदेशामध्ये असा उल्लेख असतो की, हा आदेश सर्वांना लागू आहे. असे असताना शिक्षण विभागात आणि उच्च शिक्षण विभागात काही तज्ज्ञ मंडळी आहेत ते गोलगोल फिरवत राहतात. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, आदेशाप्रमाणे दोन्ही विभागांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे असे कळविले जाईल का ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिता की, तज्ज्ञ मंडळी शिक्षण विभागात असणार नाही तर कुठे असणार ? आदेशात कोणत्याही त्रुटी राहू नयेत अशाप्रकारचे आदेश निर्गमित करण्याचा प्रयत्न करु. मी या निमित्ताने सभागृहाला सांगू इच्छितो की, एक टक्का वाढ होते त्यावेळी शासनावर वर्षाला 120 कोटी रुपयांचा बोजा पडतो. आता तर सहा टक्के वाढ झालेली आहे म्हणजे वर्षाला 720 कोटी रुपयांचा बोजा शासनावर पडणार आहे. पुन्हा जून महिन्यात जर चार टक्के वाढ झाली तर 1200 कोटी रुपये द्यावे लागतील. त्याप्रमाणे अर्थसंकल्पामध्ये तरतूद केलेली आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्रशासकीय अधिकाऱ्यांनी पोल्ट्रीधारक यांच्या संगनमताने खोटे पंचनामे करुन लाखो रुपयांची लूट केल्याबाबत

मु. शी. : सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्रशासकीय अधिकाऱ्यांनी पोल्ट्रीधारक यांच्या संगनमताने खोटे पंचनामे करुन लाखो रुपयांची लूट केल्याबाबत सर्वश्री गुरुमुखी जगवानी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते व संजय केळकर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हसन मुश्रीफ (पशुसंवर्धन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री गुरुमुखी जगवानी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते व संजय केळकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्रशासकीय अधिकाऱ्यांनी पोल्ट्रीधारक यांच्या संगनमताने खोटे पंचनामे करुन लाखो रुपयांची लूट केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एक प्रख्यात वर्तमानपत्र दैनिक "तरुण भारत" मध्ये या संदर्भातील भ्रष्टाचार पुराव्यानिशी आलेले आहेत. ती माहिती मी येथे आणलेली आहे. या प्रकरणात जे पंचनामे झालेले आहेत त्यामध्ये खाडाखोड करण्यात आलेली आहे. जेथे 300 संख्या होती तेथे खाडोखोड करुन 1500 करण्यात आलेली आहे. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.नारायण राणे यांना या संदर्भातील माहिती कळली असेलच. दैनिक तरुण भारतच्या पत्रकाराने खाडाखोड केलेल्या पंचनाम्याची झेरॉक्स मिळविली आहे. ते पुरावे मी आपल्याकडे देतो. असे असताना उत्तरामध्ये नमूद करण्यात आले आहे की, "खोटे पंचनामे बनवून लूट केली हे खरे नाही." मी माझ्याकडील सर्व पुरावे आपल्यामार्फत मंत्रिमहोदयांना देतो. त्याप्रमाणे मंत्रिमहोदय संबंधितांवर कारवाई करतील काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दिलेली सर्व कागदपत्रे पाहून चौकशी केली जाईल व चौकशीत तथ्य आढळल्यास कारवाई केली जाईल.

यांनतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, "जळगाव जिल्हयातील काही भागात कुक्कुट पक्षांना बर्ड फ्लू या रोगाची लागण झाल्यामुळे धोक्यात आलेला पोल्ट्री व्यवसाय जिवंत ठेवण्यासाठी कुक्कुट पालकांना प्रति पक्षी रुपये 20/- प्रमाणे आर्थिक मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतला." याठिकाणी माझा असा प्रश्न आहे की, आज काही शहरांच्या मध्यभागी पोल्ट्री व्यवसाय सुरु आहेत. त्यामुळे लोकांच्या जीवितास हानी होऊ नये यादृष्टीने शासन हा पोल्ट्री व्यवसाय शहराच्या बाहेर नेणार का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, तसा शासनाचा विचार नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, याठिकाणी प्रशासनाची 80-85 लाख रुपयांची लूट झालेली आहे. याठिकाणी माननीय मंत्री महोदयांकडून वारंवार सांगितले जाते की, महाराष्ट्र राज्य कर्जाच्या खाईत आहे. त्यामुळे याठिकाणचा प्रत्येक रुपया महत्वाचा आहे, असे मला वाटते. असे असतानाही एवढया मोठया रक्कमेचा घोटाळा झालेला आहे. याबाबतची माहिती वर्तमानपत्रातही आलेली आहे. माझ्या माहितीप्रमाणे, अशा प्रकारच्या बातम्या संबंधित खात्याच्या माननीय मंत्री महोदयांचे खाजगी सचिव वगैरे माहिती घेतात. परंतु एवढी मोठी बातमी आली असतानाही ती माननीय मंत्री महोदयांच्या लक्षात आणून दिलेली नाही. याबाबतीत पुरावा दिल्यानंतरही आम्ही चौकशी करु असे सांगणे योग्य नाही. याठिकाणी आपण भ्रष्टाचाराला पाठीशी घालत आहात. खरे म्हणजे, माननीय मंत्री महोदयांनी अगोदरच सांगितले पाहिजे होते की, भ्रष्टाचाराची माहिती मला मिळाली असून त्याबाबतची दखल मी गांभीर्याने घेत आहे. परंतु तसे झालेले नाही. एवढया मोठयाप्रमाणात पैशांचा भ्रष्टाचार होत असताना व त्यासंबंधीचे पुरावे, झेरॉक्स प्रती दिल्या असतानाही गेंडयाची कातडी घातलेले हे सरकार चौकशीची भाषा करीत असल्याचे सहज उत्तर देत असेल तर ते योग्य होणार नाही. त्यामुळे माझा याठिकाणी प्रश्न आहे की, याबाबतीतील पुरावे आज संध्याकाळपर्यंत आपल्याला मिळाल्यानंतर त्याआधारे आपण येत्या 15 दिवसांच्या आत त्यासंबंधीचा अहवाल आपण अधिवेशन संपण्यापूर्वी सभागृहासमोर ठेवणार का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, नवापूर जिल्हा नंदूरबारमध्ये बर्ड फलूची लागण झालेली होती. त्याबाबतीत महाराष्ट्र शासनाने ऐतिहासिक निर्णय घेतला होता की, असे पक्षी मेले असल्यामुळे प्रति पक्षी 20 रुपये प्रमाणे नुकसान देण्यात येईल. तसेच, याबाबतीत सिंधुदुर्ग

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ...

जिल्हयात 3 टप्प्यामध्ये एकूण रुपये 97,15,786/- आर्थिक सहाय्याच्या रकमेचे वितरण 230 पोल्ट्रीधारकांना करण्यात आलेले आहे. याठिकाणी 85 लाख रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे, याबाबतीत खात्याने उत्तर दिलेले आहे. परंतु तरीही सन्माननीय सदस्य यासंदर्भातील पुरावा देणार असतील तर हे शासन संवेदनशील असल्यामुळे अधिवेशन संपण्यापूर्वी आम्ही याबाबतची चौकशी निश्चित पूर्ण करुन व त्याप्रमाणे कारवाई करु.

..3.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : सोनोपंत दांडेकर कॉलेजमध्ये 12 वी आर्टसमध्ये शिकणाऱ्या तीन आदिवासी विद्यार्थ्यांना ग्रंथालय विज्ञान या विषयाच्या परीक्षेला बसून न देणे

मु. शी. : सोनोपंत दांडेकर कॉलेजमध्ये 12 वी आर्टसमध्ये शिकणाऱ्या तीन आदिवासी विद्यार्थ्यांना ग्रंथालय विज्ञान या विषयाच्या परीक्षेला बसून न देणे याबाबत सर्वश्री जयंत प्र. पाटील व शरद पाटील वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र. पाटील व शरद पाटील यांनी "सोनोपंत दांडेकर कॉलेजमध्ये 12 वी आर्टसमध्ये शिकणाऱ्या तीन आदिवासी विद्यार्थ्यांना ग्रंथालय विज्ञान या विषयाच्या परीक्षेला बसू न देणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, तीन मुले परीक्षेला मुकलेली आहेत. याला श्री.शरदकांत कुलकर्णी, केंद्र सांचलक हे जबाबदार आहेत. त्यांच्या निष्काळजीपणामुळेच तीन मुलांना परीक्षा देता आलेली नाही. त्यामुळे त्या तीन मुलांची फेर परीक्षा घेण्याची कार्यवाही होईल का ? व श्री.कुलकर्णी यांच्यावर कारवाई होईपर्यंत त्यांना तातडीने निलंबित करण्यात येईल का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ती तीनही मुले रिपिटर होती. परंतु श्री.शरदकांत कुलकर्णी, केंद्र संचालक यांच्या चुकीमुळेच तीन मुलांचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे श्री.कुलकर्णी यांची चौकशी केली जाईल व त्यांच्यावर फौजदारी गुन्हाही दाखल केला जाईल. परंतु पुन्हा परीक्षा घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

..5.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 93 अन्वयेचे निवेदन क्रमांक 4 व 5 बाबत.</u>

सभापती : नियम 93 अन्वयेचे निवेदन क्रमांक 4 व 5 च्या बाबतीत मी असा निर्णय देतो की, संबंधित मंत्री महोदय विधानसभा सभागृहातील कामकाजामध्ये गुंतले असल्यामुळे ती निवेदने शेवटी घेण्यात येतील अथवा उद्या घेण्यात येतील. आता आपण निवेदन क्रमांक 6 चर्चेसाठी घेऊया.

..6.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : सार्वजनिक बांधकाम मंत्री, नामदार छगन भुजबळ यांना एका अज्ञात व्यक्तीने दूरध्वनीवरुन जीवे मारण्याची धमकी देणे

मु. शी. : सार्वजनिक बांधकाम मंत्री, नामदार छगन भुजबळ यांना एका अज्ञात व्यक्तीने दूरध्वनीवरुन जीवे मारण्याची धमकी देणे याबाबत सर्वश्री जयंत प्र. पाटील व शरद पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र. पाटील व शरद पाटील, यांनी " सार्वजनिक बांधकाम मंत्री, नामदार छगन भुजबळ यांना एका अज्ञात व्यक्तीने दूरध्वनीवरुन जीवे मारण्याची धमकी देणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...7....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, श्री.थेटे हे राजकीयदृष्टया कोणत्या पक्षाशी संबंधित आहेत ? त्यांनी अशी धमकी देण्याची कारणे कोणती ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते होते. धमकी देण्याचे कारण असे की, जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष पदाच्या निवडणुकीमध्ये त्यांचे भाऊ श्री.दिलीप थेटे यांना उमेदवारी मिळाली नाही, म्हणून राग धरुन त्यांनी निवेदनात म्हटल्याप्रमाणे संभाषणाची भाषा केलेली आहे.

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या राज्यातील एका कॅबिनेट दर्जाच्या मंत्र्याला घमकी देण्यात आली. जातीवाचक शब्द तसेच "आम्ही तुम्हाला बघून घेऊ "असे उद्गार काढण्यात आले. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. या राज्यास महात्मा जोतिबा फुले, बाबासाहेब आंबेडकर या सारख्या थोर नेत्यांची परंपरा लाभलेली आहे. अशा या राज्यास ही गोष्ट शोभादायी नाही. या विषयी एक तक्रार करण्यात आली होती. त्यावर शासन कडक कारवाई करणार आहे की नाही ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे: सभापती महोदय, यावर शासनाने गंभीरपणे कारवाई केलेली आहे व त्या व्यक्तीला अटक करण्यात आलेली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबईच्या ऑर्थररोड जेलमध्ये दोन परस्पर टोळयातील मारामारीत एका कैद्याचा मृत्यू होणे.

मु. शी. : मुंबईच्या ऑर्थररोड जेलमध्ये दोन परस्पर टोळयातील मारामारीत एका कैद्याचा मृत्यू होणे याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते यांनी मुंबईच्या ऑर्थररोड जेलमध्ये दोन परस्पर टोळयातील मारामारीत एका कैद्याचा मृत्यू होणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, डिसेंबर 2006 मध्ये "मुंबईच्या आर्थररोड जेलमध्ये दोन परस्पर टोळयांमध्ये मारामारी झाली ती किरकोळ स्वरुपाची होती. ब्लेड आणून ही मारामारी करण्यात आली होती व मुंबई मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांची गर्दी कमी करण्यासाठी नवी मुंबई तळोजा येथे 2000 बंदी क्षमता असलेले नवीन कारागृह बांधण्यात येत असून बांधकाम अंतिम टप्यात आहे " असे या निवेदनात सांगण्यात आले. या कारागृहामध्ये दोन वेगवेगळया टोळया आहेत त्या कैद्यांमध्ये जे वितुष्ट निर्माण झाले होते त्यात तेथील कर्मचाऱ्यांचा सहभाग आहे का?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय,आर्थर रोड कारागृह हे मुंबईच्या मध्यवर्ती ठिकाणी आहे. एखाद्याने बाहेरुन शिटी मारली तरी ती आत ऐकू येईल अशी त्या जेलची स्थिती आहे. वरुन भिंतीवरुन एखाद्याने चाकू, ब्लेड ,गांजा टाकला असेल आणि तो या कैद्यांना मिळाला असेल. या प्रकरणात तेथील कर्मचाऱ्यांचा कोणताही सहभाग नाही. या कर्मचाऱ्यांची जेलमध्ये जाताना आणि जेलमधून बाहेर पडताना अशी दोन्ही वेळेस तपासणी करण्यात येते.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मुंबई मध्यवर्ती कारागृहाची बंदी ठेवण्याची अधिकृत क्षमता 804 असून प्रत्यक्षात सुमारे 2500 ते 2600 च्या आसपास बंदी कारागृहात ठेवण्यात येतात. येथे 800 बंदीसाठी जितके कर्मचारी वर्ग असतो तेवढाच कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात आलेले आहेत. मात्र बंदी अधिकृत क्षमतेच्या चौपट आहेत. तेव्हा कैदयांच्या प्रमाणात आपण अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची संख्या वाढवणार का? हे कारागृह महत्वाचे आहे. येथे इतक्या मोठया संख्येने कैदी असताना त्या ठिकाणी क्लोज टी.व्ही. सर्किटची रचना केली तर पाळत ठेवणे सोपे होऊ शकेल. आधुनिकीकरणासाठी तेथील अधिक्षकांनी सुमारे 2 ते 4 कोटी इतका निधी मागितला आहे , तर हा निधी आपण त्यांना देणार का ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी सांगितले आहे की, जेलमधील बंदी ठेवण्यांची अधिकृत क्षमता 804 असून प्रत्यक्षात 2500 ते 2600 बंदी कारागृहात ठेवण्यात येतात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या जेलमधील बंदीची संख्या कमी करण्याचे काम सुरु असून त्यांची रवानगी नाशिक व तळोजा कारागृहामध्ये करण्यात येत आहे. हे काम एप्रिल महिन्यात पूर्ण होईल. क्लोज सर्किट टी.व्ही बसविण्याचे काम परवाच प्रस्तावित केलेले आहे व कारागृहांमध्ये जामर बसविण्यासाठी 47 लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. क्लोज सर्किट टी.व्ही. चे टेंडर मागविण्यात आले होते .मात्र केवळ एकच टेंडर आल्यामुळे ते रद्द करण्यात आले . आता लवकरच क्लोज सर्किट टी. ही. सुरु करण्यात येणार आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आर्थड रोड या जेलची भौगोलिक परिस्थिती आपण पाहिली तर तेथील भिंतीवरुन एखादी वस्तू आतमध्ये टाकणे सोपे नाही आणि अशा प्रकारे वस्तू टाकता येत असतील तर या कारागृहाच्या भिंतीची उंची शासन वाढवणार का?

यानंतर श्री. रोझेकर...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे भिंतीपलिकडे गांजा जाऊ नये म्हणून गांजा घेणारे जे आरोपी आहेत त्यांना तळोजा येथील कारागृहात हलविण्यात येणार आहे.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : विदर्भ व मराठवाडा विभागात शैक्षणिक सत्र सुरु करण्याची तारीख पुढे ढकलणे

मु.शी.: विदर्भ व मराठवाडा विभागात शैक्षणिक सत्र सुरु करण्याची तारीख पुढे ढकलणे बाबत सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.वसंतराव खोटरे, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.वसंतराव खोटरे, वि.प.स.यांनी विदर्भ व मराठवाडा विभागात शैक्षणिक सत्र सुरु करण्याची तारीख पुढे ढकलणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..3.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाने दिनांक 17 एप्रिल 2006 रोजी जो शासन निर्णय निर्गमित केला आहे त्याबाबत अधिका-यांची आणि माननीय मंत्र्याची स्तुती केली पाहिजे. या निर्णयामध्ये असे म्हटले आहे की, जून महिन्याच्या दुस-या सोमवारी शाळा सुरु होतील. मराठवाडा व विदर्भात जून महिन्याच्या 20/25 तारखेपर्यन्त असलेल्या तापमानाचा विचार केला गेला नाही. 11 तारखेला शाळा सुरु होणार आहेत त्यावेळी 45/47 डिग्री सेल्सिअस एवढे तापमान त्या भागात असते. त्यामुळे मुले शाळेत येऊ शकत नाहीत तर शिक्षक काय शिकवणार? त्यामुळे जो शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे तो रद्द करुन एक-दोन आठवडयांची मुदतवाढ देणारा शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे की, सर्व विभागांमध्ये एकसूत्रता असावी व शालेय कामकाजांचे दिवस सर्व शाळांसाठी सारखे असावेत, या उद्देशाने हा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. विदर्भ आणि मराठवाडा विभागात या कालावधीत जास्त तापमान असते, याची माहिती शासनाकडे आहे. त्या महिन्यातील तापमानाची गेल्या अनेक वर्षांची आकडेवारी माझ्याकडे उपलब्ध आहे. परंतु, या आकडेवारीमध्ये मी जात नाही. पूर्वीप्रमाणे 1 जुलैपासून शाळा सुरु कराव्यात, अशा प्रकारची निवेदने लोकप्रतिनिधींनी, शिक्षण संस्थांनी सादर केलेली आहेत. 30 एप्रिलपर्यन्त या निवेदनांवर विचार करुन निश्चितपणे निर्णय घेण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.व्ही.यू.डायगव्हाणे सरांनी जे मुद्दे उपस्थित केले ते योग्य आहेत. आता एप्रिल महिना सुरु झाला नाही तर विदर्भातील तापमान 42/43 अंश सेल्सियसपर्यन्त पोहोचले आहे. एप्रिल, मे, जून महिन्यात हे तापमान 48 अंश सेल्सियसपर्यन्त पोहोचते. अशा तापमानात शाळा सुरु केल्यास विद्यार्थी शाळेत येऊ शकणार नाहीत. दुपारच्या वेळी चिटपाखरुही उडत नाही, असे तापमान त्या विभागात असते. त्यामुळे याचा विचार शासनाला करावा लागणार आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन खरे म्हणजे मंत्री महोदयांनी आताच 1 जुलैपासून शाळा सुरु करण्यात येतील, असे जाहीर करणे आवश्यक आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, अनेक वर्षांची आकडेवारी माझ्याकडे उपलब्ध आहे. एप्रिल महिन्याच्या अखेरपर्यन्त निर्णय घेऊन सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल. हे सांगतात म्हणून आम्ही निर्णय घेणार नाही.

..4.....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, शासनाने दिलेल्या निवेदनात गोंधळ आहे. या निवेदनाच्या पहिल्या व शेवटच्या ओळीकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. निवेदनातील शेवटचे वाक्य असे आहे की, "पूर्वीचा निर्णय कायम करावा वा त्यात काही फेरबदल करावेत याचा निर्णय लवकरच घेण्यात येईल." आता या गोष्टीला एक वर्ष झाले आहे. निवेदनातील पहिले वाक्य असे आहे की, "राज्यातील सर्व विभागातील शाळांच्या कालावधीमध्ये एकसूत्रता रहावी आणि शालेय कामकाजाचे दिवस सर्व शाळांसाठी सारखे असावे, या उद्देशाने राज्यातील शाळा जून महिन्याच्या दुस-या सोमवारी हया एकाच दिवशी सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे." आता निसर्गानेच एकसूत्रता ठेवली नाही, यावर मंत्रीमहोदयांकडे उपाय नाही. कारण, सूर्यनारायण त्यांच्या ताब्यात नाही, हे एक वर्षानंतर मंत्रीमहोदयांच्या लक्षात आले. मी असे पाहिले आहे की, या सभागृहातील चर्चा संबंध राज्यातील लोकांपर्यन्त जाते. एक वर्षाची संधी मिळाल्यानंतर "पूर्वीचा निर्णय कायम करावा वा त्यात काही फेरबदल करावेत, याचा निर्णय लवकरच घेण्यात येईल", असे सरकारने म्हणणे बरोबर नाही. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी म्हटल्याप्रमाणे मंत्रीमहोदयांनी यावरील निर्णय सभागृहामध्ये जाहीर करावा, अशी माझी विनंती आहे.

यानंतर कुमारी जयश्री.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख.....

सदर शासन निर्णय विविध विभागातील शाळांच्या नियोजनामध्ये एकसूत्रता राहावी म्हणून घेतलेला आहे. पण निसर्गानेच ही एकसूत्रता राहिलेली नाही, हे सिध्द केलेले आहे. माझे म्हणणे असे आहे की, या सभागृहामधील निर्णय महाराष्ट्रातील सर्व लोकापर्यंत जातो. म्हणून तो निर्णय निदान दोन ते तीन दिवसांमध्ये तरी तातडीने आपण घेणे अत्यंत आवश्यक आहे तो घेणार का ?

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : त्याशिवाय शाळांचे वार्षिक नियोजन कसे होणार ?

श्री.जितेंद्र आव्हाड : सदर प्रश्न मानवतेच्या दृष्टीकोनातून आहे. विदर्भामध्ये सध्या आता 43 ते 47 डिग्री सेल्सियस पर्यंत तापमान पोहोचलेले आहे.

श्री.हसन मुश्रीफ : विदर्भातील सगळया जिल्हयातील जून महिन्याच्या टेम्परेचरची आकडेवारी माझ्याकडे आहे. दिनांक 30 एप्रिल,2007 पर्यंत यावर निर्णय घेतला जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : महोदय, माननीय मंत्रिमहोदयांचे हे अशैक्षणिक बोलणे आहे.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सन्माननीय मंत्रिमहोदयांना एकदा विदर्भात पाठवावयाला हवे.

प्रा.बी.टी.देशमुख : सन्माननीय मंत्रिमहोदयांचे हे अशैक्षणिक बोलणे आहे, हे याकरिता की, याचा अर्थ असा की,जून महिन्याच्या पहिल्या आठवडयामध्ये देखील विद्यार्थी व विद्यार्थ्यांच्या पालकांनी शाळेबाबत कोणतेही नियोजन करु नये का ? कोणी मामाकडे जाते तर कोणी टुरिस्ट म्हणून फिरावयास जाते.

श्री.हसन मुश्रीफ : याबाबत दिनांक 30 एप्रिल,2007 पर्यंत शासन आदेश काढणार आहे. हे शासन सुध्दा मानवतावादी व संवेदनशील आहे.

(सर्व सन्माननीय सदस्य एकत्र उभे राहून बोलतात.)

सभापती : कृपया, सन्माननीय सदस्यांनी खाली बसून घ्यावे. यावर्षी विदर्भामध्ये उष्णतेची प्रखरता व तापमान जास्त आहे तसेच, आपण याचा अनुभव दरवर्षीही घेतो. पूर्वी मी जेव्हा वर्धा जिल्हयाचा पालकमंत्री असतांना मला विदर्भामधील प्रखर तापमानाचा अनुभव आला होता तसेच, मी एकदा जून महिन्यामध्ये नागपूर येथे गेलो असता, मला असे आढळून आले की, विदर्भामध्ये उष्णतेची तीव्रता जास्त आहे. एकुणच विदर्भामध्ये उष्णता जास्त आहे ही वस्तुस्थिती आहे. आज जर तेथील तापमान 43 डिग्री सेल्सियस असेल तर यदाकदाचित मे, जूनमध्ये ते तापमान 47 डिग्री

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

सेल्सियसपर्यंत जाण्याची शक्यता नाकारता येणार नाही. या सर्व पार्श्वभूमीवर मी असे म्हणेन की, सन्माननीय शिक्षणमंत्री प्रा.वसंत पुरके हे विदर्भातील असून त्यांनी यावर साकल्याने विचार करुन, सन्माननीय सदस्यांच्या भावनांचा आदर ठेवण्याच्या दृष्टीने योग्य तो निर्णय घ्यावा.

प्रा.वसंत पुरके : याबाबत दिनांक 25 ते 27 एप्रिल,2007 च्या आत साकल्याने विचार करुन निर्णय घेण्यात येईल.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण द्यावे, येत्या 15 दिवसांमध्ये शाळा बंद पडणार आहेत. शाळांना वार्षिक नियोजन करावे लागते, आज जर आपण दीर्घकालीन सूटीचा निर्णय घेतला तरच शाळांचे पुढचे नियोजन होऊ शकेल, अन्यथा शाळांचे वार्षिक सत्रांचे नियोजन होऊ शकणार नाही.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, आम्हाला आपण संरक्षण द्यावे.

श्री.हसन मुश्रीफ : अतिशय सुंदर असे नियोजन करुन आम्ही सन्माननीय सदस्यांच्या भावनांचा आदर करणार आहोत कारण की, यासंदर्भात दिनांक 30एप्रिल,2007 पर्यंत अंतिम निर्णय घेऊन आदेश काढण्यात येतील.

श्री.नारायण राणे : माननीय सभापती महोदय, आपणही सदर प्रश्नाबद्दल दखल घेतलेली आहे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन हे अधिवेशन संपण्याच्या आत दीर्घकालीन सूटीबाबत निर्णय घेतला जाईल.

यानंतर श्री.बोरले.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: वाहनांचे रजिस्ट्रेशन करण्याकरिता आर.टी.ओ.कार्यालयात रेशनिंग कार्ड, इलेक्ट्रीक बील, टेलिफोन बील ग्राहय न धरणे.

मु.शी.: वाहनांचे रजिस्ट्रेशन करण्याकरिता आर.टी.ओ.कार्यालयात रेशनिंग कार्ड, इलेक्ट्रीक बील, टेलिफोन बील ग्राहय न धरणे याबाबत श्री.गोपीकिशन बाजोरिया यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.धर्मरावबाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया यांनी "वाहनांचे रजिस्ट्रेशन करण्याकरिता आर.टी.ओ.कार्यालयात रेशनिंग कार्ड, इलेक्ट्रीक बील, टेलिफोन बील ग्राहय न धरणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिशन बाजोरिया : राज्यात वाहनांचे रजिस्ट्रेशन करण्याकरिता आर.टी.ओ. कार्यालयात निवासाचा पुरावा म्हणून रेशनिंग कार्ड, इलेक्ट्रीक बील, टेलिफोन बील हा ठोस व शासकीय पुरावा असतांना आर.टी.ओ. कार्यालय हे पुरावे ग्राहय न धरणे, यामुळे सर्वसामान्य नागरिकांना येत असलेल्या अडचणी हा राज्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण मुद्दा आहे. नियम 93 च्या सूचनेला दिलेल्या लेखी उत्तरामध्ये असे नमूद केलेले आहे की," केंद्रीय मोटार वाहन नियम 1989 च्या नियम 47 अनुसार वाहनांची नोंदणी करण्याकरिता अर्ज सादर करतांना वय व निवासाचा पुरावा म्हणून केंद्रीय मोटार वाहन नियम, 1989 मधील नियम 4 मध्ये नमूद केलेली खालील कागदपत्रे अर्जासोबत सादर करणे आवश्यक होते. शिधापत्रिका, मतदार यादी, आयुर्विमा पॉलिसी, पासपोर्ट, केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या किंवा एखाद्या स्थानिक मंडळाच्या कोणत्याही कार्यालयाने दिलेली वेतन चिठ्ठी, शाळा प्रमाणपत्र, जन्माचा दाखला आणि जिल्हा शल्यचिकित्सकापेक्षा कमी दर्जाच्या नसेल अशा नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीकाने दिलेली अर्जदाराच्या वयाबद्दलचे प्रमाणपत्र." सभापती महोदय, केंद्र शासनाने जनता इंशुरन्स पॉलिसी, टेलिफोन व वीज देयक, घरपट्टी पावती आणि शिधापत्रिका ही कागदपत्रे यातून वगळलेली आहेत. या व्यतिरिक्त उर्वरित 4 कागदपत्रांना ग्राहय धरण्यात आले आहे. सभापती महोदय, पासपोर्ट सर्वांकडेच असतो असे नाही. ब-याच लोकांकडे पासपोर्ट नसतो. माननीय मंत्री महोदयांना माझा प्रश्न असा आहे की, वाहनांचे रजिस्ट्रेशन करण्याकरिता इलेक्ट्रीक बील, टलिफोन बील, शिधापत्रिका ही प्रमाणपत्रे ग्राहय धरली जातील काय, माननीय मंत्री महोदय याबाबत किती दिवसामध्ये नियम तयार करणार आहेत आणि नियम तयार करणार नसतील तर इलेक्ट्रीक बील, टलिफोन बील, रेशन कार्ड अधिकृत प्रमाणपत्र नाहीत काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, वाहनांचे रजिस्ट्रेशन करण्याकरिता रेशन कार्ड ग्राहय धरता येणार नाही. कारण केंद्र शासनाने ते यातून वगळलेले आहे. आयकर विभागाने दिलेले पॅन कार्ड, टेलिफोन बील ग्राहय मानले जाते. मोबाईलचे पोस्टपेड बील, सक्षम प्राधिका-याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र, रहिवासी दाखला आपल्याला ग्राध्य धरता येईल.

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, शपथपत्र करण्यासाठी दोन-तीन दिवसाचा कालावधी लागतो. केंद्र शासनाने रेशन कार्डवर बंधन आणलेले आहे, असे माननीय मंत्री महोदय सांगत आहेत. "any other document or documents as may be prescibed by the State Government" सभापती महोदय, केंद्र शासनाने याबाबतचे सर्व अधिकार राज्य सरकारला दिलेले आहेत. रेशन कार्ड हे राज्य शासनाने दिलेले अधिकृत प्रमाणपत्र आहे. माझा प्रश्न असा आहे की, वाहनांचे रजिस्ट्रेशन करण्याकरिता शासन इलेक्ट्रीक बील, टेलिफोन बील आणि शिधापत्रिका ग्राहय धरणार आहे काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, वाहनाचे रजिस्ट्रेशन करण्याकरिता केंद्र शासनाने इलेक्ट्रीक बील, टेलिफोन बील, घरपट्टी पावती आणि शिधापत्रिका ही चार कागदपत्रे वगळलेली आहेत. राज्य शासराने ही कागदपत्रे सोडून चार कागदपत्रे वाढविलेली आहेत. तहसीलदाराकडून शपथपत्र करुन दिले तर ते ग्राहय धरले जाईल.

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, वाहनाचे रजिस्ट्रेशन करण्याकरिता शिधापत्रिका आणि इलेक्ट्रीक बील नाकारले जात आहे. हा नागरिकांवर अन्याय आहे. यामध्ये सुधारणा करण्यात यावी. केंद्र शासनाने राज्य सरकारला यामध्ये सुधारणा करण्याची मुभा दिलेली आहे.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, मी वारंवार हेच सांगत आहे की, हा कायदा केंद्र शासनाचा आहे. वाहनाचे रजिस्ट्रेशन करण्याकरिता लागणारी पूर्वीची चार कागदपत्रे केंद्र शासनाने यातून वगळलेलेली आहेत. पूर्वी एकूण 8 कागदपत्रे लागत होती. केंद्र शासनाने केंद्रीय मोटार वाहन नियम, 1989 मधील नियम 4 अन्वये चार कागदपत्रे वगळलेली आहेत. वाहनाचे रजिस्ट्रेशन करण्याकरिता 5 कागदपत्रे जोडली पाहिजेत, असे केंद्र शासनाचे आदेश आहेत. "Any other document or documents as may be prescribed by the State Government."

यानंतर श्री.गागरे ....

अशुधीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा आत्राम .....

ज्यांनी अगोदर 4-5 दाखले दिलेले आहेत, त्यांच्या वाहनांचे रजिस्ट्रेशन मान्य केले जात आहे. तशा प्रकारची सूचना संबंधित आर.टी.ओ. कार्यालयाना दिलेली असून वाहनांचे रजिस्ट्रेशन सुरु आहे.

श्री.गोपिकिशन बाजोरिया : सभापती महोदय, शासन याबाबतची कार्यवाही किती दिवसात करणार आहे ? रहिवासी पुरावा म्हणून दूरध्वनी देयक स्वीकारण्याचा निर्णय केव्हा घेणार आहे ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, याबाबतचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे प्रलंबित आहे. विधी व न्याय विभागाकडून मान्यता मिळण्यानंतर वाहनांची नोंदणी अधिक सुलभ होईल.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: वैद्यकीय महाविद्यालयाच्या शिक्षण शुल्क समितीस कार्यालय व पुरेसे कर्मचारी उपलब्ध नसणे.

मु.शी.: वैद्यकीय महाविद्यालयाच्या शिक्षण शुल्क समितीस कार्यालय व पुरेसे कर्मचारी उपलब्ध नसणे याबाबत सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते व संजय केळकर वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.दिलीप वळसे पाटील (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते व संजय केळकर वि.प.स. यांनी "वैद्यकीय महाविद्यालयाच्या शिक्षण शुल्क समितीस कार्यालय व पुरेसे कर्मचारी उपलब्ध नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदर वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शासनाने शिक्षण शुल्क समिती गठीत केलेली आहे, या समितीचे अध्यक्ष निवृत्त न्यायाधिश आहेत. शिक्षण शुल्क समितीने विहीत केलेल्या शुल्कावर असंतोष व संतापाचे वातावरण तयार झालेले आहे, त्यामुळे या विषयावर चर्चा करण्यासाठी नियम 93 ची सूचना दिलेली आहे.

सभापती महोदय, माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी या निवेदनात असे म्हटले आहे की, "शिक्षण शुल्क समितीच्या कार्यालयाकरिता जागा, अधिकारी व कर्मचारीवर्ग उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सध्या तेथे कार्यरत असलेले कर्मचारी अन्य शासकीय कार्यालयातून व कंत्राटी पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. तसेच दोन्ही समितींकरिता जादा कर्मचारीवर्ग देण्यात येणार आहे." असेही दिलेले आहे. जादा कर्मचारी वर्ग कधीपर्यंत देणार आहात, हा माझा पहिला प्रश्न आहे.

सभापती महोदय, लेखी निवेदनात असा उल्लेख केला आहे की, "संबंधित कागदपत्रे व लेखे यांची छाननी समितीमार्फत केली जाते". परंतु या समितीचे म्हणणे असे आहे की, आमच्याकडे कागदपत्रे छाननी करण्यासाठी कर्मचारी नाहीत, त्यामुळे छाननी करण्यास उशीर होत आहे, या समितीस पुरेशा कर्मचा-यांची आवश्यकता आहे. माझ्या अर्थसंकल्पावरील भाषणामध्येही मी या विषयावर बोललो आहे.

सभापती महोदय, संस्थाचालकांचे म्हणणे आहे की, विविध कोर्सेस चालविताना आम्हाला बराच खर्च येतो, काही वेळेस नुकसान होते. मात्र काही संस्थांना खूप नफा होतो, तेव्हा त्यांच्यावर आयकर खात्याच्या धाडी पडतात अशीही परिस्थिती असते. ही रक्कम विद्यार्थ्यांनी विविध फीच्या रुपाने दिलेली असते. शिक्षण संस्थांना होणाऱ्या तोटयाचीही तपासणी करण्याची व्यवस्था सध्या शिक्षण शुल्क समितीकडे नाही, कारण त्यांच्याकडे कर्मचारी नाही असे त्यांचे म्हणणे आहे, यासाठी शासन काय करणार आहे ?

माझा तिसरा प्रश्न आहे की, मागील वर्षी 1 लाख 32 हजार रुपये फी होती, या वर्षी समितीने ही फी वाढवून 2 लाख 40 हजार केलेली आहे. प्रवेश घेताना 1 लाख 32 हजार भरावयाचे व पुढच्या तीन-चार वर्षात उर्वरित रक्कम भरावयाची आहे. अशा प्रकारे समितीने दुप्पट फी केलेली आहे, त्यावर पुनर्विचार झाला पाहिजे. विद्यार्थी काही अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ

.....4

श्री.विनोद तावडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शकणार नाहीत अशी परिस्थिती निर्माण होत आहे. सभापती महोदय, काही वैद्यकीय महाविद्यालयांवर शिक्षण शुल्क समिती कारवाई करणार आहे असे सांगितले आहे. त्यापैकी नाशिकच्या वैद्यकीय महाविद्यालयाने विहीत फीपेक्षा जास्त फी घेतली आहे. तसेच फॉर्मसी कॉलेज, धुळे यांचेवर केंद्रीय परिषद दिल्ली यांच्यावर कारवाई करणार आहे, असे सांगूनही कार्यवाही केलेली नाही. नाशिक व धुळे येथील महाविद्यालयांवर केव्हा कारवाई करणार आहात ?

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, शिक्षण शुल्क समितीच्या कार्यालयाला 1900 चौरस फुटाची जागा शासकीय तंत्रनिकेतनमध्ये उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सुरुवातीस या कार्यालयाकरिता आवश्यक असणारा कर्मचारी वर्ग देण्यात आलेला आहे, त्यामध्ये 6 पदे शासकीय कर्मचाऱ्यांतून लोन बेसीसवर, पाच पदे कॉन्ट्रक्ट बेसीसवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. समितीच्या पदांची मागणी राज्य सरकारकडे प्राप्त झालेली आहे. ही पदे निर्मितीच्या संदर्भात शासनाने दिनांक 7.12.2006 रोजी निर्णय घेतला आहे, आवश्यक असणाऱ्या 17 पदांवर नियुक्ती करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सन्माननीय सदस्यांनी दुसऱ्या प्रश्नात म्हटले आहे की, या समितीकडे कर्मचारी संख्या कमी आहे व काही मर्यादा आहेत. मी सांगू इच्छितो की, या संबंधी राज्य सरकारची समिती बरोबर चर्चा झालेली आहे, समितीकडे जे प्रस्ताव येतात, त्या प्रस्तावाची छाननी लवकर करण्याच्या दृष्टीने सल्लागार कंपनीची मदत घेतली पाहिजे. इतर विभागाने अशा प्रकारे सल्लागार कंपनीची मदत घेऊन यातून मार्ग काढलेला आहे. माननीय सदस्यांच्या पुढील प्रश्नाच्या उत्तरात मी सांगू इच्छितो की, विद्यार्थ्यांनी वैद्यकीय शिक्षणास प्रवेश घेताना त्यांना फीची सविस्तर माहिती असली पाहिजे.

नंतर श्री.सुंबरे.....

अशुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वळसे-पाटील ....

की, माझ्या पुढील सर्व कोर्सच्या कालावधीची फी किती आहे. परंतु मध्यंतरी न्यायालयाने याबाबत निर्णय देताना दर तीन वर्षांनी फी बाबत आढावा घेतला जावा आणि त्याप्रमाणे फी आकारावी असे निर्देश दिले होते. मात्र राज्य सरकारने याबाबत स्पष्ट भूमिका घेतली की, एकदा फी भरल्या नंतर कोर्स पूर्ण होईपर्यंत तीच फी राहिली पाहिजे, त्यात बदल होऊ नये. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी असाही प्रश्न विचारला की, दोन कॉलेजांनी समितीला चुकीची माहिती सादर केल्याबाबत त्या दोन संस्थांवर कारवाई करण्याच्या सूचना समितीने दिल्या होत्या त्याबाबत पुढे काय झाले ? मी आपल्याला त्या संबंधात सांगू इच्छितो की, सदरहू कॉलेजांबाबत त्या प्रमादाबद्दल नक्की कोठल्या कायद्याखाली कारवाई करायची हा प्रश्न आहे. आपल्याला येथे एक गोष्ट समजून घेतली पाहिजे की, आज जो कायदा आहे त्यात कारवाई करण्याबाबत जे नियम आहेत, क्लॉजेस आहेत त्यात कॉलेज टेक ओव्हर करणे हाही एक उपाय आहे. परंतु ती कॉलेजेस टेक ओव्हर करून आणखी रिस्क घेण्याच्या बाबतीत शासन आज तरी तयार नाही. तेव्हा या बाबतीत कायदेशीर सल्ला घेऊन उद्याच्या तीन महिन्यात याबाबत निर्णय घेतला जाईल इतकेच मी सांगतो.

श्री. जी.एल. अैनापुरे : सभापती महोदय, शिक्षण शुल्क समिती आणि प्रवेश नियंत्रण समिती यांच्या कारभारामध्ये मनुष्यबळ नसल्यामुळे आणि काम देखील प्रचंड वाढलेले आहे, कारण कॉलेजांची संख्या वाढत चालली आहे आणि सगळ्या तपासण्या होण्यात वर्ष निघून जाते आणि मुलेही निघून जातात. विशेषत: बी.एड. कॉलेजांच्याबाबतत माझा प्रश्न आहे. त्यांनी घेतलेले पैसे त्यामुळे वसूल होत नाहीत. दुसरे असे की, या सगळ्या कॉलेजांना समानता यावी, सुप्रीम कोर्टाने याबाबत दिलेला निर्णय लक्षात घेता, सुप्रीम कोर्टाला त्यांच्या निर्णयाचा फेरविचार करण्याच्या दृष्टीने सांगण्यासाठी आपण पुढे जाणार का ? म्हणजे फी आकारणीचे अधिकार दिले त्या सर्व कॉलेजांची सरासरी काढून फी ठरवून द्यावी आणि त्यांचे नियम वगैरे सारखे असावेत यासाठी आपण सुप्रीम कोर्टाला विनंती कराल का ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, ही जी शिक्षण शुल्क समिती आहे तिला त्यांचे काम कार्यक्षमपणे पार पाडण्यासाठी ज्या काही अडी-अडचणी आहेत त्याबाबत यापूर्वीही सदर समितीच्या प्रमुखांबरोबर अनेकवेळा चर्चा झालेली आहे. न्या. पाटणकर यांनी या समितीचा कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांच्या काय अडचणी आहेत याबाबत त्यांच्याशी बोलून घेऊन त्यांना कोणत्याही

..... एसएस 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रकारे स्टाफ कमी पडणार नाही या दृष्टीने काळजी घेतली जाईल. सभापती महोदय, दुसरे म्हणजे पूर्वी जी डिफरन्शिअल फी स्ट्रक्चर होते ते न्यायालयाच्या निर्णयामुळेच केले गेले. फॅसिलिटी बेस काय काय आहे, तुमचा जमा आणि खर्च किती आहे हे लक्षात घेऊन फी ठरविण्याचा अधिकार सुप्रीम कोर्टाने ठरविला आहे आणि तो 11 जज्जेसच्या बेंचने दिलेला निर्णय असल्याने आणि त्यामध्ये इस्लामिक अॅकेडेमिक्सच्या केसमध्ये आणखी एका बेंचने निर्णय दिला असल्याने सुप्रीम कोर्टाला याबाबत विनंती करून काही मार्ग निघेल अशी परिस्थिती नाही. परंतु सुप्रीम कोर्टाने राज्य सरकारला या संदर्भात जे मार्गदर्शन केलेले आहे त्याबाबतीत काही बाजू आपल्याकडून आहेत. त्यामुळे सगळ्यांसाठी समान फी करायची म्हटले तरी काही ठिकाणी चांगल्या सवलती दिलेल्या असतात. शिवाय जिल्हा पातळी, राज्य पातळी आणि मेट्रोपोलिटीन सिटीज मधील कॉलेजेस आहेत या सगळ्यांची फी एक असू शकत नाही. त्यामुळे ही बाब आज तरी मान्य करता येणे शक्य नाही.

****

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : विदर्भात निधी अभावी 127 प्रकल्पांचे सर्वेक्षण अर्धवट असणे.

मु.शी. : विदर्भात निधी अभावी 127 प्रकल्पांचे सर्वेक्षण अर्धवट असणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, पाशा पटेल, प्रतापराव सोनवणे, मधुकर चव्हाण व श्रीकांत जोशी, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ. सुनील देशमुख (जलसंपदा राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, पाशा पटेल, प्रतापराव सोनवणे, मधुकर चव्हाण व श्रीकांत जोशी, यांनी "विदर्भात निधी अभावी 127 प्रकल्पांचे सर्वेक्षण अर्धवट असणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुसरून, आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

(यानंतर श्री. सरफरे ..... टीटी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शासनाने निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, मा. राज्यपालांनी दिलेल्या निदेशानुसार 5501 कोटींचा अनुशेष 15 डिसेंबर 2001 नंतरच्या 4 वर्षामध्ये पूर्ण करावयाचा होता. त्यापैकी फक्त 1952 कोटींचा अनुशेष दूर झाला आहे. गेल्या चार वर्षामध्ये 4 हजार 500 कोटी रुपये खर्च व्हावयास पाहिजे होते. त्यापैकी फक्त 1952 कोटींचा अनुशेष दूर केला. म्हणजे 2001 नंतर 4 वर्षानी 2005 पर्यंत तो अनुशेष दूर व्हावयास पाहिजे होता. परंतु 2007 पर्यंत त्यातील 1952 कोटींचा अनुशेष दूर झाला. म्हणजे 3 हजार 550 कोटींचा अनुशेष दूर व्हावयाचा आहे. मा. राज्यपालांनी दिलेल्या मुदतीमध्ये तो अनुशेष दूर झाला नाही. त्यामुळे अजून साडे तीन हजार कोटींचा अनुशेष शिल्लक आहे.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

शेवटच्या परिच्छेदामध्ये म्हटले आहे की, "विदर्भामध्ये एकूण 8 हजार 414 कोटींचे व 6.10 लक्ष हेक्टर सिंचन क्षमतेचे 144 प्रकल्प सर्वेक्षण ते प्रशासकीय मान्यता अशा विविध टप्प्यांवर आहेत." सभापती महोदय, हे अनुशेषाचे गुऱ्हाळ दहा ते पंधरा वर्षे चालणार आहे कां? परवाच्या दिवशी या सभागृहामध्ये औचित्याच्या मुद्दयाव्दारे हा विषय उपस्थित करण्यात आला होता त्यावेळी सांगण्यात आले की, दि. 13 मार्चच्या जी.आर. प्रमाणे प्रशासकीय मान्यतेचे अधिकार वित्त विभागाकडे दिले आहेत. याठिक्राणी उत्तर देतांना म्हटले आहे की, "अनुशेषाचा प्रश्न महत्वाचा असल्यामुळे अनुशेष असलेल्या जिल्हयातील सर्व प्रकारच्या पाअबंधारे प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जलसंपदा विभागाला देण्यात आले आहेत. अशाप्रकारे राज्यात शासन अनुशेष निर्मूलनासाठी सर्वतोपरी प्रयत्नशील असल्याचे दिसून येते. " यामधील खरे काय आहे? माननीय राज्यपालांनी निदेश देऊन सुध्दा साडे तीन हजार कोटींचा अनुशेष गेल्या चार वर्षामध्ये पूर्ण केला नाही. फक्त 1952 कोटींचा अनुशेष दूर केला. म्हणजे साडे तीन हजार कोटींचा अनुशेष अजून शिल्लक आहे. हा अनुशेष आपण केव्हा पूर्ण करणार? हे करीत असतांना आपण एका बाजूला वित्त व नियोजन विभागाने प्रशासकीय मान्यता दिली पाहिजे यासंबंधी जी.आर. काढता आणि दुसऱ्या बाजूला अशाप्रकारचे उत्तर देता. यामध्ये खरे काय आहे? हा अनुशेष केव्हा पूर्ण होणार आहे ते आपण सांगा?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे. विदर्भाचा शिल्लक राहिलेला अनुशेष 3 हजार 594 कोटींचा आहे. मा. राज्यपालांनी जे निदेश दिले त्याचे तंतोतंत पालन महाराष्ट्र शासन करीत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांना आपण खरे उत्तर देण्यास सांगावे. गेल्या चार वर्षामध्ये अनुशेष पूर्ण करण्यास सांगितले होते. तो न होण्याची कारणे काय?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, मधल्या काळात...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या निदेशाचे तंतोतंत पालन केले जाते असे सांगितले जात आहे. आणि दुसऱ्या बाजूला साडे तीन हजार कोटी रुपये खर्च न करता फक्त 1952 कोटी रुपये खर्च केले जातात. प्रकल्पांची कामे पूर्ण केली जात नाहीत. त्यामुळे मंत्रीमहोदयांनी दिलेले उत्तर दुरुस्त करण्यास आपण सांगावे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी सन 2001 साली जे निदेश दिले त्यांचे पालन झाले नाही ही गोष्ट खरी आहे. माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशानुसार या अर्थसंकल्पामध्ये ते पैसे धरले असते तर एकूण अर्थसंकल्पाचा आकार वाढला असता. त्याकरिता प्लॅनिंग कमिशनने परवानगी दिलेली नाही. म्हणून पहिल्या चार वर्षामधील निदेशाचे पालन बरोबर झ ाले नाही. परंतु या वर्षीपासून दिलेल्या निदेशानुसार अनुशेषाचे जे पैसे आहेत ते त्या त्या विभागासाठी वर्ग केले आहेत. त्यामुळे त्यांच्या पूर्ण निदेशाचे पालन या वर्षापासून झाले आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, नियम 93 च्या सूचनेमध्ये स्पष्ट म्हटले आहे की, "विदर्भात ज्या 127 प्रकल्पांच्या सर्वेक्षणाचे काम सुरु आहेत त्यात सर्वाधिक 24 प्रकल्प अमरावती व अकोला जिल्हयातील असून या प्रकल्पांची किंमत 227 कोटी रुपये आहे" ही गोष्ट खरी आहे की, देशामध्ये जे 31 जिल्हे अनुशेषामध्ये निघाले आहेत, त्यामध्ये निवेदनात म्हटल्याप्रमाणे महाराष्ट्रातील 6 जिल्हे आहेत. त्यामध्ये अतिशय मागासलेले असलेले शेतीच्या, उपजीविकेच्या साधनांवर अतिशय ताण असलेल्या जिल्हयांमध्ये नंबर 1 वर अमरावती व नंबर 2 वर अकोला जिल्हा आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख (पुढे सुरू..

महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यानंतर आजतागायत अनुशेष कायम आहे. शासनाने आपल्या निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, "रुपये 2169 कोटीचे व 93989 हेक्टर सिंचन क्षमतेचे 23 प्रकल्प सद्य:स्थितीत सर्वेक्षणाधीन आहेत." यासाठी विशेष यंत्रणा आणि विशेष मनुष्यबळ द्यावे. दुसरे असे की, अनुशेषाच्याबाबतीत हे जिल्ह्ये मेरिटमध्ये आलेले आहेत. या जिल्ह्यातील सर्वेक्षण पूर्ण करून त्यास प्रशासकीय मान्यतेच्या बाबतीतील कार्यवाही एक महिन्यात, दोन महिन्यात, तीन महिन्यात किंवा चार महिन्याच्या कालावधीत करणार आहात काय ? या बाबतीत अधिकाऱ्यांवर जबाबदारी सोपवून इतक्या कालावधीमध्ये सर्वेक्षण पूर्ण करून, प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केले पाहिजेत असे आदेश दिले जातील काय ?

डॉ.सुनील देशमुख : विदर्भातील अनुशेष दूर करण्याची आवश्यकता विचारात घेऊन पाटबंधारे प्रकल्प अनुशेष मंडळ सुरु केलेले आहे. ते महामंडळ कित्येक वर्षापासून बंद होते ते दोन वर्षापासून सुरू केलेले आहे. तसेच नुकतेच अकोला, वाशिम जिल्ह्याचा अनुशेष पहाता नवीन डिव्हीजन दिलेले आहे. त्या माध्यमातून अन्वेषणाचे काम सुरू आहे. त्याचबरोबर पाटबंधारे विभागामार्फतही सर्वेक्षणाचे काम करणार आहोत. त्यामुळे कमीत कमी कालावधीमध्ये सर्वेक्षण होईल आणि चार वर्षामध्ये सर्व अनुशेष पूर्ण करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा प्रश्न अनुत्तरित राहिलेला आहे. 13 तारखेला जी.आर. बदलण्याच्या संदर्भात दोन-तीन दिवसात निर्णय करू, असे सांगितले होते. अनुशेषाचे 1800 कोटी रुपये विदर्भाला दिलेले आहेत, ते खर्च करावयाचे असतील तर 13 तारखेला दोन-तीन दिवसात जी.आर.बदलण्याचे कबूल केलेले होते, परंतु तसे काही झालेले नाही. प्रशासकीय मान्यतेचे अधिकार महामंडळाला नसतील तर त्याचा काही उपयोग नाही. त्यामुळे जी.आर.मध्ये दुरुस्ती करणार आहात काय ?

डॉ.सुनील देशमुख : या विषयावरील निवेदन उद्या करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : पाटबंधारे क्षेत्रासाठी निधी वाटपाच्या संदर्भात माननीयराज्यपालांनी दिलेल्या निदेशाचे पालन न होणे.

मु. शी. : पाटबंधारे क्षेत्रासाठी निधी वाटपाच्या संदर्भात माननीयराज्यपालांनी दिलेल्या निदेशाचे पालन न होणे याबाबत श्री.नितीन गडकरी वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ.सुनील देशमुख (पाटबंधारे राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी "पाटबंधारे क्षेत्रासाठी निधी वाटपाच्या संदर्भात माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशाचे पालन न होणे ", या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

(माननीय सदस्य अनुपस्थित)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

लक्षवेधी सूचना क्रमांक 1 संबंधी

उपसभापती : लक्षवेधी क्रमांक 1 च्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी सासरे आजारी असल्यामुळे लक्षवेधी सूचना पुढे घेण्यात यावी, अशी विनंती केलेली आहे. त्यांच्या विनंतीनुसार ही लक्षवेधी सूचना पुढे घेण्यात येईल.

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : ठाणे जिल्ह्यातील पालघर व डहाणू तालुक्यातील समुद्र किनाऱ्यातून बेकायदेशीररित्या रेतीची होत असलेली चोरी.

मु. शी. : ठाणे जिल्ह्यातील पालघर व डहाणू तालुक्यातील समुद्र किनाऱ्यातून बेकायदेशीररित्या रेतीची होत असलेली चोरी यासंबंधी सर्वश्री सय्यद पाशा पटेल, संजय केळकर, मधुकर चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील चिंचणी, दांडेपाडा, वरोरा, वाढवण, गुंगवाडे, धाकटी डहाणू, मोठे डहाणू, आगर, चिखला व नरपड तसेच पालघर तालुक्यातील घिवली, कांबोडे, तारापूर, उच्छेळी, दांडी, नावापूर, आलेवाडी, नांदगाव, मुरबे, सातपाटी व शिरगाव येथील समुद्र किनाऱ्यातून राजरोसपणे बेकायदेशीररित्या रेतीची होत असलेली चोरी व त्यामुळे समुद्र किनाऱ्याचे होत असलेले उत्खनन, नुकत्याच चिंचणी येथे मंडळ अधिकाऱ्यांच्या धाडीत बेकायदेशीरित्या रेती काढून विकणाऱ्या नऊ बैलगाडी धारकांना 9000/- रुपयांचा करण्यात आलेला दंड आणि माहे फेब्रुवारी, 2007 रोजी व तत्पूर्वी अनधिकृत रेती उपसा करणाऱ्या तसेच महसूल बुडवून रेती पुरवठा करणाऱ्या एका ठेकेदाराकडून 54,336/- रुपयांचा तहसिलदार, डहाणू यांनी ठोठावलेला दंड, घिवली गावातील सदरहू समुद्र किनाऱ्यापट्टीतून राजरोसपणे बेकायदेशिररित्या रेतीचे उत्तखन होत असल्यामुळे ग्रामपंचायत योजनेतून बांधण्यात आलेली स्मशान भूमी व विश्रामगृह जमीनदोस्त होणे, त्या बेकायदेशीर कृत्यास पायबंद न घातल्यास भविष्यात सदरहू गावांना सुनामी लाटांचा तडाखा बसण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर शासनाने बंदी घालण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

6....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

श्री.संजय केळकर : ठाणे जिल्ह्यात डोंगर पोखरण्याचे काम चालू आहे, तसेच रेतीचे बेकायदेशीर उत्खनन करण्याचे काम राजरोसपणे चालू आहे. विशेष करून पालघर आणि डहाणू तालुक्यातील समुद्र किनाऱ्यावर बेकायदेशीर रेती काढण्याचे काम चालू असल्यामुळे हा विषय लक्षवेधीच्या माध्यमातून उपस्थित केलेला आहे. या संदर्भाने आपण दंडात्मक कारवाई केली. 9 बैलगाड्यांना एकेक हजार रूपये दंड केलेला आहे. पण हे छोटे मासे आहेत. परंतु पहाटे 2-00 ते 5-00 वाजण्याच्या सुमारास अंधारामध्ये बेकायदेशीरपणे रेतीचे उत्खनन तेथील अधिकाऱ्यांच्या संगनमताने केले जात आहे. या संदर्भाने संबंधित अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करणार आहात काय ?

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ....

सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, पालघर तालुक्यामध्ये कोणत्याही प्रकारे बेकायदेशीर रेतीचे उत्खनन झालेले नाही. परंतु पालघर तालुक्यामध्ये घिवली या गावी बेकायदेशीरपणे रेतीचे उत्खनन झाल्यामुळे तेथील ग्रामपंचायत योजनेतील स्मशानभूमी किंवा जे विश्रामगृह बांधलेले होते ते जमीनदोस्त झालेले आहे, हे खरे आहे काय ? निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, डहाणू तालुक्यात 2 लाख 93 हजार एवढी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. पालघर तालुक्यामध्ये कोणत्याही प्रकारे दंड वसूल करण्यात आलेला नाही. पालघर तालुक्यामध्ये कोणत्या काळासाठी हा दंड वसूल करण्यात आलेला नाही ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील डहाणू आणि पालघर तालुक्यात बेकायदेशीर रेती काढल्यासंबंधीची ही लक्षवेधी सूचना आहे. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर साहेबांनी सांगितले की, ठाणे जिल्ह्यामध्ये किंवा महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीरपणे रेती काढली जाते. मी सांगू इच्छितो की, डहाणू तालुक्यात ज्यांनी बेकायदेशीरपणे रेती काढली त्याबाबतचे संपूर्ण उत्तर निवेदनामध्ये दिलेले आहे. एकूण 2 लाख 93 हजार रुपये एवढी दंडात्मक रक्कम वसूल केलेली आहे. पालघर तालुक्यामध्ये कोणत्याही प्रकारे बेकायदेशीर रेती काढण्याचा प्रकार घडला नाही. परंतु त्या ठिकाणी परवानगी घेऊन जी रेती काढली त्याची 3 लाख 31 हजार रुपये एवढी रक्कम सरकारला मिळालेली आहे. सन्माननीय सदस्यांनी तिसरा प्रश्न पालघर तालुक्यातील घिवली या गावी रेती काढण्यात आल्यामुळे तेथील विश्रामगृह आणि स्मशानभूमी वाहून गेली याबाबत विचारला. तशी वस्तुस्थिती नसल्याचे निवेदनात सांगितलेले आहे. मला आपल्याला सांगावयाचे आहे की, घिवलीमध्ये कोणत्याही प्रकारे रेती काढण्यात आली नाही. त्या ठिकाणी विश्रामगृह नसून स्मशानभूमी आहे. त्या ठिकाणी स्मशानभूमीत आलेल्या लोकांसाठी शेड होती. ती शेड लाटांमुळे वाहून गेली. रेती काढल्यामुळे त्या ठिकाणची स्मशानभूमी किंवा शेड वाहून गेलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे. डहाणू तालुक्यातील भाग इको सेन्सिटिव असल्यामुळे त्या ठिकाणी 1991 पासून रेती काढण्यास मनाई आहे. त्या ठिकाणी चोरटी रेती काढण्याचे जे प्रकार घडतात त्याबाबत शासनातर्फे कारवाई केली जाते. त्या कारवाईमध्ये 2 लाख 93 हजार रुपये जमा झाले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/

श्री. नारायण राणे .....

त्या ठिकाणी बैलगाडीतून म्हणजे छोट्या प्रमाणामध्ये रेती काढली जाते. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर म्हणजे ड्रेजरने वगैरे रेती काढली जात नाही. परंतु सन्माननीय सदस्य ठाणे जिल्ह्यातील असल्यामुळे सन्माननीय सदस्य जी वस्तुस्थिती सांगत आहेत ती ग्राह्य मानून त्या ठिकाणी गस्त घालण्याचे काम केले जाईल आणि जर तशी वस्तुस्थिती असेल, त्या ठिकाणी ड्रेजरने किंवा बेकायदेशीर रेती काढली जात असेल तर त्यांना अटक करुन दंडात्मक, फौजदारी केसेस दाखल केल्या जातील.

श्री. संजय केळकर : पालघर तालुक्याच्या बाबतीत या ठिकाणी उत्तर दिलेले आहे. त्या ठिकाणी बेकायदेशीरपणे रेती काढली जाते. ड्रेजरच्या माध्यमातून नाही पण ठेकेदार रात्रीच्या काळात उत्खनन करुन त्या ठिकाणाहून ट्रकच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणवर रेती नेली जाते. या दोन्ही तालुक्यांमध्ये किंबहुना या किनारपट्टीवर आपण जी गस्त वाढविणार आहात त्याचे आम्ही निश्चितपणे स्वागत करतो. हे जे बेकायदेशीरपणे रेती काढण्याचे काम चालू आहे त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची तरतूद आहे की नाही ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, त्या ठिकाणी दहा ते बारा घमेले रेती राहील अशा बैलगाडीतून छोट्या प्रमाणात रेती काढण्याचे काम स्थानिक लोक करीत आहेत. आपल्याला माहीत आहे की, तो विभाग इको सेन्सिटिव असल्यामुळे 1991 पासून त्या ठिकाणी रेती काढण्यावर बंदी आहे.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नारायण राणे...)

तेथील स्थानिक लोकांना घरदुरुस्तीसाठी किंवा अन्य कामासाठी रेती उपलब्ध होत नाही. ती रेती त्यांना पालघर आणि अन्य ठिकाणाहून आणावी लागते. जे रेती चोरतात त्यांना शासन शोधून काढून त्यांच्या कारवाई करीत असते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : घरकामगारांसाठी घरकामगार मंडळ स्थापन करण्याचे मुख्यमंत्र्यांनी दिलेले आश्वासन

मु. शी : घरकामगारांसाठी घरकामगार मंडळ स्थापन करण्याचे मुख्यमंत्र्यांनी दिलेले आश्वासन यासंबंधी सर्वश्री सय्यद कमरुझ जामा, संजय दत्त, रमेश निकोसे, धोंडीराम राठोड, प्रा. शरद पाटील, सर्वश्री. गोविंदराव आदिक व जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

प्रा. शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात घर कामगारांच्या हक्कासाठी कोणताच ठोस कायदा वा नियम नसल्यामुळे घर कामगार, मोलकरीण यांना मिळणारे लाभ, सेवा सुविधांपासून वंचित राहावे लागत असणे, अल्पवयीन घर कामगार व घर कामगारांवर मालकांकडून होणाऱ्या अन्यायाने कामगारांमध्ये पसरत असलेला असंतोष व त्यातून घडत असलेले गुन्हे व दुर्घटनेचे प्रकार, या घरकामगारांना व मोलकरीण यांना हक्कांच्या सेवा सुविधा मिळण्यासाठी विदर्भ मोलकरीण संघटनेच्या वतीने हिवाळी अधिवेशन २००६ च्या वेळी दिनांक १५ डिसेंबर, २००६ रोजी काढण्यात आलेल्या मोर्चाच्या वेळी मुख्यमंत्री यांनी घरकामगार मंडळ स्थापन करण्याबाबत दिलेले आश्वासन, याबाबत राज्य शासनाने घर कामगार मंडळ स्थापन करुन त्यानुसार घरकामगारांना न्याय देण्यासाठी करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. गणेश नाईक (कामगार मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.) ..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, या लक्षवेधीच्या वितरित करण्यात आलेल्या निवेदनामध्ये प्रा. शरद पाटील, श्री. गोविंदराव आदिक आणि श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. अशी तीन नावे वगळण्यात आलेली आहेत. या तिन्ही नावांचा निवेदनामध्ये समावेश करावा अशी माझी आपणास विनंती आहे.

उपसभापती : ठीक आहे.

प्रा. शरद पाटील : घरेलू कामगारांना संरक्षण आणि सेवासुविधा पुरविण्याच्या बाबतीतील विधेयक शासनाने विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहामध्ये आणून कायदा करण्याची आवश्यकता आहे. निवेदनामध्ये असे नमूद केलेले आहे की, "माननीय मंत्री (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली दि.21.2.2006 रोजी बैठक घेण्यात आली व सदर बैठकीत कामगार आयुक्तांना 1 महिन्याच्या आत सर्व संबंधितांशी चर्चा करुन मसुदा विधेयक शासनास सादर करण्याचे निदेश देण्यात आले. त्यानुषंगाने विधेयकाचा मसुदा तयार करण्यात आला असून तो मंत्रिमंडळासमोर ठेवण्याची कार्यवाही सुरु आहे." हे विधेयक खरोखर तयार झालेले आहे काय ? मंत्रिमंडळासमोर विधेयकाचा मसुदा ठेवण्यात आलेला आहे काय ? नसल्यास, हा मसुदा केव्हा ठेवण्यात येईल ? या संबंधातील विधेयक दोन्ही सभागृहामध्ये केव्हा आणले जाईल ?

श्री. गणेश नाईक : घरकाम करणा-या महिला आणि घरगडी यांच्या संबंधातील हा प्रश्न आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे असंघटित कामगांराचे नेतृत्व करणा-या संघटनांनी माननीय मुख्यमंत्र्यांनी भेट घेतली. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी "शासन निश्चितपणे विचार करील" असा शब्द दिला होता. माथाडी कामगार कायद्याच्या धर्तीवर घरेलू कामगारांना सेवा सुविधा देण्यासंबंधीच्या विधेयकाचा मसुदा मंत्री मंडळासमोर मांडण्यात यावा असे मुख्य सचिवांना निदेश दिलेले होते. त्याप्रमाणे 20 ऑक्टोबर 2006 रोजी माननीय मुख्यमंत्री महोदयांपुढे या विषयाचे सादरीकरण करुन घ्यावे अशा प्रकारचे निदेश देण्यात आले होते. परंतु जिल्हा परिषदा, महानगरपालिका यांच्या निवडणुका आणि त्यानंतरचे अधिवेशन यामुळे सादरीकरणाची बाब राहिलेली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांकडे सादरीकरण केल्यानंतर मंत्रिमंडळासमोर हा विषय चर्चिला येऊन त्यावर अंतिम निर्णय घेतला जाईल.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शरद पाटील : या विषयासंबंधीचे विधेयक दोन्ही सभागृहामध्ये लवकरात लवकर आणून त्याचे कायद्यात रुपांतर करण्यात येणार आहे काय ?

श्री. गणेश नाईक : अशा कायद्याचे फार मोठे दूरगामी परिणाम होणार आहेत. म्हणून याबाबतीत सांगोपाग चर्चा होऊन निर्णय घेण्याची गरज आहे. सर्वांना विश्वासात घेऊन याबाबतीत लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : दिनांक 10.8.2000 रोजीचा शासन निर्णय सर्व शहरांना लागू आहे काय ?

श्री. गणेश नाईक : मुंबई, ठाणे, पुणे व नागपूर या प्रमुख शहरांसाठी नियमावली तयार केली होती. त्या नियमावलीचे कायद्यात रुपांतर झालेले नाही.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-3.....

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, जनश्री विमा योजना या कामगारांना लागू केली आहे, त्या अंतर्गत महाराष्ट्रातील किती कामगारांचा या योजनेमध्ये समावेश केला आहे? या विमा योजनेचा फायदा घेण्यासाठी साधारणपणे कोणकोणती कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावी लागतात?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, जनश्री विमा योजना प्रामुख्याने असंघटित कामगारांसाठी लागू केली आहे. त्यामध्ये नाका कामगार, घरेलू कामगार, बांधकाम मजूर अशा प्रकारचे जवळपास 100 घटक या योजनेमध्ये समाविष्ट केलेले आहेत. या योजनेमध्ये केंद्र शासनाचे 100 रुपये, राज्य शासनाचे 50 रुपये आणि त्या घटकाचे 50 रुपये भरण्यात येतात. सन्माननीय सदस्य श्री.जगदीश गुप्ता यांनी विचारलेली माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नाही, ती निश्चितपणे पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी आता जे उत्तर दिले ते अत्यंत महत्वाचे आहे. परंतु निवेदन ज्या अधिकाऱ्यांनी तयार केले आहे त्याचे स्वरुप आशावादी किंवा किर्तन सांगण्यासारखे केलेले आहे. निवेदनामध्ये म्हटले आहे की, "घरेलू कामगारांस औषधोपचारासाठी कमीत कमी ठराविक रक्कम मालकांनी द्यावी किंवा त्यांच्या औषध पाण्याचा खर्च करावा. प्रत्येक मालकाने आपल्या घरगड्याला किंवा मोलकरणीला ताबडतोबीने त्यांच्या पगारात काही वाढ देण्याचा विचार करावा." हा काय आदर्शवाद आणि आशावाद दाखविला आहे? मंत्रीमहोदयांनी सांगितल्याप्रमाणे या संदर्भातील विधेयक अत्यंत दूरगामी परिणाम करणारे असल्यामुळे सर्वंकष विचार करावा लागणार आहे. हे कायदेमंडळ आहे. कायदे करताना सभागृह गांभीर्याने विचार करीत असते. या सभागृहाला उत्तर देत असताना गांभीर्याने विचार केला पाहिजे. ही बाब इच्छा व्यक्त करण्यासारखी आहे का? इच्छा व्यक्त करुन राज्य चालत नाही. निर्णय घेण्याने राज्य चालते. सभापती महोदय, भारतीय मजदूर संघटनेने या कामगारांची संघटना केली आहे. घरेलू कामगार एका घरात तीन महिने काम करतात, चार महिने काम करतात, त्यादृष्टीने नियमावली तयार केली पाहिजे. ती नियमावली लवकरात लवकर करणार आहात का?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी महत्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. मॅण्डेटरी ठेवण्यासारखी ही बाब आहे. निश्चित स्वरुपाची चौकट नाही. चौकट नाही त्यामुळे बंधन रहात नाही. म्हणूनच मघाशी म्हटल्याप्रमाणे दूरगामी परिणाम निश्चितपणे होणार

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक.....

आहे. घरेलू काम करणाऱ्या घरगडी व मोलकरणीला वर्षातून 15 दिवसाची भरपगारी रजा, बोनस द्यावा असे अपेक्षित आहे. अलिकडे काम करणाऱ्या लोकांकडेच मोलकरणी काम करीत आहेत. या सर्व बाबी लक्षात घेऊन समाजाच्या स्ट्रक्चरला कशा गोष्टी परवडतील याचा सांगोपांग विचार करणे आवश्यक आहे. कायद्यात रुपांतर केल्यानंतर ते बंधनकारक होईल. अशा स्वरुपाचा कोणता कायदा असावा याचा विचार होणे आवश्यक आहे. मालक म्हणजे कंपनीचा मालक नव्हे तर घराचा मालक, त्याला हे सगळे परवडेल किंवा नाही याचा विचार केल्यानंतर कायद्यात रुपांतर केले जाईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, निवेदनाद्वारे मंत्रीमहोदयांनी जे उत्तर दिले आहे त्यातील अनुक्रमांक 1 ते 5 वरील मुद्दे काळजी करण्यासारखे आहेत. मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, ज्या 1 ते 5 योजना मांडल्या आहेत, त्या मांडताना कोणत्याही गोष्टीचा शासनाने विचार केलेला दिसत नाही. घरेलू कामगार दिवसातून एक ते दोन तास काम करतात आणि आपापल्या घरी जातात. ते एकाच घरात काम करीत नाहीत. एका दिवसात 5 घरात, 10 घरात सुध्दा काम करतात. तितक्या घरातील मालकांचा या प्रश्नाशी संबंध येतो. या सगळयाचा एकत्रित विचार करुन उत्तर दिले पाहिजे. हे निवेदन कोणी तयार केले? मंत्रीमहोदयांनी निश्चितपणे केलेले नाही. ज्या सचिवांनी उत्तर तयार केले त्यांना तरी या मुद्यांचा अर्थ कळतो का? म्हणून माझी मंत्रीमहोदयांना एकच विनंती आहे, निवेदनामध्ये जे पाच मुद्दे नमूद केलेले आहेत त्यातील पहिल्या मुद्यामध्ये म्हटल्याप्रमाणे, प्रत्येक मालकाने आपल्या घरेलू कामगाराला आठवडयातून एक दिवस सुट्टी द्यावी व ज्यांना अशा प्रकारे साप्ताहिक सुट्टी देणे शक्य नसेल तर त्यांनी त्या दिवसाचा जादा पगार आपल्या कामगारांना द्यावा.

(नंतर श्री.जुन्नरे....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

माहिती देणा-यांना आपण रशियावरुन आणले आहे की, अजून कोठून आणलेले आहे ते समजत नाही. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात म्हटले आहे की, 1) प्रत्येक मालकाने आपल्या घरेलू कामगाराला आठवडयातून एक दिवस सुट्टी द्यावी व ज्यांना अशा प्रकारे साप्ताहिक सुट्टी देणे शक्य नसेल त्यांनी त्या दिवसाचा जादा पगार आपल्या कामगाराला द्यावा. 2) पूर्ण वेळ काम करणा-या घरेलू कामगाराला वर्षातून एकदा स्वत:च्या गावी जाता योवे यासाठी 15 दिवसांची पगारी रजा मिळण्याची घरेलू कामगारांची अपेक्षा मालकांनी पूर्ण करावी व यासाठी या घरेलु कामगाराला प्रवास खर्चासाठी म्हणून काही रक्कम मालकांनी द्यावी. 3) किमान एक वर्ष सेवा झाली असेल तर दिवाळीच्या वेळी मालकांनी घरेलू कामगारास एक महिन्याचे वेतन सानुग्रह अनुदान म्हणून द्यावे. 4) घेरलु कामगारास औषधोपचारासाठी कमीत कमी ठराविक रक्कम मालकांनी द्यावी किंवा त्यांचा औषध पाण्याचा खर्च करावा. 5) प्रत्येक मालकाने आपल्या घरगडयाला किंवा मोलकरणीला ताबडतोबीने त्यांच्या पगारात काही वाढ देण्याचा विचार करावा.

सभापती महोदय, या सर्व गोष्टी शासनास मान्य आहेत असा त्याचा अर्थ होतो. निवेदन तयार करतांना अधिका-यांनी काहीच विचार केलेला दिसत नाही त्यामुळे यासंदर्भातील गंभीर गोष्टीची शासनाने दखल घ्यावी. यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भातील सुधारित उत्तर हे अधिवेशन संपण्यापूर्वी करण्यात येईल तसेच यापूर्वी माननीय मंत्रीमहोदयांनी जे उत्तर दिलेले आहे ते विचारात घेऊ नये असे सांगितले तर मी माननीय मंत्रीमहोदयांचा आभारी राहीन. घरकामगारांना न्याय मिळालाच पाहिजे परंतु जे घरकामगारांना कामावर ठेवतात अशा मालकांवर अन्याय होणार नाही असे उत्तर माननीय मंत्री महोदय देतील काय?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, या ठिकाणी ज्या बाबी दिलेल्या आहेत त्या बाबी प्रशासनाने सुचवलेल्या आहेत. या ठिकाणी ज्या बाबी सुचवलेल्या आहेत त्यासंदर्भात मंत्रिमंडळाचे किंवा शासनाचे ते अंतिम मत नाही. प्रशासनाने सूचविलेल्या उपायांबाबत घरगडयांना किंवा मोलकरणींना तक्रार केली तर सहा महिन्याची शिक्षा प्रस्तावित केलेली आहे. परंतु अशा गोष्टीचा दूरगामी परिणाम होणार नाही, ही बाब शासनाने मान्य केलेली नाही. या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांसमोर मसुदा सादरीकरण किंवा मंत्रिमंडळाचे मत व्यक्त करण्यात आलेले नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक....

ज्यावेळेस यासंदर्भात मंत्रिमंडळाचा निर्णय होईल तेव्हा त्याचे कायद्यात रुपांतर करतांना यातील अटी बाधक ठरणार नाही तसेच कामगारांनी केलेल्या कष्टाचे फळ कामगारांना मिळेल अशा प्रकारे समन्वय साधला जाईल. एकाला न्याय द्यावयाचा आणि हा न्याय देत असतांना दुस-यावर अन्याय होईल याची शासन काळजी घेईल.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : सिंधुदुर्ग जिल्हयातील कृषि विभागामार्फत होणारी कामे निवडतांना ग्रामस्थांना विश्वासात न घेणे.

मु. शी. : सिंधुदुर्ग जिल्हयातील कृषि विभागामार्फत होणारी कामे निवडतांना ग्रामस्थांना विश्वासात न घेणे यासंबंधी श्री परशुराम उपरकर , वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंधारण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सिंधुदूर्ग जिल्ह्यातील कृषि विभागामार्फत होणारी कामे निवडतांना ग्रामस्थांना कोणत्याही प्रकारे विश्वासात न घेता, तसेच एकात्मिक पाणलोट विकास 1996 शासन निर्णयाची अंमलबजावणी न करता व त्यात लोकांचा सहभाग न घेता परस्पर कृषि विभागाचे अधिकारी मशिनच्या साह्याने नाला बांध, शेततळी, अशी विविध कामे करीत असल्याचे नुकतेच उघडकीस येणे, कृषि विभागात होत असलेल्या भ्रष्टाचाराकडे शासनाचे होत असलेले जाणिवपूर्वक दुर्लक्ष, याबाबत स्थानिक गावातील ग्रामस्थांनी तक्रारी करुनही त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत तात्काळ चौकशी होण्याची आवश्यकता, चौकशीनुसार दोषी अधिकाऱ्यांवर कडक कार्यवाही करण्याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री. राजेश टोपे (जलसंधारण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात जे निवेदन करण्यात आलेले आहे ते पूर्णपणे चुकीचे आहे. माननीय मंत्रीमहोदयांना निवेदनात दुरुस्ती करावयाची असेल तर ती त्यांनी करावी. मी जिल्हा परिषदेचा सदस्य असतांना, स्थायी समितीमध्ये असतांना, जलसंधारण समिती मध्ये असतांना दिनांक 30 जानेवारी 1996 च्या शासन निर्णयास आधीन राहून त्या प्रमाणे जिल्हयातील कृषी अधिकारी कामे करीत नाहीत, तसेच ही कामे लोकसहभागातून केली जात नाही यासंदर्भात वारंवार तक्रारी केल्या होत्या. जलगंगेची कमिटी गावागावात अस्तित्वात नसतेच. कृषी अधिकारी मार्च महिन्याच्या अखेर मशिनच्या सहाय्याने कामे करुन मोठया प्रमाणात भ्रष्टाचार करीत असतात यासंदर्भात मी वारंवार सूचना केलेल्या आहेत. मी सन 2003-2004 मध्ये जिल्हा परिषदेचा सदस्य असतांना यासंदर्भात वारंवार प्रश्न उपस्थित केले होते तसेच आमदार झ ाल्यानंतर या संदर्भात मला लक्षवेधी सूचना उपस्थित करावी लागलेली आहे. यासंदर्भात शासनाने सन 2007 मध्ये कार्यवाही करुन 2.29 लक्ष रुपये जमा करण्यात आलेले आहेत अशी माहिती दिलेली आहे. ही जी रक्कम जमा करण्यात आलेली आहे त्यावरुन या ठिकाणी भ्रष्टाचार होतो हे सिध्द झालेले आहे. अधिका-यांनी जिल्हा परिषदेच्या सभागृहात येऊन माहिती देण्यास टाळाटाळ केलेली होती. त्यामुळे ज्या अधिका-यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली तसेच ज्या अधिका-यांनी या कामात भ्रष्टाचार केलेला अशा अधिका-यांवर आपण कोणती कारवाई करणार आहात?

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर.....

जे कृषि अधिकारी आहेत त्यांच्या अनेक ठिकाणी बागा आहेत. परंतु त्यांनी त्या दुसऱ्यांच्या नावावर दाखविलेल्या आहेत. शासनाच्या निधीचा गैरवापर करुन त्यांनी ही सर्व माया जमविली आहे. तेव्हा या अधिकाऱ्यांची लाचलुचपत विभागामार्फत चौकशी करण्यात येईल काय ? मी सांगितलेल्या कामांमध्ये भ्रष्टाचार झालेला आहेच तेव्हा इतर कामांमध्ये या अधिकाऱ्यांनी किती भ्रष्टाचार केला त्यासंदर्भात शासन चौकशी करणार काय ? सन 2003-04 मध्ये करुळगाव आणि शिरवळ गाव या दोन गांवामध्ये जवळपास 20 कि.मी.चे अंतर आहे. त्या ठिकाणी एकाच नावाचे 25 मजूर आढळून आले. यासंबंधी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात येऊन बोगस मस्टर सील करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली होती. परंतु त्या बाबतीत अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई झालेली नाही. तेव्हा या संदर्भातील माहिती मंत्रिमहोदय देतील काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपकर यांनी विचारलेल्या लक्षवेधी सूचनेमध्ये हा विषय नाही. तरी देखील त्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर मी देतो. सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर हे जिल्हापरिषदेचे सदस्य होते त्यावेळी त्यांनी एकाच नावाच्या व्यक्ती काम करीत असल्याबाबतची तक्रार केली होती ही वस्तुस्थिती आहे. या संदर्भात चौकशी करण्यासाठी दिनांक 1.9.2004 रोजी पाच पथके नेमण्यात आली. त्या पथकांकडून दिनांक 6 फेब्रुवारी 2007 रोजी अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यावर्षी झालेल्या नाला बांधणीच्या 43 कामांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी 18 कामांमध्ये मोजमाप कमी आढळले. वसूल प्राप्त रक्कम रुपये 2 लाख 39 हजार पैकी 2 लाख 6 हजार रुपये वसूल करण्यात आलेले आहेत. या प्रकरणी एकूण 16 अधिकारी दोषी आढळले. त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 10 व 8 नुसार कारवाई करण्यात आलेली आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या प्रकरणात 16 अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केला हे शासन मान्य करते. असे असताना शासन त्यांच्यावर कठोर कारवाई का करीत नाही जेणेकरुन भविष्यात कोणताही अधिकारी अशाप्रकारचे कृत्य करण्यास धजावणार नाही. तेव्हा 16 भ्रष्ट अधिकाऱ्यांवर शासन कठोर कारवाई करणार काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, ज्या 16 अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केला त्यापैकी 6 अधिकाऱ्यांची डी.ई.सुरु केलेली आहे. 10 अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 10 नुसार कारवाई केली जाईल. डी.ई.चा अहवाल तीन महिन्यात देण्याबाबत सांगण्यात आले आहे. डी.ई.अहवालात जी कारवाई सूचविली असेल त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, शासनाची उदासीनता किती आहे हे या प्रकरणावरुन दिसून येते. या प्रकरणाची चौकशी करण्याकरिता सप्टेंबर 2004 मध्ये पथके नेमण्यात आली आणि त्या पथकांचा अहवाल फेब्रुवारी 2007 मध्ये प्राप्त झालेला आहे. याचा अर्थ सन्माननीय सदस्यांनी या प्रश्नाबाबत पाठपुरावा केल्यानंतर लक्षवेधी सूचना दिल्यानंतर अहवाल प्राप्त झालेला आहे. तेव्हा माझा प्रश्न आहे की, शासन या 16 भ्रष्ट अधिकाऱ्यांना निलंबित करणार काय ?

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ....

याठिकाणी प्रचंड मोठया प्रमाणावर पैशांचा अपहार झालेला आहे. आणखी एका गोष्टीचा उल्लेख मी याठिकाणी करु इच्छितो. माननीय सरपोतदार साहेब हे याठिकाणी सातत्याने उत्तराचे दाखले देत असतात. याठिकाणी लेखी निवेदनात असे म्हटले आहे की, "सदर कामे मजुरांकडून करुन घेण्यात येत असून मशिनच्या सहाय्याने करण्यात येत नाहीत. मशिनच्या सहाय्याने सदरची कामे करण्यात येत असल्याचे जानेवारी, 2007 मध्ये निदर्शनास आलेले नाही. तसेच याबाबत गावातील ग्रामस्थांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत." याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी स्वत: तक्रार केलेली आहे. मग, चौकशी प्राप्त नाही असे का म्हणता ? अशाप्रकारे ज्या अधिकाऱ्याने माननीय मंत्री महोदयांना चुकीची माहिती दिलेली आहे, त्या अधिकाऱ्यांवरही कारवाई होणार का ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी माझ्या लक्षवेधी सूचनेवरील उत्तरामध्ये स्पष्टपणे सांगितले आहे की, सन 2003-04 मध्ये सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर ज्यावेळी जिल्हा परिषदेचे सदस्य होते, त्यावेळी त्यांनी तक्रार केली होती व त्या तक्रारीची चौकशी होऊन जो रिपोर्ट आलेला आहे, त्यासंबंधी मी याठिकाणी स्पष्टपणे माहिती दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्यावेळी तक्रार केली, त्यासंबंधी 2007 मध्ये उघडकीस आलेले आहे. त्यानंतर सन सन 2004-05 व 2005-06 या वर्षामध्ये कुठल्याही प्रकारची तक्रार आमच्या कुठल्याही विभागाला प्राप्त झालेली नाही वा जिल्हाधिकाऱ्यांनाही प्राप्त झालेली नाही. सन 2003-04 मध्ये माननीय सदस्यांनी तक्रार केली होती, त्यासंदर्भात चौकशी होऊन त्यानुषंगाने 5 पथके नेमण्यात आली व त्यांच्या अहवालाप्रमाणे त्यामध्ये 16 लोक प्रथमदर्शनी दोषी आढळून आले. त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) या माध्यमातून 10 लोकांवर नियम 10 अन्वये व 6 लोकांवर नियम 8 अन्वये विभागीय चौकशी 3 महिन्यांमध्ये पूर्ण करण्यात येईल व त्या अहवालाच्या आधारे कारवाई करण्यात येईल. तसेच, नियम 10 अन्वये ज्या 10 लोकांवर कारवाई होणार आहे, ती एप्रिलअखेर करण्यात येईल. अशाप्रकारे एकूण 16 लोक प्रथमदर्शनी दोषी आढळलेले असल्याचे आम्ही मान्य केलेले आहे. याबाबतीत आपण चौकशीची कायदेशीर कारवाई सुरु केली असून याबाबतीत 3 महिन्यांच्या कार्यकाळात कारवाई करण्यात येईल. याठिकाणी मी परत सांगू इच्छितो की, चौकशीच्या रिपोर्टच्या अनुषंगाने जी उचित कारवाई असेल ती 100 टक्के केली जाईल. यामध्ये कुठल्याही प्रकारे कोणालाही पाठीशी घालण्याचा प्रयत्न होणार नाही. त्यामुळे दोन्ही नियमांच्या अनुषंगाने निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. (..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : माननीय मंत्री महोदय, मी आपले उत्तर अत्यंत बारकाईने ऐकत होतो. यामध्ये प्रथमदर्शनी जरी 16 लोक दोषी आढळून आले असले तरी त्यांना कामावर ठेऊन ही चौकशी नि:पक्षपातीपणे होईल की नाही याबाबत शंका आहे. याठिकाणी त्या दोषी 16 लोकांच्या निलंबनाची मागणी सन्माननीय सदस्यांनी केलेली आहे. जे दोषी आहेत त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवावे की जेणेकरुन त्याचा विपरित परिणाम होईल, अशाप्रकारची कृती आपल्याकडून होऊ नये, असे मला वाटते. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी दोषी अधिकाऱ्यांच्या निलंबनाची कारवाई मागितलेली आहे. त्यादृष्टीने याबाबतीत विपरित परिणाम होऊ नये म्हणून आपण कोणती उपाययोजना करणार आहात, ती माननीय मंत्री महोदयांनी सभागृहाला सांगावी.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी जे नियम 8 व 10 सांगितले ते बाबाआझमच्या जमान्यापासूनचे आहेत. परंतु आता भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढलेले आहे. याठिकाणी शासनाच्या लक्षात आले आहे की, जनतेच्या तिजोरीतील पैशाची लूट झालेली आहे. मग, त्या अधिकाऱ्यांना संरक्षण देण्याचे काम माननीय मंत्री महोदयांच्या माध्यमातून का होत आहे ? आम्हाला माननीय मंत्री महोदयांकडून अशी अपेक्षा नाही. याठिकाणी अधिकारी प्रथमदर्शनी दोषी असल्याचे सिध्द झालेले आहे, मग याचा अर्थ काय होतो ? सभापती महोदय, आता भ्रष्टाचाराचे प्रमाण फारच वाढलेले आहे, हे आपणही मान्य केलेले आहे. माननीय राजीव गांधी यांनीही सांगितले होते की, केंद्राकडून एक रुपया पाठवला तर त्यातील 90 पैसे हे गायब होतात, फक्त 10 पैसेच लोकांच्या प्रत्यक्ष हातात पडतात. त्यामुळे याठिकाणी माझी मागणी आहे की, आपण त्या दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करणार का ? कारण त्यांनी प्रचंड मोठया प्रमाणात पैशांची लूट केलेली आहे.

नंतर कु.गायकवाड...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नोंद

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, नियम 7, नियम 8 आणि नियम 10 काय आहेत याचा खुलासा सन्माननीय मंत्र्यांनी करावा.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, महाराष्ट्र नागरी सेवा(शिस्त व अपील) नियमा अंतर्गत नियम 10 नुसार वेतन वाढ रोखणे, ठपका ठेवणे, नियम 8 अंतर्गत दोषी व्यक्ती विरुद्ध विभागीय चौकशी करण्यात येते व नियम 7 अंतर्गत दोषी व्यक्तीची 3 महिन्याच्या आत विभागीय चौकशी पूर्ण करुन त्यास सक्तीने सेवेतून काढून टाकण्यात येते, बडतर्फ करण्यात येते. या प्रकरणात दोषी व्यक्तींची विभागीय चौकशी चालू आहे. त्यांना कोठल्याही परिस्थितीत नोकरीवर घेतले जाणार नाही. त्यांची फिल्ड इंक्वायरी 5 महिन्यात पूर्ण करण्यात आलेली आहे. या व्यक्तींची चौकशी करण्यात काही अडचण आलेली नाही ज्यावेळी अशी अडचण संबंधित दोषी व्यक्तीकडून केली जाते त्यावेळी त्या व्यक्तीस सस्पेंड केले जाते. परंतु आता फिल्ड वरील चौकशी पूर्ण झालेली आहे व या चौकशीत त्यांच्याकडून कोणताही हस्तक्षेप करण्यात आलेला नाही. या ठिकाणी कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनास कोणतीही अडचण नाही. आता या ठिकाणी एक विचार मांडण्यात आला की, संबंधितांनी नोकरीवर राहता कामा नये व त्यांनुसार 6 कर्मचा-यांच्या बदल्या करण्यात येतील.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय. मी देखील या पाच समित्यांबरोबर तपासणी करण्याचे काम केलेले आहे. त्या ठिकाणी संबंधित दोषी कर्मचाऱ्याची मदत घेऊन त्या समितीने त्यांची तपासणी केली आहे त्यामुळे समितीला योग्य माहिती मिळालेली आहे असें सांगता येणार नाही म्हणून संबंधित दोषी अधिकारी, कर्मचारी यांच्या अनुपस्थित सक्तीने कामांची पाहाणी करावी अशी माझी मागणी आहे असे केले तर यापेक्षा मोठा भ्रष्टाचार उघडकीस येईल.. सिंधुदुर्ग जिल्हयामधील कृषि अधिकाऱ्यांना जानेवारी महिन्यात मी एक पत्र लिहिले होते. त्या पत्रात कोणत्या गावात कोणकोणती कामे करण्यात येणार आहे याचा आराखडा मागितला होता. त्याबाबत कोणतीही कृती आराखडा तयार झालेला नाही असे उत्तर 29 जानेवारीला मिळाले. अशा प्रकारे काम करण्याची अधिकाऱ्यांची पध्दत आहे .तेव्हा आपण त्यांना निलंबित करणार का ?

(उत्तर नाही.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ .शी : रेशनिंग दुकानावर अत्यंत निकृष्ठ दर्जाचा गहू दिला जाणे

मु.शी : रेशनिंग दुकानावर अत्यंत निकृष्ठ दर्जाचा गहू दिला जाणे यासंबंधी अन्न ,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे

निवेदन.

श्री. सुनील तटकरे (अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

निवेदन

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे)

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आज आपल्याला कोकण विकासासंबंधीच्या प्रस्तावावर चर्चा करावयाची आहे . या विषयावर चर्चा किती वेळ चालू शकेल तें आपण सांगाल का ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, अनेक वर्षानंतर या सभागृहामध्ये कोकण विषयी चर्चा होत आहे अजून बऱ्याच सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे . त्यामुळे चर्चेसाठी सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्यास पूर्ण वेळ द्यावा. मला असे वाटते की, ही चर्चा अजून चार 4 तास तरी चालेल.

सभापती : ही चर्चा 4.15 वाजता सुरु केली तर 6 वाजेपर्यंत पूर्ण होईल का ?

यानंतर श्री. रोझेकर ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती.....

कोकणाला न्याय मिळाला पाहिजे, प्राधान्य मिळाले पाहिजे, सर्वच सन्मानीय सदस्यांना न्याय मिळाला पाहिजे व यासाठी वेळेचे नियोजन महत्वाचे आहे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार व इतर गटनेत्यांनी मला माझ्या दालनात कृपया भेटावे.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4 वाजून 30 मिनिटांनी पुन: भरेल.

(दुपारी 3.56 ते दुपारी 4.30 मध्यंतर)

यानंतर कुमारी जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

<u>कॅबिनेट मंत्र्यांची सभागृहामध्ये अनुपस्थिती.</u>

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत.

उपसभापती : सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 5 मिनिटांकरिता स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक 4 वाजून 31 मिनिटांनी 5 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

यानंतर श्री.गागरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

<u>विशेष उल्लेख</u>

पृ.शी.: शेतकऱ्यांना विजेचे नवीन कनेक्शन देणे

मु.शी.: शेतकऱ्यांना विजेचे नवीन कनेक्शन देणेबाबत श्री.धनाजी साठे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य श्री.धनाजी साठे, वि.प.स. यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री.धनाजी साठे (नामनियुक्त) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"शेतकऱ्यांच्या विजेच्या कनेक्शनच्या संदर्भातील प्रश्नावर विशेष उल्लेख मांडण्यासाठी मी परवानगी मागितली होती. परंतु आता हा प्रश्न सुटलेला आहे, असे मला या विषयाबाबत सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. माननीय उर्जा मंत्री श्री.दिलीप वळसे पाटील यांनी शेतकऱ्यांच्या विजेच्या कनेक्शनचा प्रश्न सोडविला असल्यामुळे माझे समाधान झालेले आहे "

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

.....2

पृ.शी.: मुंबईतील पे अँड पार्क योजनेतील त्रुटी.

मु.शी.: मुंबईतील पे अँड पार्क योजनेतील त्रुटींबाबत श्री.मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"मुंबईतील गजबजलेल्या ठिकाणी मुंबई पालिकेच्या वाहतूक विभागामार्फत पे अँड पार्कची योजना राबविली जाते. परंतु या योजनेनुसार हे पे अँड पार्कचे कंत्राटदार नियमानुसार पैसे न आकारता मनमानी करतात. वेळापत्रकाव्यतिरिक्त अधिक वेळेचे पार्किंग, नियमबाहय दुहेरी पार्किंग, दुचाकीसाठी एक रुपयाऐवजी पाच रुपये घेणे, अतिमोक्याच्या ठिकाणी पार्किंग पूलचा फलक लावून वाहनधारकांकडून वाहन पार्क करण्याचे पन्नास रुपये आणि वरुन प्रत्येक तासाला पाच रुपये उकळणे, रहिवाशांकडून पालिकेचे बनावट पत्रक दाखवून पार्किंगसाठी अधिक पैसे उकळणे, तसेच एखादया संस्थेकडून महिन्याकाठी मोठी रक्कम घेऊन केवळ या संस्थेच्या वाहनांनाच पार्किंग करु देणे, अशा प्रकारचे गैरप्रकार हे कंत्राटदार करीत असतात. या गैरप्रकारांची तक्रार पालिकेत केली असता, पालिकेतील संबंधित अधिकारी अर्थपूर्ण दुर्लक्ष करतात. ए, बी आणि सी या पालिकेच्या तीन प्रशासकीय विभागांतील पे अँड पार्कच्या एकूण 69 कंत्राटांपैकी 48 कंत्राटांची मुदत गेल्या चार महिन्यांच्या काळात संपली आहे. परंतु नवीन निविदा मागवून अजून पर्यंत नवी कंत्राटे जारी करण्यात आलेली नाहीत. आजही जुनेच कंत्राटदार विनापरवाना पे अँड पार्कचे पैसे अनधिकृतरित्या गोळा करीत आहेत. पे अँड पार्क मध्ये लावण्यात येणाऱ्या फलकांवर कंत्राटदाराचे नाव, कंत्राटाची मुदत व घेण्यात येणारे पैसे हे नमूद करणे गरजेचे असतानाही बऱ्याच ठिकाणी फलकच लावलेले नसतात त्यामुळे जनतेची फसवणूक होते. यामुळे जनतेच्या मनात शासनाविरुध्द असंतोष निर्माण झालेला आहे.

.....3

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

सभापती महोदय, कंत्राटाची मुदत संपण्याच्या तीन महिने आधी निविदा काढायच्या असतात, याचा विसर अधिकाऱ्यांना सोयीस्कररित्या पडत आहे. निविदांसाठी सूचना काढताना जाहिरातीत छपाईदोषाचे कारण पुढे करुन खोटी माहिती द्यायची आणि मर्जीतील कंत्राटदारांनाच वर्षानुवर्षे कंत्राटे बहाल करायची, असे पालिकेच्या दक्षता विभागानेच उघडकीस आणले आहे. काही ठिकाणी जाणीवपूर्वक पार्किंग क्षमता कमी दाखवून कंत्राटे बहाल केल्या गेल्याच्या तक्रारी आहेत, तर काही ठिकाणी कंत्राटदारांनी आपल्याला जादा गाडयांचे कंत्राट दिल्याची तक्रार केल्यावर पालिकेच्या अधिकाऱ्यांनी त्यांचे म्हणणे ग्राहय धरुन त्याला निम्मी रक्कम परत केल्याच्या तक्रारीही आहेत. सदर विषय अत्यंत महत्वाचा असून तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित केला आहे. आपण मला विशेष उल्लेखाची सूचना मांडण्यास परवानगी दिल्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे.

नंतर श्री.सुंबरे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : हाफकीन इन्स्टिट्यूट या शासकीय शास्त्रीय संशोधन संस्थेतील संशोधकांच्या रिक्त जागा भरणे.

मु.शी. : हाफकीन इन्स्टिट्यूट या शासकीय शास्त्रीय संशोधन संस्थेतील संशोधकांच्या रिक्त जागा भरणे याबाबत श्री.अरविंद सावंत, वि. प.स. यांची विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीसंबंधात विशेष उल्लेख करू इच्छितो. इ

" परळ येथील हाफकीन इन्स्टिट्यूट ही महाराष्ट्र शासनाच्या मालकीची एकमेव शास्त्रीय संशोधन करणारी संस्था असून सदर संस्थेत 55 रिक्त संशोधकांच्या जागांपैकी फक्त 13 जागाच भरल्याने तेथील संशोधनावर त्याचा झालेला अनिष्ट परिणाम., हाफकीन इन्स्टिट्यूट या संस्थेचे नाव किती मोठे आहे हे मी सांगण्याची गरज नाही. परंतु दुर्दैवाने शासनाचे या संस्थेकडे प्रचंड दुर्लक्ष इ ालेले आहे आणि त्यामुळे या संस्थेत संशोधनासाठी संशोधकांची मोठ्या प्रमाणात गरज असताना, संशोधकांच्या 55 जागा रिक्त असताना त्यापैकी केवळ 13 जागाच भरलेल्या आहेत. सुरूवातीला या संस्थेत 306 पदे होती ती आता कमी करून 55 वर आणण्यात आली. काही महत्त्वाच्या विषयाची संशोधनाची पदे रिक्त असल्याने एकूण संस्थेचा नावलौकिक कमी होणे, सदर संस्थेला शासनाकडून मिळणारे अनुदान अत्यंत तुटपुंजे आहे. या नामांकित संशोधन संस्थेच्या दुरवस्थेला शासन जबाबदार असून सदर संस्थेला ऊर्जितावस्थेत आणण्यासाठी व गतवैभव पुन: प्राप्त करण्यासाठी शासनाने तेथील संशोधकांच्या जागा तात्काळ भरून भरघोस आर्थिक सहाय्य करण्याबाबत का टाळाटाळ चालविली आहे याबाबत तात्काळ निवेदन करण्यात यावे अशी मागणी या विशेष उल्लेखाद्वारा करीत आहे.

****

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : भिवंडीस्थित कापड व्यापाऱ्यास लो.टिळक मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथील सहा.पो.निरीक्षकाने मारहाण करून जीवे मारण्याची दिलेली धमकी.

मु.शी. : भिवंडीस्थित कापड व्यापाऱ्यास लो.टिळक मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथील सहा.पो.निरीक्षकाने मारहाण करून जीवे मारण्याची दिलेली धमकी याबाबत श्री.मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेख करतो. इ

" श्री. कोठारी नावाचे कपड्याचे व्यापारी भिवंडी येथे राहतात. त्यांचा मनिषा ट्रान्सपोर्ट नावाने भिवंडी ते मुंबई ट्रान्स्पोर्टचा व्यवसाय आहे. ते स्वत: मानवाधिकार समितीचे सदस्य आहेत. असे असताना दिनांक 9.3.2007 रोजी पहाटे त्यांच्या ट्रान्सपोर्ट कंपनीचा टेंपो मुंबईतील जव्हेरी बाजारातील त्यांच्या गोडाऊनमध्ये सर्व कायदेशीर जकात भरूनच माल उतरवित असताना लो. टिळक मार्ग पोलीस ठाणे, मुंबई चे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.अनिल नाईक हे दोन पोलीस शिपाई घेऊन त्यांच्या गोडाऊनवर आले. त्यांनी टेंपोमधील माल उतरविणाऱ्या ड्रायव्हर, क्लिनर व कामगारांना माल उतरविण्यास मज्जाव करून टेम्पो पोलीस स्टेशनवर घेऊन येण्यास सांगून, मालकास बोलाविण्यास सांगितले. श्री.कोठारी सकाळी 8.30 च्या सुमारास भिवंडी येथून पोलीस स्टेशनवर पोहोचले असता त्यांना जकात न भरता माल उतरविता म्हणून दमदाटी करण्यास सुरूवात केली. त्यावर श्री. कोठारी यांनी जकात भरलेल्या पावत्या दाखविल्या असता, तुम्ही अधिकृतपणे जकात भरली असली तरी येथे मला देखील जकात द्यावी लागते असे सांगितले. त्यावर श्री.कोठारी यांनी मी अधिकृतपणे जकात भरली असताना अशी वेगळी जकात कशासाठी द्यायची असे विचारले असता त्यांना अत्यंत गलिच्छ भाषेत, अश्लील शब्दात शिवीगाळ करून कानाचा पडदा फाटेल इतक्या जोराने त्यांच्या कानफटामध्ये दोन तीन फटके मारले. एवढ्यावरच

..... 3 एफ 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .....

ते थांबले नाही तर स.पो.नि. श्री.अनिल नाईक यांनी स्वत:कडील रिव्हॉल्व्हर काढून श्री.कोठारी यांना जीवे मारण्याची धमकी दिली. सभापती महोदय, सदर विषय अत्यंत महत्त्वाचा असून मी तो या विशेष उल्लेखाद्वारा येथे उपस्थित करीत आहे. सभापती महोदय, या स.पो.निरीक्षक श्री.अनिल नाईक यांनी श्री.कोठारी यांना इतक्या अश्लील अशा शिव्या दिलेल्या आहेत की त्या उच्चारण्यास देखील लाज वाटते. तेव्हा मी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना एवढीच विनंती करतो की, या सहाय्यक पोलीस निरीक्षकास त्वरित निलंबित करण्यात यावे. सभापती महोदय, तेथील बाकीच्या सिनिअर पोलीस अधिकाऱ्यांनी देखील या स.पो.नि. श्री.अनिल नाईक यास तू चुकीचे वागतो आहेस असे सांगितले असता ती माझी ड्युटी आहे, तुम्हाला काय करायचे आहे ? असे बोलून गप्प करण्यात आले. ..

उपसभापती : मी याबाबत शासनाला सांगू इच्छितो की, या प्रकरणाची तातडीने आणि गांभीर्याने चौकशी करण्यास पोलीस आयुक्तांना सांगावे आणि संबंधित पोलीस अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई करावी.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, हे अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबतचा अहवाल पोलीस आयुक्तांनी आपल्याला पाठवावा अशीही माझी शासनाला विनंती आहे.

****

(यानंतर श्री. सरफरे .... 3जी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मुंबई-नाशिक महामार्गावरील गोंदे ते पिंपळगाव बसवंत या भागाच्या चौपदरीकरणाचे काम त्वरीत सुरु करणे

मु.शी. : मुंबई-नाशिक महामार्गावरील गोंदे ते पिंपळगाव बसवंत या भागाच्या चौपदरीकरणाचे काम त्वरीत सुर करणे याबाबत श्री.प्रतापराव सोनवणे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य श्री. प्रतापराव सोनवणे, यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. प्रतापराव सोनवणे (नाशिक विभाग पदवीधर) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"मुंबई-नाशिक आग्रा महामार्गावर वाहतुकीची कोंडी होणे, दुर्घटना घडणे हा नित्याचाच प्रकार झालेला आहे. त्यावर मार्ग म्हणून या महामार्गाचे मुंबई ते धुळे चौपदरीकरणाचे काम या आधीच मंजूर करण्यात आले आहे. सदरचे काम हे 3 टप्प्यांमध्ये वाटले गेलेले आहे. पहिला टप्पा वडपे ते गोंदे, दुसरा टप्पा गोंदे ते पिंपळगाव बसवंत व तिसरा टप्पा पिंपळगाव बसवंत ते धुळे अशी कामे पूर्वीच मंजूर झालेली आहेत. यापैकी वडपे ते गोंदे या पहिल्या भागाचे काम सुरु आहे. तसेच, पिंपळगाव-बसवत ते धुळे या तिसऱ्या भागाचेही काम जोरात सुरु आहे.

मात्र नेमक्या मधल्या, गोंदे ते पिंपळगाव बसवंत या सर्वात व्यस्त असलेल्या भागाच्या कामाला आजपर्यंत सुरुवातही झालेली नाही. यामुळे या ठिकाणी बॉटलनेक तयार होणार आहे. त्यातून या भागात वाहतुकीची कोंडी होणार आणि अनेक दुर्घटनांना सामोरे जावे लागणार आहे.

या इतक्या महत्वाच्या कामाला एकेक दिवस उशीर करणे म्हणजे वाहतुक कोंडी आणि अपघातांना निमंत्रण देण्याचा विषय आहे. दोन टोकांचा रस्ता पूर्ण होतो आहे, आणि मधल्या टप्प्याच्या कामाला सुरुवात सुध्दा नाही हा नियोजन शून्यतेचा प्रकार आहे.

शासनाने हा विषय अत्यंत गांभीर्याने घ्यावा, तातडीने गोंदे ते पिंपळगाव बसवंत या भागाचे चौपदरीकरणाचे काम त्वरीत चालू करावे व या सर्वच कामाला अधिक वेग देऊन त्वरीत संपूर्ण काम पूर्ण करावे आणि जनतेला दिलासा द्यावा अशी मागणी मी विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : वाशिम जिल्हा परिषदेंतर्गत संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेमध्ये होत असलेला भ्रष्टाचार

मु.शी. : वाशिम जिल्हा परिषदेंतर्गत संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेमध्ये होत असलेला भ्रष्टाचार याबाबत श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने वाशिम जिल्हा परिषदेंतर्गत झालेल्या भ्रष्टाचाराची गंभीर बाब विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

"संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेतून 20 टक्के निधीतून मंजूर करावयाच्या कामात केलेला भ्रष्टाचार : या संदर्भात तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.शेख यांनी तत्कालीन प्रकल्प संचालक श्री. कोहीनकर यांना दि.8.11.2006 रोजी जा.क्र. जिप/स्टेनो/4566/2006, जिल्हा परिषद, वाशिम सादर केलेल्या अहवालाची प्रत उपलब्ध आहे. सध्या श्री. कोहीनकर हेच मुख्य कार्यकारी अधिकारी झाले असल्याकारणाने हे प्रकरण दडपले जात आहे. अहवाल बोलका आहे तरी कार्यवाही नाही. या अहवालाची प्रत माझ्याकडे आहे. आपणामार्फत संबंधित खात्याला मी विनंती करतो की, या अहवालाच्या शेवटच्या पानावर सर्व गटविकास अधिकाऱ्यांना तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.शेख यांनी या संदर्भात सर्व कामे तहकूब करण्याबाबतचे स्पष्ट आदेश दिले होते. वरील भ्रष्टाचार वेगळा आणि या आदेशानंतरही गटविकास अधिकारी वाशिम यांनी तर भ्रष्टाचाराचा "अतिरेक" शब्द कमी पडेल असा भ्रष्टाचार या आदेशांतर्गत निर्माण केला आहे. या आदेशासोबत कामे करु नयेत अशी जी यादी जोडली होती त्याच्यावर प्रशासकीय असलेल्या मान्यतेचा दुरुपयोग करुन वेगवेगळ्या कामाच्या तीन झेरॉक्सच्या सहीचा वापर करुन त्या मान्यता अंतर्गत असलेल्या जागी इतर कामांच्या झेरॉक्स प्रती मारुन 3 कोटीची कामे मंजूरीच्या नावाखाली कोषागारातून रक्कम उचलण्यात आली जी कामे अस्तित्वातच नाहीत. अशी माहिती माझ्याकडे उपलब्ध झाली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कोहीनकर यांनी दूरध्वनीवर माझेशी बोलताना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

1.30 कोटींचे पैसे वापरल्याचे मान्य केले. याठिकाणी त्यांची सत्ता असून अजूनपर्यंत त्यांनी कोणतेही कालव्याचे काम केले नाही.

याच जिल्हा परिषदेमध्ये 500 बचत गट स्थापन केल्याची असत्य यादी सादर करुन प्रत्येकी 1 हजार प्रमाणे पैसे उचलले असून 4 हजारप्रमाणे आणखी 20 लाख रुपयांचे देयक सादर करण्यात आले आहेत. अशाप्रकारे हा 25 लाखांचा घोटाळा निर्माण झाला आहे. याबाबत अधिकृत तक्रार जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षा सौ. अनिताताई दहात्रे यांनी करुनही तक्रार दुर्लक्षित करुन भ्रष्टाचार चालू आहे.

जिल्हापरिषद पशुसंवर्धन विभागासाठी खरेदी करण्यात आलेल्या 17 लाखाचे सर्जिकल कीट, थर्मामीटर, डीलोमीटर, ट्रॅव्हिस, कठडे, ऑपरेशन टेबल असा निकृष्ट दर्जाचा माल खरेदी केल्यामुळे संबंधित पशुसंवर्धन विभागाने ही देयके रोखली असून या संदर्भातही चौकशीचा फार्स चालू आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरू....

या तीनही प्रकरणात आपण तातडीने ग्राम विकास खात्याचे सचिव मा.श्री.वत्स यांनी आपल्या अधिकाराचा वापर करून वाशिम जिल्हा परिषदेतील जबाबदार अधिकारी रवाना करून याची शहानिशा त्वरित करणे आवश्यक आहे. संबंधितांवर वर उल्लेखिलेल्या अहवालानुसार तातडीने कारवाई होणे आवश्यक आहे. तसेच कोणतेही काम न करता वाशिम गटविकास अधिकाऱ्याने 3 कोटी रूपये कोषागरातून किवा जेथून पैसे उपलब्ध होते, त्या बँकेमधून काढले असल्यामुळे त्याची वसुली करावी तसेच त्यांच्यावर फौजदारी गुन्हा त्वरित दाखल करावा. त्याचप्रमाणे त्याबाबतीतील निलंबनाची कारवाई होणे आवश्यक आहे. याबाबतच्या कारवाईची माहिती एक महिन्यात द्यावी हे सांगण्यापेक्षा या तीनही प्रकरणाची चौकशी विभागीय आयुक्तांनी करण्याकरिता निर्देश देण्यात यावेत आणि त्यांच्यामार्फत संपूर्ण अहवाल उपलब्ध करून घ्यावा. अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करतो. जयहिंद जय महाराष्ट्र.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

पृ. शी. : पाटबंधारे खात्याने धरणातील पाण्याचे वाटव व नियंत्रण योग्य राहण्यासाठी पाणी वाटप संस्था स्थापन केल्याबाबत.

मु. शी. : पाटबंधारे खात्याने धरणातील पाण्याचे वाटव व नियंत्रण योग्य राहण्यासाठी पाणी वाटप संस्था स्थापन केल्याबाबत, श्री.जयंत प्र. पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री.जयंत प्र.पाटील, यां□ ए□ विशेष उल्ले□ची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

"शासनाच्या पाटबंधारे खात्याने धरणातील पाण्याचे वाटप व नियंत्रण योग्य राहण्यासाठी पाणी वाटप संस्था स्थापन केल्या आहेत. या संस्थांना कसल्याही प्रकारची आर्थिक तरतूद उपलब्ध करून दिलेली नाही. दरमहा या संस्थेच्या व्यवस्थापक मंडळाची बैठक घ्यावी, असे या संस्थांना कळविण्यात आले आहे. परंतु तरतुदीअभावी बैठका कशा आयोजित कराव्यात, असा प्रश्न संस्था पदाधिकाऱ्यांसमोर निर्माण झाला आहे.

शासनाने असेही जाहीर केले आहे की, ज्या पाणी वाटप संस्थांच्या निवडणुका बिनविरोध होतील त्या संस्थांना निवडणुकीसाठी जो खर्च झाला तो खर्च संस्थेला अनुदान म्हणून सदर रक्कम दिली जाईल. या संस्था निर्माण करण्याचा शासनाचा जो उद्देश आहे त्याचा विचार करता शासनाने या संस्थांना पाणी कसे सोडावे, सोडलेल्या पाण्याचे व्यवस्थित वाटप व्हावे, आठवड्यातून पाणी सोडण्याच्या कोणत्या वेळा निश्चित कराव्यात या सर्व कार्यवाहीवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार या संस्थांना देण्यात यावेत. सबब, या सर्व गोष्टीचा विचार होऊन पाणी वाटप संस्थांना चांगल्या प्रकारे काम करता यावे व वरील उणिवा दूर होण्यासाठी शासनाचे लक्ष मी ह्या विशेष उल्लेखाद्वारे वेधू इच्छितो."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

पृ.शी. : निधीअभावी व नियोजनाअभावी सर्व स्तरावर कोकण प्रदेशाकडे शासनाचे होणारे जाणुनबुजून दुर्लक्ष.

मु.शी. : निधीअभावी व नियोजनाअभावी सर्व स्तरावर कोकण प्रदेशाकडे शासनाचे जाणुनबुजून होणारे दुर्लक्ष या विषयावर सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, विनोद तावडे,श्रीमती सुधा जोशी, श्री.परशुराम उपरकर, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री मधुकर चव्हाण, जितेंद्र आव्हाड, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री भास्कर जाधव, रामनाथ मोते, जयंत प्र.पाटील, संजय केळकर, कर्नल सुधीर सावंत, श्री.राजन तेली, श्रीमती फौजिया खान, वि.प.स.यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरू.....

उपसभापती : आता कोकण विकासासंबंधीच्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू होईल व सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे हे आपले भाषण सुरू करतील.

श्री.विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आज कोकण विकासावरील प्रस्तावावरील चर्चा सुरू करताना सन्माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत, त्यांना मी मनापासून धन्यवाद देतो.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

सभापती महोदय, कोकण विकासाच्या प्रस्तावावर आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी चर्चेला सुरुवात केली तसेच अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले. या चर्चेच्या निमित्ताने अतिशय महत्वाचे मुद्दे पुढे आलेले आहेत. मला असे वाटते की, बऱ्याच वर्षानंतर कोकणाच्या विषयावर इतके सविस्तर विवेचन या सभागृहामध्ये होत आहे. या सभागृहातील एकतृतियांशपेक्षा जास्त सन्माननीय सदस्य हे मूळचे कोकणातील असल्यामुळे कोकणाच्या विषयामध्ये अशा पध्दतीची चर्चा होणे अतिशय उपयोगाचे आहे. माननीय दादा हे कोकणाला उर्वरित महाराष्ट्रामध्ये धरत असले तरी योजना होत असताना तसे काही दिसत नाही. त्यामुळे अशी चर्चा आवश्यक असते असे मला वाटते. कोकणाच्या संदर्भात ज्या मुद्यांची चर्चा केली त्यामध्ये पर्यटन असेल, फलोद्यान असेल, बंदरे असतील या सगळ्यांच्या बाबतीत जर नीट योजना झाल्या, या सगळ्यांची शासनकर्ते म्हणून जर आपण नीट रचना करु शकलो तर खऱ्या अर्थाने या राज्याचा आर्थिक कणा या तीन गोष्टीतून उभा राहू शकतो. सहकाराची चळवळ सुरु झाल्यानंतर विविध सहकारी कारखान्यांना 1:9 या प्रमाणात अनुदान दिले गेले असेल तसेच कापूस न पिकणाऱ्या भागामध्ये सूतगिरण्या मिळाल्या असतील, साखर कारखाने मिळाले असतील त्याविषयी आमची तक्रार नाही. कोणाला जास्त मिळाले त्याबाबत कोकणवासीयांची काही तक्रार नाही. परंतु इतरांना जे मिळते त्याच्या 60-70 टक्के जरी आमच्या वाट्याला आले असते तरी त्यातून खऱ्या अर्थाने कोकणातील पर्यटन, कोकणातील बंदरे, कोकणातील फलोद्यान या सर्व बाबतीत विकास झाला असता. या राज्यामध्ये डॉलर आणण्याची क्षमता कोकणातील या तीन क्षेत्रांमध्ये आहे. कोकण हा या राज्याला परकीय चलन मिळवून देणारा, डॉलर मिळवून देणारा विभाग आहे. त्या पध्दतीने जर त्याची रचना करता आली, त्या पध्दतीने जर तेथील अर्थकारण बांधता आले तर महाराष्ट्राचा आर्थिक कणा म्हणून हा कोकण विभाग उभा राहू शकतो. केरळ राज्याचे संपूर्ण अर्थकारण पर्यटनावर उभे आहे. केरळ राज्याचे बजेट मुंबई महानगरपालिकेच्या बजेटएवढे आहे. त्या पध्दतीने जर या कोकण विभागातील अर्थकारणाची रचना करता आली, त्या पध्दतीच्या योजना जर त्या भागामध्ये देता आल्या तर खरोखरच महाराष्ट्राचा आर्थिक कणा म्हणून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. विनोद तावडे .....

हा कोकण विभाग उभा राहू शकतो. एवढी क्षमता या कोकणाच्या मातीत आहे. मघाशी आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी तसेच सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील म्हणाले त्याचप्रमाणे काल-परवा सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. हर्षवर्धन पाटील म्हणाले की, हे सगळे सन्माननीय सदस्य मुंबईमध्ये राहतात. इतर भागामध्ये शासनाने सहकारी साखर कारखाने काढले, सूतगिरण्या काढल्या, दूध डेअरीज काढल्या तसेच त्या भागात इतर योजना आणि सवलती दिल्या तशा सवलती कै. भाई सावंत यांच्या म्हणण्याप्रमाणे कोकणात दिल्या असत्या तर सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी हे मुंबईमध्ये आले नसते. सन्माननीय सदस्या सुधाताई जोशी, सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत मुंबईला आले नसते. आम्ही सुध्दा कोकणात राहिलो असतो. ज्या सुविधा आपण इतर भागांना दिल्या, ज्या योजना आपण इतर भागांना दिल्या त्या योजना या भागात दिल्या असत्या तर सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांना सांगू इच्छितो की, आम्ही या सगळ्यांना घेऊन त्या ठिकाणी अधिक काम केले असते. तशी क्षमता त्या ठिकाणी आहे.

सभापती महोदय, पर्यटनाबाबत सांगावयाचे झाले तर कोकणामध्ये एस.ई.झेड च्या बाबतीत रणकंदन माजले आहे. खऱ्या अर्थाने कोकणात पर्यटनाच्या बाबतीत एस.ई.झेड. निर्माण केले पाहिजे. दुसऱ्या कोणत्याही एस.ई.झेड. पेक्षा कोकणाला पर्यटनाच्या एस.ई.झेड.ची आवश्यकता आहे. त्या पध्दतीच्या कारखान्याची योजना, त्या पध्दतीच्या उद्योगाची योजना कोकणामध्ये करता येऊ शकते असे मला वाटते. मी माननीय मुख्यमंत्र्यांना तसेच माननीय अर्थमंत्र्यांना विनंती करु इच्छितो की, आपण कोकणातील पर्यटन व्यवसायाला गती दिली पाहिजे.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. उल्हास पवार)

यानंतर श्री. शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मला मान्य आहे की, फाईव्ह स्टार हॉटेल्स काढण्याच्या बाबतीत सीआरझेडमुळे काही मर्यादा असू शकतात. परंतु पर्यटन क्षेत्रामध्ये फाईव्ह स्टार हॉटेल्स असलीच पाहिजे असे नाही. आता मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यमर्वीय लोक मोठ्या संख्येने पर्यटनाकडे आकर्षित झालेले आहेत. त्यामुळे त्यांना परवडतील अशा सुखसोयी पर्यटनाच्या माध्यमातून उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. यादृष्टीने माननीय मुख्यमंत्री महोदयांनी विचार केला पाहिजे. या पर्यटन व्यवसायाला 10 वर्षे करातून सूट देण्यात आली पाहिजे. हा पर्यटन व्यवसाय करणा-यांना शासनातर्फे कोणत्याही प्रकारची मदत दिली जात नाही. त्यामुळे या व्यवसायातून त्यांना मिळणारे उत्पन्न हे करपात्र केले नाही तर त्याच पैशातून ते आपला व्यवसाय वाढवून त्या व्यवसायाला ते अधिक चालना देऊ शकतील. कोकणामध्ये जलपर्यटन, क्रीडा पर्यटन, साहसी पर्यटन असे अनेक पर्यटनाचे प्रकार विकसित करता येण्यासारखे आहेत. परंतु अशा प्रकारची पर्यटन स्थळे विकसित करण्यासाठी कोकणातील माणासाला 10-10 ठिकाणी फिरावे लागते. तेव्हा कोकणामध्ये पर्यटनाला चालना मिळण्यासाठी आवश्यक असणा-या परवानग्या एकाच ठिकाणी मिळतील अशी सोय शासनाने उपलब्ध करुन दिली पाहिजे. कोकणातील दापोली, मुरुड, रत्नागिरीतील हरिहरेश्वर, दिवेआगर या ठिकाणी ग्रामीण पर्यटनाला चांगली चालना मिळू शकेल. त्यादृष्टीने काही लोकांनी प्रयत्नही सुरु केलेले आहेत. या पर्यटन व्यवसायासाठी पुढील 10 वर्षाकरिता शासनाने 100 कोटी रुपयाची तरतूद केली तर पर्यटन व्यवसायाचा कोकणामध्ये निश्चितच विकास होईल अशी मला खात्री असून 10 वर्षानंतर या 100 कोटी रकमेच्या अनेकपटींनी परतावा या शासनाला महसुलाच्या माध्यमातून मिळू शकेल इतकी क्षमता या कोकणामध्ये आहे. जल पर्यटन आणि कृषी पर्यटनाच्या माध्यमातून कोकणामध्ये देशी-विदेशी पर्यटकांना आपणास मोठ्या प्रमाणावर आकर्षित करता येईल आणि ग्रामीण पर्यटनाची वेगवेगळी मॉडेल्स आपणाला जगासमोर आणता येतील. केवळ चार-पाच खोल्यांचे रिसॉर्ट करण्याचे प्रयोग कोकणामध्ये विविध संस्थांनी केलेले आहेत. या प्रयोगांना मोठ्या प्रमाणावर चालना मिळण्याची आवश्यकता आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 17:00

(श्री. विनोद तावडे...

सभापती महोदय, पर्यटन व्यवसायामध्ये वीज हा फार महत्वाचा घटक आहे. आता जेथे पर्यटकांच्या राहाण्याची सोय केलेली आहे अशा ठिकाणची वीज भारनियमनामुळे सतत जाऊ लागली तर साहजिकच पर्यटक अशा ठिकाणी येणार नाहीत. तेव्हा भारनियमानाचा यादृष्टीकोनातूनही विचार होणे आवश्यक आहे. आज केरळ राज्य हे पर्यटनाच्या क्षेत्रामध्ये जगाच्या नकाशावर आलेले आहे. कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतील पर्यटनस्थळे चांगल्या प्रकारे विकसित केली तर आपले राज्य विशेषत: कोकण भाग हा निश्चितच जगाच्या नकाशावर आल्या शिवाय राहाणार नाही. पर्यटकांना व्हर्जिन बिचेचस्चे आकर्षण आहे. गोव्यामध्ये लाखोंच्या संख्येने पर्यटक येत असतात.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

त्या गावात मुक्कामाला राहून दिवसाचे काही तास तो पर्यटक व्हर्जिन बिचेसवर येईल अशाप्रकारे प्रयत्न करता येऊ शकतो. त्या पध्दतीने योजना तयार झालेली दिसत नाही. कोकणातील फलोद्यानाबाबत यापूर्वीच्या वक्त्यांनी उल्लेख केलेला आहे. फलोद्यानाचा उल्लेख करीत असताना सन्माननीय फलोत्पादन मंत्री सभागृहात उपस्थित झाले आहेत हा निव्वळ योगायोग आहे असे मी मानतो. जवळजवळ दीड हजार हेक्टर क्षेत्रात हापूस आंब्याची लागवड होत असते. 1 हजार कोटी रुपयांची उलाढाल या हापूस आंब्याच्या उत्पादनातून होत असते. या हापूस आंब्याला मार्केट मिळवून देण्यासाठी प्रयत्न झाला पाहिजे. केवळ मुंबईपुरते मार्केट उपलब्ध करुन देऊन भागणार नाही. मुंबई, अहमदाबाद, पुणे या ठिकाणी मार्केटिंगची व्यवस्था करण्याबरोबरच दिल्ली, मद्रास, विदेशात सुध्दा विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. आज काही सार्वजनिक संस्था आंबा महोत्सवाचे आयोजन करीत असतात. परंतु शेतकऱ्यांना डायरेक्ट मार्केटिंग इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करुन देऊन त्यांना आर्थिक मदत कशी करता येईल यासाठी प्रयत्न झाला पाहिजे. आज संस्था स्तरावर फलोत्पादन मंत्रालय, पणन मंत्रालय यांच्याकडून प्रयत्न होत आहेत. या गोष्टीला मोठे व्यापक स्वरुप देण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाला पाहिजे. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे आंबा हे फळ डॉलर मिळवून देणारे फळ आहे. त्याचे मार्केटिंग चांगल्या पध्दतीने करु शकलो तर स्वाभाविकपणे त्यातून चांगले उत्पन्न मिळून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना देखील फायदा मिळणार आहे. आज दुर्दैवाने स्थिती अशी आहे की, शेतकऱ्यांना योग्य तो भाव मिळत नाही.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये 70 हजार टन व रत्नागिरी जिल्हयामध्ये 60 हजार टन आंबा उत्पादन होतो. 80 हजार टन आंबा हा फक्त खाण्यासाठी उपयोगात आणला जातो. 50 हजार टन आंबा कॅनिंगसाठी पाठविला जातो. दुर्दैवाने कोकणात एकही कॅनिंगचे युनिट नाही. सहकारी तत्वावर 1:9 प्रमाणात भांडवल देऊन शासन या भागामध्ये कॅनिंग कारखाना आणि त्याला लागणाऱ्या पूरक गोष्टी उभ्या करील, त्या पध्दतीने काजूच्या प्रक्रियेसाठी कारखाना उभा करण्यासाठी 1:9 या प्रमाणात भांडवल देऊ असे रत्नागिरी येथील कॅबिनेट बैठकीनंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषित केले होते. त्या नुसार कारखान्याचे प्रस्ताव देऊनही आजतागायत ते वास्तवात येऊ शकले नाहीत हे दुर्दैव आहे. कोकणातील आंबा उत्पादक आज कॅनिंगच्या बाबतीत परप्रांतीयांवर अवलंबून असतात. आज कॅनिंगचा उद्योग हा 500 कोटी रुपयांवर जाऊन पोहोचला

असुधारित प्रत/ प्रसिध्दीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

आहे. आपल्याच राज्यात, कोकणातील भागात सहकारी तत्वावर कॅनिंगचा कारखाना उभा करु शकलो तर त्यामधून रोजगार निर्मिती देखील होऊ शकते. आज आंबा कॅनिंगसाठी बाहेरच्या भागात जातो, वाहतुकीमध्ये वेट लॉस होतो. स्वाभाविकपणे त्यातून शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पन्न मिळत नाही.

सभापती महोदय, कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये मॉडेल ॲक्ट लागू करण्याचा शासन कसोशीने प्रयत्न करीत आहे. दोन वर्षापूर्वी मुंबई कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये अक्षरश: रुमाल पध्दतीने जे व्यवहार होत होते त्यामधून कोकणातील शेतकऱ्यांना कसे नागवले जात होते त्याचे ते मूर्तिमंत उदाहरण होते.

तालिका सभापती (श्री.उल्हास पवार) : अजूनही या प्रस्तावावर आणखी 10 सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत. त्यामुळे प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी बोलत असताना स्वत:च वेळेचे नियोजन केले तर ते अधिक चांगले होईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आंबा पीक घेत असताना शेतकऱ्यांनी सेंद्रिय खताचा वापर करावा असे सांगितले जाते. कारण या आंबा फळाला परदेशी बाजारामध्ये चांगली मागणी असते.

(नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

यासाठी जो परवाना लागतो त्याला 60 हजार रुपये खर्च येत असल्या कारणाने शेतकरी विचारतात की, एवढा महागडा खर्च करुन लागवड करावयाची व त्यात निसर्गाची अवकृपा झाली तर एवढा मोठा तोटा कशाला सहन करावयाचा म्हणून आंबा उत्पादक त्या फंद्यात पडत नाहीत. यावर्षी आंबा उत्पादक शेतक-यांचे फार मोठया प्रमाणात नुकसान झाले असल्यामुळे शासन त्यांच्या कर्जावरील व्याज माफ करणार आहे काय? कर्जाचे सोपे हप्ते पाडून देणार आहे काय? जसा ऊस उत्पादक, कापूस उत्पादक शेतक-यांना शासना तर्फे दिलासा दिला जातो तशाच प्रकारचा दिलासा आंबा उत्पादक शेतक-यांना शासन दिलासा देणार आहे काय? अतिवृष्टीमुळे, निसर्गाच्या कोपामुळे आंबा उत्पादक शेतकरी उद्ध्वस्त झालेला आहे. यावर्षी तरी आंब्याचे चांगले पीक येईल आणि आपली आर्थिक स्थिती सुधारेल या आशेने आंबा उत्पादक शेतकरी पहात होता परंतु त्याचा भ्रम निरास झालेला आहे. शासनाकडून काही तरी सवलत मिळेल, विदर्भातील, मराठवाडयातील शेतक-यांना ज्या प्रकारे सवलत मिळते तशा प्रकारची सवलत आपल्यालाही मिळेल या आशेने आज आंबा उत्पादक शासनाकडे पहात आहे. बजेट सेशन मुंबईत सुरु असल्यामुळे आंबा उत्पादक शेतक-यांच्या नजरा अधिवेशनाकडे लागल्या आहेत, विशेषत: आजच्या चर्चेकडे लागलेल्या आहेत.

सभापती महोदय, वनाखील किती जमीन उपलब्ध आहे यासंदर्भात एकेकाळी सुप्रिम कोर्टाने राज्यातील जिल्हाधिका-यांकडून माहिती मागवली होती. त्यावेळेस सिंधुदुर्ग जिल्हयाच्या जिल्हाधिका-यांनी 42 हजार हेक्टर जमीन वन संज्ञेखाली आहे असा रिपोर्ट दिला. त्यानंतर सिंधुदुर्ग जिल्हयात श्री. भुषण गगराणी जिल्हाधिकारी म्हणून आले व त्यांनी 38 हजार हेक्टर जमीन वन सज्ञेखाली असल्याला रिपोर्ट दिला. संपूर्ण राज्यातील 29 जिल्हयात 20 हजार हेक्टर जमीन वन सज्ञेखाली आली होती. कोकणामध्ये 38 हजार जमीन वन सज्ञेखाली आल्यामुळे सिंधुदुर्ग जिल्हयात जर काही व्यवसाय करावयाचा असेल तर व्यवसाय करता येत नाही. वन सज्ञेच्या माध्यमातून सिंधुदुर्ग जिल्हयावर जो अन्याय होत आहे त्यातून सुटका करावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, सुपारीवरील कर कमी करावा म्हणून गेली चार अधिवेशने माजी सन्माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक यांनी प्रयत्न केले होते परंतु सुपारी वरील कर गेल्या

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

अधिवेशनात शासनाने कमी केलेला आहे. कोकणात पाटबंधारे प्रकल्पाची अवस्था अतिशय खराब आहे. 1980 साली पाटबंधारे मंत्री श्री. बी.जे. खताळ यांनी कोकणासाठी सिंचन प्रकल्पाचा आराखडा तयार केला होता. कोकण सिंचन विकासासाठी उच्चाधिकार समिती नेमली होती त्यासाठी 20 एकराचा बृहत आराखडा तयार केला होता. त्यानंतर कोकणातील पाटबंधारे प्रकल्पाचे काही तरी होईल असे कोकणातील जनतेला वाटले होते परंतु तसे काहीही झाले नाही.

सभापती महोदय, कोकण रेल्वेच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी विचार मांडलेले आहेत. यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, माझे वडील म्हाडामध्ये काम करीत होते. म्हाडामध्ये रिटायर्ड झाल्यानंतर त्यांनी मला सांगितले की, मी कोकण रेल्वेच्या कर्ज रोख्यात पैसे गुंतवणार आहे. त्यावेळेस मी त्यांना सांगितले की, कर्ज रोख्यात पैसे गुंतवले तर व्याज कमी मिळेल परंतु माझ्या वडीलांनी सांगितले की, मला व्याज कमी मिळाले तरी चालेल परंतु कोकणामध्ये रेल्वे गेली तर ते चांगले होईल. अशाच प्रकारे सर्व कोकणातील जनतेने आपले पैसे कोकण रेल्वे कर्ज रोख्यात गुंतवलेले आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

कोकणातील लोक असे भावनिक आहेत. अशाप्रकारे पैसे उभारणीसाठी कोकणातील माणसाने स्वत:चा वाटा उचलला होता. मी माहितीच्या अधिकाराखाली कोकणासंबंधी काही माहिती मिळविली व कोकणातील विशिष्ट पध्दतीचा अभ्यास केल्यानंतर कृष्णा खोरेसाठी गुंतवणूक किती झाली आणि कोकण पाटबंधारेसाठी किती गुंतवणूक झाली यातील फरक पाहिला. त्यावेळी मला असे आढळून आले की, ही गुंतवणूक जवळपास दुपटीने जाणवते. कारण कोकणातील लोक भावनिक आहेत. तेव्हा कोकण पाटबंधारेसाठी जमलेले पैसे गेले कुठे, कुठे खर्च करण्यात आले ? कृष्णा खोरे प्रकल्पाला दिलेले पैसे परत मिळण्यासाठी चार-चार वर्षे लागली, त्यावरील व्याज मिळाले नाही. तेव्हा किमान आता तरी कोकण पाटबंधारे विभागाच्या मागण्या आहेत त्या पूर्ण कराव्यात. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी पाटबंधारेबाबत काही चांगल्या सूचना केलेल्या आहेत त्या अमलात आणाव्यात.

सभापती महोदय, मला याठिकाणी एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो तो म्हणजे कोयना धरणातील पाणी समुद्रात वाहून जाते ते रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याकडे वळविता येईल असे पेंडसे समितीने सुचविले होते. परंतु पेंडसे समितीने दिलेला अहवाल मंत्रालयामध्ये धूळ खात पडून आहे. सुचविल्याप्रमाणे वेळीच कार्यवाही झाली नाही तर त्यावरील खर्च वाढत जातो. आता याबाबत शासनास विचारले तर हा खर्च परवडणारा नाही असे त्यांच्याकडून उत्तर येईल आणि तो अहवाल बासनात गुंडाळला जाईल. अशाच तऱ्हेची परिस्थिती गुजरात राज्यात निर्माण झाली असता त्याठिकाणी समुद्रात जाणारे पाणी अडविण्यासाठी बंधारे बांधण्यात आले.

सभापती महोदय, कोकणास फार मोठी किनारपट्टी लाभलेली आहे. त्यामुळे भरतीच्या वेळी बऱ्याच ठिकाणी समुद्राचे खारे पाणी शेतात येते त्यामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. तेव्हा भरतीच्या वेळी समुद्राचे पाणी शेतात येऊ नये म्हणून बंधारे घालण्यात यावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

सभापती महोदय, मी आपल्यामार्फत माननीय मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, देवगड तालुक्यात आनंदवाडी प्रकल्प आहे. या प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून 13 कोटी रुपयांची आर्थिक तरतूद झाली होती. परंतु शासनाने हा निधी खर्च न केल्यामुळे त्यातील 12 कोटी रुपये परत गेले. तेव्हा मला येथे वेदनेने म्हणावेसे वाटते की, शासन तरतूद करीत नसेल तर निदान केंद्र सरकारकडून मिळालेल्या निधीचा पुरेपूर उपयोग तरी करावा.

सभापती महोदय, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांबाबत बोलावयाचे झाले तर या ठिकाणी येणारा प्रत्येक अधिकारी हा एक तर प्रमोटी असतो किंवा त्याची पहिली तरी पोस्टींग असते. या दोन्ही ठिकाणी नेमणूक झालेले अधिकारी बहुतांश घाटावरचे असतात. त्यामुळे शनिवार-रविवार ते घरी जातात. अधिकाऱ्यांना भेटावायाचे म्हटले तर कोणीही अधिकारी भेटत नाहीत. ही कोकणच्या माणसाची खंत आहे. जर एखादा चांगला अधिकारी मिळाला तर तो जास्तीत जास्त सहा महिने किंवा वर्षभर टिकतो. नंतर त्याची दुसरीकडे बदली केली जाते.

सभापती महोदय, कोकणचा माणूस हा मनी ऑर्डरवर जगतो असे म्हटले जाते, हे खरे की खोटे ते मला माहीत नाही. परंतु मी आपणास सांगू इच्छितो की, जर कोकण विभागासाठी 50 टक्के तरतूद केली तर कोकणातील माणूस मुंबईतील बंद पडलेल्या गिरणी कामगाराचा संसार चालवू शकतो, मोठ्या प्रमाणावर परकीय चलन मिळवून देऊ शकतो इतकी क्षमता त्यांच्यामध्ये आहे. कोकणातील माणसे आळशी, भांडखोर आहेत असे म्हटले जाते. परंतु ते दिवस गेले. आताचे तरुण मेहनती आहेत. गावाकरिता दहा गोष्टी निर्माण करु शकतात,

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

हा आत्मविश्वास आम्हा सर्वांमध्ये असून शासन स्तरावर मेगा प्लॅनिंग केले तर खऱ्याअर्थाने कोकणाला न्याय मिळेल, असे मला वाटते. कोकण विभागाला आजपर्यंत जे मिळावयास पाहिजे होते, ते मिळालेले नाही. कोकणावर सातत्याने अन्याय होत आलेला आहे. या निमित्ताने कोकणवासियांना आपण जर काही दिले तर कोकणवासिय अनेकपटीने जास्तीचा महसूल राज्याला मिळवून देतील, तेवढी क्षमता कोकणामध्ये आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, आपण कोकणाच्या दृष्टीने 5-6 विषयी ठरवून प्रायॉरिटीने योजना करण्यासंबंधी याठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा करावी, ही विनंती. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

धन्यवाद !

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधान परिषद नियम 260 अन्वये याठिकाणी जो प्रस्ताव चर्चेसाठी आलेला आहे, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, कोकणाच्या आर्थिक विकासासाठी विविध सर्वंकष योजनांची आवश्यकता पुन:पुन: मांडण्याची वेळ यावी आणि दरवेळी आढावा घेतल्यावर पूर्वी जाहीर केलेल्या योजनांवर ठोस कारवाई न झाल्याचेच दृष्टोत्पत्तीस यावे, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. पायाभूत सुधारणा हा आर्थिक विकासाचा गाभा आहे. परंतु कोकणासाठी पुरेशी वीज, रस्ते आणि पाण्याची सोय अजूनही झालेली नाही. ग्रामीण विद्युतीकरणाची प्रगती किती झाली आहे आणि कोकणातील किती गावांपर्यंत आणि वाडयापर्यंत वीज पुरवठा झालेला नाही याची माहिती एकत्रित करुन वीज या वाडया-वस्त्यापर्यंत पोहचविण्याकरिता तात्काळ शासनाने योजना आखावी आणि ती कार्यान्वित करावी, कारण त्याची अत्यंत गरज आहे. कोकणातील नद्या फक्त चार महिने दुथडी भरुन वाहतात, परंतु त्या 6 ते 8 महिने कोरडया असतात. कारण, पावसाचे पाणी समुद्रात पोचविणे हेच जणू त्यांचे काम असते. "पाणी अडवा आणि पाणी जिरवा" हे तंत्र कोकणात छोटे बंधारे, तलाव, तळी हयांच्या मदतीने अंमलात आणणे फार आवश्यक आहे.

सभापती महोदय, रस्त्यांची सोय तर अत्यंत अपुरी असून अनेक गांवे बारमाही रस्त्यांपासून वंचित आहेत. मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग सोडला तर बाकी रस्त्यांची स्थिती साधारणत: वाईटच आहे. सागरी महामार्गाची घोषणा 25 वर्षांपूर्वी झाली पण त्यावर ठोस कारवाई अजून झालेली नाही. अद्यापही समुद्र किनाऱ्याची छोटी छोटी गांवे रस्त्यांनं तर सोडाच पण फेरी बोटींनीही जोडलेली नाहीत. काही स्थानिक माणसे फेरी बोटींचा खाजगी व्यवसाय करु इच्छितात. त्यांची गुणवत्ता तपासून ही जलवाहतुकीची सोय स्थानिक जनतेला, पर्यटकांना तसेच मालवाहतुकीसाठीही उपलब्ध करुन द्यावी. किचकट पेपरवर्क आणि अनावश्यक परवान्यांच्या घोळात ही सेवा अडकवू नये. कोकणाचा माणूस डोक्याने हुशार, त्यांना जवळच्याजवळ उच्चशिक्षणाची सोय उपलब्ध झाली पाहिजे,

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी सुरु...

कोकणी माणूस म्हणजे कोर्टकचेऱ्या कज्जे दावे यात गुरफटलेला अशी त्याची प्रतिमा झालेली आहे. त्याच्या मुलाबाळांना शिक्षणाच्या भरपूर सोयी उपलब्ध करुन द्या आणि त्यांच्या बुध्दीमत्तेचा राज्याच्या आणि राष्ट्राच्या उभारणीसाठी वापर करुन घ्या.

सभापती महोदय, कोकणाचे प्रमुख व्यवसाय 1.शेती 2. आंबा, काजू नारळ, सुपारी यांची बागायत ,3. मच्छीमारी आणि 4.पर्यटन हे आहेत. यापैकी शेती आणि बागायत यांना पाण्याची सोय आणि उत्तम रोपवाटीका उपलब्ध केल्यावर त्यात सुधारणा होईलच तरीदेखील मुबलक पाणी कोकणच्या वाटयाला आलेलेच नाही. प्रचंड प्रमाणात नर्सरीज निर्माण करुन उत्तम रोप बागायतीसाठी उपलब्ध करुन द्यावीत त्यासाठी शासनाने भरीव योजना करुन द्याव्यात त्यासाठी शासनाने भरीव योजना आखावी वरवरचे थातुरमातुर काम करु नये तरच शेती आणि बागायत याचे उत्पन्न कोकणाला मिळेल. सुपारी लागवडीखालील जमिनीचा कर माफ करण्याबाबत शासनाने 2005 च्या नागपूर अधिवेशनामध्ये आश्वासन दिले होते त्याची पूर्तता नुकतीच झालेली आहे त्याबद्दल शासनाचे मी आभार मानते. या करमाफीबाबत माजी आमदार श्री. अशोक मोडक यांनी वेळोवेळी विषय मांडला आहे याचा उल्लेख आताच सन्माननीय सदस्य श्री विनोद तावडे यांनी केला आहे.

मच्छीमारांच्या समस्या हा एक फार मोठा गंभीर विषय आहे. पारंपारिक मच्छीमारांच्या समस्या हा एक मोठा गंभीर विषय आहे. पारंपारिक मच्छीमाराचे तोटे, मोठया ट्रॉलर्स चे आक्रमण माशांच्या विशिष्ट जातींचा दुष्काळ, ॲक्वाकल्चर डेव्हलपमेंटला आवश्यक भांडवल पुरवठा आणि प्रशिक्षणाची सोय तसेच मच्छी साठविण्यासाठी शीतगृहे ,कॅनिंग आणि फ्रोझन फीश करण्यासाठी यंत्रणा एक्सपोर्ट करिता लागणारी रेफ्रिजरेटर व्हॅन इ. गोंष्टीची सोय करण्यासाठी उद्योजक व भांडवल यांची व्यवस्था होणे आवश्यक आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या धर्तीवर सहकार चळवळ जोमदार करुन मच्छीमारी सोसायटयांना भांडवल पुरवठा करुन त्यांच्याकडून या योजना राबविल्यास सामान्य जनतेपर्यंत विकासाची फळे पोहोचतील.

पर्यटन व्यवसाय वाढीस लावण्यांसाठी पायाभूत दळणवळणाच्या सोयी हॉटेलच्या संख्येत आणि गुणवत्तेत सुधारणा आणि पर्यटनाच्या सुखसोई बघू शकणारे प्रशिक्षित मनुष्यबळ यांची गरज

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी .....

आहे. 720 कि.मी.चा समुद्रकिनारा आणि समृध्द निसर्गाचं वरदान लाभलेल्या कोकणात पर्यटनाला फार मोठा वाव आहे. सिंधुदूर्गसाठी जो विमानतळाचा प्रस्ताव आहे तो कार्यान्वित होणे आवश्यक आहे. कोकणात मैलोनमैल लांबीच्या सुंदर मुलायम वाळूच्या चौपाटया आहेत. निसर्गरम्य डोंगरद-या आहेत. किल्ले आहेत विशेषत: समुद्रातील किल्ले पण सगळे दुर्लक्षित मुरुडच्या जंजिरा किल्ल्याला मी अनेकदा भेट दिली आहे. इतका सुंदर किल्ला पण त्याची मुळीच देखभाल केली जात नाही. आर्कियालॉडीकल डिपार्टमेंट कडून परवानगी घेऊन जंजि-याची देखभाल करण्याची तरतूद करणे आवश्यक आहे. तसेच गणपतीपुळे,हरीहरेश्वर या तीर्थक्षेत्रांचे धार्मिक महत्त्व आणि रिलीजियस टुरिझमचे पोटेन्शियल विचारात घेऊन खास विकास करावा. कोकणाच्या विकासासाठी कोकणाला उर्वरीत महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळामध्ये गुरफटवू नका.

यानंतर श्री. रोझेकर ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी.....

कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास महामंडळ द्यावे तरच कदाचित कोकणच्या विकासाला चालना मिळेल. सभापतीस्थानी असलेले सन्माननीय तालिकासभापती, श्री.उल्हास पवार हे उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आहेत. ते कोकणाकडे थोडेफार लक्ष देतात. पण तेवढे पुरेसे नाही. कोकणच्या विकासाकडे यापुढे अधिक दुर्लक्ष करणे तुम्हा, आम्हा, कोणालाही परवडणारे नाही, असे आवर्जून सांगू इच्छिते. कोकणवासियांच्या भावनांचा उद्रेक झाला तर तो आटोक्यात आणणे शासनाला कठीण जाईल, एवढा इशारा देऊन शासनाने कोकणच्या विकासासाठी ठोस पावले उचलावित, अशी विनंती मी आपल्या माध्यमातून करते. धन्यवाद.

जय हिंद. जय महाराष्ट्र.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, येत्या काही काळात मंत्रिमंडळात होणारे संभाव्य बदल लक्षात घेऊन सन्माननीय सदस्या, श्रीमती सुधा जोशी यांनी शासनाला इशारा दिला आहे की काय ?

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, आम्ही जर-तर वर अवलंबून नसतो.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य, श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी कोकण विकासासंबंधीचा प्रस्ताव मांडला व या प्रस्तावावर सभागृहात चर्चा सुरु आहे.

सभापती महोदय, आम्ही सर्वपक्षीय सदस्यांनी सभागृहात अशी मागणी केली होती की, या प्रस्तावावरील चर्चेला माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी आमची मागणी मान्य केली व आज ते सभागृहात उपस्थित आहेत. मी कोकण विभागाच्या वतीने त्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, चर्चेत सहभागी झालेल्या सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची पुनरावृत्ती न करता केवळ चार महत्वाचे मुद्दे मी मांडणार आहे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी चर्चेत भाग घेत असतांना असे सांगितले की, रायगड जिल्हयातील काळ प्रकल्पाचे पाणी सन 1962 ते सन 1967 पर्यन्त जिल्हयातील शेतक-यांना देण्यात येत होते. अंबातीर कालवा अलिबाग तालुक्यामध्ये येणार होता. परंतु, मला आपल्या माध्यमातून माननीय मुख्यमंत्र्यांच्या हे लक्षात आणून द्यावयाचे आहे की, रायगड जिल्हयामध्ये जे जे पाटबंधारे प्रकल्प आले त्या प्रकल्पातून शेतीला पाणी न देता उद्योगधंद्यांना देण्यात आले त्यामुळे या जिल्हयातील सर्व शेती ओसाड पडली आहे. रोहा, माणगाव या तालुक्यांमध्ये काळ प्रकल्पाचे पाणी आले. परंतु, तेथील कालव्यांची दुरुस्ती करण्याची आर्थिक कुवत स्थानिक पाटबंधारे कार्यालयाची नाही. चौक येथील प्रकल्पाचीही अवस्था तशीच आहे. मोरबाड धरण जवळ जवळ 200 कोटी रुपये खर्च करुन बांधले. परंतु, या प्रकल्पातील सर्व पाणी शेतीला देण्याऐवजी नवी मुंबई मधील उद्योगधंद्यांना देण्यात आले आणि त्यामुळे या परिसरातील शेती व्यावसायिक पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहेत. अंबातीर धरणामुळे अलिबाग व पेण हे दोन्ही तालुके वीस वर्षांपूर्वीच सुजलाम-सुफलाम झाले असते.

सभापती महोदय, सन्माननीय श्री.मोहन पाटील हे राज्यमंत्री असतांना त्यांनी हेटवणे प्रकल्पासाठी स्वत:ची 200 एकर जमीन दिली. पण या प्रकल्पाचे पाणी सिडकोला देण्यात आले. एवढेच नव्हे तर आता पेण तालुक्यातील 25 गावातील शेतजमीन सरकार सेझसाठी घेत आहे. जे नियोजन वीस वर्षापूर्वी पाटबंधारे विभागाने कोकणासाठी केले होते त्याकडे नंतरच्या कालावधीत संपूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. ..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्री दोन वेळा अलिबाग तालुक्यात आले होते. आम्ही त्यावेळी सांबरकुंड धरणाची मागणी केली. त्याप्रमाणे टेंडर निघाले पण कामाला अद्याप सुरुवात झाली नाही. निधी अपुरा असल्याचे सांगितल्यामुळे मी बँकेतर्फे 100 कोटी रुपये मंजूरीचे पत्र दिले, तरी देखील अद्याप कामाला सुरुवात झालेली नाही, शासनाने त्याची दखल घेतलेली नाही. सन्माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत, माननीय अर्थमंत्री देखील उपस्थित असावयास हवे होते. माननीय अर्थमंत्र्यांची मागील पाच भाषणे माझ्याकडे आहेत. त्यातील बंदर विकासाचा परिच्छेद पाचही भाषणात एकसारखा आहे. तोच परिच्छेद, तेच शब्द, कशाचाही फरक केलेला नाही. गेल्या सात वर्षातील भाषणातील बंदर विकासाचा परिच्छेद एकसारखा आहे. किती किलोमीटर बंधा-यांचे काम होऊ शकते, याचा अभ्यास कोणी केला आहे का ?

यानंतर कुमारी जयश्री.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ SBT/MAP प्रथम श्री.रोझेकर..... 17.35

श्री.जयंत प्र.पाटील.....

कोकणातील एकूण 720 किलोमीटर समुद्र किनारपट्टी पैकी फक्त सुमारे 150 किलोमीटरमध्ये आपण त्या ठिकाणी बंदरांचा विकास करु शकतो. उर्वरित बाकीचा सर्व " ओपन सी " आहे. ठाण्यापासून रायगडपर्यंतच्या समुद्रकिना-यावर आपण जे.टी.बांधू शकतो परंतु आतापर्यंत 20 फुटाच्या समुद्रकिना-यावर सुध्दा जे.टी.बंदरांचा विकास या सात ते दहा वर्षामध्ये झालेला नाही, हे दुर्दैव आहे. आपण दरवर्षी बंदरांच्या विकासाबाबत बोलतांना अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या निमित्ताने, अर्थसंकल्पावरील अभिभाषणाच्या निमित्ताने तेच तेच बोलता, तेच तेच सांगतात परंतु प्रत्यक्ष बंदरांचा विकास ख-या अर्थाने अद्यापही झालेला नाही. या भागात बंदरांचा विकास करण्यासाठी बी.ओ.टी. तत्वावर उद्योजक का येत नाहीत, याचाही गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना एक विनंती करतो की, त्यांनी कोकणातील आमदारांना आपला एक दिवस द्यावा व आमच्या व्यथा समजून घेऊन आमच्याकडे असलेल्या कल्पनांना वाव द्यावा. मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. आमच्या कोकणवासियांना सरकारने काहीतरी दिलासा द्यावा, अशी सरकारला मी या निमित्ताने विनंती करतो. बंदरांच्या विकासाबाबत असणारा मुख्य प्रश्न म्हणजे गाळाचा आहे. कोकणातील संपूर्ण बंदर क्षेत्र हा एक दुर्लक्षित भाग आहे. कोकणाच्या सर्वांगीण विकासाकरिता जर शासनाने दरवर्षी 100 कोटी रुपयांची तरतूद केली तर दरवर्षी कोकणातून या शासनाला 1,000 कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाल्याशिवाय राहणार नाही. बंदरांमधील गाळ काढावयाचा परंतु कोणी काढावयाचा एम.एम.डी.ने,सार्वजनिक बांधकाम खात्याने की माननीय मुख्यमंत्री महोदयांनी कारण त्यांच्याकडे बंदरविकास खाते आहे, या वादामध्ये दोन वर्ष लॅप्स झाली. आपण बंदरांच्या विकासाकरिता दोन कोटी रुपये मंजूर केले होते परंतु अद्यापही तेथे कामास सुरुवात झालेली नाही, या चर्चेच्या निमित्ताने आपण याबाबत गांभीर्याने विचार केला पाहिजे. आपल्याला मध्यंतरी चार दिवस सुट्टी होती. मी त्या सुट्टीच्या काळामध्ये बँगलोर येथे गेलो होतो. मला ब्रेकफास्टमध्ये सुध्दा मच्छी लागते, त्याशिवाय माझ्या दिवसाची सुरुवातच होत नाही. मी ब्रेकफास्ट करण्याकरिता नेहमीप्रमाणे मच्छी आणावयास उडिपीमध्ये गेलो असता मला तेथील बंदरांचा व तेथील व्यवस्थापनेचा विकास झाल्याचे आढळून आले. मी कामानिमित्त बँगलोर,दुबई येथे व्यवसायानिमित्त गेलो असता मला नेहमी तेथील बंदरविकास बघून आपल्या येथील बंदरांची आठवण होते. कर्नाटक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

सरकारनेही बंदरांच्या विकासाच्या क्षेत्रामध्ये फार मोठे पाऊल उचललेले आपल्याला आढळून येईल. कर्नाटकमध्ये जे.टी.बंदरांचा विकासही मोठया प्रमाणावर झालेला आहे, तेथील मच्छीमारांच्या विकासाच्या दृष्टीने निर्माण केलेल्या सोयी सवलती बघितल्या तर आपल्याला असे दिसून येईल की, बर्फाची फॅक्टरी,कोल्ड स्टोरेज फॅसिलिटी, स्वच्छता, वगैरे सर्व सुविधा मच्छीमार व्यवसायिकांना उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. आपल्याला जागतिक मार्केट मुंबईमध्ये उपलब्ध असतांना देखील आपण बंदरांचा विकास अजून करीत नाही, याउलट बँगलोर येथील मालाला जागतिक बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी तेथील माल मुंबईमध्ये आणावे लागते. ही सगळी बंदरे विकसित करण्याच्या दृष्टीकोनातून केंद्रसरकारकडून आलेले पैसे संपूर्ण प्रक्रिया करुन जर कोकणाच्या विकासाकरिता संपूर्णत :वापरले तर कोकणाचा विकास हा उत्तमप्रकारे होऊ शकतो. या शासनाने कोकणामध्ये ॲग्रीकल्चर टुरिझमला मान्यता द्यावी. कोकणातील जो पर्यटन व्यवसाय आहे. त्याला कृषी पूरक उद्योग म्हणून मान्यता द्या म्हणजे या व्यवसायाच्या विकासाला नाबार्डकडून अर्थसहाय्य व सेल्सटॅक्समध्ये सवलत मिळू शकते, यामध्ये शासनाला कुठलीही अडचण किंवा आर्थिक झीज पडणार नाही. कोकणातील पर्यटन व्यवसायाला ॲग्रीकल्चर टुरिझम म्हणून जर मान्यता दिली तर खरोखर कोकणाचा सर्वांगीण विकास होण्यास मदतच होईल. सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी यांनी रस्त्यांच्या बाबतीत जो मुद्दा मांडला त्याबद्दल माझे मतभेद आहेत कारण रस्ते कोकणामध्ये भरपूर झालेले आहेत. कोकणामध्ये रस्ते अगदी छोटया छोटया गावांच्या टोकापर्यंत पोहोचविण्यात आलेले आहेत. 90 टक्के रस्त्यांचे काम कोकणामध्ये पूर्ण झालेले आहे.

यानंतर श्री.बोरले.....

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील .....

मुरुड तालुक्यामध्ये एकही गाव असे नाही की, त्या गावामध्ये रस्ता नाही. मुरुड तालुक्यामध्ये शेतकरी कामगार पक्षाचे राज्य आहे.

सभापती महोदय, नारळ आणि सुपारीच्या बाबतीत काही सन्माननीय सदस्य बोलले. नारळ आणि सुपारीच्या बाबतीत माजी सन्माननीय सदस्य श्री.अशोक मोडक नेहमी बोलत असत. शासनाने नारळ आणि सुपारीला हमी भाव दिला पाहिजे. मलबारी तेथे येऊन कवडीमोल भावाने नारळ आणि सुपारीची खरेदी करतात. माझी 12 एकराची वाडी आहे. ती वाडी मी मलबारींना दिलेली आहे. शासनाने कृषि उत्पन्न बाजार समितीमार्फत नारळ आणि सुपारीची खरेदी केली पाहिजे. मलबारी एक सुपारी 60 पैशाला खरेदी करतो आणि ती बाहेर 1 रुपया 20 पैशाला विकतो. तसेच, मलबारी 2 ते 3 रुपयाला नारळाची खरेदी करतो आणि बाहेर 8 रुपयाला विकतो. शासनाने कापसाला, धानाला, ऊसाला हमी भाव दिला. त्याप्रमाणे नारळाला आणि सुपारीला हमी भाव दिला पाहिजे, अशी माझी मागणी आहे. जेणे करुन शेतक-यांना नारळाचे आणि सुपारीचे उत्पन्न घेण्यामध्ये आनंद वाटेल. सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी मांडलेला एक मुद्दा मी खोडणार आहे. मी कोकण कृषि विद्यापीठाच्या सिनेटवर होतो. कोकण कृषि विद्यापीठामध्ये चांगले अधिकारी आहेत. कोकणामध्ये रोपांचे उत्पादन मोठया प्रमाणावर आहे. परंतु त्याला मार्केट नाही. आंब्याची कलमं कोकण कृषि विद्यापीठाकडे पडून आहेत. अनेक तरुणांनी नर्सरीच्या माध्यमातून चांगली रोपे तयार केलेली आहेत. त्या रोपांची विक्री करण्यासाठी शासनाने मार्केट व दळणवळणाची सुविधा उपलब्ध करुन दिली पाहिजे. कोकण कृषि विद्यापीठातील अधिकारी आणिशास्त्रज्ञ चांगल्या प्रकारे काम करीत आहेत. मी स्वत: 5 वर्षे त्यांच्या बरोबर काम केलेले आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित आहेत. दापोली हा पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत चांगला स्पॉट आहे. दापोली कृषि विद्यापीठामध्ये इन्फ्रास्ट्रक्चर तयार आहे. परंतु एम.टी.डी.सी.ने पर्यटनाच्या दृष्टीने चांगली व्यवस्था केली तर मुंबईमध्ये येणारे पर्यटक तेथे येऊ शकतील. दापोली हे चांगले पर्यटन स्थळ आहे. दापोली येथे येणा-या पर्यटकांची संख्या वाढली तर शासनाला मोठया प्रमाणावर उत्पन्न मिळेल. कोकण कृषि विद्यापीठाचे 9 कोटी रुपयांचे उत्पन्न

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील .....

आहे. त्यापैकी 8 कोटी रुपये कोकण कृषि विद्यापीठातील अधिका-यांच्या पगारावर खर्च होत आहेत. तेथे काम करणा-या अधिका-यांची शासनाने पाठ थोपटली पाहिजे आणि त्यांचे कौतुक केले पाहिजे. मी स्वत: तेथे काम केलेले आहे. शासनाचे पश्चिम महाराष्ट्राकडे जास्त लक्ष आहे. शासनाने कोकणाकडे थोडेसे लक्ष दिले तर निश्चितपणे कोकणामध्ये आर्थिक क्रांती आणि तरुणांना रोजगार उपलब्ध होईल. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी कोकण विकासाच्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देतांना कोकणातील तरुणांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने दिलासा द्यावा, अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

यानंतर श्री.गागरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी कोकणच्या विकासाच्या संदर्भात जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. कोकणाच्या विकासाचा खरा मूलमंत्र कोणता असेल तर तो पाणी आहे. कोकणच्या प्रश्नावर सर्वांनी आपापले विचार मांडले असून मी ते ऐकले आहेत. काही सन्माननीय सदस्यांनी कोकणातील सागरी किनाऱ्याबद्दल विचार मांडले आहेत. कोकणातील ठाणे, रायगड किंवा खास करुन रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्हयांचा विचार केला तर एका बाजूला संपूर्णपणे सहयाद्री पर्वत आहे तर दुसऱ्या बाजूला सागरी किनारा आहे. यामधून मुंबई ते गोवा महामार्ग जात आहे. सहयाद्रीच्या सीमेवर दुसऱ्या बाजूला कोल्हापूर जिल्हा लागतो, अशी कोकणची भूरचना आहे.

सभापती महोदय, मी सुरुवातीलाच एक वाक्य बोललो आहे की, कोकणाच्या विकासाच्या खरा मूलमंत्र पाणी आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे हे कोकणातील आंब्याबाबत बोलले आहेत, तसेच केनींगबाबत बोलले आहे. हा सर्व विषय सागरी किनाऱ्यापासून 25 कि.मी. अंतरावर असलेल्या गावाच्या संदर्भात आहे, तेथे आंब्याचे उत्पादन बऱ्यापैकी आहे. जसजसे तुम्ही सहयाद्रीकडे जाता तसे तिकडे आंब्याचे उत्पन्न घेता येत नाही. दोन पट्टयातील आंब्याचा दर्जा, उत्पन्न व चव वेगळी असते. सहयाद्रीच्या सर्व पट्टयात आंब्याचे उत्पन्न येत नाही, आले तरी त्याचा चव, दर्जा व प्रत वेगळी असते व त्यापासून उत्पन्न कमी मिळते. देवगडच्या पट्टयात एका झाडाला 50 पेटया आंबे येतात. कणकवली व वैभववाडी तालुक्यात कोणी हौसेने आंबा लावला तर 5-10 पेटया आंबा येतो, एवढी तफावत आहे.

सभापती महोदय, आंबा उत्पादनाचा विचार करताना मी कोकणातील पाणी प्रकल्पाच्या संदर्भात अधिक बोलणार आहे. 1980 साली श्री.ए.आर.अंतुले यांनी कोकण सिंचन उच्चाधिकार समिती नेमली. महाराष्ट्राचे पाटबंधारे मंत्री श्री.बी.जे. खताळ यांच्या अध्यक्षतेखाली ही कोकण सिंचन विकास उच्चाधिकार समिती नेमली होती. या समितीने कोकणातील चार जिल्हयांतील 20 प्रमुख खोऱ्यांच्या विकासासाठी बृहत आराखडा तयार केला. या 20 खोऱ्यामध्ये 7 मोठे, 96 मध्यम, 417 लघु राज्यस्तर प्रकल्प व लघु स्थानिक स्तर प्रकल्प उभारण्याचे योजले होते. या प्रकल्पांद्वारे 3 लाख 67 हजार 132 हेक्टर जमीन सिंचनाखाली येऊ शकेल असा अभ्यास केला गेला होता.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MAP/ KGS/

श्री.अरविंद सावंत.....

त्या समितीचा अहवाल शासनाकडे आला होता, त्याचे पुढे काय झाले ? शासनाने काही व्यवहार्य सूचनाही केल्या होत्या, पण कोणत्याही शासनाने त्या प्रत्यक्षात उतरविल्या नाहीत.

सभापती महोदय, मला हे उदाहरण सांगण्यास खेद होतो की, कणकवली तालुक्यात मौजे घोंडसरी येथील देवघर मध्यम पाटबंधारे प्रकल्पास 1979 साली प्रशासकीय मान्यता मिळाली. तेव्हा या प्रकल्पाचा खर्च सुमारे 1548.31 लक्ष रुपये होता. 1994 साली दुसऱ्यांदा प्रशासकीय मान्यता घ्यावी लागली, तेव्हा 7098 लाख एवढा खर्च अपेक्षीत होता. त्यानंतर तिसऱ्यांदा प्रशासकीय मान्यता घेतली तेव्हा या प्रकल्पाचा खर्च 17,497 लाख एवढा होता. कोकणातील प्रकल्प दुर्देवाच्या फेऱ्यात अडकले आहेत. परंतु सुदैवाने या प्रकल्पाचे काम सुरु झाले असून तो पूर्णत्वास जाऊ शकतो. सध्या या प्रकल्पाला 20 कोटी रुपयांची गरज असतानाही शासनाने पुरेसा निधी दिलेला नाही.

नंतर श्री.सुंबरे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ....

यातून या प्रकल्पासाठी 1064 मीटर लांबीचे आणि 53.58 मीटर उंचीचे मातीचे धरण प्रस्तावित आहे. त्यातून पुढे जो कालवा काढायचा, त्यांना पाणी द्यायचे पण आजही हा प्रकल्प झाला नसल्याने पाणी नाही आणि पुनर्वसनाचा प्रश्न आहे तो वेगळाच. अगोदरच कोयनेच्या पुनर्वसनाचा प्रश्न अजूनही लोंबकळतो आहे. सभापती महोदय, हा प्रकल्प 1979 सालचा असून आज 28 वर्षे झाली पण अजूनही त्यावर कोणतेही काम झालेले नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील टाळंबा प्रकल्प हा मोठा प्रकल्प आहे, या शिवाय नरवडे, घोणसरी-देवधर, वैभववाडी-अरूणा, शिंरशिंगे,सावंतवाडी हे मध्यम प्रकल्प आहेत तसेच 35 लघू पाटबंधारे प्रकल्प आहेत. गेल्या 35 वर्षांमध्ये यातील एकही प्रकल्प पूर्ण झालेला नाही. मी हे येथे संपूर्णत: सत्य मांडत आहे, वस्तुस्थिती मांडत आहे. त्यात काही दुरूस्ती सन्माननीय सदस्य श्री.कुलकर्णी यांना करावयाची असल्यास ते जरूर करू शकतात. सभापती महोदय, आज हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 2400 कोटी रूपयांची गरज आहे. कोकणाचा 2000 कोटीचा सिंचनाचा अनुशेष आहे पण तरीही शासन त्याबाबत शांत आहे. सभापती महोदय, सुरूवातीस मी ज्या नरडवे प्रकल्पाचा उल्लेख केला त्यामध्ये दोन कालवे काढले होते. एक 72 कि.मी. लांबीचा उजवा कालवा आणि दुसरा 15 कि.मी.लांबीचा डावा कालवा. तेथील जनता या प्रकल्पाची आणि या कालव्यांची मोठी अपेक्षा करीत आहे पण शासनाने आता ते रद्द केले आहेत आता हे पाणी कोठे सोडून देणार तर ते धरणामध्ये सोडले जाणार आहे. सभापती महोदय, एकीकडे सन्माननीय श्री.शरद पवार यांनी बाष्पी भवनातून पाणी वाया जाऊ नये म्हणून पाईपलाईन द्वारा पाणी देण्याचे ठरविले असताना हे कालवेच आपण रद्द केले आहेत आणि त्यामुळे कणकवली तालुक्यातील डीगवळे, नाटळ, कुंभवडे, भिरंवडे, हरकुल बुद्रुक, हरकुळ खुर्द इ. 25 गावे पाण्यापासून वंचित राहणार आहेत. त्यामुळे के.टी बंधाऱ्यांमध्येही पाणी राहणार नाही. म्हणून मी याद्वारा शासनाचे लक्ष वेधतो. सभापती महोदय, केंद्रीय शासनानेदेखील नियोजन मंडळाचे श्री.एस.एस.स्वामीनाथन् यांचा पश्चिम घाटातील अभ्यास करण्यासाठी एक अभ्यासगट स्थापन केला होता आणि त्यांनी सूचना करूनही त्याचा काहीही उपयोग झालेला नाही. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये एकत्रित क्षेत्र 13040 पैकी 1084 क्षेत्र हे बिनशेती होते, पोटखराब्याची जमीन वगळता लागवडीस अयोग्य असलेली 8 टक्के जमीन आहे म्हणजे प्रत्यक्ष लागवडीस योग्य म्हणजे शेती करण्यायोग्य अशी जमीन 7898 इतकी आहे. त्यातील बहुतांश जमीन फलोद्यानाखाली आलेली

..... 3टी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ....

आहे. परंतु तेथे शेती म्हणजे केवळ भातशेती आणि तीही जिराईत. संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये दुपिकी जमीन आढळणार नाही आणि फळांसाठी देखील 3 महिन्यामध्येच पीक घेतले जाते. सभापती महोदय, या प्रस्तावाला पाठिंबा देताना काही सूचना मी येथे करू इच्छितो. कोकण सिंचन महामंडळ आपण केले पण त्याचे पुढे काय झाले ? काहीही नाही. म्हणूनच आता कोकण वैधानिक विकास मंडळाची मागणी केली गेली आहे तिला माझा पाठिंबा आहे. सभापती महोदय, देवगड तालुक्यात सैतावडे नावाचा एक धबधबा आहे, वर्षाचे 365 दिवस हा धबधबा वाहत असतो. परंतु तेथे एक बंधारादेखील बांधण्याचे शासनाला आजवर सुचलेले नाही. त्यावर वीज सुद्धा निर्माण आपण करू शकतो. पण त्याकडेही लक्ष दिले गेलेले नाही. देवधर मध्यम प्रकल्प 20 कोटीसाठी गेल्या कित्येक वर्षांपासून रखडलेला आहे. त्यामुळे कोकणामध्ये पाणी नसते. सभापती महोदय, मला आमचे तेथील दिवस आठवतात. येथे म्हटले गेले की, सारी कोकणातील माणसे मुंबईतच असतात. पण मी आपल्याला सांगतो की, उन्हाळ्यामध्ये आम्ही तेथे गेलो तर आम्हाला तेथे पाणीच मिळत नाही. नद्यांचे प्रवाह थांबलेले असतात, सारे पाणी संपलेले असते. माझ्या घरापासून जवळपास अडीच तीन कि.मी. पासून आम्हाला डोक्यावरून पाणी वाहून आणावे लागते. ....

(यानंतर श्री. सरफरे ..... 3यू 1 ..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

आज नळ पाणी योजना तयार केली तरी सुध्दा त्या योजनेसाठी आवश्यक असलेले पाणी मिळत नाही. पहिली गोष्ट अशी की, जर लोकांना पिण्यासाठी पाणी मिळत नसेल तर सिंचन दूर राहिले. म्हणून कोकणासाठी असलेले निकष आपण बदलले पाहिजेत अशी आमची मूळ मागणी आहे. गेल्या कित्येक वर्षापासून आम्ही मा. श्री. बाळासाहेब थोरात यांना सांगत आहोत की, कोकणातील एका कोल्हापूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीच्या कामासाठी 10 लाख रुपये खर्च येतो. आणि पश्चिम महाराष्ट्रातील, उत्तर महाराष्ट्रातील त्याच कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याच्या दुरुस्तीच्या कामासाठी अर्थसंकल्पामध्ये, पूरक मागण्यांमध्ये 50-50 लाखाची तरतूद केलेली असते. एका बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी 10 लाख रुपये मागितले तर आपण पाणी वापर संस्था स्थापन करा म्हणून सांगितले जाते. ही संस्था स्थापन करण्यासाठी पहिल्यांदा बंधाऱ्यामध्ये पाणी असले पाहिजे. तेव्हा प्यायला पाणी नसेल तर सिंचन कोठून करणार, आणि संस्था निर्माण करुन काय करणार? तेव्हा या चर्चेच्या निमित्ताने माझी अशी मागणी आहे की, आपण कोकणासाठी डोंगरी विभागाचे निकष लावणार आहात की नाही? सद्या असलेले निकष आपण बदलले पाहिजेत ते बदलले जात नाहीत? त्यामुळे कोकणातील प्रकल्पांची कामे अडली आहेत. मी मघाशी उल्लेख केला होता की, कोकणामध्ये सम पातळीवर जमीन आढळत नाही. संपूर्ण सहयाद्री पट्टयाचा विचार करतो त्यावेळी सर्व जमीन ही पायऱ्या पायऱ्यांनी उतारावर असलेली दिसते. नदीचा प्रवाह सुध्दा उतारावरुन जोरात येतो. ज्यावेळी आपण पाण्याचा वापर करण्यासंबंधी विचार करतो त्यावेळी आपले निकष वेगळे आहेत याचाही विचार केला पाहिजे. आमच्याकडे छोटेसे 2 कोटीचे धरण बांधावयाचे होते, त्याकरिता थोडीशी जमीन लागणार होती. त्या प्रकल्पामध्ये शेतकऱ्याची जमीन जात नव्हती तरी सुध्दा तो प्रकल्प अडला. याचे कारण तो प्रकल्प निकषामध्ये बसत नव्हता. त्या प्रकल्पामुळे 250 हेक्टरपेक्षा कमी जमीन सिंचनाखाली येईल म्हणून प्रस्ताव अमान्य करण्यात आला. अशाप्रकारचे अनेक धरणांचे, कालव्यांचे प्रस्ताव आपण अमान्य केले. माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी आपण सत्ताधारी पक्षामध्ये आहात. आपण सर्वांनी मिळून कोकणासाठी असलेले हे निकष आपण बदलले पाहिजेत. कमी सिंचन क्षेत्र असले तरी आपण प्रकल्प मंजूर केले पाहिजेत. कोल्हापूर, सातारा जिल्हयामध्ये, पश्चिम महाराष्ट्रामध्ये मैलो न मैल सपाट जमीन दिसते . तेव्हा उतारावरुन पाईपलाईनव्दारे पाणी आणले तर लोकांना प्यायला पाणी मिळेल, सिंचनासाठी पाणी मिळेल, नदी समृद्ध होईल आणि कोकणातील माणूस मुंबईत येणार नाही. कोकणामध्ये तीन महिने भात शेती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

केल्यानंतर उत्पन्नाचे कोणतेही साधन उपलब्ध नाही. तेथील वशिष्ठी, सावित्री नदीचे पाणी कोयनेतून वाहत जाते. कित्येक वर्षापासून तज्ज्ञांनी सुचविले आहे की, हे पाणी आपण उचला आणि ते तळ कोकणाकडे न्या. त्या संदर्भात सुध्दा विचार केलेला नाही. तो प्रकल्प करण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये एका पैश्याची सुध्दा तरतूद केली जात नाही. या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना भेटलो असतां त्यांनी सांगितले की, भू स्तरामध्ये जांभा दगड असल्यामुळे त्याला पाण्याचा झिरपा जोरात आहे. त्यामुळे हे पाणी आपल्याला अडविता येत नाही. जोपर्यंत आपण ही संकल्पना बदलत नाही तोपर्यंत कोकणचा विकास होणार नाही. वैधानिक विकास मंडळ केले तरी जोपर्यंत धरणामध्ये पाणी थांबणार नाही तोपर्यंत कोकणात समृध्दी येणार नाही. म्हणून पाणी अडविणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे कोकणामध्ये तुकडे बील या संदर्भात आणखी एक सूचना करु इच्छितो. कोकणामध्ये चार भावंडाची 20 एकर वडिलोपार्जित जमीन असेल तर त्यामधील काही जमीन लागवडी योग्य असते. एखाद्याच्या वाटयाला लागवडी योग्य जमीन येत असेल तर बाकीची पोट खराबा जमीन इतरांना मिळेल. त्याकरिता तुकडे बील आणण्यात आले. त्यामुळे लागवडी योग्य जमीन कोणती आहे हे पाहून ती चार भावंडामध्ये तुकडे करुन देण्यात आली. अशाप्रकारे वडिलोपार्जित असलेल्या 20 एकर जमिनीचे तुकडे केल्यानंतर त्या जमिनीमध्ये कोणत्याही प्रकल्पाचे काम हाती ध्यावयाचे असेल तर त्यापैकी एक 200 चौरस फूटाचा तुकडा एका भावाचा तर त्याला लागून असलेला दुसरा तुकडा दुसऱ्या भावाचा असतो. त्याठिकाणी सलग एकाच मालकाची जमीन नसल्यामुळे त्यामधून अडचणी निर्माण होतात. त्यावर मात करण्यासाठी पिण्याकरिता पाण्याबरोबर सिंचनाकरिता पाणी दिले पाहिजे व त्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी आपण पुरविल्या पाहिजेत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोकणामध्ये आंब्याचे पीक होते, ही समाधानाची बाब आहे. ती आम्हाला मिळालेली वडिलोपार्जित देणगी आहे. देवगडच्या आंब्याची चव कणकवलीच्या आंब्याला येत नाही. याचे कारण पाण्याची, जमिनीची नैसर्गिक ताकद आहे. आपण मोठी धरणे महाराष्ट्रामध्ये करतो. त्याचे पाणी पाटाने किंवा पाईपलाईनने आपण देत नाही म्हणून माझी अशी सूचना आहे की, कोकणात प्रत्येक गावनिहाय छोटी धरणे, गावतळी होणे आवश्यक आहे. नद्यांच्या प्रवाहामध्ये जितके म्हणून बंधारे घेता येतील तेवढे घ्यावेत, तेथील सर्व गाव जलमय झाले पाहिजे तरच जमिनीच्या पाण्याची पातळी वाढेल. माझ या गावच्या घराजवळ पाच बोअरवेल घेतल्या. साडेतीनशे मिटर खोदल्यानंतर त्यापैकी एका बोअरला पाणी लागले. त्यामधून किती पाणी मिळेल हे माहीत नाही. माझी मागणी आहे की, गावनिहाय जेथे जेथे बंधारे घेता येतील तेवढे घ्यावेत, नदीच्या पात्रावर किंवा जिथे जिथे जमीन मिळेल तेथे किमान 2 कोटी रुपयांचे बंधारे करावेत. परंतु यासंबंधीचे निकष बदलल्याशिवाय बंधाऱ्याचे कोणतेही काम करता येणार नाही. आपण केवळ भावनाविवश होऊन चालणार नाही, परंतु निकष बदलण्याची गरज आहे. गाव तेथे धरण प्रकल्प राबविला तर आपण यशस्वी होऊ.

शेवटी मी लहानशी मागणी करू इच्छितो की, सागरी महामार्गाचा विषय चर्चेला गेला. सागरी उत्पन्नाच्यासंदर्भात सांगायचे झाले तर सागरी विद्यापीठ निर्माण करण्याचा विचार केला पाहिजे. मध्यंतरी केंद्र सरकारने सागरी विद्यापीठाचा प्रस्ताव ठेवला होता. सागरी विद्यापीठ चेन्नई येथे जाणार असे म्हटल्याबरोबर केंद्र सरकारमध्ये असलेले पश्चिम बंगामधील लोकप्रतिनिधी एकत्र आले आणि त्यांनी उठाव करून आम्हाला सागरी विद्यापीठ पाहिजे म्हणून केंद्र सरकारच्या विरोधामध्ये गेले. आपल्याकडे 720 कि.मी.चा समुद्र किनारा लाभलेला आहे असे असताना मग आपल्याकडे सगरी विद्यापीठ का होऊ शकत नाही ? भारती विद्यापीठ सागरी विद्यापीठ काढू शकेल. कोकणामध्ये पर्यटनाचा विषय मांडला गेला, त्याचबरोबर पंचतारांकित हॉटेल होण्याबाबतचीही चर्चा करण्यात आली. असे असले तरी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होणार आहे. पंचतारांकित हॉटेल्सना 24 तास पाणी वाहवत ठेवावे लागते. पिण्यासाठी पाणी उपलब्ध होत नाही त्या ठिकाणी पंचतारांकित हॉटेल्स कशी होणार ? या निमित्ताने पुन्हा एकदा मागणी करतो की, कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास महामंडळ निर्माण करावे. गाव तेथे धरण प्रकल्प राबवावा आणि सागरी विद्यापीठ निर्माण केले पाहिजे. अशी सूचना करून, आपण मला बोलण्याची संधी दिलबद्दल आपणास धन्यवाद देतो आणि माझे दोन शब्द संपवितो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभने निवडलेले) : सभापती महोदय, ज्येष्ठ नेते सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी कोकणच्या विकासासंबंधीची चर्चा उपस्थित केलेली आहे त्या चर्चेच्यावेळी मघाशी माननीय मुख्यमंत्री महोदय या ठिकाणी उपस्थित होते त्याबद्दल त्यांना धन्यवाद देते. अनेक सन्माननीय सदस्यांनी कोकणच्या विकासाच्या संदर्भात अनेक विषयावर चर्चा घडवून आणलेली आहे.

सभापती महोदय, नररत्नांची खाण असलेल्या, परशुरामाची भूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोकणला निसर्गाचाही वरदहस्त लाभलेला आहे. 720 कि.मी. लांबीचा लाभलेला समुद्रकिनारा, वर्षाला 100 ते 300 इंचापर्यन्त पडणारा पाऊस आणि लाभलेली खनिज संपत्ती ही या भूमिला मिळालेली निसर्गाची मोठी देणगी आहे.

यानंतर श्री.बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे .....

सभापती महोदय, स्वातंत्र्यपूर्व काळात परकीय राजवटीत उपेक्षित राहिलेल्या या भूमीला स्वातंत्र्याच्या 60 वर्षानंतरही न्याय मिळालेला नाही. ही या भूमीत वास्तव्य करणाऱ्या जनतेचे दुर्दैव म्हणावे लागेल. कोकणाचा 720 किलोमीटर लांबीचा समुद्र किनारा ही केवळ कोकणालाच नव्हे तर या राज्याला मिळालेली दुसरी नैसर्गिक देणगी आहे. पण दूरदृष्टी अभावी या देणगीकडे राज्य शासनाने आजवर पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. सुयोग्य नियोजन करुन गेल्या 25 वर्षात मत्स्योत्पादनाचा विकास घडवून आणला असता तर अन्न, परकीय चलन व रोजगार निर्मिती असा तिहेरी लाभ झाला असता. केरळ राज्याचा समुद्र किनारा महाराष्ट्र राज्याच्या समुद्र किनाऱ्यापेक्षा लांबीने कमी आहे परंतु केरळ राज्यातील मत्स्योत्पादन महाराष्ट्र राज्यापेक्षा दीडपट आहे. केरळ राज्याला लाभलेला समुद्र किनारा आणि महाराष्ट्र राज्याला लाभलेला समुद्र किनारा यामध्ये फार मोठे अंतर आहे. तरीही कोकणातील मासेमारीपेक्षा केरळ राज्यातील मासेमारी दीडपट आहे. खोल समुद्रामध्ये खाजगी क्षेत्रातील कोणीही मासेमारी करण्यासाठी धजावत नाही. याचे कारण असे की, खोल पाण्यामध्ये जर मासेमारी करावयाची असेल तर त्यासाठी सुसज्ज आणि अत्याधुनिक साधनांनी युक्त जहाजे उपलब्ध असणे गरजेचे आहे. त्यामुळे खाजगी क्षेत्रातील लोक सुध्दा याकडे वळत नाहीत. केरळच्या बरोबरीने कोकण विकासाकडे पहावयाचे असेल तर याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. महाराष्ट्र राज्य मत्स्यव्यवसाय विकास महामंडळ व कोकण विकास महामंडळ ही कोकणच्या औद्योगिक विकासाशी निगडित असलेली दोन्ही महामंडळे पुरेशा अर्थसहाय्याअभावी निष्प्रभ ठरली आहेत.

सभापती महोदय, कोकणातील उपलब्ध खनिज संपत्तीवर आधरित काही उद्योगधंदे सुरु करणे शक्य होते व आवश्यकही होते. पण या क्षेत्रातही कोकणवासीयांची घोर निराशाच झाली आहे. रत्नागिरी, रायगड व सिंधुदुर्ग जिल्ह्यात तसेच या जिल्ह्यालगतच्या कोल्हापूर जिल्ह्याच्या काही भागात उत्तम प्रतीच्या बॉक्साईटचा 4 ते 5 कोटी टनांचा साठा आहे. या साठ्यावर होऊ घातलेला रत्नागिरी येथील ॲल्युमिनियमचा कारखाना बारगळल्यातच जमा आहे. या कारखान्यासाठी असलेल्या प्राथमिक सुविधा निर्माण करण्याच्या बाबतीत महाराष्ट्र शासनाची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे .....

अनास्था आणि कोकणच्या नेतृत्वाची उदासिनता या कारखान्याच्या मुळावर आली आहे असे म्हटले तर अतिशयोक्तीचे ठरणार नाही.

सभापती महोदय, फौंड्रीच्या उद्योगाला तसेच काच उद्योगाला लागणारी सिलिका कोकणात विपूल प्रमाणात सापडते. पण ही सिलिका मुंबईच्या मार्केटमध्ये नेण्याचे मोटरट्रक हे एकमेव वाहतुकीचे साधन आहे. परिणामी हैद्राबादहून रेल्वे वॅगनने येणाऱ्या सिलिकेशी कोकणातील सिलिकेचा स्पर्धेत निभाव लागू शकत नाही. कोकण किनाऱ्यावरील देवगड, विजयदूर्ग, मालवण यासारख्या काही बंदरांचा मध्यम प्रतीची बंदरे म्हणून विकास केला असता तर हीच सिलिका सागरी मार्गाने मुंबईला कमी खर्चात नेता आली असती. त्याच सागरी मार्गाचा उपयोग आंबा उत्पादकांनाही झाला असता. पण मध्यम प्रतीची बंदरे विकसित करण्याच्या बाबतीत महाराष्ट्र शासन नेहमीच उदासीन राहिले आहे. जर या बंदरांचा निश्चित स्वरुपात विकास झाला असता तर आंबा, सिलिका ही उत्पादने मुंबईमध्ये नेण्यासाठी ते मोठ्या प्रमाणामध्ये उपयोगी ठरले असते.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती मंदा म्हात्रे....

सभापती महोदय, कॅलिफोर्निया हा अमेरिका खंडतील फळफळावळीने समृध्द असलेला प्रदेश आहे. या कॅलिफोर्नियाप्रमाणेच कोकणची भूमी फलोत्पादनासाठी उपयुक्त असून येथील हवामानही फळझाडांच्या लागवडीला अनुकूल आहे. कोकणात आंबा, फणस, काजू, कोकम, नारळ, सुपारी, केळी, पपया, अननस, जांभूळ, चारोळी, पपनस, चिकू आदी फळझाडांपासून किफायतशीर उत्पन्न मिळू शकते. त्यामुळेच माननीय नामदार श्री. अजितदादा पवार यांनी कोकणातील फलोत्पादनामध्ये घातलेले लक्ष निश्चितच कौतुकास्पद म्हणावे लागेल. फलोत्पादनाच्या बाबतीत माननीय नामदार श्री. शरद पवार साहेबांना असलेली आस्था माननीय मंत्री महोदय अजितदादा पवार साहेबांनी गांभिर्याने मनावर घेतली. त्यामुळेच आज कोकणात फलोत्पादनाच्या बाबतीत विकास झालेला दिसतो. याही पुढे जाऊन महाराष्ट्र शासनाने फळांवर प्रक्रिया करणारे उद्योग मोठया प्रमाणात निर्माण केले आणि उत्पादित मालाला परकीय बाजारपेठ उपलब्ध करुन दिली तर परकीय चलन मिळेलच. परंतु कोकणातील बेरोजगारीही मोठ्या प्रमाणात कमी होईल आणि कोकणचा कॅलिफोर्निया व्हायला वेळ लागणार नाही. सभापती महोदय, केरळमध्ये पर्यटन क्षेत्र मोठ्या प्रमाणावर विकसित झालेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी सांगितल्या प्रमाणे महाराष्ट्राला आर्थिकदृष्टया सक्षम केले तर कोकण हा महाराष्ट्राचा आर्थिक कणा होऊ शकतो. केरळ राज्य हे पर्यटन क्षेत्राला खूप महत्व आणि प्रसिध्दीही देते. महाराष्ट्रामध्ये केरळ राज्यातील विविध हस्तकेलेच्या वस्तूही विकल्या जाताना दिसतात. तसेच केरळचे लोणचेही आपल्याला बाजारामध्ये पहावयास मिळते. अशा प्रकारे विविध माध्यमातून केरळ राज्याला उत्पन्न मिळते. या पध्दतीने आपण महाराष्ट्राकडे लक्ष दिले तर महाराष्ट्राला सुध्दा मोठ्या प्रमाणावर परकीय चलन मिळाल्या शिवाय राहाणार नाही. परिणामी कोकण हे केरळ सारखे होईल आणि कोकणातील बेरोजगारी दूर होईल.

सभापती महोदय, पर्यटनाच्या दृष्टीने कोकणाला 720 कि.मी. लांबीचा समुद्र किनारा लाभलेला असून जंजिरा, सिंधुदुर्ग, रांगणा इत्यादी ऐतिहासिक दुर्ग तसेच आंबोली सारखी थंड हवेची ठिकाणे, गणपतीपुळेसारख्ी तीर्थक्षेत्रे ही कोकणाला लाभलेली आणखी एक देणगी आहे.

. .2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती मंदा म्हात्रे...

पण कोकणातील पर्यटन केंद्रे विकसित करण्याच्या दृष्टीने आजवर झालेले प्रयत्न मर्यादित आहेत. पर्यटन केन्द्रे ही रोजगार व परकीय चलन मिळवून देण्यास उपयुक्त ठरतात. त्यासाठी कोकणात पर्यटन केंद्रे विकसित करण्याचा कामाला प्राधान्य दिले जाणे आवश्यक आहे. कोकणच्या किना-यावर सागरी उद्याने, वन उद्याने व अभयारण्ये विकसित करण्यासारख्या अनेक जागा आहेत. अशा जागांची निवड करुन त्या ठिकाणी सागरी उद्याने, वन उद्याने व अभयारण्ये उभारुन पर्यटकांना आकर्षित करणा-या सोयी निर्माण केल्यास कोकणात पर्यटकांची रीघ लागण्यास वेळ लागणार नाही. महाराष्ट्र शासनाला कोकणाचा खरोखर विकास व्हावा असे वाटत असेल, कोकणचा आर्थिक व औद्योगिक अनुशेष दूर व्हावा असे वाटत असेल तर काही महत्वाचे निर्णय घेणे आवश्यक आहे. मी याबाबतीत एक-दोन महत्वाच्या बाबी शासनाला सांगू इच्छिते. त्या म्हणजे कोकणामध्ये लोह, मँगनीज, सिलिका, बॉक्साईट हे खनिज साठे विपुल प्रमाणात आहेत. रत्नागिरीच्या परिसरात इल्मेनाईटचे साठेही आहेत. या खनिजावर प्रक्रिया करणारे सार्वजनिक क्षेत्रातील कारखाने उभारण्याबाबत शासनाने विचार करावा.

कोकणाच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ निर्माण करण्याचा ठराव महाराष्ट्र विधानसभेने संमत केला आहे. तेव्हा विदर्भ, मराठवाड्याप्रमाणेच कोकण वैधानिक विकास मंडळाची स्थपना करावी अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करते.

कोकणच्या किना-यावर आयात निर्यात होणा-या मालाच्या चढ-उतारासाठी बारमाही बंदर आणि अद्ययावत सोयींनी युक्त अशी मासोमारी बंदरे प्रत्येक जिल्ह्यात विकसित करण्याचा शासनाने विचार करावा.

सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यामध्ये धरण झाले तर कोकणातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निश्चितच सुटेल. तसेच कोकणच्या किना-यावरील मच्छीमार समाजाची उन्नती घडवून आणण्यासाठी, बेरोजगारीची समस्या सोडविण्यासाठी खोल पाण्यातील मत्स्योद्योग विकसित करण्यासाठी शासनाने पावले उचलली पाहिजेत.

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्रीमती मंदा म्हात्रे.....

त्याचप्रमाणे मच्छिमार समाजातील युवकांना उपयुक्त असे प्रशिक्षण, मासळी पकडण्यासाठी अद्ययावत यंत्रसामुग्री, मासे उतरवून घेण्यासाठी अत्यावश्यक सोयी उपलब्ध करुन देण्याबाबत विचार करणे आवश्यक आहे. कोकणातील विशिष्ट अशी भौगोलिक परिस्थिती, नद्यांना असलेला मोठा उतार, पाण्याचा साठा करण्यासाठी उपलब्ध होणारे मर्यादित क्षेत्र तसेच कोकणातील बऱ्याच धरणांच्या बांधकामासाठी लागणाऱ्या दगडासाठी जांभा दगडाचा वापर मोठया प्रमाणात होऊ शकतो. हा दगड वापरात आणला तर त्यामधून खूप फायदा होऊ शकतो. कोकणातील लागवडीसाठी 6.5 लाख हेक्टर पडिक जमीन उपलब्ध असून त्यापैकी निम्मे क्षेत्र शासनाने रोजगार हमी योजनेंतर्गत फलोद्यानाच्या लागवडीसाठी उपयोगात आणण्याचे ठरविले आणि हे उद्दीष्ट पूर्ण केले तर निश्चित स्वरुपामध्ये कोकणातील गरीब कोकणवासिय श्रीमंत झाल्याशिवाय राहणार नाहीत. कोकणातील बेरोजगारी हटवावयाची असेल तर मी ज्या सूचना केलेल्या आहेत, इतर सन्माननीय सदस्यांनी त्या भावना मांडल्या आहेत त्या संदर्भात उत्तराच्या भाषणामध्ये माननीय मुख्यमंत्री महोदय अवश्य विचार करतील अशी अपेक्षा व्यक्त करते. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुळकर्णी यांनी ज्या पोटतिडकीने या प्रस्तावावर चर्चा घडवून आणली, इतर सन्माननीय सदस्यांनी ज्या पोटतिडकीने आपल्या भावना मांडल्या, त्या कोकणाच्या विकासासाठी शासनाने प्राधान्य द्यावे एवढे बोलून मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद देते आणि माझे भाषण पूर्ण करते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, या प्रस्तावावर मी भाषण करीत असताना ओघवत्या स्वरुपात गाव तेथे धरण व या धरणासाठी 1 ते 2 कोटी रुपये लागतील असा उल्लेख केला होता. वास्तविक कोणत्याही धरणाचे काम 1 ते 2 कोटी रुपयांमध्ये होऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. मला धरणाऐवजी लघुबंधारा म्हणावयाचे होते. कृपया तशी दुरुस्ती व्हावी अशी विनंती आहे.

तालिका सभापती : ठीक आहे. तशी दुरुस्ती करण्यात येईल.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मुद्यांची पुनरुक्ती होणार नाही असेच मुद्दे मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, वेळेचे बंधन विचारात घेऊन सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुळकर्णी यांनी कोकणाच्या विकासासंबंधी जो प्रस्ताव आणला आहे त्या प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे. मागील तीन दिवस या विषयाची सभागृहात चर्चा सुरु आहे. या संपूर्ण चर्चेचा विचार करता ज्या महत्वाच्या गोष्टी समोर आलेल्या आहेत त्या म्हणजे कोकणाचा खऱ्या अर्थाने विकास करावयाचा असेल तर कोकणाचा अनुशेष दूर केला पाहिजे. कोकणामध्ये अनुशेष असल्याबद्दलची या सभागृहाची भावना सर्वांनीच आपल्या भाषणातून व्यक्त केलेली आहे. कोकणाचा हा अनुशेष दूर करावयाचा असेल, कोकणाचा विकास करावयाचा असेल तर प्रथम सिंचनाचा, बंदर विकासाचा, मत्स्य व्यवसायाचा आणि शिक्षणासंबंधीचा शासनाने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. पर्यटन हा या चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. पर्यटनासंबंधी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व सूचना मांडलेल्या आहेत. शासनाकडून काही अपेक्षाही व्यक्त केलेल्या आहेत. पर्यटनाबाबत सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे, श्री.संजय केळकर व अन्य सदस्यांनी खूप चांगल्या सूचना केलेल्या आहेत, त्या सूचनांना मी समर्थन देतो.

(नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

सभापती महोदय, कोकण पर्यटन महासंघ नावाची संस्था आहे. या संस्थेत खूप चांगले कार्यकर्ते काम करतात. कोकणाचा पर्यटनाच्या मार्फत विकास व्हावा यासाठी कोकण महासंघाकडे चांगल्या चांगल्या योजना आहेत, कल्पना आहेत. कोकण पर्यटन महासंघाने यासंदर्भात काही प्रोजेक्टही सादर केलेले आहेत. ख-या अर्थाने कोकणाचा पर्यटनाच्या माध्यमातून विकास करावयाचा असेल तर या कोकण पर्यटन महासंघाचा खूप चांगल्या प्रकारे उपयोग होऊ शकतो.

सभापती महोदय, सिंचन विकासाचे आज संपूर्ण कोकणामध्ये प्रकल्प सुरु आहेत परंतु या सर्व प्रकल्पांचे काम अपूर्ण असल्यामुळे कोकणातील सिंचनाचा अनुशेष निर्माण झालेला आहे. आज कोकणामध्ये सिंचनाचे एकूण 38 प्रकल्प आहेत. यामध्ये एक मोठा, 4 मध्यम आणि 33 लघू प्रकल्प आहेत. हे सर्व प्रकल्प पूर्ण करावयाचे असतील तर त्यासाठी 1200 कोटी रुपये खर्च येणार आहे परंतु या प्रकल्पासाठी मागील वर्षी 164 कोटी रुपये शासनाने उपलब्ध करुन दिलेले आहेत. याचा अर्थ केवळ निधी अभावी हे प्रकल्प पूर्ण होऊ शकत नाहीत. कोकणातील सिंचनाचे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी, सिंचनाचा अनुशेष नष्ट करण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. केवळ घोषणा करुन कोकणाचा कधीही विकास होणार नाही तर धोरणात्मक निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली तरच कोकणाचा विकास होऊ शकेल. कोकणाच्या विकासासाठी या सभागृहात वेगवेगळे निर्णय घेण्यात आलेले आहेत परंतु त्या निर्णयाची अंमलबजावणी शासनाने केलेली नाही.

सभापती महोदय, कोकणामध्ये स्वतंत्र शालांत परीक्षा मंडळ दिले जाईल अशी घोषणा शासनातर्फे करण्यात आली होती. यासंदर्भात माननीय शिक्षण मंत्र्यांनी 7 मार्च, 2007 रोजी सांगितले की, शालांत परीक्षा हया मंडळामार्फत घेण्यात येईल असे आश्वासन दिले परंतु अद्यापही शालांत परीक्षा मंडळासाठी जागा घेण्याचे काम या शासनाने केलेले नाही. कोकणासाठी घोषणा केल्या जातात परंतु त्याची अंमलबजावणी करावयाची नाही हे शासनाचे धोरण आहे की काय असे जनतेला वाटू लागले आहे. त्यामुळे कोकणाच्या संदर्भात ज्या घोषणा केल्या जातात त्याची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, कोकणातील पर्यटनाचा विकास, मत्स्य विकास, बंदर विकास, शेती विकास या सर्व बाबतीत शासन पॅकेज देणार आहे त्यामध्ये शैक्षणिक गोष्टींचाही उल्लेख होण्याची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

आवश्यकता आहे. ठाणे, रायगड, रत्नागिरी तसेच सिंधुदुर्ग जिल्हयाचा विचार केला तर रत्नागिरी आणि सिंधुदुर्गचे शिक्षण उपसंचालकांचे कार्यालय कोल्हापूर येथे आहे. रायगड आणि ठाणे जिल्हयाचे कार्यालय मुंबईमध्ये आहे. रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयाचे न्यायालय कोल्हापूर येथे आहे. रायगडचे न्यायालय पुण्यात तर ठाण्याचे न्यायालय नवी मुंबईत आहे अशा प्रकारे कोकणातील चार जिल्हयांचे विभाजन करण्यात आलेले आहे. म्हणून आमची मागणी आहे की, ठाणे, रायगडसाठी स्वतंत्र शिक्षण उपसंचालकांचे कार्यालय व्हावे यासंदर्भात या सभागृहात एक प्रस्ताव देखील आला होता त्यावेळेस माननीय मंत्रीमहोदयांनी जाहीर केले होते की, ठाणे, रायगडसाठी तातडीने शिक्षण उपसंचालकांचे कार्यालय देण्यात येईल परंतु अद्यापही ठाणे, रायगडसाठी उपसंचालकांचे कार्यालय देण्यात आलेले नाही. मुंबईमध्ये अगोदरच प्रचंड कारभार आहे त्यामुळे ठाणे आणि रायगडमध्ये स्वतंत्र शिक्षण उपसंचालक कार्यालय करण्याचा शासनाने जो धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे त्याची तातडीने अंमलबजावणी होण्याची आवश्यकता आहे. कोकणामध्ये शिक्षणाचा सुध्दा बॅकलॉग आहे. कोकणामध्ये इंजिनिअरिंग, मेडिकल, फार्मसी तसेच नर्सिंग कॉलेजेस नाहीत. कोकणातील चारही जिल्हयातील शाळा डोंगरी तसेच दुर्गम भागातील आहेत. दुर्गम भागातील शाळा आणि अन्य भागातील शाळा यामध्ये तफावत आहे. अन्य भागातील शाळेसाठी जे निकष आहेत ते निकष कोकणातील शाळांसाठी लावता येणार नाही. इतर भागात जसे विद्यार्थ्यांची संख्या, तुकडयांची संख्या तसेच अन्य जे निकष आहेत तसे निकष कोकणातील शाळांसाठी लावता येणार नाहीत.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री.रामनाथ मोते.....

तेव्हा कोकणातील दुर्गम आणि डोंगराळ भागातील शाळांसाठी "खास बाब" म्हणून हे निकष बदलावे लागतील. आज कोकणातील शाळेत विद्यार्थ्यांची संख्या कमी होत आहे. मी स्वत: कोकणातील शाळांना भेटी दिलेल्या आहेत. कुटुंब नियोजनाच्या बाबतीत सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्याचा पहिला क्रमांक आहे. त्याठिकाणी मुला-मुलींची संख्या फार कमी आहे. अनुदानीत शाळेत एका तुकडीमध्ये किमान 20 मुले आवश्यक असतात. जर ही संख्या एकने जरी कमी झाली तरी त्या तुकडीचे अनुदान काढून घेतले जाते. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला गावात स.का.पाटील माध्यमिक शाळा आहे. त्या शाळेतील एका वर्गामध्ये 19 मुले झाली म्हणून मागील सहा वर्षापासून त्या वर्गाचे अनुदान काढून घेतलेले आहे. त्यामुळे दोन शिक्षकांचा पगार बंद झालेला आहे. वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या 19 वर गेल्या गेल्या त्या वर्गाचे अनुदान काढण्यात आले. परंतु आता त्या वर्गामध्ये 20 पेक्षा जास्त मुले असताना देखील अद्यापपर्यंत शासनाकडून अनुदान प्राप्त झालेले नाही. तेव्हा माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे की, इतर विभागासाठी शाळांच्या बाबतीत जी अट घालण्यात आलेली आहे ती कोकणातील दुर्गम आणि डोंगराळ भागातील शाळांसाठी रद्द करण्यात यावी.

सभापती महोदय, कोकणातील तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणाचा अनुशेष दूर होणे आवश्यक आहे. कोकणामध्ये मोठ्या प्रमाणावर फळबागा आहेत. आपण कोकणाला कॅलिफोर्निया समजतो. कोकणात फळावंर प्रक्रिया करणारी उपाययोजना होणे आवश्यक आहे. जसे ऊसाच्या बाबतीत मांजरी येथे, द्राक्षांच्या बाबतीत नाशिक येथे संशोधन केंद्रे आहेत. त्याप्रमाणे कोकणातील फणस- काजू व इतर फळांच्या बाबतीत संशोधन केंद्र निर्माण होणे आवश्यक आहे. दापोली येथे कृषि विद्यापीठ आहे. परंतु त्याठिकाणी लागवड संदर्भात संशोधन केले जाते. तेथे इतर कोणत्याही प्रकारचे संशोधन होत नाही. तेव्हा कोकणामध्ये संशोधन केंद्र होणे अत्यंत आवश्यक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

सभापती महोदय, कोकणवासियांना समाधान वाटावे म्हणून मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र रत्नागिरी येथे सुरु करण्यात आले. कोकणातील इच्छूक मुले तेथे शिकण्यासाठी जातील. परंतु कोकणातील शैक्षणिक विकासासाठी ज्या पध्दतीने सुविधा उपलब्ध व्हावयास पाहिजेत त्या झालेल्या नाहीत. तसेच पोस्ट ग्रॅज्युएशनकरिता सुविधा उपलब्ध व्हावयास पाहिजेत.

सभापती महोदय, पाटबंधारे योजनासंबंधी स्वामीनाथन समितीच्या शिफारशीनुसार खर्च करण्यात यावा. नळपाणी योजनेची वाताहात झालेली आहे याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे कोकणात पडणारा प्रचंड पाऊस. कोकणात पावसाळ्यात अनेक ठिकाणी उताऱ्यावरुन मोठ्या प्रमाणावर पाणी वाहून जाते. त्यामुळे जमिनीची मोठ्या प्रमाणावर धूप होते. भविष्याच्या दृष्टीने विचार केला तर ही अतिशय गंभीर बाब आहे. डेहराडून येथील जलसंधारण संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेने तेथील पाहणी केलेली आहे. त्यांच्या निष्कर्षानुसार दरवर्षी 6 हजार दशलक्ष टन पोषक द्रव्ये पाण्याबरोबर वाहून जातात. ही पोषक द्रव्ये आणि मातीची धूप अशीच सुरु राहिली तर संपूर्ण कोकण ओकाबोका दिसल्याशिवाय राहणार नाही. तेव्हा या संदर्भात काळजी घ्यावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बंदरे आणि मत्स्य विकासाबाबत काळजी घेणे आवश्यक आहे. कालच वर्तमानपत्रात एक बातमी वाचली की, कोल्हापूरातील मळी विजयदुर्ग बंदरातून निर्यात होण्यास सुरुवात झालेली आहे. त्यामुळे तेथील लोकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे. परंतु त्या प्रमाणात बंदराचा विकास मात्र झालेला नाही. तेव्हा विजयदुर्ग बंदराच्या विकासासाठी कोट्यावधी रुपयांची तरतूद होणे आवश्यक आहे. तसेच कोकणातील सर्वच बंदरांचा विकास होणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

सभापती महोदय, प्रत्येक तालुक्यांमध्ये शासकीय आयटीआय आणि एक शासकीय उच्च शिक्षणासाठी महाविद्यालय असणे आवश्यक आहे. तशाप्रकारचा शासनाचा धोरणात्मक निर्णयही आहे. परंतु याबाबतीत कुठल्याही प्रकारची उपाययोजना याठिकाणी झालेली नाही, त्यामुळे याबबतचाही उल्लेख पॅकेजमध्ये होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, कोकणातील बेरोजगारांना परिस्थितीनुसार व्यवसाय निर्माण करुन देणे आवश्यक आहे. काल वर्तमानपत्रामध्ये मी एक बातमी वाचली. एका युवकाने शहाळापासून पाण्याची योजना तयार केलेली आहे. त्यासाठी त्यास 25 हजार रुपयांचा खर्च आला. हा खर्च शासनाने केला तर तशाप्रकारचा व्यवसाय कोकणातील बेरोजगारांना उपलब्ध होईल. त्यामुळे अशाप्रकारे परिस्थितीनुसार स्थानिक बेरोजगारांना त्यांच्या उत्पन्नानुसार संधी उपलब्ध करुन द्यावी, अशी मी विनंती करतो. सभापती महोदय, वेळेचे बंधन लक्षात घेऊन मी माझे भाषण येथेच थांबवतो.

धन्यवाद !

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, सन्माननीय जेष्ठ सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी जो याठिकाणी कोकणासंबंधीचा प्रस्ताव चर्चेला आणला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी व त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या स्थापनेस 47 वर्षे पूर्ण होऊनही कोकणाचा आर्थिक विकास झालेला नाही. कोकण विभागाचा असमतोल दूर करण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने म्हणावे तसे प्रयत्न केलेले नाहीत, हे याठिकाणी मला मुद्दाम नमूद करावेसे वाटते. दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास महामंडळ स्थापन करण्यासंबंधी सातत्याने मागणी करतात. परंतु त्याबाबतीतही अद्यापि कुठल्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही. खऱ्या अर्थाने, फार मोठया प्रमाणावर अन्याय कोकण विभागावर झालेला आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण महामंडळ तयार झाले. परंतु कोकणामध्ये फारच विषमता असून त्याठिकाणचे पीक असेल, दळवळणाची साधने असतील, उर्वरित ज्या सुविधा असतील त्याबाबत कुठल्याही प्रकारची चर्चा याठिकाणी झालेली नाही. पश्चिम महाराष्ट्र हा आर्थिकदृष्टया विकसित झालेला होता. कोकणचा भाग आर्थिकदृष्टया मागासलेला होता. परंतु याचा विचार न करताच उर्वरित महाराष्ट्राच्या महामंडळामध्ये कोकणाचा समावेश केल्यामुळेच खऱ्याअर्थाने कोकणावर फार मोठा अन्याय झालेला आहे. त्याचीच चिड कोकणामध्ये निर्माण झालेली आहे. 80 वर्षापूर्वी चिपळूणचे कवी माधव केशवर यांनी असे लिहिले आहे की,

" सहयाद्रीच्या तळी शोभते
हिरवे तळ कोकण
राष्ट्रदेवीचे निसर्ग निर्मित
केवळ नंदनवन"

अशाप्रकारचे सुंदर वर्णन त्यांनी कोकणाचे केलेले आहे. कोकणाला 720 किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभलेला आहे, त्याठिकाणी सहयाद्रीच्या रांगा आहेत. खरे वैभव कोकणामध्येच आहे. अशाप्रकारचे वर्णन कवी माधव केशवर यांनी 80 वर्षापूर्वी केलेले आहे. कोकण निसर्गरम्य आहे. संपूर्ण महाराष्ट्राला आर्थिक संपन्नतेने समृध्द करण्याचे सामर्थ्य एकटया कोकणामध्ये आहे.

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्य अतिशय मौलिक सूचना करीत आहेत. परंतु त्याची नोंद कोणीच घेत नाही.

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, मी नोंद घेत आहे.

नंतर कु.गायकवाड...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली सुरु...

सभापती महोदय, कोकणातील साधनसंपत्तीचा आपण पूर्णपणे उपयोग करुन धेतला तर केवळ कोकणच नाही तर संपूर्ण महाराष्ट्राच्या आर्थिक उन्नतीस हातभार लागू शकेल. कोकणामध्ये काजू, आंबा, कोकम यांची बागायती आहे. कोकणाला 720 कि.मी चा स्वच्छ आणि सुंदर सागरी किनारा लाभलेला आहे. तसेच चांगल्या प्रकारची खनिज संपत्ती लाभलेली आहे. अशा प्रकारे अनेक अलंकार कोकणाला निसर्गाने बहाल केलेले आहेत. परशुरामाच्या या भूमीत अनेक विचारवंत जन्माला आले. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या राज्याची राजधानी निवडताना रायगडाची निवड केली. त्यावेळी त्यांनी पश्चिम महाराष्ट्र, मुंबई, पुणे यांचा विचार केला नाही. अशा प्रकारे शिवाजी महाराजांनी 300 -350 वर्षापूर्वी जी दूरदृष्टी दाखविली होती तशी दूरदृष्टी आपल्या शासनाकडे नाही याची खरोखरच आम्हाला खंत वाटते. या सभागृहात अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडली आहेत त्यामुळे मी जास्त काही बोलणार नाही. आज महाराष्ट्रातील एकूण 93 लाख हेक्टर जमीन ओलिताखाली आहे आणि कोकणातील केवळ 3 लाख हेक्टर जमीन ओलिताखाली आहे. महाराष्ट्रातील जास्तीत जास्त निधी हा कृष्णा खोऱ्याच्या माध्यमातून पश्चिम महाराष्ट्रामध्ये खर्च करण्याचे राज्यपालांनी निदेश दिलेले आहेत. त्यामुळे उर्वरित महाराष्ट्रात या पूर्वी जादा दिलेल्या निधीमुळे त्या निधीचा तिसरा हिस्सा या वर्षी विदर्भ व मराठवाडयाकडे वळविण्यात आल्यामळे कोकणास कमी निधी उपलब्ध झालेला आहे असे समजते. माननीय राज्यपाल यांच्या निदेशाप्रमाणे गेल्या दोन वर्षात विदर्भावर कमी खर्च झाल्यामुळे झ ालेली तूट पुढील तीन वर्षात भरुन काढण्यासाठी 600 कोटी रुपये प्रतिवर्षी विदर्भाला देण्याचे आदेश आहेत. त्यामुळे उर्वरित महाराष्ट्रास अतिशय कमी निधी उपलब्ध होणार आहे. सन 2007-08 मध्ये 1200 कोटी रुपये ऐवजी 620 कोटी रुपयेच मिळणार आहेत. त्यापैकी कोकणास फक्त 118 कोटी रुपयेच मिळणार आहेत. सन 2008-09 व 2009-10 मध्येच हा आकडा अनुक्रमे 90 कोटी रुपये व 70 कोटी रुपये होणार आहे. मुख्यत्वे जी तूट झालेली आहे ती कृष्णा खोरे विकास महामंडळ यांनी जादा केलेल्या खर्चामुळे परंतु त्याचा दुष्परिणाम मात्र कोकण व तापी प्रदेशावर होत आहे. कोकण प्रदेशात एकूण 94 प्रकल्प असून त्याची सिंचन क्षमता अडीच लक्ष हेक्टर आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली सुरु .....

उर्वरित किंमत 4720 कोटी रुपये इतकी आहे. यापैकी 4 मोंठे प्रकल्प असून त्यांची उर्वरित किंमत 1860 कोटी रुपये इतकी असूनही निधी अत्यंत कमी मिळणार आहे. त्यासाठी निधीची तरतूद भरपूर असणे आवश्यक आहे.

यातील लघु पाटबंधारे योजना 1 ते 2 वर्षात पूर्ण होऊ शकणार आहेत. परंतु या योजनांची प्रति हेक्टरी किंमत रुपये एक लाखापेक्षा जास्त असल्याने ते ए.आय.बी.पी.मध्ये बसत नाहीत. त्यामुळे केंद्रशासनाकडून ए.आय.बी.पी.अंतर्गत लघु पाटबंधारे प्रकल्पांना निधी उपलब्ध होत नाही. कोकणात अवर्षण प्रवण क्षेत्र नसल्याने मोठे, मध्यम प्रकल्प लघुपाटबंधारे योजना ए.आय.बी.पी.अंतर्गत घेण्यास अडचणी येत आहेत.

यानंतर श्री. रोझेंकर....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली.....

अवर्षणप्रवण क्षेत्रात अेआयबीपीचे प्रकल्प घेण्यासाठी जी सूट आहे त्याचा फायदा कोकणाला मिळत नाही. या सगळयाचा विचार केला तर कोकणाला कोणत्याही स्त्रोतातून पाटबंधारे प्रकल्पांसाठी निधी मिळणार नाही.

सभापती महोदय, दुसरी एक मोठी अडचण येथील विकासाच्या बाबतीत आहे. कोकणात वनक्षेत्र मोठया प्रमाणावर आहे. कोणताही प्रकल्प सुरु करतांना वन जमिनीची आवश्यकता असल्याने वन विभागाकडून परवानगी मिळविण्यास बराच कालावधी लागतो. त्यामुळे वन खात्याकडून प्रस्ताव मंजूर करुन घेण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सिंचन क्षमता पूर्णपणे वापरली गेली पाहिजे व यासाठी शेतक-यांना प्रोत्साहित करण्याची आवश्यकता असते. परंतु, कोकणात जे लाभक्षेत्र विकास प्राधिकरण होते ते शासनाने बंद केले आहे. या प्राधिकरणाला 'कडा' असे नाव होते. इतर भागात हे प्राधिकरण सुरु आहे पण कोकणातील प्राधिकरणाचे कार्यालय बंद करण्यात आले आहे. या प्राधिकरणात कृषि खात्यातील, सहकार विभागातील अधिकारी असत व शेतक-यांना प्रशिक्षित करण्याचे काम ते करीत असत.

सभापती महोदय, जलसंधारणाच्या बाबतीत देखील फार मोठी अडचण आहे. प्रगतीपथावरील 68 योजना पूर्ण करण्यासाठी 168.48 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. त्यापैकी थळभरणी पूर्ण झालेल्या 25 लघु पाटबंधारे प्रकल्पांना 40.62 कोटी रुपयांची गरज आहे. लघुपाटबंधारे प्रकल्पांसाठी जे मापदंड शासनाने निश्चित केलेले आहेत ते बदलण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, दुसरे महत्वाचे म्हणजे कोकणातील रस्ते व साकव यावरील कामाचे निकष देखील बदलण्याची गरज आहे. कोकणातील रस्त्याची व्याख्या अशी आहे की, एका सिझनमध्ये सहा तासापेक्षा जास्त पाणी एका जागेवर राहिले व असे सहा वेळा झाले तर तो रस्ता आठमाही समजला जातो म्हणून कॉजवे व पुलाचे निकष बदलावे लागतील. कारण कोकणातील पाण्याला वेग आहे, पाणी डोंगराकडून सरळ समुद्राला जाऊन मिळते. त्यामुळे निकष बदलावे लागतील. साकवाच्या बाबतीत सांगायचे झाले तर शासनाच्या नियमानुसार साकवाच्या तीन

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली.....

किलोमीटरच्या परिसरात दुसरा साकव घेता येत नाही. कोकणाची आणि इतर भागांची भौगोलिक परिस्थिती वेगळी आहे. कोकणामध्ये बारा-पंधरा घरांच्या वाडया असतात व त्या प्रत्येक वाडयांमध्ये एखादा ओढा किंवा नदी असते. त्यामुळे 'वाडया तेथे साकव' अशी संकल्पना राबविली गेली पाहिजे. अशा प्रकारे विकास करावयाचा असेल तर कोकणातील पाच जिल्हयांसाठी सुमारे 200 कोटी रुपयांची गरज लागेल. आपल्याकडे स्टेट हायवे, एमडीआर, ओडीआर, व्हीआर असे रस्त्यांचे प्रकार आहेत. सिंधुदूर्ग जिल्हयातील रस्त्यांच्या डांबरीकरणासाठी किमान 76 कोटी रुपयांची आवश्यकता आहे, रत्नागिरी जिल्हयासाठी 86 कोटी 48 लाख रुपये, ठाणे जिल्हयासाठी 91 कोटी रुपयांची व रायगड जिल्हयासाठी 30 कोटी 92 लक्ष रुपयांची आवश्यकता आहे. हे सर्व करीत असतांना महामार्ग क्रमांक 17 वरील जोडरस्ते झाले पाहिजेत, वळणे कमी केली पाहिजेत, आवश्यक तेथे बोगदे केले पाहिजेत.

सभापती महोदय, सागरी महामार्ग 750 किलोमीटरचा आहे. यातील 696 किलोमीटरचे काम पूर्ण झाले असून आता फक्त 54 किलोमीटरचे काम राहिलेले आहे. पर्यटनाच्या दृष्टीकोनातून हा मार्ग अतिशय महत्वाचा आहे. यासाठी 55 कोटी रुपयांचा निधी लागणार आहे, हा निधी शासनाने तातडीने उपलब्ध करुन दिला पाहिजे. हा प्रकल्प सन 1980 पासून सुरु झाला आहे व गेल्या 27 वर्षापासून हा प्रकल्प रेंगाळलेला आहे. त्यामुळे लवकरात लवकर हा निधी शासनाने दिला पाहिजे.

सभापती महोदय, सन 1973 साली खनिकर्म महामंडळ स्थापन झाले होते. आमच्या कोकणात लोह खनिज, बॉक्साईट, सिलिका, इल्मेनाईट, चुनखडी, मॅगनीज, क्रोमाईड, ग्राफाईड व गौण खनिजांमध्ये चिकन माती, चिनी माती, रंगाची माती, जांभा दगड, खडीचा दगड, साबण दगड अशी खनिज संपत्ती आहे. परंतु, कोणतेही प्रक्रिया करणारे कारखाने कोकणात नाहीत. करुळ व इन्सुली येथे सिलिकावर आधारीत कारखाना काढण्यात आला होता, परंतु तो बंद झाला आहे. हे कारखाने सुरु करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. राज्यातील एकूण खनिज साठयापैकी 20 टक्के साठा हा कोकणात आहे. परंतु, त्याबाबत शासनाने कधीही विचार केलेला नाही. महाराष्ट्रातील भुपृष्ठावरील जलसंपत्तीपैकी 40 टक्के जलसंपत्ती ही कोकणात आहे.

यानंतर कुमारी जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली.....

त्याचा फायदा होण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न होणे आवश्यक आहे. पर्यटन हे आर्थिक विकासाचे प्रमुख साधन म्हणून अनेक देशांनी आपल्या अर्थव्यवस्थेत कायापालट करुन घेतल्याचे आपणास आढळून येईल. आपल्या देशाच्या वर्ल्ड टूर आणि टुरिझम या संस्थांनी भारताचा पर्यटनामध्ये जगामध्ये पाचवा क्रमांक आहे असे सांगितले आहे. देशात पर्यटक वाढत आहेत त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्यातही पर्यटकांची संख्या वाढत आहे. या शासनाने सिंधुदूर्ग या जिल्हयाला पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केलेले आहे, तरीसुध्दा या जिल्हयातील पर्यटन विकासाकरिता या शासनाने गेल्या आठ वर्षात किती पैसे खर्च केले ? हा देखील एक संशोधनाचा विषय होऊ शकतो. केंद्रशासनाच्या माध्यमातून माझ्या माहितीप्रमाणे 24 कोटी रुपये सिंधुदूर्ग जिल्हयाच्या सर्वांगीण विकासाकरिता खर्च झालेले आहेत. केरळ,राजस्थान या राज्यांचे उदाहरण देतांना सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, केरळ या राज्याने आपल्या बजेटमध्ये पर्यटन विकासाकरिता 100 कोटी रुपये ठेवलेले आहे. या सगळया गोष्टींबाबत जर विचार केला तर कोकणामध्ये पर्यटनाकरिता भरपूर वाव आहे, त्याकरिता शासनाने निश्चितपणाने प्रयत्न केले पाहिजेत. दिनांक 26 ऑगस्ट,1997 रोजी कोकणातील पर्यटन धोरणाविषयी एक शासन निर्णय काढण्यात आला. दिनांक 30 एप्रिल,2000 रोजी सिंधुदूर्ग जिल्हयाला पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आले. सदरच्या शासननिर्णयामध्ये इकोटूर,रोजगार केंद्र,विमानतळ,दळणवळण यासाठी दरवर्षीच्या बजेटमध्ये आवश्यक तेवढी तरतूद करण्यात यावी, असे सांगितले आहे, तरीदेखील आतापर्यंत याकरिता कुठल्याही प्रकारचे प्रयत्न शासनस्तरावर झालेले नाहीत. पर्यटनाचे एक अविभाज्य अंग म्हणून कोकणाची संस्कृती व परंपरा,लोककला उदा.दशावतार,कळसूत्री बाहुल्या,अशा एकुण 36 लोककला कोकणामध्ये अस्तित्वात आहेत. या शासनाने ज्याप्रमाणे तमाशा या लोककलेस राजाश्रय दिला त्याचप्रमाणे उपरोक्त कोकणातील लोककलांनासुध्दा राजाश्रय देण्याची आवश्यकता आहे. पर्यटकांसाठी पर्यटनस्थळी पायाभूत सुविधांचा विकास करणे आवश्यक आहे. सिंधुदुर्गात टाटा कन्सल्टन्सी च्या माध्यमातून जी 22 स्थळे आयडेंटीफाय केली आहेत, त्यांचा विकास होणे आवश्यक आहे. ग्रामीण व कृषीपर्यटन या सर्व बाबींचा देखील विचार होणे अत्यंत आवश्यक आहे. सन 1997 पासून ताज व ओबेरॉय हॉटेलमालकांना कोकणातील जागा दिलेल्या आहेत परंतु अद्यापही त्या जागांवर कुठल्याही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली.....

प्रकारचा हॉटेल व्यवसाय पर्यटकांच्या दृष्टीकोनातून उद्योजकांकडून सुरु करण्यात आलेला नाही. माझी मागणी अशी आहे की, या उद्योजकांना दिलेली जागा शासनाने परत घेऊन पुन्हा नव्याने या जागांची जाहिरात करुन नवीन उद्योजकांना तेथे विकास करण्याकरिता वाव तसेच संधी द्यावी. या शासनाने कोकणामध्ये विकासाच्या दृष्टीकोनातून कोणतेही पाऊल उचललेले नाही, असे मी कधीच म्हणणार नाही. कोकणाच्या संदर्भात शासनाने केलेल्या कामाबाबत बोलतांना मी प्रामुख्याने माननीय शरदचंद्रजी पवार साहेबांचे नाव घेईन, त्यांनी कोकणामध्ये कृषी व फलोद्यानाच्या अनेक प्रभावी योजना राबविल्या. आज कोकणामध्ये पाच लाख हेक्टर जमीन ही काजू व आंबा या दोन पिकांच्या लागवडीखाली आहे. कोकणाच्या विकासाबाबत आपण पर्यटन,कृषी,पाटबंधारे,वनविकास या सर्व गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे.

किल्ल्यांच्या संदर्भात बोलावयाचे म्हटले तर महाराष्ट्राची राजनैतिक जडणघडण आणि येथील किल्ले यांचे एक अतूट नाते आहे. शिवरायांचा वास्तव्य - राज्याभिषेक आणि मृत्यूही रायगड या किल्ल्यावरच घडला. याच बलवंत दुर्गाच्या आधारावर शिवरायांनी दिल्लीश्वराला नामोहरम केले. हे किल्ले म्हणजे फक्त दगडाचे चिरे एकमेकांवर रचून उभारले गेले नव्हते. तर शिवरायांनी माणसांची मने आणि मनगटे यातून मजबूत केली. स्वदेशाच्या स्वातंत्र्य सधनतेसाठी त्यांनी जागोजाग दुर्ग व दुर्गम गड उभारलेले आहेत. शिवरायांच्या निधनानंतरही याच किल्ल्यातून मराठयांनी प्रेरणा घेतली अत्याचारी मोगल अन कावेबाज इंग्रजांशी 17 व्या शतकापासून 19 व्या शतकापर्यंत याच किल्ल्याच्या मदतीने मराठे लढले, येथील बुरुजांवर तोफगोळयांचा भडिमार झाला. ढासळलेले बुरुज,माना टाकलेल्या कमानी,नामशेष झालेल्या इमारती हे जरी आजच्या किल्ल्याचें दर्शन असले तरी ही परिस्थिती स्वदेश, स्वधर्म आणि स्वराज्य यांच्या रक्षणासाठी केलेल्या हौतात्म्यातून निर्माण झाली आहे. इथला निखळलेला प्रत्येक चिरा,स्वातंत्र्यांसाठी बलिदान झालेल्या पराक्रमी पूर्वजांची कहाणी सांगतो म्हणून माझी अशी मागणी आहे की,

यानंतर श्री.बोरले.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री.राजन तेली .....

संपूर्ण देशामध्ये 600 ते 700 किल्ले आहेत. कोकणामध्ये 107 किल्ले आहेत. रायगडमध्ये 51, रत्नागिरीमध्ये 24, सिंधुदुर्गमध्ये 32 किल्ले आहेत. शासनाने कोकणातील सर्व किल्ल्यांचे जतन केले पाहिजे. सिंधुदुर्ग जिल्हा बघण्यासाठी दरवर्षी 4 ते 5 लाख पर्यटक येत असतात. परंतु तेथे पर्यटकांसाठी सोईसुविधा नाहीत. तीच परिस्थिती विजयदुर्ग किल्ल्याची आहे. विजयदुर्ग किल्ल्याला 800 वर्षे पूर्ण झालेली आहेत. माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर. पाटील विजयदुर्ग किल्ला बघण्यासाठी आले होते. शासनाने कोकणातील सर्व किल्ल्यांचे जतन करावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, कोकण कृषि विद्यापीठासंदर्भात अनेक सन्माननीय सदस्य बोलले. कोकण कृषि विद्यापीठ दापोली येथे आहे. कृषि विद्यापीठ सुरु झाल्यानंतर त्याचा उपयोग शेतक-यांना किती झाला ? कोकण कृषि विद्यापीठातील अधिका-यांनी काहीच काम केले नाही, असे मी म्हणणार नाही. परंतु कोकण कृषि विद्यापीठाबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे. सहयाद्रीच्या पट्टयामध्ये, कोकणामध्ये किती तरी वन औषधी आहे. त्यावर प्रक्रिया करणारे उद्योग सुरु करुन शासनाला त्यातून रोजगार निर्मिती करता येईल. केंद्र शासनाच्या अनेक योजना आहेत. वन औषधी शोधण्याचे काम कोकण कृषि विद्यापीठाने केले पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, पुढच्या काळात कृषि, पर्यटन, फळप्रक्रिया, मत्स्यसंवर्धन, फलोत्पादन, वन औषधीवरील प्रक्रिया याबाबतचे अभ्यासक्रम सिंधुदुर्गमध्ये सुरु करण्याची आवश्यकता आहे. तसेच उद्यान विद्यालय सुरु करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी 21.46 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. यासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, वेंगुर्ले येथे जाती संरक्षण व शेतकरी अधिकार प्राधिकरण, नवी दिल्ली यांचेकडून "वृक्ष जातीचे उद्यान रुपात जतन" या सिंधुदुर्ग जिल्हयातील गौरवशाली ठरणा-या प्रस्तावित उद्यानासाठी शासनाने 100 एकर जागा उद्यान लागवडीसाठी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. या उद्यानात भारत देशातील सर्व कृषि संस्थांनी विकसीत केलेल्या फळ जातीच्या वृक्षांचे जतन होईल. हे उद्यान पर्यटनासाठी अत्यंत महत्वाचे ठरणार आहे, असा हा आगळावेगळा प्रकल्प आहे.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली .....

सभापती महोदय, फिशरीज हा मत्स्य विभागाचा महत्वाचा भाग आहे. शासनाने मत्स्य दुष्काळ जाहीर करावा, अशी माझी मागणी आहे. डिझेलच्या खरेदीमध्ये मच्छिमारांना सवलत मिळावयास पाहिजे. शासनाने मत्स्य दुष्काळ जाहीर करुन मत्स्य व्यवसायाच्या संदर्भातील धोरण जाहीर करावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, कोकणासाठी मेडिकल कॉलेजची आणि नवीन एस.एस.सी. बोर्डाची मागणी करण्यात आली आहे. तसेच, आय.टी.आय.मध्ये शिकविले जाणारे ट्रेड उपयोगी नाहीत. म्हणून आय.टी.आय.मध्ये पर्यटन, शेतीवर आधारीत नवीन ट्रेड शिकविले पाहिजेत.

सभापती महोदय, कोकणातील लघुउद्योग बंद पडलेले आहेत. लघुउद्योजकांनी सरकारी योजनांचा लाभ घेऊन लघुउद्योगाकरिता कर्ज घेतलेले आहे. उद्योजकांकडून ते कर्ज वसूल केले पाहिजे. नवीन उद्योजकांनी अनुदानाचा फायदा घेण्यासाठी उद्योगांची स्थापना करु नये, अशा प्रकारची अट शासनाने घातली पाहिजे.

सभापती महोदय, खारभूमी संदर्भात अशी बातमी होती की, खारभूमी कार्यालय विदर्भातील नागपूर येथे स्थापन करण्यात येणार आहे. कोकणाला 720 किलोमीटरचा समुद्र किनारा लाभलेला आहे. या विभागातील अधिका-यांच्या वेतनावर व प्रवास भत्त्यावर जेवढा खर्च होतो तेवढी तरी रक्कम कोकणातील खारभूमीवर खर्च होते काय ? याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. शासनाने मत्स्य धोरणासंदर्भात आणि खारभूमी संदर्भात धोरण जाहीर करावे, अशी माझी मागणी आहे. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

इतर मागासवर्गीयांच्या आरक्षणासंदर्भात

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, इतर मागासवर्गीयांच्या आरक्षणासंबंधी हायकोर्टाने निकाल दिलेला आहे. त्यासंदर्भात राज्य शासनाने आज सभागृहाची बैठक संपेपर्यंत निवेदन करावे, असे माननीय सभापतींनी सकाळी निदेश दिले होते. शासन आज सभागृहाची बैठक संपेपर्यंत ते निवेदन करणार आहे काय ?

उपसभापती : याबाबतची माहिती घेऊन मी ती माहिती सभागृहाला देईन.

यानंतर श्री.गागरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: निधीअभावी व नियोजनाअभावी सर्व स्तरावर कोकण प्रदेशाकडे शासनाचे होणारे जाणुनबुजून दुर्लक्ष.

मु.शी.: निधीअभावी व नियोजनाअभावी सर्व स्तरावर कोकण प्रदेशाकडे शासनाचे होणारे जाणुनबुजून दुर्लक्ष या विषयावर सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, विनोद तावडे, श्रीमती सुधा जोशी, श्री.परशुराम उपरकर, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री मधुकर चव्हाण, जितेंद्र आव्हाड, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री भास्कर जाधव, रामनाथ मोते, जयंत प्र.पाटील, संजय केळकर, कर्नल सुधीर सावंत, श्री.राजन तेली, श्रीमती फौजिया खान, वि.प.स. यांचा नियम 260 अन्वये प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरु.....)

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, कोकणच्या बाबतीत मी दोन सूचना मांडू इच्छितो. माझी पहिली सूचना अशी आहे की, कोकण विभागासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ स्थापन करण्यात येईल असे रत्नागिरी येथे झालेल्या मंत्रिमंडळाची बैठकीत जाहीर केले होते. त्यानंतर जुलै महिन्यात या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, श्री.गुरुनाथ कुलकर्णी व मी आग्रह धरला होता. सभागृहात उपस्थित असलेले शालेय शिक्षण मंत्री प्रा.वसंत पुरके हे म्हणाले होते की, मार्च 2007 च्या 10 वी 12 वी च्या परीक्षा नवीन माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय मंडळामार्फत होतील. याबाबतचा प्रस्ताव शासन मंजूर करणार होते, यावर पुढे कोणती कार्यवाही झाली आहे ?

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, शासन कोकणातील जनतेची किती उपेक्षा करीत आहे ? सध्या सभागृहाच्या सभापतीस्थानी माननीय उपसभापती स्थानापन्न आहेत, त्यांनी याच सभागृहात दिनांक 13.7.2006 रोजी शालेय शिक्षण मंत्री प्रा.वसंत पुरके यांना निदेश दिले होते की, "सन्माननीय मंत्री महोदयांना मी या संदर्भात सांगू इच्छितो की, एक तर या लक्षवेधी सूचनेद्वारा समस्त सभागृहाने, माननीय मुख्यमंत्र्यांनी या संबंधात केलेल्या घोषणेकडे आपले लक्ष वेधलेले आहे. विशेषत: रत्नागिरी येथे अशा प्रकारचे स्वायत्त शिक्षण मंडळ होऊ शकते

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .....

असे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनीही सांगितले आहे. तेव्हा मला देखील असे वाटते की, विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी अशा प्रकारचे स्वायत्त मंडळ होणे आवश्यक आहे आणि त्यासाठी हे अधिवेशन संपण्यापूर्वी आपण या बाबतीत प्रत्यक्ष प्रपोजल सभागृहासमोर मांडावे. तोपर्यंत ही लक्षवेधी सूचना रोखून ठेवा असे मी म्हणणार नाही. मात्र या बाबतीत जो काही निर्णय आपल्याला घ्यायचा आहे तो आपण सकारात्मक घ्या. वाटल्यास, त्यासाठी संपूर्ण चर्चा करून कोकणासाठी स्वतंत्र शिक्षण मंडळ निर्माण करण्यासाठीचा प्रस्ताव सभागृहाच्या माहितीसाठी घेऊन यावा." सभापती महोदय, मार्च 10 वी 12 वी च्या परीक्षा नवीन माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेतल्या जाणार होत्या, त्याचे काय झाले ? याचे माननीय मंत्र्यांनी उत्तर द्यावे.

सभापती महोदय, कोकणामध्ये आमदार व खासदारांच्या निधीतून काही विधायक काम करताना अधिकारी अडथळे निर्माण करीत आहेत. याबाबत मी आपणास एक घटना सांगू इच्छितो, कै.प्रमोद महाजन हे दिनांक 6 मार्च 2006 रोजी माझ्या गावी आले असताना त्यांनी महाविद्यालयाच्या सभागृहाचे उद्घाटन केले होते. यावेळी त्यांनी खासदार निधीतून 10 लाख रुपये मदत सभागृहाच्या बांधकामासाठी जाहीर केले होती. या रकमेतून महाविद्यालयाच्या सभागृहाची इमारत बांधवयाची होती, आता सभागृहाची ही इमारत 37 लाख रुपये खर्चून बांधण्यात आली आहे, त्यातील दहा लाख रुपये मदत कै.प्रमोद महाजन यांनी जाहीर केली होती. परंतु जिल्हाधिकारी यांनी आक्षेप असा घेतला की, केंद्र सरकारमधील लोकप्रतिनिधींचा निधी रिलीज करता येईल, परंतु हे सभागृह शासनाच्या मालकीचे करण्यात यावे, तरच त्यांच्या निधीतील 10 लाख रुपये मदत देण्यात येईल, सभागृहाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम, कॉम्प्युटर लॅब इत्यादी आमच्या ताब्यात द्या, अशा प्रकारे जिल्हाधिकाऱ्यांनी मनमानी अटी घातल्या.

सभापती महोदय, कोकणातील अधिकारी शासनाच्या व लोकप्रतिनिधींच्या निधीतील रक्कम मिळण्यास अडचणी निर्माण करुन कमी निधी देत आहेत. आमदार, खासदार, नगरसेवक यांचा पूर्ण निधी विकास कामासाठी वापरला पाहिजे. शाळा, महाविद्यालये, रस्ते किंवा इतर विकास कामांना लोकप्रतिनिधींनी निधी दिला तर अधिकाऱ्यांनी त्यावर मनमानी अटी घालू नयेत.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : मी सन्माननीय सदस्यांना पुन्हा विचारु इच्छितो की, कै.प्रमोद महाजन यांनी त्यांच्या निधीतून 10 लाख रुपये कोणत्या कामासाठी दिले होते ?

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आमच्या संस्थेच्या महाविद्यालयात आधुनिक कॉम्प्युटर लॅब व सभागृह उभारण्यासाठी सदरील रक्कम कै.प्रमोद महाजन यांनी त्यांच्या निधीतून दिली होती. परंतु जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, 37 लाख रुपयांचे सभागृह शासनाच्या नावे करा, आमच्या ताब्यात द्या.

उपसभापती : लोकप्रतिनिधींनी त्यांच्या निधीतून मदत जाहीर केल्यानंतर अधिकाऱ्यांनी अडथळे निर्माण करणे, ही अत्यंत गंभीर बाब आहे. परंतु सन्माननीय सदस्य यांनी या अडचणीतून मार्ग काढून सभागृह उभारले आहे व या रकमेचा सभागृहासाठी विनियोग केला आहे. याबाबत माझी सूचना आहे की, या सभागृहाला कै.प्रमोद महाजन यांचे नाव देण्यात यावे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, जिल्हाधिकाऱ्यांनी सभागृह व कॉम्प्युटर लॅबसाठी 10 लाख रुपये निधी वेळेवर रिलीज केला नाही.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, विदर्भातील अकोल्यामध्येही महाविद्यालयाच्या ग्रंथालयाकरिता निधीच्या बाबतीत असाच प्रकार घडलेला आहे, माझी विनंती आहे की या प्रकरणाचीही दखल घेण्यात यावी.

यानंतर श्री.सुंबरे.....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव (रायगड,रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य सन्माननीय सदस्य श्री. गुरूनाथजी कुलकर्णी यांनी बाकीच्या आपल्या सर्व सहकाऱ्यांना घेऊन, स्वत: पुढाकार घेऊन नियम 260 अन्वये कोकणाच्या विकासाच्या दृष्टीने शासनाकडून न्याय मिळावा म्हणून आणलेल्या ठरावावर मी माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, कोंकण, कोंकण म्हणून ज्याचा वारंवार उल्लेख केला जातो त्या कोकणाला एका बाजूने 720 कि.मी. समुद्र किनारा लाभलेला असून दुसऱ्या बाजूला लांबच लांब सह्याद्री पर्वताच्या रांगा आणि त्यामध्ये 50-50 ज्याला खळतपट्टा म्हणतात असा भाग. अशा प्रकारे दक्षिणोत्तर असा लांबच्या लांब वेडीवाकडी पर्वतराजी आहे. परशुरामाच्या बाणाने तयार झालेली भूमी अशी कोकणाची ओळख सांगितली जाते. या ठरावाच्या माध्यमातून शासनाने आमच्या कोकणाकडे लक्ष द्यावे अशा भावनेने येथे ही चर्चा होत आहे.

सभापती महोदय, या कोकणाचे देशासाठी काय दिले नाही ? देशासाठी या कोकणाने सर्व क्षेत्रात आपले योगदान दिलेले आहे. अनेक साहित्यिक दिले आहेत, अनेक वाचक दिले आहेत, अनेक लेखक, शूर वीर दिले आहेत तसेच अनेक प्रकारचे राजकारणी, समाजकारणी, विचारवंत लोकदेखील दिलेले आहेत. एवढेच नव्हे तर काल ज्या छत्रपती शिवाजी महाराजांची पुण्यतिथी आपण साजरी केली त्या छत्रपतींचे मूळ गाव मराठवाड्यामध्ये, आजोळ विदर्भामध्ये आहे आणि त्यांची जन्मभूमी आणि बालपण हे पश्चिम महाराष्ट्रात गेले. परंतु त्या छत्रपतींनी आपल्या स्वराज्याची राजधानी कोकणामध्ये स्थापन केली आणि आपल्या आयुष्याचा अखेरचा श्वास देखील त्यांनी कोकणी माणसाच्या खांद्यावर घेतला. अशी आमच्या कोकणाची महती आहे. या कोकण भूमीने या देशाला खेळाडू दिले आहेत, राजकारणी दिले आहेत आणि येथे प्रत्येकाने उल्लेख केला की, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे म्हणून जे 105 हुतात्मे झाले त्यातील 99 जण कोकणातील होते. अशी ही कोकण भूमी राज्यकर्त्यांच्या दूरदृष्टी अभावी, नियोजनाअभावी उपेक्षित राहिली आहे. त्यामुळे आता तरी कोकणाला न्याय द्यावा म्हणून हा ठराव येथे आपण सगळ्यांनीच आणलेला आहे. सभापती महोदय, या कोकणचा विकास करीत असताना कोकणाचा विकास हा तीन प्रकारे होईल असे विचार व्यक्त केले जात आहेत. प्रामुख्याने सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पर्यटनाचा

..... 4एच 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

विकास झाला तर कोकणच्या विकासाला गती मिळेल. रत्नागिरी जिल्हा हा फलोद्यान जिल्हा म्हणून जाहीर झाला आणि रायगड जिल्हा हा औद्योगिक जिल्हा म्हणून जाहीर करण्यात आला. रायगड जिल्हा हा औद्योगिक जिल्हा म्हणून जाहीर केला गेला असतानाच रत्नागिरी

(**सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री.रामनाथ मोते**)

जिल्ह्यातील खास करून चिपळूणमध्ये औद्योगिक कारखानदारी आणली गेली पण दुर्दैवाने आज त्या बाबतीत कोणत्याही प्रकारे शासनाकडून न्याय दिला पाहिजे होता तो दिला गेला नाही, दिला जात नाही. उदाहरण सांगावयाचे तर कोल्हापूर सारखा प्रगत जिल्हा, तेथे औद्योगिक धोरण जाहीर केलेले आहे. त्याला जो दर्जा दिलेला आहे तो डी आणि डी(प्लस) दिलेला आहे तर रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण येथील गाणेफडकोळी येथे जे उद्योग विकसित झाले त्याला देखील डी किंवा डी(प्लस) झोन जाहीर व्हायला पाहिजे असताना तेथे सी आणि सी(प्लस) झोन जाहीर केला गेला. तसे पाहू गेल्यास कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड जिल्ह्यांच्या मानाने कोल्हापूर हा सुधारलेला जिल्हा आहे की मागासलेला जिल्हा आहे ? तर कोल्हापूर जिल्हा हा कोकणापेक्षा खूप पुढारलेला जिल्हा आहे, प्रगत जिल्हा असताना तेथे मात्र वेगळ्या प्रकारच्या सुविधा दिल्या गेल्या आणि कोकण त्या मानाने खूप मागासलेला असताही तेथे वेगळ्या सुविधा दिल्या गेल्या. सभापती महोदय, बजेटमध्ये देखील 871 कोटी 13 लक्ष रूपये पाटबंधाऱ्यांसाठी दिलेले आहेत. मी मुद्याचे विचारतो की, आम्हाला उर्वरित महाराष्ट्रामध्ये टाकले गेले आहे. ...

(यानंतर श्री. सरफरे .... 4आय 1 ..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री. भास्कर जाधव....

उर्वरित महाराष्ट्राकरिता देण्यात आलेल्या 871.13 कोटींपैकी वर्षानुवर्षे रखडलेल्या कोकणातील पाटबंधारे प्रकल्पांसाठी चालू वर्षी किती पैसे देणार आहात ते सांगण्याची आवश्यकता आहे. हा निधी देऊन आपण कोकणातील पाटबंधारेचा अनुशेष भरण्याचे काम केले नाही तर वर्षानुवर्षे वाढत चाललेला अनुशेष थांबणार नाही.

सभापती महोदय, कोकणामध्ये फार मोठया प्रमाणावर औषधी वनस्पती आढळते. या औषधी वनस्पतीचा आपल्याला विकास करावा लागेल. श्रीलंकेमध्ये 250 वर्षापासून बोटॅनिकल गार्डन डेव्हलप करण्यात आले आहे. त्यामध्ये ज्या दुर्लभ औषधी वनस्पती आहेत त्यांचे सवर्धन, रक्षण करण्यात आले आहे. त्यांचा विकास फार मोठया प्रमाणात करण्याचे काम केले आहे. त्याप्रमाणे कोकणामध्ये बोटॅनिकल गार्डन निर्माण करण्यात यावे अशी माझी प्रमुख मागणी आहे. सभापती महोदय, आंबा, काजू, फणस, जांभळे, करवंदे, कोकम अशा निसर्ग निर्मित फळांना कोकणचा मेवा समजला जातो. या फळांवर प्रक्रिया करणारे कारखाने कोकणामध्ये निर्माण केले पाहिजेत. आणि त्यांना एक्सपोर्ट ओरिएंटेड अशाप्रकारचे स्वरुप दिले पाहिजे. त्याकरिता प्रत्येक पंचायत समितीच्या गणामध्ये एक याप्रमाणे सेंटर्स निर्माण केले तर तेथील बेकारी दूर होण्यासाठी मदत होईल आणि निसर्ग निर्मित फळांपासून उत्पादने करण्यासाठी मोठया प्रमाणात उपयोग होईल.

सभापती महोदय, कोकणामध्ये दरवर्षी 150 ते 175 इंच इतका पाऊस पडतो. हे पावसाचे प्रचंड पाणी नदीला आणि समुद्राला जाऊन मिळते. कोकणामध्ये फार मोठया प्रमाणावर डोंगर उतार असल्यामुळे पावसाचे पाणी थांबत नाही. हे पाणी थांबविण्याकरिता डोंगरावर गटारासारखे खड्डे मारण्याचे काम शासनामार्फत केले जाते, त्याला सीसीटी असे म्हटले जाते तर कोकणी लोक त्याला हरळा म्हणतात. एका बाजूला पश्चिम महाराष्ट्रामध्ये 40 इंच पाऊस पडतो. त्याठिकाणी पाणी साठविण्यासाठी या खड्डयांचा उपयोग चांगल्या प्रकारे होतो. त्या उलट कोकणामध्ये परिणाम होतो. अशापध्दतीने डोंगरावर खड्डे मारल्यानंतर त्यामध्ये पाणी साचण्याऐवजी डोंगरावरील जमिनीची धूप मोठया प्रमाणामध्ये होते व डोंगराच्या पायथ्याशी बांधण्यात आलेले बंधारे गाळाने भरतात. त्यामुळे पाणी साठविण्यासाठी बांधण्यात आलेले बंधारे गाळाने भरुन जातात. त्यादृष्टीने शासनाने नवीन प्रयोग करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, चिपळूणच्या नॅशनल हायवे क्रमांक 17 च्या डाव्या बाजूला संपूर्ण कोकणी लोकांची वस्ती आहे. आणि हायवेच्या उजव्या बाजूला समुद्र किनारा आहे. रस्त्याच्या डाव्या बाजूला असलेल्या डोंगराच्या माथ्यावर पाणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव....

साठविण्याचे तंत्रज्ञान विकसित करण्यात आले पाहिजे. त्यामध्ये प्रामुख्याने विहिरी खोदणे, पाणी अडविणे, छोटे छोटे तलाव करणे ही कामे केली पाहिजेत. 35 हजार तलावांची रत्नागिरी जिल्हयामध्ये नोंद आहे. जवळ जवळ सर्व तलाव भरुन गेले आहेत. अशाप्रकारे सर्व डोंगरावर पाणी अडविणे शक्य झाले तर ते पाणी पाझरुन डोंगराखालील विहिरीमधील पाण्याची पातळी वाढण्यासाठी मदत होईल. डोंगरावरुन वाहून जाणारे पाणी अशाप्रकारे अडविले तर तळाशी बांधण्यात आलेले बंधारे भरण्यासाठी त्याची मदत होईल. अशाप्रकारे आपण बंधारे बांधून आपण पाण्याचा पाझर केला तर पाण्याचा प्रश्न सुटण्यास मोठया प्रमाणावर मदत होईल त्यादृष्टीने विचार करण्याची आवश्यकता आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव (पुढे सुरू...

कोकणामध्ये नद्या आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी कोयना विद्युत प्रकल्पाच्या संदर्भाने उल्लेख केला. कोयना प्रकल्पातून वीज निर्माण केल्यानंतर जवळजवळ 78 टीएमसी पाणी टेलमधून वाहून जाते, त्याचा काही उपयोग होत नाही. त्या पाण्याच्या दोन्ही तिरावर 2156 हेक्टर जमीन आहे, त्या जमिनीवर लागवड होत नाही. आता काही जमिनीवर केळी पिकाची लागवड चिपळूण तालुक्यामध्ये चांगल्या प्रकारे होत आहे. त्यावेळेला पी.के.सावंत असताना 13 लिफ्ट इरिगेशन योजना केलेल्या होत्या. त्या आता बंद पडलेल्या आहेत. आता आपण सहकारी तत्वावर लिफ्ट इरिगेशन योजना दिल्या जात आहेत. पण कोकणामध्ये सहकार तत्वावरील लिफ्ट इरिगेशन योजना रुजलेल्या नसल्यामुळे कोकणात लिफ्ट इरिगेशरन योजना नाहीत. त्या ठिकाणी लिफ्ट इरिगेशन योजना करण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करून दिला तर लोकांच्या सहभागातून लिफ्ट इरिगेशन योजना होतील आणि शेतकऱ्यांच्या शेतामध्ये ग्रॅव्हीटीने त्या पाण्याचा उपयोग शेतीसाठी होईल. त्याचा देखील उपयोग करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मी आता खरी गोष्ट सांगितली तर माझ्या मतदार संघामध्ये ओरड होईल. पण मी त्याची चिंता करत नाही. पाच-दहा वर्षामध्ये एवढी लाकूडतोड मी कधी पाहिलेली नाही. गेल्यावर्षी हिरवेगार दिसणारे डोंगर आज उजाड दिसत आहेत. त्या ठिकाणी हायवेच्या एका बाजूला वसति आणि दुसऱ्या बाजूला समुद्र किनारा आहे आणि त्या भागात हिरवीगार दिसणारी झाडी निसर्गाने दिलेली देणगी होती. कोकणात कोळसा पाडण्याचे काम केले जात होते त्यासाठी लाकूडतोड केल्यामुळे डोंगर उजाड दिसायला लागले. त्यानंतर परत झाडे लावल्यानंतर डोंगर हिरवेगार दिसायला लागले. एकेका झाडाला पाच-दहा फुटवे येतात. सामाजिक वनीकरणाने लावलेली झाडे शोधून सापडणार नाहीत. परंतु जी नैसर्गिक झाडे आहेत त्या झाडांना असे फुटवे येतात. आज कोकणामध्ये मोठयाप्रमाणावर लाकूडतोडीचे काम चालू आहे. खास करून रायगड जिल्ह्यातील पन्नास-शंभर बिऱ्हाडे यासाठी तयार असतात. एका रात्रीत झाडांची तोड करून डोंगर उजाड करतात. चिपळूण तालुक्याच्याबाबतीत सांगायचे झाले तर आश्चर्य वाटेल. सन्माननीय श्री.सरपोतदार साहेबांनी सांगितले त्याप्रमाणे मुंबईमध्ये मोठयाप्रमाणात लाकडे आणली जातात. पण मी सांगू इच्छितो की, चिपळूण तालुक्यामधील दिवसाला 500 ते 700 टन लाकडे तोडली जातात. बिगर ताशीव लाकडांची वाहतूक करण्यास परवानगी नाही. तरी देखील विना परवाना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव (पुढे सुरु....

लाकडाची वाहतूक केली जाते. या संदर्भाने आम्ही पास असल्याशिवाय लाकूड वाहतुकीला परवानगी देऊ नये असा फॉरेस्ट खात्याच्या अधिकाऱ्यांवर दबाव आणला. पण नंतर त्या अधिकाऱ्यांनी चलाखी करून पासेस देण्यास सुरुवात केली आणि पाच-पन्नास, सत्तर पासेस देण्याचे काम केले त्यामुळे हिरवागार असलेला डोंगर उजाड होत आहे आणि पाण्याची दिवसेंदिवस अडचण होत आहे, याला आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने लक्ष घातले पाहिजे.

सभापती महोदय, कोकणासाठी एक गोष्ट करावी लागेल. कोकणामध्ये पडीक जमीन आहे ती लागवडीखाली आणण्याचे काम झाले पाहिजे. ती जमीन लागवडीखाली आणण्याच्यादृटीने त्यावेळचे मुख्यमंत्री आदरणीय श्री.अंतुले साहेबांनी प्रयत्न केला. त्यांच्या कामाच्या पध्दतीप्रमाणे त्यांनी एका रात्रीत अधिकाऱ्यांना पाठवून फळझाडांची रोपे आणून शेतकऱ्यांच्या दरवाज्यामध्ये आणून टाकली. कोकणातील फळलागवडीचा कार्यकाळ 1 जून ते 30 सप्टेंबर असा ठरलेला आहे. त्या काळामध्येच फळझाडांचा इष्टांक ठरविला जातो.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव.....

सभापती महोदय, अशा पध्दतीचा इष्टांक ठरवत असताना ज्या नर्सरीतून ही रोपे बाहेर काढली जातात त्या रोपांना बाहेरचे हवापाणी मानवले पाहिजे. आईच्या गर्भातून जन्माला आलेल्या मुलाला सुध्दा बाहेरच्या हवामानाशी जुळवून घेण्यामध्ये दोन चार महिने जातात. तशी या रोपांची परिस्थिती आहे. रोप नर्सरीतून बाहेर काढल्यानंतर त्या रोपाला काही महिने बाहेरचे हवामान मानवले पाहिजे. त्याकरिता काही महिने जातात. अधिकारी 30 सप्टेंबरपर्यंत लागवड करतात. 30 सप्टेंबरनंतर कोकणामध्ये पाऊस कमी होतो आणि ऑक्टोबर हिट सुरु हाते. त्यामुळे केलेल्या लागवडीपैकी बरीचशी रोपे मरुन जातात. माझी अशी विनंती आहे की, आपण असे इष्टांक ठरवून देऊ नका. कमी जमीन लागवडीखाली आली तरी चालेल परंतु 1 जून ते 15 जून या कालावधीत त्या ठिकाणी लागवड करण्याकरिता इष्टांक किंवा कालावधी ठरवून द्यावा. या पंधरा दिवसांमध्ये त्यांनी लागवड केली पाहिजे असे बंधन त्या ठिकाणी घातले तर निश्चितपणे मोठ्या प्रमाणावर लागवड होईल आणि लावलेली झाडे जिवंत राहतील.

सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यामध्ये एकूण क्षेत्र 9,33,700 हेक्टर असून त्यापैकी 62,600 हेक्टर जमीन पडीक आहे. रायगड जिल्ह्यामध्ये एकूण क्षेत्र 6,86,900 हेक्टर असून त्यापैकी 98,600 हेक्टर जमीन पडीक आहे. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये एकूण क्षेत्र 8,16,400 हेक्टर असून 2,97,200 हेक्टर जमीन पडीक आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये एकूण क्षेत्र 5 लाख 4 हजार हेक्टर असून त्यापैकी 1,92,700 हेक्टर जमीन आताही त्या ठिकाणी पडीक आहे. ही जमीन लागवडीखाली येऊ शकेल अशा पध्दतीचा धडक कार्यक्रम शासनाने हाती घेतला पाहिजे. त्यामध्ये शासनाने औषधी वनस्पती तसेच पारंपारिक वनस्पतीची लागवड केली पाहिजे. हिरडा, बेहडा अशा औषधी वनस्पतीची लागवड केली पाहिजे. बिब्ब्याची झाडे आता लोप पावलेली आहेत. एकेकाळी बिब्बा औषध म्हणून घरामध्ये सांभाळून ठेवत असत. आता बिब्ब्याची झाडे दिसत नाहीत. या झाडांची जपणूक करण्यासाठी शासनाने त्या पध्दतीची लागवड करणे आवश्यक आहे. फळझाडांची लागवड करावयाची असेल तर ती कृषी खात्यामार्फत करावी परंतु जी औषधी वनस्पती आहे त्यांची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

लागवड ग्रामपंचायतीमार्फत करण्याकरिता ग्रामस्थांना काही अनुदान दिले, प्रत्येक ग्रामपंचायतीला इष्टांक ठरवून देऊन संत गाडगेबाबा अभियानासारखे अभियान राबविले तर ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणावर जमिनी लागवडीखाली येतील. याचाही शासनाने विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, शेतीला 6 टक्के व्याजाने कर्ज दिले जाते. तशा प्रकारची केंद्र शासनाची आणि राज्य शासनाची योजना आहे. माझी शासनाला विनंती आहे. मत्स्यव्यवसाय आता पूर्णपणे अडचणीत आलेला आहे. त्यांना डिझेलचा परतावा 8 रुपये 45 पैसे देण्याचे शासनाने मान्य केलेले आहे. परंतु तो परतावा त्यांना वेळेवर मिळत नाही. केरळ आणि गुजरात राज्याला लाभलेला समुद्र किनारा छोटा आहे. आपल्या राज्याला सगळ्यात मोठा समुद्र किनारा लाभलेला असून सुध्दा या ठिकाणी जी मासेमारी होते ती पारंपारिक पध्दतीने होते. त्यांना अद्ययावत तंत्रज्ञानाच्या बाबतीत मार्गदर्शन मिळत नाही. समुद्रामध्ये किती खोल पाण्यामध्ये गेल्यानंतर कोणत्या प्रकारचे मासे मिळतील यासंदर्भात मार्गदर्शन मिळत नाही. आज समुद्रामध्ये गेल्यानंतर कधी वादळ होईल, आपल्याला कसा धोका आहे याचे मार्गदर्शन मिळत नाही. त्यामुळे या ठिकाणी पारंपारिक पध्दतीने मासेमारी चालू आहे. एकाने दुसऱ्याला सांगितले, दुसऱ्याने तिसऱ्याला सांगितले अशा पारपारिक पध्दतीने या ठिकाणी मासेमारीचा व्यवसाय चालू आहे. शासनाने ज्या पध्दतीने शेतीला 6 टक्के व्याजाने कर्ज देण्याची घोषणा केली आहे तशाच पध्दतीने मच्छिमार व्यावसायिकांना सुध्दा 6 टक्के व्याजाने कर्ज देण्याचे धोरण आखणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, झाडांच्या बाबतीत सांगत असाताना एक मुद्दा मांडावयाचा राहून गेला. कै. पी. के. सावंत यांनी कोकणात काजू लागवडीची मोठी योजना आणली होती. ती योजना आणल्यानंतर त्या त्या भागामध्ये काजूची लागवड झाली. काजूची लागवड झाल्यानंतर जेव्हा तगाई वसूल करण्याची वेळ आली त्यावेळी शोधूनही काजू बी कोठे सापडले नाही म्हणून शेतकऱ्यांना दोष देण्यात आला आणि ती योजना बारगळवण्याचे काम त्या ठिकाणी करण्यात आले.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

(श्री. भास्कर जाधव...

त्यावेळी जी योजना आणली ती कशा पध्दतीने राबविली गेली हे आपण पाहिले पाहिजे. कोकणामध्ये काजू लागवडीची योजना राबविण्याचा कै. पी.के.सावंत यांचा हेतू चांगला होता. परंतु अधिका-यांनी त्या योजनेचा बट्टयाबोळ केला. इष्टांक पूर्ण करण्याकरिता अधिका-यांनी बाजारातून काजूच्या बिया घेऊन त्या शेतक-यांच्या जमिनीमध्ये लावल्या. परंतु त्या बिया लावल्याचे शेतक-यांना माहीत देखील नव्हते. मग 6 वर्षानंतर जेव्हा त्या काजूच्या लागवडीचे अनुदान भरण्याची वेळ आली त्यावेळी शेतक-यांना कळले की, त्यांच्या जागेमध्ये कोणी तरी काजूच्या बिया लावल्या होत्या. त्यावेळी शेतक-यांनी काजूच्या बिया भाजून खाल्ल्या असे सांगून शेतक-यांना बदनाम करण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न झाला. याबाबत विधानसभेमध्ये मोठा आवाज उठविण्यात आला. त्यानंतर कै. के.पी. सावंत यांच्या नेतृत्वाखाली चौकशी समिती नेमण्यात आली. चौकशीमध्ये शेतक-यांना त्यांच्या जमिनीवर काजूची लागवड झाल्याचे माहित नसल्याचे निष्पन्न झाले. अशा त-हेने त्यावेळी योजनेचा बट्टयाबोळ झाला.

सभापती महोदय, या निमित्ताने मी शासनाला काही सूचना करु इच्छितो. विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये एमटीडीसीचे रिझर्व्हेशन करण्याची एजन्सी मिळविण्यासाठी 10 हजार रुपये डिपॉझिट म्हणून घेतले जातात. परंतु कोकणामध्ये एमटीडीसीचे रिझर्व्हेशन करण्याची एजन्सी घेतली तर त्यासाठी 50 हजार रुपये भरावे लागतात. एका बाजूला कोकण मागासलेला असताना एमटीडीसीची रिझर्व्हेशनची एजन्सी घेण्यासाठी 50हजार रु. भरावे लागणे हा कोकणावर एक प्रकारे अन्यायच आहे. पर्यटनासाठी जर 20 खोल्यांचे निवासस्थान बांधले तर शासन त्यासाठी अनुदान देते. कोकणामध्ये 20-20 खोल्यांची निवासस्थाने बांधण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर खर्च येतो. तेव्हा या संदर्भात जे काही निकष असतील त्यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. जर एखाद्याकडे 5-10 खोल्या असतील आणि त्या खोल्यांना जोडून आणखी 10 खोल्या बांधून 20 खोल्यांचा कोटा पूर्ण केला तर त्याला नव्याने बांधलेल्या 10 खोल्यांसाठी अनुदान दिले जावे अशी निकषामध्ये सुधारणा केली पाहिजे. यामुळे पूर्वीचे हॉटेल मालक पुढे येतील आणि या योजनेला मोठ्या प्रमाणावर चालना मिळू शकेल. त्याच प्रमाणे जे लोक अशा प्रकारची निवासस्थाने बांधतील त्यांना घरपट्टी आकारामध्ये सूट द्यावी अशी विनंती मी शासनास करीत आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. भास्कर जाधव...)

सभापती महोदय, कोकणातून फार मोठ्या प्रमाणावर महसूल गोळा केला जातो. परंतु त्या प्रमाणात कोकणाकडे पाहिजे तेवढे लक्ष दिले जात नाही. या महसुलाचा विचार केला तर आजपर्यन्त शासनाने कोकणाला काय दिले ? कोणत्या योजना दिल्या ? असे प्रश्न समोर उभे राहातात. मी केवळ रत्नागिरी जिल्ह्यातील महसुलाची आकडवारी येथे देतो. सन 2001-02मध्ये 7 कोटी 41 लाख रु.चे उद्दिष्ट होते आणि वसुली 7 कोटी 68 लाख 38 हजार रु. इतकी झाली. म्हणजे 103.27 टक्के वसुली झाली. सन 2002-03मध्ये 8. 59 कोटीचे उद्दिष्ट होते आणि वसुली 9 कोटी 29 लाख 23 हजार रु. इतकी झाली. म्हणजे 108 टक्के वसुली झाली. सन 2003-04मध्ये 12.75 कोटीचे उद्दिष्ट होते आणि वसुली 12 कोटी 86 लाख 36 हजार रु. इतकी झाली. म्हणजे 100.85 टक्के वसुली झाली. सन 2004-05मध्ये 13.38 लाखाचे उद्दिष्ट होते आणि वसुली 24 कोटी 63 लाख 5 हजार रु. इतकी झाली. म्हणजे 185.6 टक्के वसुली झाली. सन 2005-06मध्ये 17.36 कोटीचे उद्दिष्ट होते आणि वसुली 29 कोटी 18 लाख 20 हजार रु. इतकी झाली. म्हणजे 168.13 टक्के वसुली झाली.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव.....

सभापती महोदय, आज कोकणामध्ये असा कोणत्या प्रकारचा महसूल आहे? ही आकडेवारी मी रत्नागिरी जिल्हयाची सांगत आहे. कोकणातील फक्त रत्नागिरी जिल्हयातून ही वसुली होती. ती साधी घरपट्टीची होते. त्याच वेळी वाळू उत्खननापासून, मत्स्य व्यावसायिकांकडून वसुली होते. आज कोकणामध्ये मोठ्या प्रमाणात चिरे खाणीचा व्यवसाय चालतो. त्या चिरे खाणीच्या कारखान्याकडून वसुली केली जाते. दिलेल्या इष्टांकापेक्षा दीड ते दोन पटीने वसुली करण्याचे काम कोकणामध्ये झालेले आहे. आज चिरे खाणी व्यावसायिकांना कोकणातील महसूल अधिकाऱ्यांनी इतके जेरीस आणले आहे की, भीक नको पण कुत्रा आवर असे म्हणण्याची त्यांच्यावर पाळी आली आहे. वास्तविक चिरे खाणी व्यावसायिकांना 30 टक्के सूट दिली पाहिजे. परंतु त्यांना ट्रकच्या पासाकरिता 5000 रुपये रॉयल्टी द्यावी लागते. तहसीलदार, प्रांत अधिकारी ग्रामीण भागामध्ये जातात आणि पासाच्या नावाखाली गाडीवाल्यांना पकडतात. महिन्याची रॉयल्टी त्याने भरलेली असते. तरी देखील तेथील प्रत्येक ट्रिपकरिता पासाची मागणी करतात. ग्रामीण भागामध्ये चिरे खाणी असेल तर प्रत्येक ट्रिपसाठी तहसील कार्यालयात आले पाहिजे आणि पास घेतला पाहिजे आणि मगच ट्रिप मारली पाहिजे अशा पध्दतीने छळले जाते, अडवणूक केली जाते. त्या ट्रकवाल्यांकडून जाणीवपूर्वक चूक केली म्हणून दंडाच्या पैशाची वसुली केली जाते. वास्तविक त्यांना 30 टक्के सूट आहे. जमिनीच्या भूगर्भामध्ये जांभा दगड मिळेल की नाही हे तो सांगू शकत नाही. वरच्या भागातील दहा फूट, आठ फूट माती काढली जाते, त्यानंतर खालच्या बाजूला जांभा दगड मिळतो. परंतु अधिकारी वरच्या भागातील माती काढली की त्यावर देखील चार्ज लावतात. एवढ्या प्रमाणात रॉयल्टी मिळत असली तरी त्या चिरे खाणीच्या मालकांना जांभा दगड मिळतो की नाही हे पाहून तेवढ्याच प्रमाणात रॉयल्टी घेण्याचे काम शासकीय यंत्रणेने केले पाहिजे. परंतु हे चिरे खाणीचे मालक आपल्या खिशातून खर्च करुन रॉयल्टी भरण्याचे काम करतात. अशाप्रकारे अधिकाऱ्यांकडून वसुली केली जाते.

सभापती महोदय, नियोजन मंडळाचा वसुली करताना आराखडा किती आहे? गेल्या वर्षीचा रत्नागिरी जिल्हयाचा आराखडा 31 कोटी रुपयांचा होता. सिंधुदुर्ग जिल्हयाचा 18 कोटी रुपयांचा होता. रायगड जिल्हयाचा 57.37 कोटी रुपयांचा व ठझणे जिल्हयाचा 200.56 कोटी रुपयांचा होता. एका बाजूला नियोजन आराखडयामध्ये कोकणातील पैसा खर्च होत नाही. 28 फेब्रुवारी,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव.....

2004 रोजी 300 कोटी रुपयांचे पॅकेज कोकणासाठी जाहीर करण्यात आले. एका वर्षात हा पैसा खर्च व्हावयास पाहिजे होता. परंतु आज 2007 उजाडले आहे. ही काय पंचवार्षिक योजना आहे का? 300 कोटी रुपये आजपर्यंत कोकणाला मिळू शकले नाहीत. त्यानंतर विदर्भाला 3750 कोटी रुपयांचे पॅकेज दिले. ते पॅकेज संपले, आम्हाला आनंद आहे. त्यानंतर 1200 कोटी रुपयांचे पॅकेज दिले. तेही संपले. पंतप्रधानांनी पॅकेज दिले, ते संपले. परंतु कोकणासाठी 3-4 वर्षात 300 कोटी रुपयांचे पॅकेज देता आणि ते देखील खर्च होत नाही म्हणून सांगितले जाते हे योग्य आहे का? कोकणातील माणूस हा शासनाचा देणेकरी नाही. आज कोकणात लोडशेडिंग केले जाते. जर 15 टक्के वीजचोरी होत असेल, वीज बिलाची थकबाकी असेल तर त्याठिकाणी फक्त लोडशेडिंग करता येते. कोकणात किती वीजचोरी होते? कोकणात 1 टक्का देखील वीज चोरीचे प्रमाण नाही. कोकणात वीज बिलाची थकबाकी असू शकत नाही. असे असताना त्या ठिकाणी शासन लोडशेडिंग करीत आहे. प्रत्यक्ष शासकीय कामाची, शासकीय जबाबदारी तुम्ही कोकणी माणसावर लादत आहात. कोकणी माणूस आपल्या इभ्रतीची कदर करतो. प्रत्येक गोष्ट मुकाटपणे सहन करतो. तो आत्महत्या करीत नाही. तो शासनाकडे येत नाही. शासनाने लक्ष दिले नाही म्हणून आत्महत्या करतो का? मी इतर भागाबद्दल टीका करीत नाही. कोकणासारखे इतर भागामध्ये भूकंप होतात, महापूर येतो, वादळ येते. कोकणामध्ये वादळ येते, महापूर येतो, भूकंप होतो. मुंबईतील कापड गिरण्यांमध्ये बहुसंख्य कोकणी माणूस काम करीत होता. कापड गिरण्या बंद पडल्यामुळे कोकणी माणूस आज वणवण करीत राहिला आहे. मी आपल्या घरात उपाशी आहे हे सांगायला तो कधी आला नाही. तो लाल मातीत राहिला. कोकणी माणूस हा स्वाभिमानी माणूस आहे. तो लाचारपणे कोणासमोर झुकणार नाही. म्हणून त्याने कधी आत्महत्या केली नाही.

सभापती महोदय, आज ऊस जास्त पिकला म्हणून साखरेचा बफर स्टॉक करण्याची शासनाने घोषणा केली. ऊस जास्त पिकला म्हणून ऊसाच्या 25 कि.मी.अंतराच्या वाहतुकीसाठी किती पैसे देणार याची घोषणा झाली. ऊस जास्त पिकला म्हणून 31 मे पर्यंत साखर कारखाने चालू ठेवा म्हणून शासनाने आदेश दिले. आज कोकणातील मासे साठविण्यासाठी शासन काय करते? कोकणातील आंबा साठविण्यासाठी शासन काय करते?

(नंतर श्री.जुन्नरे...

अशुद्धित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. भास्कर जाधव ...

कोकणातील फळे टिकवण्यासाठी तुम्ही कोणती उपाययोजना केलेली आहे ? कोकणातील मासे टिकवण्यासाठी, कोकणातील मासे परदेशात पाठवण्यासाठी तुम्ही कोणती उपाययोजना केलेली आहे? निसर्गाने महाराष्ट्राला निरनिराळी निसर्ग संपदा दिलेली आहे. पश्चिम महाराष्ट्राला निसर्गाने वेगळी निसर्ग संपदा दिलेली आहे, विदर्भाला वेगळी निसर्ग संपदा दिलेली आहे, मराठवाडयाला वेगळी निसर्ग संपदा दिलेली आहे, तसेच कोकणाला सुध्दा निसर्गाने वेगळी निसर्ग संपदा दिलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी थोडया वेळापूर्वी म्हटले आहे की, "कोकणातील माणूस स्वाभिमानी असल्यामुळे कोकणातील शेतक-यानी कधीही आत्महत्या केलेली नाही." विदर्भ, मराठवाडयातील आत्महत्या करणा-या शेतक-यांबद्दल अशा प्रकारचे उद्‌गार काढणे हे योग्य नाही. अशा प्रकारचे उद्‌गार काढणे चुकीचे आहे. आत्महत्या करणा-या विदर्भ आणि मराठवाडयातील शेतक-याच्या संदर्भात अशा प्रकारचे उद्‌गार काढणे हे त्या शेतक-यांचा अवमान करण्यासारखे आहे. सन्माननीय सदस्य विदर्भ, मराठवाडयातील शेतक-यांची तुलना कोकणातील शेतक-यांशी करतात ते योग्य नाही. आत्महत्या करणा-या शेतक-याला कधीही लाचार म्हणता येणार नाही. विदर्भ आणि मराठवाडयातील आत्महत्या करणारे शेतकरी लाचार आहेत त्यामुळे ते आत्महत्या करतात असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय? सन्माननीय सदस्यांनी विदर्भ, मराठवाडयातील आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या संदर्भात जे शब्द उच्चारलेले आहेत ते कामकाजातून काढून टाकण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या प्रस्तावावर विचार मांडत असतांना मी जरुर जाशात आलो होतो. मी जोशात आल्यामुळे यासंदर्भात मला भान राहिले नाही. मी म्हणालो होतो की, गिरण्या बंद पडल्या तेव्हा येथील कामगार कोकणात गेले, कोकणाची माती स्वाभिमानी आहे, कोकणाच्या मातीचा तो गुणधर्म आहे कोकणी माणूस घरात उपाशी असला तरी तो कधीही लाचारी स्वीकारीत नाही. त्यामुळे याचा अर्थ विदर्भातील शेतकरी लाचार आहेत असे मला म्हणण्याचे काहीच कारण नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ...

सभापती महोदय, कोकणामध्ये फक्त भात पिकतो आणि तो सुध्दा निसर्गाच्या लहरीवर पिकतो. कोकणात पिकणारे भात हे एकमेव पीक आहे. कोकणात भात सोडून दुसरे कोणतेही पीक घेतले जात नाही. कोकणात दोन पिके घेतली जात नाही, किंवा चार पिके सुध्दा घेतली जात नाहीत. तसेच कोकणात पर्यायी पिके घेण्याचाही काही मार्ग नाही. जसा विदर्भ आणि मराठवाडा निसर्गावर अवलंबून आहे तसाच कोकण सुध्दा निसर्गावर अवलंबून आहे. तापमान वाढले तर आंबे कमी येतात, मळभ आले तरी आंब्याचा मोहर गळून जातो. आता कोकणामध्ये जबरदस्त हीट वाढलेली आहे. जबरदस्त हीट वाढत असल्यामुळे कोकणात पाऊस कधी पडेल हे सांगता येत नाही. कोकणामध्ये साधारणत: 19 एप्रिलला पाऊस न चुकता पडत असतो. कोकणात पाऊस पडण्याची लक्षणे आता दिसू लागलेली आहेत. पाऊस पडता पडता वादळ सुध्दा येत असते. वादळ आल्यामुळे आंब्याच्या झाडावर असलेले आंबे पडतात व त्यामुळे आंबा उत्पादक शेतक-याचे अतोनात नुकसान होते. त्यामुळे अशा प्रकारे कोकणातील आंब्याचे नुकसान झाले तर त्यासाठी शासन काही नुकसान भरपाई देणार आहे काय? आपण जशी विदर्भ, मराठवाडयात शेती पिकली नाही नाही म्हणून नुकसान भरपाई देतो, पीक आले नाही म्हणून नुकसान भरपाई देतो त्या प्रमाणे ज्या शेतक-याचे पीक निसर्गावर अवलंबून आहे अशा कोकणातील आंबा पिकविणा-या आंबा उत्पादक शेतक-याला तुम्ही काही नुकसान भरपाई देणार आहात की नाही हा माझा सवाल आहे?

सभापती महोदय, ज्यावेळेस युती शासन होते त्यावेळी मी सुध्दा सत्ताधारी पक्षात होतो. त्यावेळी विरोधी पक्ष नेते पदी माननीय मधुकरराव पिचड होते. त्यावेळेस कोकणातील आंबा उत्पादक शेतक-यांना नुकसान भरपाई मिळण्याच्या संदर्भात एक लक्षवेधी सूचना आली होती. आंबा पिकविणा-या शेतक-यांना नुकसान भरपाई मिळाली पाहिजे म्हणून विरोधी पक्ष आवाज उठवत होता. परंतु सत्ताधारी पक्षातून आवाज उठवणारा मी एकमेव सदस्य होतो. त्यावेळी माननीय मनोहर जोशी हे मुख्यमंत्री होते. या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात शेतक-यांना मदत दिली तर त्याचा फायदा विरोधी पक्षाला होईल असे सत्ताधारी पक्षाला वाटत होते. मदत केली नाही तर आपले नुकसान होईल अशा कात्रीत सत्ताधारी पक्ष सापडला होता. या विवंचनेत माननीय मुख्यमंत्री

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ...

उठले आणि ते सभागृहाबाहेर जावयास निघाले त्याचवेळेस मी सुध्दा उठलो आणि दोन्ही हात पुढे करुन त्यांना अडवले आणि सांगितले की, "50 वर्षापासून कोकणाला न्याय मिळाला नाही. 50 वर्षातून आता कोकणाला न्याय देण्याची वेळ आलेली आहे. आपण कोकणातील आंबा उत्पादक शेतक-याला थोडी मदत केली तरी चालेल परंतु या प्रश्नाच्या संदर्भात तुम्हला आता न्याय द्यावा लागणार आहे. कोकणालातील आंबा उत्पादक शेतक-याकडे पाठ फिरवू नका, कोकणातील आंबा उत्पादक शेतक-याकडे पाठ फिरवली तर कोकणाला न्याय मिळणार नाही" असे मी त्यावेळेस बोललो होतो.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव.....

तेव्हा सरांनी सर्वांशी वाईटपणा घेतला. सत्ताधारी पक्षाचा सदस्य माननीय मुख्यमंत्र्याविरुध्द जाणे काय असते याची आपणा सर्वांना चांगली माहिती आहे. परंतु मी माझ्या आमदारकीची पर्वा केली नाही. आम्ही सरकारमध्ये असलो,सरकारचे समर्थन करणारे असलो तरी कोकणच्या प्रश्नाबाबत आम्ही आता बोलणार नाही तर केव्हा बोलणार ? आमच्या भागातील वेदना आम्हाला जास्त समजणार नाही तर आणखी कोणाला समजणार ? तेव्हा सन्माननीय श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी कोकणच्या प्रस्तावावर जे विस्तृत भाषण करताना ज्या समस्या मांडल्या त्या कोकणातील सर्वसामान्य जनतेच्या होत्या. त्या त्यांच्या तोंडातून निघाल्या. आपण येथे सर्वजण सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नावर बोलण्यासाठी येतो. तेव्हा त्यांच्या व्यथा आपण येथे मांडल्याच पाहिजेत.

सभापती महोदय, राज्याच्या तुलनेत विचार केला असता कोकणात 20 टक्के खनिज तयार होते. तेव्हा हे खनिज आपल्याला डेव्हलप करायचे आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी जर कोकणच्या संदर्भात एक विशेष बैठक बोलाविली तर त्या बैठकीमध्ये कोकणासंबंधीची परिणामकारक अशी व्यवस्थित माहिती निश्चितपणे देऊ.

सभापती महोदय, याठिकाणी अपांरपारिक ऊर्जा मंत्री श्री. विनय कोरे उपस्थित आहेत. मला मिळालेली माहिती खरी नसेल तर त्यांनी ती करेक्ट करावी. नागालँड राज्यात पावसाळ्यामध्ये धबधब्यांवर छोटे छोटे युनिट बसवून वीज निर्माण केलेली आहे. आज राज्याला जवळपास चार ते पाच हजार मे.वॅ.विजेचा तुटवडा आहे. आपण जर नागालँड राज्यासारखी कोकणात धबधब्यांपासून वीज निर्माण करु शकलो तर लोकशेंडीग काही प्रमाणात कमी होऊ शकेल. कोकणात तीन-चार महिने पाऊस असतो. तेव्हा अशाप्रकारचा प्रयोग केला तर प्रत्येक घरामध्य वीज मिळून विजेचा प्रश्न सुटू शकेल. माझ्या चिपळूण तालुक्यामध्ये मी हा यशस्वी प्रयोग केलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव.....

सभापती महोदय, आज कोकणामध्ये सागराच्या लाटांपासून वीज निर्माण करण्याचा प्रयत्न शासन करीत आहे अशी माझी माहिती आहे. एक कि.मी.च्या अंतरापर्यंत 10 मे.वॅ.वीज निर्माण होऊ शकते. महाराष्ट्राला 720 कि.मी.चा समुद्र किनारा लाभलेला आहे याचा विचार करता आपला प्रयत्न जर यशस्वी झाला तर जवळपास 60 हजार मे.वॅ. वीज आपण तयार करु शकतो. एक कि.मी.मागे 15 लोकांना रोजगार मिळू शकतो. त्यामुळे कोकणातील बेकारी पूर्णपणे नष्ट होईलच, परंतु या राज्यातील वीज आपण दुसऱ्या राज्यांना देऊ शकू. कोकण विजेच्या बाबतीत किती सक्षम आहे हे आपण दाखवून देऊ शकू. वैद्यकीय क्षेत्रासाठी वनस्पती मिळवून देण्यासाठी कोकण किती सक्षम आहे हे दाखवून देऊ शकू. कोकणातील जगप्रसिध्द आंब्याच्या बाबतीत चर्चा होते. आंबा हे परकीय चलन मिळवून देणारे पीक आहे. समुद्रातील लाटांपासून वीज निर्मिती करायची असेल तर स्थानिक लोकांना रोजगार देण्याकरिता त्यांना या उद्योगामध्ये सबसिडी दिली पाहिजे. यासाठी लागणारे कर्ज मिळण्यासाठी बँकानी तेथील लोकांना सहकार्य करावे अशी विनंती शासनाने केली पाहिजे. पर्यटनाच्या माध्यमातून सिंधुदुर्ग जिल्ह्याचा, फलोत्पादनाच्या प्रोसेसिंगच्या माध्यमातून रत्नागिरी जिल्ह्याचा, औद्योगिकीकरणाच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यांचा विकास करावा. विकासाच्या दृष्टीकोनातून हे धोरण परिणामकारक होईल याची माननीय मुख्यमंत्र्यांनी नोंद घ्यावी अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि आपण मला मोठ्या अंत:करणाने फार वेळ बोलू दिले याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

उपसभापती : कोकणच्या प्रस्तावरील चर्चेचे उत्तर उद्या 93 वरील निवेदन झाल्यानंतर माननीय मुख्यमंत्री देतील.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा) विधेयक

L. A. BILL NO.X OF 2007.

(A BILL FURTHER TO AMEND THE VIDARBHA IRRIGATION DEVELOPMENT CORPORATION ACT, 1997 AND THE KONKAN IRRIGATION DEVELOPMENT CORPORATION ACT, 1997.)

डॉ.सुनील देशमुख (पाटबंधारे, लाभक्षेत्रविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 10 - विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, 1997 आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, 1997 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ.सुनील देशमुख : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 10-विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, 1997 आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, 1997 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी (औरंगाबाद पदवीधर) : सभापती महोदय, सुरुवातीस या बिलाचे मी स्वागत करतो. विदर्भ आणि कोकणामधील काही विशेष प्रकल्पापुरते महामंडळ केले होते, परंतु या महामंडळात आता आपण बाकीच्या प्रकल्पांचाही समावेश करीत आहात, हे चांगले आहे. परंतु हा कायदा करीत असताना त्यामध्ये काही तांत्रिक चुका झालेल्या आहेत. त्या पुढील काळामध्ये आपण अध्यादेशाद्वारे काढून दुरुस्त कराव्यात, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, याठिकाणी 15 (अ) मध्ये असे म्हटले आहे की, " नेमून दिलेल्या दिनांकाच्या लगतपूर्वी पाटबंधारे विभागाच्या नियंत्रणाखाली आणि राज्य शासनाकडे निहित होत्या अशा महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील, महामंडळाकडे वर्ग करण्यात आलेले प्रकल्प आणि त्यांची स्थावर व जंगम मालमत्तांचा समावेश असलेल्या म्हणजेच त्याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्व पाटबंधारे प्रकल्प, जलविद्युत प्रकल्प, बांधकाम चालू असेलेली कामे यांचा समावेश असलेल्या मालमत्ता व मत्ता महामंडळाकडे निहित होईल आणि त्याकडे हस्तांतरित करण्यात आलेले असेल आणि त्याबाबतीत मिळालेले सर्व उत्पन्न आणि केलेला खर्च हा महामंडळाच्या लेख्यावर आणण्यात येईल," याठिकाणी आपण फक्त काम ट्रान्सफर केलेले आहे. कॉन्ट्रॅक्ट ऑब्लीगेशन आणि लिगल डीस्प्यूटचा उल्लेख या विधेयकात नाही. उद्या लिगल डीस्प्यूटचा प्रश्न उपस्थित झाला तर समस्या निर्माण होईल. कारण, या कायद्यामध्ये त्यासंबंधीचा उल्लेख नाही. आपण हे विधेयक वाचले तर त्यामध्ये असे आहे की, "all assets and liability of the said project will be transferred". .अशा प्रकारचे हे 15 (अ) कलम आहे. अशाप्रकारची ही तांत्रिक चूक यामध्ये झालेली आहे. हे कलम महत्वाचे असल्यामुळे त्यातील चूक दुरुस्त होणे आवश्यक आहे. विदर्भ आणि कोकणचा विकास होण्याच्या दृष्टीने आपण प्रकल्प ट्रान्सफर करणार आहात, परंतु काही ऑनगोईंग प्रकल्प असतात, त्यासंबंधीचे कॉन्ट्रॅक्ट असते. या प्रकल्पावर मालकी हक्क महामंडळाचा राहील की सरकारचा राहील, हे यातून स्पष्ट होत नाही. महामंडळ आणि सरकार या दोन वेगवेगळया यंत्रणा आहेत. त्यामुळे ते स्पष्ट झाले पाहिजे. सरकार सार्वभौम असून त्यामुळे प्रकल्पाच्या नोंदीसाठी सरकारला पैसा लागणार नाही. परंतु महामंडळाकडे मालकी हक्क राहणार असेल तर त्यांना रजिस्ट्रीचे पैसे भरावे लागतील. तसेच, महामंडळाला लिज टॅक्स द्यावा लागेल. परंतु महामंडळाला करार करण्यासाठी कंपनीचे जे नियम आहेत ते लागू होतात.

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी...

कारण, सुप्रिम कोर्टात मी यासंबंधीच्या एका मुद्यासंबंधी लढलो व त्या केसमध्ये मी जिंकलोही. त्यामुळे यासंबंधीची चांगली माहिती मला आहे व त्यामुळेच मी याठिकाणी सुधारणा सुचवीत आहे. कारण, या कायद्यातील तांत्रिक चुकीमुळे कोणालाही फटका बसू नये, अशी माझी भावना आहे. कॉन्ट्रॅक्टऐवजी "कॉन्ट्रॅक्च्युअल ऑब्लीगेशन" हा शब्द टाकल्यामुळे मला दोन तास कोर्टामध्ये इ ागडावे लागले.

नंतर कु.गायकवाड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ....

Whether the contracts with the Corporation or contracts with the Government are different? At that time the court said that the contracts have four parts. First , assets and liability, second contractual obligations and rights, third part is legal proceedings and fourth part is relationship. कोर्टकचेऱ्या करावयाच्या असतील, कोर्टात केस करावयाची असेल तर कोणाच्या विरुध्द केस करावयाची महामंडळाच्या विरुध्द की शासनाच्या विरुध्द ? महामंडळाकडे आपण लिगल ट्रान्सफर करीत आहात तर जमिनीवरचे जे अधिभार आहे, जे डिस्पूटस आहेत तेसुध्दा हस्तांतरित होणे आवश्यक आहे. आपण कमांड एरिया डेव्हलपमेंटचे काम पाटबंधारे विभागाअंतर्गत करित आहोत परवा सिचन खात्याचे प्रोजेक्टस घेऊन काही फंडींग एजन्सीजकडे गेलो होतो .पैठणचा सुदर प्रकल्प आहे त्यासाठी 2-3 हजार कोटी रुपये खर्च करुन टुरिझम सेंटर निर्माण करता येऊ शकेल का याची चौकशी करण्यासाठी मी लिजिंग अँड फायनान्स कॉर्पोरेशनकडे गेलो होता 90 हजार कोटी रुपये या संस्थेकडे आहेत. त्यांच्याकडे मी हा प्रस्ताव मांडला. त्यांनी सांगितले की, या प्रकल्पाची मालकी जर महाराष्ट्र सरकारकडे असेल तर निधी देणे अवघड आहे कारण सरकारचे निर्णय त्वरीत घेतले जात नाहीत. पण महामंडळाच्या मालकीमध्ये फक्त कर्मचाऱ्यांचे पगार देता येतात म्हणून मालकी हक्क पुन्हा सरकारकडे देण्यात आले. जवळजपळ 5हजार कोटी रुपयांची इनव्हेस्टमेंट मिळू शकते. जायकवाडी प्रकल्प त्याचे धरण एरिया, कमांड एरिया, तेथील 1200 एकरची जागाव 600 क्वार्टर्स अशा या संपूर्ण प्रकल्पाची प्रगती करण्यासाठी 2 कन्सल्टंट नेमण्याची आवश्यकता आहे. यासाठी आम्हाला लिगल डॉक्युमेंटची आवश्यकता असते. घाईगडबडीत कायदे आणले जातात त्यामुळे विकास खोळंबतो. म्हणून आज हा कायदा पास करताना आपण आवश्यक ती काळजी घ्यावी त्यासाठी इरिगेशन डिपार्टमेंटमधील लोकांच मत घ्यावे व एक लिगल कन्सल्टंट नेमावा. मॅनेजमेंटचे काम सरकारने करायला हरकत नाही परंतु ॲसेट लाएबिलिटी तरी आपण महामंडळाकडेच ठेवावी . मी या ठिकाणी महामंडळाचे स्वागत करतो कारण सरकार म्हटले म्हणजे त्याची अकौंटॅबिलिटी नसते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ....

आता आम्हाला जा गोदावरी खोरे महामंडळाचा 2005-06 चा अहवाल देण्यात आाला तसा या महामंडळाचा देखील अहवाल येईल. आम्ही आपणास जायकवाडी प्रकल्पाबाबत प्रश्न विचारला होता.माझी माननीय मंत्र्यांना अशी विनंती आहे की, ज्याप्रमाणे आम्ही गोदा परिक्रमा केली त्याप्रमाणे त्यांनी जायकवाडी परिक्रमा करावी म्हणजे त्यांना जायकवाडी धरणाची परिस्थिती लक्षात येईल.तेथील सिंचनाचा कमांड एरिया कागदावर 30 टक्के दिसतो, जलप्रदाय योजनेतील विहिरी वगैरेच्या सिंचन क्षमतेमुळे ही टक्केवारी 40 -45 पर्यंतची खोटी कागदावरील येते. या कंपनीचे शेअर इंडेक्स तुम्हाला केवळ आपणास केवळ बॉम्बे स्टॉक एक्सचेंज, नॅशनल स्टॉक एक्सचेंज एवढेच नव्हे तर नॅसडॅक पर्यंत नेता येतील आणि वॉटरच्या अगेन्स्ट तुम्हाला एखादी ॲग्रिकल्चरल पॉलिसी आणता येईल. मी येथे एक उदाहरण देऊ इच्छितो सुखणा नावाचा एक छोटा मध्यम पाटबंधारे प्रकल्प आहे त्याचे कॅनॉल दुरुस्त केले तर त्यामुळे 35 कोटी रुपयांचे कृषी उत्पन्न वाढेल.

यानंतर श्री. रोझेकर ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी.....

आणि म्हणून माझे म्हणणे आहे की, हा पहिला टप्पा आहे, ठीक आहे, मंत्री महोदयांना आपण संधी देऊ. परंतु, ही जी पाटबंधारे विकास महामंडळे आहेत ती लुटण्यासाठी ठेवणार आहात की जनतेचे भले करण्यासाठी त्यांचा उपयोग होणार आहे, याचा एकदा विचार झाला पाहिजे. त्यामुळे मी आता जे मुद्दे माझ्या भाषणात मांडले त्या अनुषंगाने सर्वकष कायदा कधीपर्यन्त आणण्यात येईल ? याचे उत्तर सन्माननीय मंत्र्यांनी दिले तर मी या विधेयकाला सहमती देऊ शकेन व नंतरच विधेयक मंजूर करावे, अशी माझी विनंती आहे.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख (अर्थ राज्यमंत्री) : सभापती महोदय, राज्यातील जलसंपत्तीचा पूर्णपणे उपयोग करण्याच्या दृष्टीने व प्रादेशिक समतोल राखण्याच्या दृष्टीने पाच वेगवेगळया अधिनियमांव्दारे पाच वेगवेगळी पाटबंधारे विकास महामंडळे आपण राज्यात स्थापन केली आहेत. आपल्याला माहित आहे की, कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, 1996, त्यानंतर लोकांच्या आग्रहास्तर विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम 1997, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम 1997, महाराष्ट्र तापी खोरे पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम 1997, महाराष्ट्र गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम 1998 या पाच अधिनियमांव्दारे आपण विविध पाटबंधारे विकास महामंडळाची निर्मिती राज्यात केली. कोकण आणि विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ वगळता बाकीच्या तीन पाटबधारे विकास महामंडळात सगळे प्रकल्प समाविष्ट केले आहेत तर कोकण आणि विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळांकडे निवडक पाटबंधारे प्रकल्प सोपविले आहेत. सुरुवातीला 8 ते 10 प्रकल्प विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडे सोपविले होते त्यानंतर वाढत वाढत त्यांची संख्या 90 पर्यन्त पोहोचली होती. कोकणातील काही प्रकल्प मुख्य अभियंता, मुंबई, मुख्य अभियंता, ठाणे या कार्यालयांच्या माध्यमातून करण्यात येत होते तर काही प्रकल्प कोकण पाटबंधारे विकास महामंडळाकडे होते. मधल्या कालावधीत पंतप्रधान पॅकेजमधून मिळणारा निधी, केंद्राकडील अेआयबीपी योजनेतून मिळणारा निधी येण्यास सुरुवात झाली. नंतर असे लक्षात आले आहे की, हा प्राप्त झालेला निधी जर पाटबंधारे विभागाकडे दिला तर तो 31 मार्चपर्यन्त खर्च करावा लागतो अन्यथा व्यपगत होतो. परंतु, जो निधी अेआयबीपीच्या माध्यमातून पाटबंधारे विकास महामंडळांना मिळाला त्यांना 31 मार्चची अट लागू नव्हती. त्यामुळे आर्थिक वर्ष संपल्यानंतर सुध्दा पुढील वर्षात हा निधी महामंडळ खर्च करु शकत होते. अेआयबीपी, विदर्भ पॅकेज, मराठवाडा पॅकेज, पंतप्रधान पॅकेज यामधून जवळ जवळ 2177 कोटी रुपये केंद्राकडून राज्याला मिळणार आहेत. जर आपण हे प्रकल्प विदर्भ सिंचन विकास महामंडळाकडे वर्ग केले नाही आणि हा निधी 31 मार्चपर्यन्त खर्च केला नाही तर ही सर्व रक्कम व्यपगत होण्याची शक्यता आहे. मधल्या कालावधीत खानदेश पॅकेजमधून 398 कोटी रुपयाचा निधी महामंडळाकडे सुपूर्द करण्यात आला, पण तो 31 मार्चनंतर व्यवपगत झाला नाही व त्यामुळे प्रकल्प न रेंगाळता सुरु राहिले. त्याचप्रमाणे ज्या प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख.....

मिळालेली आहे त्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करावयाची असते व त्यासाठी वित्त विभागाची परवानगी घ्यावी लागत होती. त्यामुळे विदर्भातील, कोकणातील अनुशेष पूर्ण होण्याच्या दृष्टीकोनातून अडचण निर्माण होत होती. या नवीन दुरुस्तीमुळे सर्वेक्षणाधीन प्रकल्प, बांधकाम झालेले प्रकल्प किंवा काम सुरु असलेले प्रकल्प, ज्यांना प्रशासकीय मान्यता मिळाली आहे अशा प्रकल्पांना नवीन अधिनियमातील बदलामुळे विकास महामंडळाकडे वर्ग करण्यात येणार आहे. त्यामुळे विविध विभागातील प्रकल्पांना गती मिळणार आहे. म्हणून माझी अशी विनंती आहे की, सर्व सन्माननीय सदस्यांनी या अतिशय चांगल्या दुरुस्तीला मान्यता द्यावी व विधेयक मंजूर करावे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.श्रीकांत जोशी यांनी 2/3 महत्वाचे मुद्दे या ठिकाणी उपस्थित केले आहेत.

यानंतर कुमारी जयश्री.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख.....

आपण असे म्हणालात की, जे प्रकल्प पाटबंधारे विभागाकडून महामंडळाकडे गेले ते या विधेयकाच्या 15 (अ) या क्लॉजखाली येतील परंतु ते प्रकल्प तसेच राहत असल्यामुळे महामंडळाकडे वर्ग होणार आहेत. यामध्ये जर काही लिगल डिस्प्यूटस झाले तर महामंडळ आपल्या स्तरावर कोर्टात जाईल व त्यामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही.

श्री.श्रीकांत जोशी : परंतु तसा काही 15 ब मध्ये उल्लेख केलेला नाही.

डॉ.सुनील देशमुख : 15 ब या क्लॉज अंतर्गत येणारे सर्व लिगल डिस्प्यूट्स महामंडळ आपल्या स्तरावर कोर्टात जाऊन सोडवेल.

श्री.श्रीकांत जोशी : आपण याबाबत कायदेतज्ज्ञांचा योग्य तो सल्ला घ्यावा व योग्य असेल तर माझी काहीही हरकत नाही. अन्यथा याप्रमाणे नवीन सुधारणा करणे आवश्यक आहे.

डॉ.सुनील देशमुख : सन्माननीय सदस्यांनी फिशरीच्या संदर्भात देखील प्रश्न विचारला होता त्यावर माझे असे म्हणणे आहे की, फिशरीच्या संदर्भातील काही अधिकार आपण मत्स्य विभागाला वर्ग केलेले आहेत. विदर्भातील अप्पर वर्ध्यासारख्या मोठया प्रकल्पातील फिशरीचे काही अधिकार मत्स्य विभागाला दिलेले आहेत तसेच काही अधिकार राज्यशासनाकडे राहतील. कडा विभागाचे जे काम आहे ते आता सरकार सोपे करणार आहे,त्यासंदर्भातील सर्व अधिकार शासनाकडेच राहतील याबाबत माझे काहीही दुमत नाही. वनजमीन मोबदला,भूसंपादन ,कामांचे प्रत्यक्ष निधी वितरण वगैरे या सर्व बाबी महामंडळाच्या स्तरावर होणार असल्यामुळे पूर्वीपेक्षा जलद गतीने कामे होतील. ब-याच लोकप्रतिनिधींची अशी मागणी होती की, विदर्भातील प्रकल्पाविषयीचे सर्व अधिकार सुध्दा पाटबंधारे विकास महामंडळाला देण्यात यावेत त्याला अनुसरुन ही अमेंडमेंट येथे आणलेली आहे. या निमित्ताने सर्व सन्माननीय सदस्यांना मी अशी विनंती करतो की, कृपया आपण ही सुधारणा पारित करावी.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश:विचारात घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1,संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ.सुनील देशमुख : महोदय, मी आपल्याला अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 10 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 10 संमत झाले आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. बुधवार,दिनांक 04 एप्रिल,2007 रोजी सकाळी 10.00 ते 11.45 वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक पुन: भरेल. सदर बैठकीमध्ये मराठी भाषेच्या प्रस्तावावर चर्चा होईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 7 वाजून 59 मिनिटांनी बुधवार,दिनांक 04 एप्रिल,2007 च्या सकाळी 10.00वाजेपर्यंत स्थगित झाली.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही